# माणूस



फेब्रुवारी १९६४

वर्ष तिसरे : अंक नववा

※

फेब्रुवारी १९६४

※

: संपादक :

श्री. ग. माजगावकर




## स्वरूपदर्शन

**व्यक्ती आणि वार्ता :**

गुड लक पतौडी : वि. ग. कानिटकर

वाङ्‌मयीन परिसंवाद : . . .

**कथा :**

सारी रात्र मेघ कोसळणार आहेत : मनोहर देखणे

**कविता :**

समीप, ढ, खूण : रमेश वैद्य

प्राण—रंग : के. उदयन्

दूरच्या त्या वाटेवर : कु. सुमन करमरकर

हे पांचाली : मधुसूदन गोखले

बाजार : सुरेश भट

माझे काचपात्रात : स. ज. कापसे

रातझड : राजा महाजन

वाकल्या माझ्या नभाला : श्रीकांत पुरोहित

**आख्यान :**

आणि मॅकमिलनचे तख्त कोसळले : रा. म. शास्त्री

**समीक्षा :**

आग्यामोहोळ (कादंबरी) : प्रा. सरदेशमुख

**विविध विषय विभाग :**

चित्रपट-परीक्षण : बहुरानी, फुल बने अंगारे, काय हो चमत्कार ! विदेशी चित्रपट, गंगाजळी इत्यादि.

**मुखपृष्ठ :** पतौडीचे नबाब

### सूचना

१. कथासाहित्य किंवा लेख पाठविताना सोबत टपालखात्याच्या नवीन नियमानुसार पुरेसे टपालहशील पाठवावे.

२. कविता पाठविताना, कविता नापसंत ठरून ती परत हवी असल्यास पुरेसे टपालहशील पाठवावे.

३. नापसंत साहित्य जर परत नको असेल तर केवळ निर्णय कळविण्यास पुरेसे टपालहशील पाठविल्यास निर्णय कळविण्यात येईल व असे साहित्य निकालात काढले जाईल.

४. प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

५. या मासिकात व्यक्त झालेली मते ' माणूस ' मासिकाच्या चालकांची अधिकृत मते असतातच असे नाही.

※

वार्षिक वर्गणी : आठ रुपये

किरकोळ अंक : एक रुपया

※

पत्रव्यवहाराचा पत्ता :

**' माणूस '**

४१९ नारायण पेठ, पुणे २

# गुड लक पतौडी

वि. ग. कानिटकर

भारतीय क्रिकेटचा गेल्या पंचवीस वर्षांचा इतिहास ज्यानी काळजी-पूर्वक अभ्यासिला आहे त्यांच्या लक्षात एक गोष्ट आली असेल; भारतीय संघाला कधीही योग्य नेता लाभलेला नाही. नेता लाभलेला नाही याचा अर्थ नेतृत्व करणारा खेळाडू संघात नव्हताच असा नाही. गंमत हीच आहे की प्रत्येक वेळी असा फॉर्म असलेला चतुरस्र खेळाडू संघात असताना कप्तानपदाची माळ मात्र अनपेक्षितपणे कुणीतरी कनिष्ठ प्रतीच्या खेळाडूने पळवलेली आहे.

## संस्थानिकांची मिरास

भारत जेव्हा स्वतंत्र झालेला नव्हता तेव्हा क्रिकेटच्या क्षेत्रात संस्थानिकांची मिरासदारी होती. क्रिकेट खेळाडूंना जो राजाश्रय होता तो संस्थानिकांच्या पदरी होता, त्यामुळे संपूर्ण वेळ खेळाला देणारे खेळाडू–इंदूर, बडोदे आदि संस्थानातून भारताला उपलब्ध झाले. या व्यतिरिक्त धनिकांच्या मुंबईत असाच आश्रय काही गिरणीमालकांनी आणि कारखानदारांनी नोकरीच्या रूपाने काही खेळाडूंना उपलब्ध केल्यामुळे काही खेळाडू हे मुंबई शहरातून फक्त उदयाला आले. संस्थानिकांनी भारतीय क्रिकेटवर हे जे उपकार केले ते अर्थातच कुणाला विसरता येणार नाहीत. परंतु याचबरोबर या संस्थानिकांनी वर्षानुवर्षे भारतीय संघाच्या नेतृत्वाचा हव्यास धरून क्रिकेटचे जे नुकसान केले, त्याचीही नोंद केली पाहिजे. हा हव्यास किंवा हट्ट भारत पारतंत्र्यात असतानाच क्रिकेटभक्तानी पुरा केला. कारण भारतीय संघाचा परदेशातील खर्च किंवा परदेशी खेळाडूंचा भारतातील खर्च हा आतबट्ट्याचा व्यवहार हे संस्थानिकच भागवीत असत.

'युवराज ऑफ पतियाळा' म्हणजे हल्लीचे पतियाळाचे महाराज यांनी अशा रीतीने रायडरच्या नेतृत्वाखाली एक ऑस्ट्रेलियन संघ भारतात आणला होता. अर्थात भारतीय संघाचे कप्तान होते–हेच महाराज ! मर्चंट, अमरनाथ आदि मंडळी याच्याच नालायक नेतृत्वाखाली त्यावेळी सामने खेळली.

हल्ली रेडिओवर ज्याचा आवाज ऐकला की पळून जावेसे वाटते ते विजयनगरचे महाराज (Vizi) यांनी असाच एक भारतीय संघ इंग्लंडला नेला होता. याच संघात सी.के.; अमरनाथ आदि मंडळी होती. अमरनाथ त्यावेळी ऐन जोमात होता. तरुण होता. या लहरी कप्तानाशी त्याचा खटका उडाला. आणि अमरनाथला अर्थातच दौऱ्यातून शिस्तभंगाच्या नावाखाली इंग्लंडमधून भारतात हाकलून देण्यात आले. चौकशी झाली. अमरनाथला शिक्षा झाली; आणि दौरा गाजला तो या भांडणामुळे आणि ह्याच्याच वृत्तपत्रीय चर्चेमुळे.

१९३९ पूर्वी अशी परिस्थिती होती. मग महायुद्धामुळे क्रिकेटला अवकळा आली. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. संस्थाने विलीन झाली. क्रिकेट खेळाडूंची ही "मायबापे" फक्त तनखा खाऊ लागली आणि त्याचबरोबर संस्थानिकांचे भारतीय क्रिकेटवरील वर्चस्व उखडले जाऊ लागले. आता फक्त आकाशवाणीवर विझीच आमचा सूड घेत आहेत–तेवढेच !

## अमरनाथचे नेतृत्व

भारतीय क्रिकेट स्वतंत्र भारतात थोडे थोडे बाळसे धरू लागले. परिणामी चारच महिन्यांनी जो भारतीय संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर गेला त्याचे कप्तानपद इंग्लंडमध्ये एकदा बदनाम झालेल्या लाला अमरनाथच्या गळ्यात पडले. याच्याच कप्तानपदाचा डॉन ब्रॅडमन यानी आपल्या चरित्रात गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे.

भारतात परतल्यावर गोडार्डच्या नेतृत्वाखाली वेस्ट इंडीज संघ भारतात आला. भारतीय क्रिकेटच्या तोपर्यंतच्या इतिहासात अत्यंत रोमांचकारी सामना याच दौऱ्यात मुंबईला झाला. मुंबईला पाचवा कसोटी सामना सुरू झाला तेव्हा भारताने फक्त एक सामना गमावलेला होता व तीन अनिर्णीत राहिले होते. अमरनाथने हा सामना जिंकण्याचा महान प्रयत्न केला. जोशी नावाच्या पंचाने अखेरच्या क्षणी उडालेल्या गोंधळात १॥ मिनिट शिल्लक असताना व अखेरच्या षटकांतील एक चेंडू बाकी असताना खेळ थांबवण्याचा मूर्खपणा केला नसता तर या सामन्याची अखेर कदाचित भारताच्या विजयात होऊ शकली असती. अमरनाथच्या या सामन्यातील नेतृत्वाने भारतीय खेळाडूंत उत्साहाचे वारे संचारले. अमरनाथने या सामन्यात यष्टिरक्षण केले. (कारण सेन जखमी झाला होता.) धावा काढल्या. उत्तम नेतृत्व केले. फडकर–गुलाम अहमद यानी वेस्ट इंडीज संघाला रडकुंडीला आणले. त्यापूर्वी हजारेने शतक केले (१२२). मोदींनी ८६ धावा केल्या. नेतृत्व काय चमत्कार करू शकते, याचा हा सामना म्हणजे एक पाठच होता.

संघाचे नेतृत्व यथावकाश अमरनाथ याच्या नेतृत्वाखाली खेळलेल्या विजय हजारे यांचेकडे आले. १९५३ साली हजारे याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ वेस्ट इंडीजच्या दौऱ्यावर गेला. त्यापूर्वी इंग्लंडचा दौरा हजारे यांच्याच नेतृत्वाखाली पुरा करण्यात आला. १९५३ सालच्या दौऱ्यात विजय हजारे दि. ४ एप्रिल १९५३ ला आपला शेवटचा कसोटी सामना खेळले. हजारे याच्या नेतृत्वासंबंधी सर्वांनीच समाधान व्यक्त केलेले होते. या दौऱ्यात वेस्ट इंडीजसारख्या बलाढ्य संघाबरोबर चार सामने अनिर्णीत ठेवण्यात हजारे याना यश आले. एक सामना–दुसरा कसोटी–सामना मात्र–भारताने गमावला. या वेळी एका टीकाकाराने सूचक वाक्य लिहिलेले आहे–

"Hazare and his men returned empty handed, but they had left a great impression as a team of fine cricketers."

आपला संघ–संघ म्हणून एकजीव वाटावा एवढे दृश्य निर्माण करण्याचे कसब नेत्यांच्या ठिकाणी असलेच पाहिजे. आणि विजय हजारे याच्या अमरनाथशी तुलना करता–संथ वाटणाऱ्या नेतृत्वात हा गुण निश्चित होता.



चंदू बोर्डे

## उमरीगरची शोकांतिका

विजय हजारेनंतर नेतृत्वाची जबाबदारी आणखी एका चतुरस्त्र खेळाडूकडे आली. तो खेळाडू म्हणजे पॉली उमरीगर ! इंग्लंडमध्ये मार खाऊन इअॅन् जॉन्सन् यांच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियन संघ घरी परतताना भारतात तीन कसोटी सामने खेळला. या तिन्ही सामन्यांत नेतृत्व उमरीगरकडेच होते. या तीन सामन्यांत उमरीगरने मांजरेकरच्या खालोखाल म्हणजे क्रमांक दोनने आपली धावसंख्या राखलेली होती. यातील दोन सामने भारताने गमावले. परंतु त्याला उमरीगरचे नेतृत्व कमी पडले हे कारण नव्हते. लिंडवॉल, हार्वे, मकाय, बेना, बर्ज, मॅकडोनल्ड यांसारखे रथी–महारथी ऑस्ट्रेलियन् संघात होते.

ऑस्ट्रेलियन संघ नोव्हेंबर १९५५ मध्ये भारतीय संघाला हादरवून परत गेला व गेरी अलेक्झांडर यांच्या नेतृत्वाखाली वेस्ट इंडीज संघ नोव्हेंबर १९५८ मध्ये भारतात आला. या दौऱ्याच्या वेळी नेतेपदाशी खेळण्यास निवडसमितीने सुरवात केली. या खेळात निवडसमितीचा खेळ झाला आणि भारतीय क्रिकेटचा नसलेला जीव मात्र अधिक अर्धमेला झाला.

पहिल्या कसोटी सामन्यात उमरीगर कप्तान होता. पहिला सामना अनिर्णीत राहिला. उमरीगरने पहिल्या डावात ५५ व दुसऱ्या डावात ३६ धावा केल्या. या सामन्यात गुलाम अहमद निवडला देखील गेला नव्हता—!

आणि दुसरा सामना नागपूरला १२ डिसेंबरला सुरु झाला तेव्हा कप्तानपद गुलाम अहमदच्या स्वाधीन केलेले ! बिचारा उमरीगर— संघात इतर दहांत एक ! या सामन्यातही उमरीगरने ५७ व ३४ धावा केल्याच. गुलाम अहमदने ४० षट्के टाकली. ११० धावा दिल्या आणि गडो बाद केले ० ! सामना भारताने गमावला.

तरीही कलकत्त्याच्या सामन्यात कप्तानपद पुन्हा गुलामकडेच राहिले. हा सामना वेस्ट इंडीजने एक डाव ३३६ धावांनी जिंकला. भारताच्या पहिल्या डावात फक्त १२४ धावा झाल्या. त्यात उमरीगर नाबाद ४४ होत्या.

मद्रासला २१ जानेवारी १९५९ ला चौथा सामना सुरु झाला. गुलामला डच्चू मिळाला. आता एकदम विनू मंकडवर निवडसमितीचे मन बसले. सामना भारताने गमावला.

पाचवा सामना नवी दिल्लीला ६ फेब्रुवारी १९५९ ला सुरु झाला. आता मंकडला निवड समितीने हाकलले, एकदम हेमू अधिकारी गादीवर आला. सामना अनिर्णीत राहिला.

ही निवड समिती नेमके काय करीत होती याचा उलगडा कधी कुणाला झाला नाही. उमरीगरला कप्तानपदावरून काढण्याची आधी जरुरी नव्हती. बरे त्याला काढला त्या पूर्वी नवा नेता तरी शोधलेला होता का ? मग गुलाम अहंमद, मंकड, अधिकारी यांची वरात काढली—

## बोर्डे-नाडकर्णींचा उदय

परंतु १९५८–५९ सालच्या या सामन्यात एक नवीन खेळाडू नाव कमावून बसला. तो म्हणजे प्रथम महाराष्ट्रातून रणजी करंडक सामन्यांत पुढे आलेला चंदू बोर्डे. वेस्ट इंडीजविरुद्ध पहिल्याच सामन्यात ७ धावा काढून बिचारा धावचीत झाला ! आणि दुसऱ्या डावात त्याला खेळायलाच मिळाले नाही. दुसऱ्या सामन्यात त्याने अनेकदा भोपळा काढला आणि दुसऱ्या वेळी १३ धावा केल्या. तिसऱ्या सामन्यात त्याला गाळण्यात आले. चौथ्या सामन्यात त्याने ५६ धावा केल्या. पाचव्या सामन्यात कुणीतरी आजारी पडले म्हणून बोर्डेला पुनः संधी मिळाली. या सामन्यात बोर्डेने पहिल्या डावात १०९ व दुसऱ्या डावात ९६ धावा करून ही अखेरची संधी कमालीच्या बाहेर राबवली.

हे घडेपर्यंत भारतीय कसोटी खळाडूंत नाडकर्णींचा समावेश झालेला नव्हता; व पतौडीच्या नबाबांना मुलगा आहे व तो बऱ्यापैकी खेळतो याची गंधवार्ताही भारतीय क्रिकेटप्रेमींना नव्हती ! !

या मालिकेत फलंदाजीत उमरीगरची सरासरी ४८ व बोर्डेची ४० पडून त्यांचे क्रमांक एक व दोन असे लागले. रॉय, रामचंद, कॉन्ट्रॅक्टर आदि मंडळी पार खाली होती.

१९५९ साली भारतीय संघ इंग्लंडला निघाला. यावेळी कप्तानपद एक तर उमरीगरकडे किंवा रामचंदकडे द्यायला हवे होते, परंतु पुनः एक संस्थानिक आड आले. बडोद्याचे महाराज या संघाचे मॅनेजर झाले आणि कुठून काय कळ फिरली, कप्तान झाले डी. के. गायकवाड ! या गायकवाडांना आपली वासरे आवरता आली नाहीत आणि चार भारतीय खेळाडूंवर शिस्तभंगाचे इलाज करावे लागले. वस्तुस्थिती अशी होती की निवड समिति माथी मारील ते नेतृत्व बिनतक्रार सहन करायला क्रिकेटचा संघ म्हणजे काही लष्करी तुकडी नाही ! नेतृत्व हे संघातील कुणाही खेळाडूला आदराचे स्थान वाटावे असे भक्कम आणि आव्हान देण्याला अशक्य असले पाहिजे. गायकवाडांमध्ये ही धमक होती का ? त्यांना नेतृत्व बहाल केले नसते तर दौऱ्यावर त्यांची निवड होण्याची मारामार होती. मग दौऱ्यात जे व्हायचे ते झाले. पुन्हा नेतृत्वाचाच हा गोंधळ ! या दौऱ्यात ठळकपणे पुढे आले ते पुन्हा उमरीगर व कॉन्ट्रॅक्टरच ! !

इंग्लडमध्ये पराभूत होऊन गायकवाड परतले ते एकदम संघाबाहेरच फेकले गेले. बेनॉने जो ऑस्ट्रेलियन संघ १९५९ ला भारतात आणला त्याच्याविरुद्ध पहिल्या कसोटी सामन्यात नेतृत्व मिळाले गुलाबराय रामचंदला ! उमरीगर का नाही ? उत्तर नाही ! ! या सामन्यात उमरीगरने सर्वांत जास्त म्हणजे चार गडी बाद केले. परतु रामचंद हा धडाडीचा कप्तान आहे असा तरी अनुभव होता. पुढचा कानपूरचा सामना रामचदच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने जिंकला, (जसू पटेल यांना खरे म्हणजे या एकुलत्या एका चमत्कारावर 'भारतरत्न'च पदवी मिळायची, परतु कुणीतरी सामान्य डोक्याच्या दिल्लीश्वराने फक्त 'पद्मश्री'च दिली ! दिल्लीश्वराच्या या उतावळेपणाला हसावे की रडावे हेच कळत नाही ! )

या मालिकेत यानंतर रामचदला हाकालण्याचे धैर्यच निवडसमितीला झाले नाही. नाहीतर त्यांनी आणखी दोन नव्या खेळाडूंचे " मामा " करून दाखवले असते !

या कसोटी मालिकेत चंदू बोर्डे याने बापू नाडकर्णीच्या जोडीने स्पिनर म्हणून नाव कमावले. उमरीगरने बोलिंगच्या सरासरीत अग्रस्थान मिळविले.

## कप्तानपदाचे नवे कॉंट्रॅक्ट

१९६०–६१ या कालात फाजल महमदच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानचा क्रिकेटसघ भारताच्या स्वारीवर आला.

निवडसमिती नेता-निवडीला बसली. रामचद रद्द झाला आणि एकदम नरी कॉन्ट्रॅक्टरचे निवडसमितीने चुबन घेतले ! वृत्तपत्रातून 'आता पुढची दहा वर्षे भारताला कप्तान शोधायला नको' असे बोलले गेले. बिचारा उमरीगर आता कॉन्ट्रॅक्टरच्या नेतृत्वाखाली खेळू लागला !

पाठोपाठ १९६१ साली टेड डेक्स्टरच्या नेतृत्वाखाली इंग्लिश संघ भारतात आला. मे, काउड्री, ट्रूमन, स्टॅथम यासारखे मोहरे न आणता जणू भारताची गमत करण्याकरतां हा सघ इथे आला. पण देसाई, बोर्डे, दुराणी, नाडकर्णी, उमरीगर यानी डेक्स्टरच्या संघाचा कलकत्ता व मद्रास येथे पराभव करून कॉन्ट्रॅक्टरचे नेतृत्व शुभशकुनाचे ठरवले.

१९६२ च्या जानेवारीत वेस्ट इडीजमध्ये जो भारतीय सघ निघाला त्याचे नेतृत्व ओघानेच कॉन्ट्रॅक्टरकडे आले. उमरीगरला नेतृत्व द्यायचेच नाही असे ठरल्यानंतर निवडसमितीला या बाबतीत घोटाळा करण्याची सधिच यावेळी मिळाली नाही. आता प्रश्न आला उपनेतेपदाचा !

एकतर यावेळी उपनेतेपद बोर्डे किंवा नाडकर्णी यापैकी एकाला मिळायला हवे होते. परतु निवडसमितीला शोध लागला—

पतौडीचे छोटे नवाब इग्लडमध्ये आपल्या वडिलाप्रमाणेच क्रिकेटमध्ये पराक्रम करीत आहेत ! आता संस्थानिक असल्यामुळे पतौडी इंग्लंडमध्ये पराक्रम करीत होता हा काय बोर्डेचा दोष ? उलट स्वतःच्या पराक्रमावर बोर्डे इग्लडमध्ये सन्मानाने कौंटीकडून पाठविला गेला होता. तेव्हा बोर्डेला मागे सारून पतौडीच्या नवाबाला या दौऱ्यावर उपनेतेपद बहाल करण्याची निवडसमितीला काही गरज होती का ? पण मग ती भारतीय निवड समिती कुठली ? झाले ! पतौडीचे नवाब उपनेते झाले.

भारत–विंडीज सामन्याची समग्र इकीकत यापूर्वी ( माणूस, जून–जुलै १९६२ ) वाचकांना सादर केली गेली आहे. तिथे खेळल्या गेलेल्या पहिल्या दोन सामन्यात कॉन्ट्रॅक्टर कप्तान होते. या दोन्ही सामन्यात नबाब खेळले नाहीत. कारण ते आजारी होते.

## नबाब बरे झाले !

तिसरा सामना सुरू होण्यापूर्वी बार्बाडोस सघाविरुद्ध खेळताना कॉन्ट्रॅक्टर जबर जखमी झाले आणि नवाब मात्र सुदैवाने बरे झाले !

तिसऱ्या कसोटी सामन्यापासून पुढील तीनही सामन्यात पतौडीचे नवाबच कप्तानपदी होते. हे तीनही सामने भारताने गमावले. तरी पण या सामन्यांच्या धावाच्या सरासरीकडे लक्ष टाकले तर काय दिसले—क्रम असा लागला.

उमरीगर, नाडकर्णी, दुराणी, सुरती, बोर्डे, मेहरा, इजिनिअर, पतौडी !

याशिवाय गोलंदाजीत उमरीगर, नाडकर्णी, दुराणी व बोर्डे यांनी पराक्रम केले ते निराळेच.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, की वेस्ट इडीजच्या दौऱ्यावर उपनेतेपदासाठी सर्वात लायक कुणी असले तर नाडकर्णी–बोर्डे हेच होते.

परतु झाले ते झाले! पतौडीचे नवाब उपनेतेपदी आले. त्याचे क्षेत्ररक्षण फार सुरेख झाले असे सागितले जाते. ही त्याच्या जमेची बाजू.

सध्या भारतात दौऱ्यावर असलेला इग्लडचा संघ भारतात येण्याचे वेध जेव्हा लागले तेव्हा कॉन्ट्रॅक्टरने असे जाहीर केले की कसोटी सामने खेळण्याइतपत आता तो चांगला बरा झालेला आहे. परंतु निवडसमितीने कॉन्ट्रॅक्टरकडे का दुर्लक्ष केले ? तो सध्या फॉर्ममध्ये नाही हे उत्तर चालणार नाही ! पीटर मेने ज्या ज्या वेळी इग्लंडचे नेतृत्व केले तेव्हा तो काय फॉर्ममध्ये होता ? नेतृत्व हे नुसत्या फॉर्मवर अवलंबून नाही. तर सातत्य महत्त्वाचे असते. अनुभव महत्त्वाचा असतो. शिवाय वैयक्तिक पराक्रम करून आपले वजन नेत्याने राखावे लागते.

अर्थात् पर्यायाने झाले काय तर कप्तानपद पतौडीच्या नवाबाकडे आता आलेले आहे. ही निवड जाहीर होण्यापूर्वी नेतृत्व नाडकर्णीना द्यावे की बोर्डेंना द्यावे, याची घनघोर चर्चा वृत्तपत्रातून सुरू होती. या चर्चेचा अभ्यास केला तर हे लक्षात येईल की बोर्डे किंवा नाडकर्णी हे आजच नव्हे तर यापूर्वीच उपनेतेपदाला लायक असताना त्यांना डावलण्यात आलेले असल्यामुळे त्याच्या नावाने आता हाकाटी करण्यात अर्थ नव्हता. यावेळी झाले ते योग्यच झाले आहे. कारण पुनश्च पतौडीच्या नवाबाना काढून नेतृत्वाचा खेळखडोबा करण्यात अर्थ नव्हता.

पहिला कसोटी सामना अनिर्णीत रीतीने संपला आहे. दुसरा, हा अंक हाती पडण्यापूर्वी संपलेला असेल. या दोन्ही सामन्यात पतौडीच्या नेतृत्वाचा कस लागेल. यावेळी निवड समितीने फक्त दोनच सामन्याकरता पतौडीच्या नवाबाना कप्तान करून पुनः एकदा पूर्वीप्रमाणे भारतीय क्रिकेटचे हाल करण्याचे ठरवले आहे की काय ? सुदैवाने तसे होऊ नये. पाचही सामने आता एका नेतृत्वाखालीच होऊ द्यावेत. विचार एकदाच करावा व ठाम करावा आणि घोडे मध्येच बदलू नये एवढीच निवड समितीकडून भारतीय क्रिकेटशौकिनाची अपेक्षा आहे. या गोष्टीचे महत्त्व पटावे म्हणून हा पूर्वेतिहास मुद्दाम उलगडला आहे.

गुड लक पतौडी !



# "हाले चैतन्याचे चाक"

—सर्व संकटे, अडथळे दूर सारून
लोकशाही समाजवादाच्या
दिशेनें प्रगतीची वाटचाल झाली पाहिजे.
आज आपण जो मार्ग चोखाळतो आहोत
त्यावरील आपल्या निष्ठेचा पुनरुच्चार करु या.
विषमता व अन्याय ह्यांना मूठमाती दिली पाहिजे.
वैयक्तिक स्वातंत्र्य, निष्ठा, प्रामाणिकपणा
आणि कार्यक्षमता हाच जेथें मानदंड
मानण्यात येईल अशा समाजाची
आपणाला भारतात उभारणी
करावयाची आहे त्याची आठवण राहूं द्या.

## ... ध्येयाच्या दिशेने आगेकूच करू या

प्रसिद्धि संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

मराठीतील वाङ्मयप्रकारातील नवी वळणे, विकास, दिशा यांची जाणीव सर्वसामान्य वाचकाला व्हावी या उद्देशाने पुणे येथील शाहू मंदिर महाविद्यालयाच्या वाङ्मयमंडळाच्या वतीने काही दिवसांपूर्वी एक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती.

या मालेचे संयोजन प्रा. आनंद यादव याचेकडे होते व त्यात प्रा. अनुराधा पोतदार, प्रा. स. चि. भावे, प्रा. विद्याधर पुडलिक, प्रा. शं. गो. साठे व प्रा. चंद्रकुमार डांगे या साहित्यिक वक्त्यांची भाषणे झाली. यातील कथा, नाटक व कविता हे विषय ' माणूस 'च्या कक्षेतील असल्याने या तीन विषयावरील व्याख्यानांचा सारांश पुढे दिला आहे—सं.

## १ : कथा

# ललित-लेखकाने सामाजिक श्रद्धांचा कैदी होऊ नये

आजची कथा ही पूर्वीच्या कथेहून वेगळी वाटते. कारण तिच्याविषयी आज नव्याने विचार होताना दिसतो. ती कित्येक वेळा समजत नाही, म्हणून तिच्यावर टीका केली जाते. तिचा नवा वाचक-वर्ग निर्माण झाला आहे. तथापि जुनाही वाचक-वर्ग अजून अस्तित्वात आहे.

तिचा वेगळेपणा हा महत्त्वाचा आहे. नवतेत वेगळेपणा असतो. वेगळेपणा म्हणजे संपूर्ण नवेपणा नव्हे. कथाकार नवे असतील, पण कथा नवी असेलच असे म्हणवत नाही.

साहित्याची एक पहिली कसोटी आहे. एकच सनातन भेद आहे. चागले काय आणि वाईट काय, हा तो भेद.

कथेमध्ये जो वेगळेपणा आलेला आहे तो एका विशिष्ट साधनामुळे घडून आलेला आहे. जीवनातील अनुभवाचा विकास साहित्यात दिसतो. हा अनुभवाचा विकास व तो व्यक्त करण्याची पद्धती यामुळे आजची कथा नवी झाली आहे.

जुनी कथा घटनाप्रधान होती. घटनाप्रधान कथेतही मनोविश्लेषण करता येते. पण मराठीतील घटनाप्रधान कथेने तसे केले नाही; वास्तविक कोणत्याहि कथेला वळण लावण्याचे सामर्थ्य असेल तर ती निर्णायक व संपूर्ण होऊ शकते.

निकष हा घटना वा विश्लेषण यावर नसतो. पण दुर्दैव असे की मराठीत चांगल्या घटनाप्रधान कथा नाहीत.

अनुभवांचा वेगळ्याप्रकारे विकास करता येऊ शकतो ही जाणीव नव्या कथाकाराना झाली आहे. तसेच लेखकाना कमालीचे स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यामुळे कलात्मक साहस येऊ लागले. ही वैशिष्टचे भावे, गाडगीळ, गोखले, कमल देसाई, शंकर पाटील यांच्या कथातून दिसू शकतात.

नवकथा अतिशय सूक्ष्म अनुभव पकडणारी झाली आहे. म्हणून ती वाचली पाहिजे. ती सागता येणार नाही. अर्थात् तिचा वेगळेपणा हा परपरेपासून तुटलेला नाही; तसा तो कधी तुटत नसतो.

ललितलेखकाने सामाजिक श्रद्धांचा कैदी होऊ नये. भावे आणि गोखले याच्या कथात अशा श्रद्धाचा बाधिलपणा दिसतो. वास्तविक लेखकाजवळ फक्त दृष्टिकोन असावा. श्रद्धा, मूल्य इत्यादि गोष्टीना त्याने कवटाळू नये.

नवकथांमध्ये जी. ए. कुलकर्णी याची कलात्मक निष्ठा उग्र आहे. त्यांच्या कथेला रग एकच आहे पण तो चागला गडद आहे.

कमल देसाई यांचे असेच आहे. गाडगीळ यांच्या कथात विविधता आहे. अनेक पातळीवरून ते अनुभव घेऊ शकतात. माडगूळकराच्यापेक्षा शकर पाटील यांच्या ग्रामीण कथा वेगळ्या पातळीवरून घडपड करतात. त्या कधी यशस्वी तर कधी अपयशी होतात. मिरासदार याच्या कथात शक्यता फार होत्या. त्यानी विकसित स्वरूपात विनोद आणला. पण त्या विनोदाला नंतर त्यांनीच खाली आणले. पुढे त्यानी चुटके लिहिले. जीवन-शोध सपला. मराठी नव्या कथेचे स्वरूप थोडक्यात असे आहे.

—प्रा. विद्याधर पुंडलिक

## २ : कविता

# नवकवितेत मर्ढेकरांचे पोकळ अनुकरण फार

मर्ढेकरांच्या सप्रदायातील नवकविता जन्माला यायला अनेक कारणे आहेत. दुसऱ्या महायुद्धानतर प्रस्थापित जीवनमूल्ये उध्वस्त झाली. केवळ बुद्धिवाद पाठीमागे पडला. समाजात अनास्था आणि एकप्रकारचा निराशावाद जन्माला आला. ही जागतिक आणि पर्यायाने सामाजिक परिस्थिती कारणीभूत झाली आहे. तसेच मराठी वाङमयातही साकेतिकतेचा अतिरेक झाला होता. ही वाङमयीन परिस्थितीही नवकविता जन्माला घालायला कारणीभूत आहे. मर्ढेकरानी अर्थात् यामुळेच नवकवितेला जन्म दिला.

मर्ढेकराच्या मागून अनेक कवीनी या नव्या दिसणाऱ्या कवितेचे पोकळ अनुकरण केले. या अनुकरणात समजसपणापेक्षा नवेपणाचा हव्यास होता. म्हणून मर्ढेकरांच्या काव्यात जाणवणारी दुर्बोधता या अनुकरणवाद्यांच्या कवितेत जास्त प्रमाणात आली. वास्तविक ही अनुकरणातून आलेली दुर्बोधता उपरी आहे.

नवकाव्यात आलेली प्रतिमा वास्तविक तशी अपरिचित नाही. पण काव्यातील तिचा मूळ हेतूच बदललेला असल्याने त्या अपरिचित वाटतात. आज ह्या प्रतिमा काव्यातील साम्य-भेद, अलकरण, शोभा वाढविणे इ. हेतूंनी काव्यात येत नसून, सेंद्रिय पातळीवरच्या गतिमान अनुभवाना व्यक्त करण्यासाठी येतात. (म्हणजे अनुभवातील सवेदना, भावना व विचार याना त्या एकसमयावच्छे-

देकरून पकडू इच्छितात.) त्यामुळे आशय समृद्ध होतो; असा अनुभव आहे. ह्या प्रतिमेचा पुरस्कार आजच्या कवींनी केला.

ह्याच प्रतिमेने काही कूट प्रश्न निर्माण केले. अनेक प्रकारचे अपरिचित सकर तिच्यात होताना दिसतात. शिवाय प्रतिमा-विश्वात आज खूप वाढ झालेली आहे. यामुळेही दुर्बोधता आलेली आहे. शिवाय आजच्या कवीनी काव्यातील सवादाचे महत्त्व नाकारले आहे त्यामुळेही काव्यात दुर्बोधता येत आहे. अशा प्रकारच्या दुर्बोधतेचे कारण कळू शकते. पण अनुकरणवाद्यानी आशयाच्या अभावामुळे, न कळलेल्या चिंतनामुळे जे दुर्बोधतेचे आवरण घेतलेले आहे, ते मात्र लटके आहे.

नवकवीनी मराठी वाङमयाला अनेक चागल्या गोष्टी दिलेल्या आहेत. भाषेचा मुक्तपणे वापर करायला त्यानी शिकविले. त्यांनी साकेतिकता मोडून काढली. भाषा अधिक भेदक केली. तिला रेखीवपणा आणला. भाषेचा अर्थ, शब्दाचा नाद, छंदांतील लय या शक्ती त्यानी जास्तीत जास्त उपयोगात आणल्या. जाणीव आणि सवेदना याचे क्षेत्र अधिक व्यापक आणि सखोल केले. मर्ढेकर, करदीकर, बापट, पाडगावकर हे नवकवीच असले तरी यांच्या जाणीवा वेगवेगळया आहेत. सूक्ष्म आहेत. इंदिराबाईंनी तर आपल्या कवितेला एकच एक स्थायीभाव दिला आहे. एकच एक स्थायीभाव असल्यावर दोन परिणाम दिसून येतात. पहिला म्हणजे एकसुरीपणा व त्यामुळे कंटाळवाणा पाल्हाळ निर्माण होतो. आणि दुसरा म्हणजे एकाच स्थायीभावामुळे कवितेचे सामर्थ्य वाढते. इदिराबाईंच्या कवितेचे अशा प्रकारचे सामर्थ्य वाढलेले आहे. एकच एक भावना त्यानी वेगवेगळ्या प्रतिमांद्वारा व पातळ्यांवरून व्यक्त केलेली दिसते. बोरकर-कुसुमाग्रज यांच्या नावांचाही यावेळी आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यानीही नवकवितेत मोलाची भर घातली आहे.

—प्रा. अनुराधा पोतदार

## : ३ : नाटक

# आजचे नाटक जीवनातून आलेले आहे

आज रंगभूमीला वाईट अवस्था आलेली आहे, असे म्हणता येत नाही रंगभूमीवर आज जेवढी टीका केली जाते तेवढी टीका इतर कशावरही होत नाही. आज नाटकाचे भरघोस पीक दिसून येते. टीकाकार व नाटककार भरपूर दिसतात.

पूर्वी नाटककार, टीकाकार, प्रेक्षक विद्वान असत. त्याचे मत ग्राह्य मानले जात असे; आज तशी अवस्था नाही. अर्थात ही गोष्ट चागली आहे. तसेच पूर्वीच्या लोकांचे असे मत आहे की आजच्या नाटकात रसोत्कर्ष नाही. नव्याचे आग्रही तितक्याच जोराने सागतात की आजचेच नाटक जास्त प्रामाणिक आहे. कारण सातत्य, संयम, वास्तवता इ. गोष्टी आजच्या नाटकात आहेत.

असे झाले तरी जुन्या-नव्या नाटकांत अनेक साम्यस्थळे आहेत. नव्या नाटकांत रुपातरिता बरीच आहे. पाश्चात्यांची छाप आहे. जुन्यांतही हे दिसून येते. रंगभूमीविषयीचे वाद हे पूर्वीपासूनचे आहेत. स्त्रियानी कामे करावीत किंवा नाही; संगीताच्या प्राबल्याविषयीचे वाद, ऊर्दू, फारशीमधून चाली आणणे इ. गोष्टी दिसून येतात. आज नावीन्याची कल्पना वेगळी आहे. परिस्थितीमुळे ती बदलत गेली आहे एवढेच.

पण नव्या नाटकात नाटकाबद्दलचे सकेत बदललेले आहेत. पूर्वीच्या नाटकात बोध, आदर्श याचा प्रभाव होता. सत्याचा, सद्गुणांचा जय; असत्याचा, दुर्गुणांचा पराभव; इ. कल्पना होत्या, पण नव्या नाटकात हे सकेत नाहीत. पूर्वी कथानकाचा सांगाडा ठरलेला होता. सुखान्तिका व शोकान्तिका हे स्थूल आडाखे ठरलेले होते. ते आता बदलले. त्यातून नाटककार बाहेर पडले. लेखकांच्या दृष्टिकोणातही फरक पडला. हा फरक परिस्थितीमुळे पडला.

दुसऱ्या महायुद्धात प्रस्थापित जीवनमूल्ये उध्वस्त झाली. आपण ती गमावून बसलो. वैफल्य आले. तरीही 'मी' ची धडपड आहे. हा "मी"पणा सापडेल असे काहीना वाटते तर काहीजण "मी"ची फक्त राख चिवडतात. याचे दर्शन आजच्या नाटकात दिसून येते. म्हणून आजचे नाटक जीवनातून आलेले आहे, असे म्हणावेसे वाटते; पूर्वीचे नाटक मात्र रंजकतेच्या पातळीवर जुळविले जात असे.

पूर्वीच्या नाटकाचे माध्यम स्वतंत्र होते. पूर्वीच्या बोलपटांवर नाटकाचा परिणाम दिसून येत होता. पण आज उलटे झाले आहे. नाटकांवर बोलपटांचा परिणाम होत आहे. लाइट इफेक्ट करणाऱ्याला आज महत्त्व प्राप्त झाले आहे. पश्चिमेकडील नव्या लाटा आज वरचेवर येत आहेत. (पूर्वी शेक्सपिअर आम्हांला बरेच दिवस पुरला) त्यामुळे जुन्या-नव्यांत प्रेक्षक आज गोंधळलेला आहे. त्याला नाटक आकलन करून घ्यायला उसंतच मिळत नाही. आणि नाटककार तर एक प्रयोग करून लागलीच पुढे जातो. आणि प्रेक्षक मागेच पडतो. दोघांतील अंतर त्यामुळे वाढले. म्हणून प्रेक्षकाचा गैरसमज झाला. आणि दिग्दर्शकाच्या तर प्रेक्षकांकडून आज मोठमोठ्या अपेक्षा आहेत.

गैरसमज व्हायचे आणखी एक कारण म्हणजे अलीकडच्या कलावंतांमध्ये धोक्याची जबाबदारी (Risk) घेण्याची वृत्ती जास्त आहे. ती ते उघड्या डोळ्यानी घेतात. त्याना त्यांतील अपयशाचाही वाटा मग पत्करावा लागतो, अर्थात त्यानी ते गृहीत धरले आहे. पण यशापेक्षा अपयश नेहमी उठून दिसते

जुन्या-नव्याचे समिश्रण करणारेही आज दिसून येतात. आजच्या नाटकाची खोली वाढली, असे मात्र सांगता येत नाही. पूर्वी नावीन्याची कल्पना एका व्यक्तीची असे. आज ती सामुदायिक झाली. लेखक, दिग्दर्शक, नट, पडदेवाले सर्वच नावीन्याला मदत करीत आहेत. त्यामुळे प्रेक्षकाला अनक तऱ्हेच्या नावीन्याला तोंड द्यावे लागते.

जुन्या-नव्याचे पंथ ( Schools ) ठरले आहेत; प्रेक्षक मात्र तोच आहे. परंतु नवा प्रेक्षक तयार करण्याची धडपड चालू आहे. पण ती अजून यशस्वी होत नाही. नवा प्रेक्षक तयार करावयाचा असेल तर, नवे नाटक अभिरुचिमान्य करावयाचे असेल तर सरकार, जाणते समीक्षक याचे साहाय्य हवे.

—प्रा. शं. गो. साठे




## आजोबांची काठी...

माणसाला आधाराची खरी गरज असते उतारवयांतच. हातपाय थकलेले असतात, कांहीं काम होत नसतं, कोणीतरी सांभाळून न्यायला हवं असतं. पूर्वी अेकत्र कुटुंबांत म्हाताऱ्या मंडळींना फारच आदरानं वागविलं जाई. त्यांचा शब्द म्हणजे अखेरचा. त्यांच्यासाठीं सर्वजण जीव टाकत असत. त्यामुळें म्हातारपण सुखांत जाई. पण आतां काळ कितीतरी बदलला आहे! प्रत्येकाचा व्यवसाय भिन्न झाल्यानें मुलं वेगवेगळी राहूं लागली. म्हाताऱ्या माणसांना इच्छा असूनहि जवळ राहतां येत नाहीं. आज ही स्थिति; मग तुमच्या उतारवयांत तर हा प्रश्न आणखीच बिकट होणार. अशा वेळीं आपले स्वतःचे उत्पन्न असले तर सुखासमाधानानें दिवस काढतां येतील. त्यासाठीं विमा उतरविण्यासारखा दुसरा उपाय नाहीं. आतां हप्ताहि कमी पडेल. आजच तुमच्या विमा एजंटाचा सल्ला घ्या.


**आयुर्विम्याला** पर्याय नाहीं

Pratibha-641

## बाजार

सानथोरांनी दुकाने थाटली...
मीच हा हिंडे भणंगासारखा !
मोठमोठ्यांनी कमाई लाटली
मीच आयुष्यास झालो पारखा !
एक माझ्या सोबतीला वादळे
लावुनी खांद्यास खांदा चालती !
माझिया मस्तीत मी जाई पुढे...
मात्र बाजारू कवाडे लागती !

--सुरेश भट



## समीप !

पावलांची गती
मंदावे अंधारी
वळाया माघारी
येइचिना
दूरवर दिसे
कुठे तरी जाळ
मृत्यूचे का भाळ
लकाकते ?

## ढ !

इतुके जाणून
काहीही न मिळे
आंधळ्याचे डोळे
माझ्यापाशी !

## ख़ूण !

हौस आकाशाची मोठी
चांदण्याचे चुडे केले
अवनीच्या अंगावर
रोमांचाची लक्ष फुले
काय द्यावे कळेना हे
संभ्रमित अवनीस
आकाशाच्या हातातील
खुणावते चंद्रपोस !

--रमेश गोविंद वैद्य

## प्राण-रंग

शुक्राच्या प्रहरापाशी
हले रात्रिचा पदर
विठाईच्या भुपाळित
भरे पहाटेचा उर
सुरु मायेची आरती
प्राणातले रंग मुके
झुके धुक्याशी पापणी
अन् पापणिशी धुके
गर्द पिंपळपानात
रेशमी गे झिळमिळ
येते तुळशीला जाग
होता गळाभर जळ

--के. उदयन

रूपांतरित कथा



लहानपणापासून सारं देत येणारी स्त्री मिळवते काय तर फक्त पीडा ! तुझ्या कधी ध्यानात आलंय् का की स्त्रीला ही पीडाच सुखावह वाटते ? तिची पीडा... ही वेदना नष्ट झाली तर कदाचित ती तडफडून मरून जाईल ...........

# सारी रात्र मेघ कोसळणार आहेत

मनोहर देखणे


*प्रिय लेखक*

" तुझ्या ' मधुहास ' मासिकातील " अंतराग " कथेबद्दल अभिनंदन ! या वेळी तू अगदी कमाल केली आहेस. माझ्याचसारखी अनेकांची अभिनंदनपर पत्रं तुला आली असतील ! पण माझं हे पत्र तुला एका नव्या कथेचं बीज देणार आहे. तुझ्या कथेत तू जे सारं लिहिलं आहेस ते तुझ्या जीवनात घडलेलं नाही, हे मला चांगलं ठाऊक आहे. ही तुझी नुसती कल्पना आहे. प्रत्यक्षात तू ज्या तृषेनं व्याकुळ झालेला आहेस ती कधीच तृप्त झालेली नाही. असो.

तुला माझं नाव, गाव वा पत्ता ठाऊक नाही. मी स्त्री की पुरुष आहे तेही माहीत नाही. पण सांगतेच—मी स्त्री आहे. बाकीचं पुढील पत्री. वाट पहा.

*प्रिय लेखक*

आज तुला पत्र लिहिताना मला हसू येतंय्. तू कितीहि मोठा कलावंत असलास नि वयानंही प्रौढ असलास तरी माझ्यासमोर एखाद्या बालकासारखा आहेस. तुला ठाऊक आहे का की तुझ्या आवडीनिवडी, तुझा स्वभाव, तुझ्या आयुष्यातील बारीक सारीक घटनांशीही मी परिचित आहे ? तुला याची कल्पना आहे का ? मला हे सारं कसं ठाऊक आहे हे मी पुन्हा कधी सांगेन. आता येवढंच विचारते की लहानपणी—किशोरावस्थेत तू एका मुलीवर प्रेम केलं होतंस ना ? ती तुझ्या दूरच्या नात्यातली एक सुकुमार सौंदर्यसंपन्न मुलगी होती. जसजसं तुझं वय वाढत गेलं तसतसं तुझं त्या मुलीवरलं प्रेमही वर्धमान होत राहिलं. हळुहळू ती पोरही तुझ्याकडे खेचली जाऊ लागली. हे तुझं पहिलं प्रेम होतं. वयाच्या सतराव्या वर्षी तू तिला प्रेमपत्रांतून लिहिलं होतंस, ' मी तुझ्यावर माझ्या प्राणांहून अधिक प्रेम करतो ! ' सांग, लिहिलं होतंस ना



असं ? —नंतर तिनं त्या पत्राचं उत्तर दिलं, तेव्हा तर तू अगदी आनंदानं वेडावून गेलास. नंतरएका लग्न-समारंभात तुमची भेट झाली व जिन्यात तिला गाठून हलकेच तू तिच्या ओठांचं चुबन घेतलं होतंस. आठवत ? त्यानंतर तू तिला निरोप द्यायला स्टेशनवर गेलास. तुझ्या पित्यानं तुमच्या विवाहाला नकार दिला होता ... ती डबडबलेल्या नेत्रांनी तुझ्याकडे पाहत दूरदूर गेली. तू नंतर एकान्तात खूप रडला होतास.

समज, त्या मुलीशी तुझं लग्न झालं असतं तर काय झालं असतं ? विचार करताना मनात हसू येतं – तू आज दहा मुलांचा बाप होतास ! ( ती आज १० मुलांची आई आहे, हे मला माहित आहे ! ) इतक्या मुलांचं भरणपोषण—त्यांचं संगोपन—तुझ्यासारख्या एका श्रेष्ठ कलावन्ताला किती करुणाजनक होतं —? आज इतकंच पुरे. बाकी पुढच्या पत्रात.

*प्रिय लेखक*

माझ्या दोन पत्रांनी तुला अस्वस्थ बनवलं असेल नाही ? – माझ्याबद्दल तऱ्हेतऱ्हेच्या कल्पना तुझ्या मनात येत असतील ! माझ्याबद्दल तुझ्या मनात जिज्ञासा उत्पन्न करून, तुला विवंचनेत टाकूनही मी मात्र खुशीत आहे. मजा आहे नाही ? तुला मी हवं ते लिहू—सांगू शकते नि तू मात्र माझं काहीही भलंबुरं करूं शकत नाहीस !—आता हळुहळू मी माझी सारी कथा सांगणार आहे व खात्री आहे की तू मन लावून ती ऐकशील ! माझं अक्षर न् अक्षर तुझ्या अंतरावर कोरलं जाईल, हे मी जाणते. ऐक आज माझ्याच बाबतीत—

मी पूर्ण युवती आहे – अविवाहित नि अनाघ्रात ! असामान्य रूपसंपदा घेऊन जन्मास आलेय् व बऱ्याचश्या ललितकलांचं शिक्षण घेतलंय. त्यातून एका धनवानाची एकुलती एक मुलगी आहे ! संपत्ती अन् ऐश्वर्यानं भरलेल्या घराची एकमेव उत्तराधिकारी. तरीही उच्छृंखल नाही. अति संयमानं जीवनांतलं प्रत्येक पाऊल मी मोठ्या विचारपूर्वक टाकलंय. नारीला न शोभणारं असंही काही केलं नाही.

—आज सात एक वर्षं झाली. कळीतून फूल उमलण्याच्या अवस्थेत मी असतानाच त्यानं माझ्या आयुष्यात प्रवेश केला. नाव ऐकून काय करणार ? एक सुरेखसा नवयुवक ! माझ्या मागं सावलीसारखा फिरू लागला. माझ्यापायी जणू वेडा झाला ! मी देखील त्याच्यावर मोहित झाले नव्हते असं नव्हे. कदाचित थोड्याच दिवसांत मी आपलं सर्वस्व त्याला अर्पण करून बसले असते ... त्याच्याशी विवाह करायला घरची कुणाचीही आडकाठी आली नसती. पण ते घडलं नाही. सारं एकदम उलटापालट झालं. माझं जीवन काहीच्या काही झालं. वडिलांचं दिवाळं नाही निघालं, किंवा माझ्यात काही उणीव नाही आढळली. मग काय झालं असं ? सांगेन. वाट बघ.

*प्रिय लेखक*

त्या दिवशी संध्याकाळी सूर्य मावळण्याच्या सुमारास वडिलांची कार पोर्चमध्ये येऊन थांबली. कारमधून त्यांच्याबरोबर एक सुडौल तरुणही आला होता. मी खिडकीतून पहात होते. वडिलांनी सागितलं की तो त्यांचा बालमित्र होता व मी त्यांना प्रणाम करायला हवा.

मी त्या खोलीत गेले तेव्हा नोकर खिडकीचं दार उघडीत होता. मी त्यांच्यासमोर जाऊन उभी राहिले व मस्तक खाली वळवून नमस्कार केला. त्यांनी मला काय आशीर्वाद दिला कोण जाणे पण त्या क्षणी त्यांनी मला डोळे भरून पाहिलं – ती दृष्टी कशी होती, कसं सांगू मी ? – पण ती नजर माझ्या अंतरंगापर्यंत गेली व मी जणू त्यांच्या व्यक्तिमत्त्वानं कायमची भारून गेले. कितीतरी सुंदर पुरुष मीही पाहिले आहेत. परंतु असलं मुग्धरूप – असला मनोरम भाव ? छे, कधीच नाही.

मी मागं सांगितलंच आहे की माझे वडील मोठे व्यापारी आहेत. त्यामुळं घरांतली सारी व्यवस्था मलाच पहावी लागते. त्यामुळं दिवसातून अनेकदा मला त्यांच्यासमोर जायची वेळ येई. पण त्यांनी चुकूनही कधी माझ्याकडे दृष्टी वर करून पाहिलं नाही. पाहावं तेव्हा ते आपले लिहिण्यात किंवा वाचनात गढलेले. काय वाचतात, काय लिहितात मला कळलं नाही. वडिलांच्याच तोंडून नंतर एकदा समजलं की ते एक महान् कलावन्त आहेत ! – ते ऐकून मनात एक विलक्षण भाव जागृत झाला. यापूर्वी मी कलेशी परिचित

झाले होते तरी एखाद्या कलावन्ताच्या सान्निध्यात यायची ही पहिलीच वेळ होती ... कॉलेजच्या पुस्तकांखेरीज दुसरी कोणतीच पुस्तकं वाचलेली नसल्यानं एक दिवस पुस्तक मागायला मी गेले. त्या वेळी पुन्हा एकवार त्यांनी पहिल्यासारखंच माझ्याकडे असं काही पाहिलं की ती नजर पुन्हा तशीच आत आत गेली... त्यांनी मला स्टीफन झ्वाईगचं ' A letter from an unknown woman ' हें पुस्तक दिलं.

—त्या पुस्तकानं त्या रात्री माझी झोपच घालवली. मन जणू पार चेंदामेंदा झालं ! – दुसऱ्या दिवशी पुस्तक परत करताना मी सहजपणे त्यांना विचारलं, " प्रेम कशाला म्हणतात ? "

त्यांनी चमकून माझ्या डोळ्यात डोकावून पाहिलं व नंतर नजर दुसरीकडे वळवून उत्तर दिलं, " एक विशेष प्रकारचा आन्तरिक आनन्द आहे तो ! "

—त्यावर मी संकोच सोडून पुन्हा विचारलं, ' प्रेम कसं होतं ? का होतं ? त्याचेही काही नियमबियम आहेत का ? "

" नाही. नियम वगैरे काही नाही. प्रेम आपलं असंच घडतं. कदाचित जन्मजन्मांतराच्या संस्कारानं वा अदृश्य शक्तीनं किंवा प्राकृतिक शक्तीमुळं ! ' ते म्हणाले.

तरीही मी वेड्यागत प्रश्न केला–"न विचारताच ? परोक्षपणेही ? एकतर्फी ? "

" हो; न विचारता, परोक्ष नि एकतर्फीदेखील प्रेम होऊ शकतं – "

" पण मग तो आंतरिक आनंद कसा मिळतो ? "

" मिळतो ! " इतकं बोलून ते चूप झाले.

त्यानंतर माझ्या जीवनाचं नवं पर्व सुरू झालं. मी भराभर जगातली नावाजलेली पुस्तकं वाचू लागले. पुस्तकांनी मला वेगळीच दृष्टी दिली. एका मंद प्रकाशानं उजळून जाऊन माझ्या व्यक्तिमत्त्वान एक आगळंच रूप घेतलं.

' त्यांच्या ' प्रतिभेच्या दीप्तीनं मी झळाळून जाऊन एका अननुभूत, अव्यक्त मधुर भावनेनं विव्हल बनू लागले–त्यांचं हे ऋण कशासाठी होतं, मी नाही सांगू शकणार. तू स्वतः एक कलाकार आहेस, तेव्हा जाणशीलच. त्यांच्यापुढं मी स्वतःला तुच्छ मानू लागले–आणि पुढं आमच्यांत सूक्ष्मपणे निर्माण झालेलं ते बंधनसूत्रही तुटलं. ते काही दिवसांनी आमच्या घरून निघून गेले. कसे गेले ? का गेले ? सांगेन. पुढच्या पत्राची वाट पहा.

*प्रिय लेखक*

आपल्या तुटलेल्या कहाणीचे धागे पुन्हा जोडतेय्. ते ज्या दिवशी गेले त्याच दिवसाची गोष्ट आहे. बाहेर वातावरणात खूप उकाडा होता व मनही एकाएकी कशानं की गुदमरू लागलं होतं. एकाएकी मनात आलं, न्हाऊन घ्याव. म्हणून तडक तशीच उठले, बाथरूमध्ये गेले, दार लोटून घेतलं. हळुहळू अंगावरचं एकेक वस्त्र काढून ठेवीत पूर्ण ' निर्वसना ' झाले. वेणी सोडून केस मोकळे सोडले व डोक्यावरचा पाण्याचा फवारा उघडून त्या खाली डोळे मिटून भिजत उभी राहिले. जलधारा माझ्या नग्न देहलतेला भिजवू लागल्या. अंतरांतून एक गोड संवेदना भिरभिरू लागली. किती वेळ अशी उभी होते कोण जाणे ! मनाला चांगलं प्रफुल्लित वाटल्यावर नळ बंद करायला गेले नि बघते तो दार अर्धवट उघडलेलं ! धस्स झालं मनात! आतून बोल्ट लावायची मी कशी विसरले ? कोणी मध्येच येऊन गेलं का कोणी मला अशा विवस्त्र अवस्थेत नहाताना पाहिलं की काय ?

नोकरचाकर तर दुपारचे शांतपणे झोपलेले होते. कुठे चिटपाखरूही नव्हतं. विचार आला, मग काय ते तर नव्हते आले इकडे ... घाईघाईनं कपडे करून मी खिडकीतून वाकून पाहिलं, तर ते दोन्ही हातांत डोकं धरून सुन्नपणे बसलेले ! पायांत चपलाही तशाच ! म्हणजे ... ?

हाय ! हे काय घडलं आज माझ्या हातून ? लाजेनं अर्धमेली झाले मी. वेळेवर त्यांना चहा-फराळाचंही नाही बनवून दिलं ... दुसऱ्या दिवशी सकाळी बघते तर निघून गेलेले ! कुणाला काही न सांगता न सवरता, एकाएकीच. मी तर त्यांच्या त्या अवचित प्रयाणानं विस्मित झाले, दु:खी झाले. वडिलांनाही

कारण कळेना. ... मग एक दिवस पुढे मी वडिलांना त्यांच्याबद्दल विचारलं. तेव्हा ते उत्तरले, "काही ठावठिकाणा नाही त्याचा. त्याला शाळेत असताना आम्ही 'छोटू' म्हणत असू. तो कुठल्या नावानं पुस्तकं लिहितो हेही ठाऊक नाही तू तर वाचली असशील त्याची पुस्तकं ? "

मनात म्हटलं, त्यांनी दिली नाहीत तर कुठून वाचणार ? पण पित्याला म्हटलं, "हो वाचली ! फार छान लिहितात. "

—त्याना मी त्यांची पुस्तकं मागितली असता ते उत्तरले होते, "या वेळी माझ्यापाशी पुस्तकं नाहीत माझी. प्रकाशकाला लिहून पाठवून देईन. "

परंतु ते गेल्यानंतर पुस्तकं तर राहू द्याच, त्यांचं कधी पत्रही नाही आलं किंवा साधा निरोपही नाही आला. मी मात्र त्यांची आठवण काढीत राहिले. रात्रीमागून दिवस उगवू लागला व मी रोज सकाळपासून त्यांची प्रतीक्षा करू लागले. पण सारे दिवस वांझोटेच निघाले. जाताना त्यांनी एक २०–२२ पानांचा लेख व इतर पुस्तकं तशीच ठेवली होती. काय असेल त्या लेखात ... ? वाट पहा.

*प्रिय लेखक*

त्यांच्याच शब्दांत वाच–काय लिहिलं होतं त्या लेखात ...

'मी आपल्या या मित्राच्या मुलीवर प्रेम करू लागलोय. अगदी पहिल्याच वेळी हिला पाहिलं तेव्हापासून. व प्रेयसीच्याच रूपानं मी ही प्रेमपूजा आरंभलीय्. मी मनाशी खूप झगडा केला. पण यश आलं नाही. या उत्कट मनोकामनेपुढं मी हार खाल्ली. इतकी वर्षं, इतकी युगं मी ज्या माझ्या कल्पनेतील प्रेयसीसाठी भटकत होतो ती हीच ! हीच ती !

'मी ह्यात काही अनुचित करतो आहे का ? बहुधा नाही. तिच्याशी लग्न करायचा, तिला नग्न करायचा विचारही माझ्या मनाला स्पर्शून गेला नाही. मग अनुचित कसं ? प्रेमातील वासनेचा त्याज्य भाग तर मी फेकूनच दिला होता. माझं प्रेम मलाच केवळ ठाऊक ! तिलाही ते ठाऊक नसेल–प्रेम करतो खरं; पण वाटल्यास हिचा सहवास मी तोडू शकतो. दूर राहून प्रेम केलं तर ? ... पण माझ्यानं ते होईल असं वाटत नाही. ...

... हिच्या सान्निध्यावाचून एकही दिवस मला चैन पडणार नाही. हिचं दर्शन न घडलं तर माझा प्रत्येक दिवस सुना जाईल––

.. आज मी ठरवलयं की हिच्याच जवळपास राहिलं पाहिजे तस न झालं तर आपल्या मनाला खूप वेदना होतील. कदाचित मृत्यूही ...!

इथे राहायचं तर अर्थातच संकोच सोडून, स्वाभिमान गुंडाळून राहायचं अन् हिचं लग्न झालं की ही जाईल त्या गावी हिच्याच घराच्याजवळ जागा घेऊन राहायचं–किती दुबळा निघालो मी !–

... हे प्रेम माझ्या आनन्दाची परमावधी आहे. आयुष्याची सार्थकता ! मला आता दुसरं काही नकोय्–काहीही नकोय् ! '

–हे सार वाचून माझी काय स्थिती झाली असेल, जरा कल्पना तर कर ! खरच सांगते, सारी रात्र झोप आली नाही. बेचैन, बेचैन झाले

वडिलांचे मित्र – माझे प्रियकर ! ऐकायला कसं विचित्र वाटतं, नाही ? पण जगातली कुठली शक्ती कुणाच्या प्रेमाला अडवू शकते ? आणि काय प्रेम एकपक्षीही असू शकत नाही ? त्यात वयाच बंधन आडवं येतं ?

तू या प्रश्नांची काय उत्तरं देशील कोण जाणे ? माझं उत्तर आहे, 'नाही;' अन् तेच उत्तर बरोबरही आहे.

आता जरा माझ्या मनाचा तू विचार कर. त्यांच्या त्या निर्हेतुक आणि निरागस प्रेमाबद्दल मला त्यांच्याबद्दल तिरस्कार वाटायला हवा होता का ?– ज्यात शरीरसुखाचा अभिलेष नाही अशा प्रेमाबद्दल मी तिरस्कार करू ? पण इथे मला एक प्रश्न तुला विचारायचा आहे. त्यांचं हे वासनारहित प्रेम पुढेही

काय असंच राहिलं असतं ? तू म्हणशील 'हो,' पण मी म्हणेन– 'नाही!' त्यांनी खूप काळ मनाशी जपलेलं हे प्रेम माझ्या विवाहाची चर्चा सुरू होताच प्रगट केलं असतं. प्रेमयाचना केली असती, विवाहाची तयारी दाखवली असती तर ? माझं शरीर मागते तर ?–मी त्यांचा धि.कार करायला हवा होता ? छे ! मी कदाचित त्याना होकार दिला असता–त्यांच्या सर्व मागण्यांना रुकार दिला असता. मात्र हे आज वाटतंय– पाच वर्षापूर्वी तर मी प्रेमाची एक निराळी मूर्ती पहात होते.

आता सांगते ते अचानक आमच्या घरून का निघून गेले ते– त्या दिवशी दुसरं कुणी नाही, तेच बाथरूमकडे आले होते व मला त्या निर्वसन अवस्थेत पाहताच त्यांच्या मनांतले सारे शुभ संकल्प वाहून गेले होते. त्यांचा संयम ढळला होता–मनातली ही ठिणगी भडकू नये म्हणूनच ते निघून गेले.

ते मला मनापासून चाहत होते, निःसीम प्रेम करीत होते, हे कळल्यावर माझी काय दशा झाली असेल ? मी चेतनाशून्यच झाले. पण हळूहळू स्वःला सावरलं मी–मात्र काळजातून ते दुःख गेलं नाही. कारण मीही प्रेम करीत होते त्यांच्यावर.

ते म्हणायचे– प्रेम म्हणजे एक आंतरिक आनंद ! हृदयात आग धुमसत राहते तोच का विशेष आन्तरिक आनंद ?

नंतर मी पुन्हा आपल्याला जगातील श्रेष्ठ साहित्यात बुडवून टाकलं आणि किती वेगळी दृष्टी लाभली मला ! माझी अशी धारणा झाली की साहित्य हे जीवनाचं सौदर्य आहे. जीवनाच्या सौदर्याचा शोध म्हणजेच साहित्य ! या जीवन-सौदर्याकडे ज्यानं जितकं अधिक पाहिलं असेल, तितका तो श्रेष्ठ कलावन्त समजते मी. बस्स; आज इतकंच. बाकीचं पुढच्या पत्रात.

*प्रिय लेखक*

सुरवातीच्या पत्रात मी लिहिलं होतं की तुझ्या बाबतीत मी खूपसं जाणते. विश्वास ठेव–मी तुला कधी पाहिलं नाही की तुझ्या कोणी नातलगाकडून मला काही समजलं नाही.

माझ्या अध्ययनाचंच हे वैशिष्टच आहे की साहित्य वाचून मी त्याच्या निर्मात्याला चांगलं ओळखते. त्यात तो कलाकार 'स्वतः' किती असतो हे मी चागलं सांगू शकेन..... तुझ्या सर्व साहित्यकृती मी वाचल्या आहेत. नि म्हणून तुझा सारा जीवनेतिहास मी जाणू शकते .....मला वाटतं मी लिहायचं विसरून गेले की मी या देशातील एका लेखकाला फार मानते. तो तूच आहेस ! खरं, तुझ्या लेखणीत अशी जादू आहे ! अगदी जादूगार आहेस तू !– त्या जादूनं तू कोणत्याही नारीला आपल्याकडे सहजपणे आकर्षून घेतोस. जागजागी तुझी नजर थांबते– आणि टिपलेल्या अनुभवांतून तू जे प्रेमजाल पसरतोस त्यात स्त्री सहजगत्या फसते..... प्रेम करू लागते; अन् नंतर काहीच घडत नाही.

तुला जे हवं होतं, ते त्या स्त्रियांपाशी नव्हतं. त्या तुला समजूच शकल्या-नाहीत. तू मात्र एकटाच उरलास. तुला हवंय तरी काय ? कुणाच्या मना–प्राणाशी एकाकार होण्याची तुझी कल्पना किती चूक होती ! आजच्या या भोगवादी नि व्यावहारिक जगात त्याची कुणी कदर करणार आहे ?

तुझी स्वप्नं कधी साकार झाली नाहीत, न कधी होतील तू माझा लाडका लेखक आहेस. अनेकदा मी प्रार्थना केलीय् की तुझी मानस–प्रेयसी तुला मिळो. पण तुझ्यात हा जो अभाव आहे, जो शोध चालू आहे, तेही एक सुखच नाही का ? या शोधाच्या अव्यक्त आनंदात बुडूनच तर तू इतक्या अनुपम कथा–कादंबऱ्या लिहू शकलास. 'प्राप्ती' प्रमाणंच 'अप्राप्तीचं' ही एक सुख आहेच ना वेगळं ? सांग, कुणाचा शोध कुणी जवळ असण्याची इच्छा, कुणाच्या दर्शनाची कामना हे सारं सुख नाही आहे का !

आज पुन्हा झ्वाइगची ती अज्ञात पत्र-लेखिका आठवते. कसा तिनं आपल्या जीवनाचा सारा स्नेह हळुहळू एका दिव्यासाठी वेचला नि सुखी होत राहिली–आयुष्याच्या अखेरपर्यंत तिनं त्या दिव्यातली ज्योत विझू दिली नाही. खरं म्हणशील तर हेच ते प्रेम; हीच प्रेमाची परिभाषा–बाकी सारं व्यर्थ ! ..... अन् मग मला बोध झाला एकाएकी, की प्रेमाची ही पीडा म्हणजे आनंदाचच एक रूप. त्यांनी सागितलेली प्रेमाची व्याख्याही हीच होती......ते प्रेम, तो आनंद मला मिळाला.

तुझं म्हणणं कबूल करूनही मला म्हणावंसं वाटतं की प्रत्येक स्त्री ही एक माता आहे व प्रत्येक पुरुष एक 'शिशु!'—एक अबोध, हट्टी बालक! कारण पाहा ना—पुरुष नेहमीच स्त्रीकडे हट्ट करून काही ना काही मागतच असतो व स्त्री आईप्रमाणेच त्याचे हट्ट पुरवते. कधी तारुण्यात तो प्रेमयाचना करील. की स्त्री उगीचच जराशी नाखुशी दाखवील व म्हणेल की घे. प्रेमच घे! तुझ्या समाधानासाठी सारं काही मी दान करीन—घे हे प्रेम! तन घे, मन घे; तृप्त हो!

.. ..लहानपणापासून सारं देत येणारी स्त्री मिळवते काय तर फक्त 'पीडा!' तुझ्या कधी हे ध्यानात आलंय का की स्त्रीला ही पीडाच सुखावह वाटते! तिची पीडा— ही वेदना— नष्ट झाली तर कदाचित ती तडफडून मरून जाईल.

—शरीरसंबंध, संतानोत्पत्ती, स्तनपान आणि अविश्रांत सेवा— प्रत्येक जागी दुःख आहे नि प्रत्येक दु:ख तिचं सुख आहे—परमसुख. माझ्याकडून अधिक वदवून घेऊ नकोस. लाज वाटते.

अन् असाच एक शिशु-पुरुष माझ्या जीवनात आला नि गेला. ते कशासाठी गेले?......ते जिच्या शोधार्थ होते ती मीच तर होते!

—हे काय केलंत तुम्ही असं? तुमच्या दृष्टीनं मी गोंधळले. पण जेव्हा मला त्यातला भाव कळला होता, तेव्हा तुम्ही निघून गेला होतात. माझ्या प्रियकरा, सांग मी काय करू?—

हृदयातलं सारं प्रेम मी तुझ्यासाठी साठवून ठेवलंय. येऊन हे घे—सारं. नि सुखी हो. प्रियकरा, सेक्सला तू पाप समजलास का? यांत कसलं पाप? स्वार्थी, लालसायुक्त सेक्स पाप असेल, पण हे तुझं प्राप्तव्य होतं. तुझा नैवेद्य होता. स्वेच्छेनं, श्रद्धेनं मी हे तन तुला समर्पण करून म्हणाले असते, घे; सार्थक कर. होय, आता परधनासारखं मी ते जतन करतेय. तू येशील तेव्हा तुला द्यायला!

आज माझी ही सारी कहाणी तुला सांगितल्यानं मला हलकं हलकं वाटतंय. या कथनानं तूही सुखी हो अन् मला आशीर्वाद दे की माझं सुख चिरंजीव होवो! एका अज्ञात स्त्रीनं तुला इतकी पत्रं लिहिली पण नाव-गाव, पत्ता काहीही सांगितलं नाही म्हणून रागावू नकोस. आता हे लेखन समाप्त! नमस्ते."

[पण ऐन वर्षाऋतूत, चार महिन्यांनी पुन्हा एक पत्र लेखकाला आलंच!]

"अशी मी कधीच रडले नव्हते! रडतच पत्र लिहितेय् हे. तू इतका निष्ठुर असशील असं वाटलं नव्हतं. तूं तर पत्थर निघालास.

वडिलाचे एक मित्र आज चहाला आले असता वडिलांनी सहसा तुझ्या बाबतीत त्यांना प्रश्न केला, "आपल्या छोटूच काही कळलं का?" त्यावर त्या मित्रानं काय उत्तर दिलं ठाऊक आहे?

माझ्या या कानांनी तुझंच नाव ऐकलं. कळलं की त्यांचा 'छोटू' तो तूच! काय दुष्ट असतात हे कलावन्त!

.. अर्धी रात्र सरली आहे आभाळात मेघांची गर्दी उसळलीय्. बाहेर अंगणात पाऊस कोसळतोय—बहुतेक सारी रात्र तो कोसळेल. आज झोपू शकणार नाही. आतही हृदय भरून आलंय. डोळे ओलावले आहेत. सारी रात्र हा पाऊसही पडत राहणार......मेघ कोसळत राहणार आहेत.

सहन होत नाही माझ्यानं. इतकं मोठं सुख माझ्या भाग्यात असेल कुठून? ठाऊक होतं मला.

दगाबाज! तू तर माझं काहीच शिल्लक ठेवलं नाहीस. स्त्रीचा शील—संकोच, लाज—लज्जा—सारं सारं मी तुझ्या पुढ्यांत उघडं करून टाकलं. माझं सारं काही लुबाडलंस तू. मला भिकारीण बनवून सोडलस.

सांग तरी असं कोणतं व्रत घेतलंयस तू ते? हो हो. ...नको येऊस. कोण तुला बोलावतंय! दूरच राहा. इथे नको येऊस— शपथ आहे तुला!—हे निर्मोही मानवा, नको येऊस!

—रडव मला. जितकं तुला हवं असेल तितकं सताव मला!

—नको येऊस.... नको येऊस ....नको येऊस, जा!

● ● ●

समीक्षा

## बेधडक आत्मकथन

# आग्यामोहोळ

: समीक्षक :

त्र्यं. वि. सरदेशमुख

ही कादंबरी म्हणजे कोण्या एका डॉक्टराने आपल्या जीविताचा पैलकाठ दृष्टीच्या टप्प्यात आलेला असता केलेले स्मरणगुंजन आहे. 'गुंजन' म्हटले खरे, पण त्याची तीव्रता, त्या त्या प्रसंगाची गहनता व ते वर्णन करण्यामागील आत्मीयतेचा गहिरेपणा यांच्या गुणाकारमिश्रणाने कधी नितळ, कधी तरल, कधी घुमसणारे, कधी स्फोट पावणारे, कधी निरामय तर कधी आधिग्रस्त स्वरूप ही कादंबरी घेत जाते. त्यामुळे या स्मरणगुंजनातून केव्हा दिलखुलास हसरी शीळ ऐकू येते, केव्हा उदास पंचमालाप, केव्हा हृदयभेदक टाहो, केव्हा उग्र भयासुर मेघगर्जना, केव्हा कढणारी पण अति सोशिक जन्मवेदना, केव्हा उन्मत्त सिंहनाद तर केव्हा विकल आणि पावन असा शंखनाद ऐकू येतो. स्मरणसामर्थ्याला मराठी कादंबरीने एवढ्या हुकमतीने कामी लावल्याचे उदाहरण माझ्या आढळात येत नाही. मरणावर एकाच गोष्टीने मात करता येते. ती म्हणजे स्मरणाने आणि स्मरणावर विस्मरणाने.

जीवितातली सगळी बरी-वाईट स्मरणपुंजी घेऊन या कादंबरीचा नायक सहप्रवाश्यांना सोडून एकटाच एकटा हिमालयातील शेषनागाच्या पायथ्याशी असलेल्या अमरगंगेच्या काठी जाऊन उभा राहतो तेव्हा तेथे त्याला कोणी घेरले असेल तर त्याच्या जीविताला झपाटून टाकलेल्या दोन व्यक्तींनी. व्यक्ती कसल्या त्या ! एक तर कित्येक वर्षांपूर्वी मरून गेलेली, आणि दुसरी केवळ छायेप्रमाणे निकट वावरणारी. पहिली नसून असलेली, दुसरी असून नसलेली. म्हणूनच या दोघींनी त्याला असण्यानसण्यापलीकडचे काही बहाल केले होते. त्यांची स्मरणी ओढीत रघुनाथाने मरण जिंकले परंतु जीवनाच्या क्रौर्यापुढे, वरचढपणापुढे त्याला नमावे लागले. विस्मरणाची किमया त्याच्या हाती नाही. हीच सामान्यांची कहाणी आहे. मरणावर स्वार होऊन जीवनाभिमुख असलेल्या रघुनाथाने मराठी कादंबरीला अमोल देणे देऊन ठेवले आहे. त्याने हिमालय गाठला तो केवळ जीवनानुभवाचे सप्तपातळ त्याने धांडोळलेले आहेत म्हणूनच आणि हे पाताळ धांडोळूनही तो सहीसलामत राहू शकला ते केवळ हिमालयाचा हात त्याच्या पाठीवर होता म्हणूनच.

**मराठी कादंबरीत आजवर हिमालयाच्या अंगाखांद्यावर अशा लडिवाळपणाने कोणी वावरले नाही. हिमालयानेही कोणाला असे वात्सल्य दिले नाही.** काव्यशास्त्रविनोदाची फोडणी म्हणून हिमालयाचे ऐकीव दाखले देणे निराळे, आणि जीवितसर्वस्वाचा आलेख घेत घेत मनोभावाच्या मीठमोहऱ्या हिमालयावरून ओवाळून टाकणे निराळे. 'आग्यामोहोळा'च्या लेखकाने दुसरी गोष्ट करून दाखवली आहे.

### हिमालयाएवढा नायक

'आग्यामोहोळा'त हिमालय आला म्हणून ती मोठी, उंच झाली आहे अशातला भाग मुळीच नाही. हिमालयावाचूनही ती उंच नाही तर खोल तरी अवश्य होऊ शकली असती. या कादंबरीला उंचावणाऱ्या ज्या अनेक गोष्टी आहेत त्यांत नायकाचे व्यक्तिमत्त्व हे सर्वप्रथम महत्त्वाचे आहे. ते हिमालयाएवढे आहे असे म्हटल्याने व्यर्थ खुशामतीचा गौरव केल्यासारखे वाटू नये. कितीही उंच आणि उदात्त हिमालय झाला तरी त्याचा पायथा तराईच्या किट्ट जंगलात आणि दलदलीत रुतलेला असतो हे जो कादंबरीकार प्रभावीपणे दाखवू शकतो त्याच्या नायकाच्या उंच आणि विशाल व्यक्तिमत्त्वाकडे नाकडोळे मोडून पाहण्याचे कारण उरत नाही.

कादंबरी आत्मकथनपर असल्याने नायकाच्या अंतर्मुखतेचे सगळे आरोहावरोह मींडेसह झंकारून दाखवणे लेखकास शक्य झाले आहे. या कथनाला आत्मगौरव आणि आत्मपीडन ही अंगे खासच आहेत– आणि ती कोणत्याही तिसऱ्या दर्जाच्या आत्मचरित्रातही सापडू शकतात– पण आत्मशोधनार्थ आणि परान्तःप्रवेशार्थ यात जी कडोविकडीची तळमळ आहे ती चालचलाऊ आत्मचरित्राला नितान्त अकल्पनीय, न झेपणारी आहे. कारण तिच्यातच या कादंबरीच्या कलेचा मानबिंदू आहे. रघुनाथाच्या आत्मशोधनाला जिजीविषा, पराक्रम, तितिक्षा आणि प्रीती हे चार पैलू आहेत. यांपैकी एका किंवा अनेक पैलूंतून तो सदैव आपल्या जीवनाचे अंतर्याम निरखीत राहतो. त्याच्या वाट्याला येणारा आनंद असामान्य पातळीवरचा आणि दुःखे बहुजनांच्या सामान्य पातळीवरची असलेली दिसतात. यामुळेच तो सामान्यांतला असामान्य होऊन वेधकपणे आणि स्वतंत्रपणे व्यक्तित्वसंपन्न होतो.

### ही कादंबरी की आत्मचरित्र ?

ही कादंबरी नसून आत्मचरित्र आहे, अशी टीका करणे म्हणजे एखाद्या मनोभिराम मूर्तीला 'तो पाषाण आहे !' म्हणून बोट दाखवण्यासारखे खरे तितकेच खोटे होय. तशाने नुसती वजाबाकीच पदरी येते. डॉ. रंगनाथ देशपांडे आणि नायक डॉ. रघुनाथ कुलकर्णी या व्यक्ती एकच की भिन्न, हा प्रश्न कलासमीक्षणक्षेत्रात निखालस



डॉ. रंगनाथ ( रघुनाथ ! ) देशपांडे

वावगा, इतकेच नव्हे तर आडमुठा आहे. या कथनाच्या द्वारे लेखकाने मला रघुनाथाचा परिचय करून दिला आहे. तो देण्यात मला त्याने कलात्म वाङ्मयकृतीचा आनंद कितपत दिला हा प्रश्न मूलगामी. लेखक माझ्या (म्हणजे साधारण वाचकाच्या) परिचयाचा नसण्याचाच संभव मोठा. असे असता, आणि लेखकाने आपली कृती कादंबरी म्हणून सादर केली असता 'ते आत्मचरित्र आहे !' अशा वाग्विलासाने आपल्या टीकेला 'इदं च नास्ति परं न लभ्यते' असल्या तृतीय पंथाने रखडत नेणे म्हणजे सगळा उन्हाळाच. आणि समजा, लेखक माझ्या परिचयाचा निघाला, म्हणजे काय त्याच्या वाङ्मयकृतीकडे मला अलिप्तपणे पाहता येऊ नये ? खुद्द लेखकाला आत्मचरित्रच कादंबरीरूप करण्यात जेवढी वस्तुनिष्ठ अलिप्तता साधता आली तितकी मला तो आणि त्याची कला यांतील दुभागती रेषा ओढण्याइतपतही लाभू नये हे माझ्या समीक्षापद्धतीचे दुर्दैव म्हणायचे. **आत्मकथनपर कादंबरी पाहिली की 'रंगरंगोटी केलेले आत्मचरित्र हे !' अशी आम्ही आरोळी ठोकावी, आणि कलात्म रीतीने लिहिलेले आत्मचरित्र पाहिले की 'ही तर शुद्ध कादंबरी !' म्हणून त्याची बोळवण करावी, असा आमच्या समीक्षणाचा, कसेही झाले तरी स्वतःची पाठ थोपटून घेणारा व्यापार आज तेजीत आहे.**

कलावंताचे चरित्र आणि त्याची कला यांना दुभागणाऱ्या रेषेचा वर उल्लेख केला तीच रेषा त्यांना सांधणारी मीलनरेषाही असते हे आपण विसरू तर दुसऱ्या एका आपत्तीशी आपल्याला सामोरे जावे लागते. कलाकृतीशी सुसंगत आणि अविभाज्य असलेली त्याची आत्मनिष्ठा तोतया असते असे मानावे लागते. कलाकृतीतील आत्मनिष्ठा आणि वस्तुनिष्ठा यांना फोडून वेगळे करण्यासाठी हटवादी समीक्षकांनी चालविलेला आटापिटा केविलवाणा होत आलेला आहे. त्याचे कारण, त्या परस्परविरोधी गोष्टी नसून परस्परोपजीवी आणि परस्परपोषक अशा आहेत. त्या एकामेकात सरमिसळीने वावरतात आणि केव्हा केव्हा दुसरीचे रूप पांघरतात. आरशात आपले रूप आणि आपला शृंगार निरखिणारी अभिसारिका कोणत्या क्षणी त्या प्रतिबिंबाकडे आपल्या प्रियकराच्या डोळ्यांनी पाहते आणि कोणत्या क्षणी स्वतःच्या, हे तिचे तिलादेखील सांगता येणार नाही, उमगणार नाही. या दोन्ही निष्ठा, या दोन्ही दृष्टी परस्परानुरक्त आहेत. आणि दोहोंच्या अनाकलनीय संगमातच मानवी प्रतिभेची झळाळी पाहता येते. आत्मनिष्ठा काय किंवा वस्तुनिष्ठा काय, निखालस अमिश्र स्वरूपात अनुभवता येणे मानवी मनाच्या घडणीनुसार अशक्य कोटीतील आहे. मानवी मन ही सर्व वस्तुजातीबरोबरच अस्तित्वात आलेली चीज आहे. तिला स्वतंत्रपण आहे तसेच अखिल वस्तुजाताशी अंशत्वही आहे. संदर्भानुसार या मनोनिष्ठेच्या स्वतंत्रपणाचा किंवा अंशत्वाचा ठळकपणा पाहायचा, इतकेच. वैज्ञानिक प्रयोगशाळेतले अत्यंत कर्मठ वस्तुनिष्ठेच्या बडेजावाने चाललेले प्रयोगही शास्त्रज्ञांच्या खोल आत्मनिष्ठेने असे ना तसे ओवळे होऊन गेलेले असतात, अशी महान् शास्त्रज्ञांचीच कबुली मिळते. आणि साक्षात्कारासारख्या नितान्त आत्मनिष्ठ चित्तप्रक्रियेला समग्र वस्तुजाताला व्यापणारे अधिष्ठान लाभलेले असते, असे अधिकारी पुरुष सांगतात. कथाकादंबऱ्यांतली वस्तुनिष्ठा तर उघडउघड आत्मनिष्ठेचीच द्वैतलीला असते, आणि आत्मनिष्ठा ही वस्तुनिष्ठेचा अद्वैत विहार असतो. प्रतिभावंताचा आत्मा वस्तूवस्तूंतील भेद आणि अभेद यांची आरास करीत असता एकाच आत्मसूत्राने त्यांना ओवीत जातो. आपल्या तत्त्वज्ञानात परब्रह्माला 'वस्तू' ही संज्ञा आहे. मानवी आत्मा 'वस्तू'चा अंशभाक् असूनही तसाच स्वयंप्रज्ञ, स्वयंप्रभ आणि स्वयंपूर्ण आहे. तो वस्तूला आपल्यात सामावू शकतो. किंवा उलटीकडून पाहिले असता आपण वस्तूशी संमीलित होतो.

## कलाकृतीत कलावंताचे अस्तित्व

जाणिवेवर भर देऊन हा संयोग साधणाऱ्या आत्म्याची वाट वेगळी आणि भावनाबळाने तो साधणाऱ्या आत्म्याची वाट वेगळी. कलावंत कादंबरीकाराची वाट अशी दुसरीच असणार. नितान्त

आत्मनिष्ठ रूप घेतलेल्या कादंबरीला ती आत्मचरित्र आहे म्हणून निखंदण्याचे काहीच प्रयोजन नसते. कारण सर्वच श्रेष्ठ -महर्षींच्या कादबऱ्याना त्याच्या जीवनचरित्राशी रहस्य साधावे लागले आहे. टॉल्स्टॉय्विषयी लिहिताना स्टीफन् झ्वाइग् एके ठिकाणी म्हणतो:

"What need have we of formal autobiography when Tolstoy (like Goethe) writes the fullest and more truthful of autobiographies in the complex of his works? The novels and the tales contain perfectly recognizable portraits of their author in every phase of his career. His double stalks through the pages."

दॉस्तॉव्हस्की, हार्डी, फ्रान्स्वॉ मॉर्या, आल्बर्तो मोराव्हिया, पार लागरक्विस्ट, आल्बेर काम्यू याच्यासारख्यांच्या उत्तमोत्तम कलाकृतीच्या रचनेमागे त्यांचे चारित्र्य आणि चरित्रही आहे याची रसिक समीक्षकांना दाद असावी. लेखकाचें चरित्र आणि चारित्र्य ही कादबरीत भुईपणाने थोडीच अवतरतात ! ती उघड्यावर थोडीच पडलेली असतात ! कादंबरीची निर्मिती करीत असता लेखक दोन भूमिका घेत असतो– एक साक्षित्वाची, आणि दुसरी नटनाची. 'मयाध्यक्षेण प्रकृति: सूयते स चराचरम्।' त्याचा 'मी' अध्यक्ष झालेला असतो आणि त्या अध्यक्षत्वाने कादबरीकलेला गर्भाधान केलेले असते. त्यातून होणारी निर्मिती कित्येक मानवी जीवांची चरित्रे आणि चारित्र्ये रगवीत. रसिकप्रिय होते. केव्हा केव्हा हे अध्यक्षत्व एवढ्या प्रभावीपणाने वावरताना दिसते की त्याने निर्मिलेली चरित्रे आणि चारित्र्ये त्याच्याच एका चरित्र-चारित्र्याचा विलास वाटू लागतात. महाभारताएवढ्या विराट् कहाणीला आणि तिच्यातील असख्य व्यक्तिजीवनाला श्रीकृष्णाच्या चरित्राने आणि चारित्र्याने कसे ग्रासले आहे ते विचारान्ती जाणवू लागते. तोच त्या सबध कालमहिम्याचा आणि तत्कालीन मानवी जीवनरीतीचा अध्यक्ष. तसेच आत्मचरित्रपर कादबरीचा 'मी' हा तिचा उघड उघड अध्यक्ष असतो. तिच्यातील कथाप्रसगाना आणि व्यक्तिदर्शनाला त्याच्या चरित्र-चारित्र्याने अंतर्बाह्य व्यापून टाकलेले असते. या 'उघड उघड अध्यक्षा'च्या मागे (किंवा आत किंवा खाली...काय हवे ते म्हणा, ते बरोबरच असते !) लेखक उभा असतो आणि त्याच्या रहस्यमय अस्तित्वाला भेद करण्याच्या खटाटोपाला हात न घालताही त्याच्या गळ्यात हार घालता येतो, इतकेच येथे सागावेसे वाटते.

## बेधडक आत्मपरता

'आग्यामोहोळा'च्या बेधडक आत्मपरतेने कित्येकांना बावरल्यासारखे झाले असेल; कारण त्यातील रघुनाथाच्या साक्षित्वाला आजवरच्या मराठी कादबरीत तरी तोड नाही आणि नटनाला सीमा नाही. त्याच्या प्रखर साक्षित्वाने अंतर्मुखतेची कळ त्याच्या हाती दिलेली आहे. तिच्याने मानवी चारित्र्याचा गाभा तो गाठू शकतो, आणि नटनकौशल्याने मानवी चरित्राचे विविधिरम्य आलेख तो देऊ शकतो. रघुनाथाने केलेल्या कथनात एवढे नाट्य ठेचून भरले आहे की त्यानेच सामान्य वाचक भारावून जावा, आणि विचक्षण म्हणवणारा बिचकावा ! विचक्षणाला साधीभोळी समावेशकता आणि अद्भुतप्रियता सहसा सोडून गेलेली असते. चारशे पानांच्या या कादबरीत तीस-चाळीस पात्रे आणि जवळजवळ त्याच्या दीडपट प्रसंग दाटीवाटीने येतात. असे वाटते की अजून चारशे पाने त्यांनी गट्ट केली असती तर त्याना असे अर्धपोटी उठावे लागले नसते. व्यक्तीच्या आणि प्रसगाच्या रेलचेलीनेच दबून जाणाऱ्या वाचकाला आपण तथाकथित आधुनिक अभिरुचीचे ग्राहक असल्याने तुसडेपणा करण्याचे समाधान येथे सहज लाभण्याजोगे आहे. दामूबन्नू'च्या प्रकरणातील काहीसा अरोचक पाल्हाळ वगळला तर अन्य कोठल्याही प्रसगाची प्रत्ययकारिता व परिणामकारिता बाधा गेल्याचे मला आढळून आले नाही. पुण्याच्या सामाजिक जीवनातील काही व्यक्तीचे आत्मवृत नावनिशाणीने आलेले उल्लेख व्यावहारिक अभिरुचीला जाचक होत नसले तरी कादबरीच्या कलात्म सौंदर्याला त्याची अनुचितता जाणवते. पण लेखकाने कादंबरीचा धर्म आतरिक जिव्हाळ्याने अनुष्ठिला असल्याने अपघाताप्रमाणे ओढवलेल्या रसहानीला केवळ दु:स्वप्नाच्या छायेसारखे घेरून टाकणारी सावित्रीशक्ती, काश्मीर-सरोवरातील गुल्बानू-सहवासाच्या अतिसुकुमार प्रसगापासून तो अमरगगेवर रघुनाथाने आत्मश्राद्धाला उभे राहण्याच्या क्षुरधाराप्रसंगापर्यंत सारख्याच तत्परतेने कादबरीची पाठराखण करताना आढळते.

आरंभ आणि अत याना एका सुरेख वर्तुळात बेमालूम गोवणारी ही कथा डॉ. रघुनाथ कुलकर्णी या 'पोटार्थी' माणसाच्या जीवनाच्या आसावर फिरताना दिसते. रघुनाथाने कोठल्याही सामाजिक कार्याचे बिरुद मिरवलेले नाही की कोठल्या राजकीय पक्षाचा शिरपेच बांधलेला नाही. त्याच्या ऐन तारुण्यात आणि प्रौढत्वात गांधीजीच्या चळवळी भरास येऊन कार्यसाधिक्त झाल्या आणि सुभाषचद्राचे नेतेपण हौतात्म्य पावले, पण रघुनाथाचे पोटार्थीपण लयाला गेले नाही. आपण आणि आपले कुटुब (केवढे कुटुब !) याच्या सुखदु:खाशी त्याने आपली जन्मगाठ बाधली आणि आपल्या पोटार्थाला चारही पुरुषार्थांचे सौभाग्य येऊ दिले.

" ते स्वातंत्र्य खरे न फक्त अपुली जे तोडिते बंधने
अन्याच्या पदशृंखलास बघते निष्कप ऐशा मने !"

या कविवचनाच्या सदर्भाने त्याचा पोटार्थ परदु:खशमनाचे कंकण बाधून कृतार्थ झाला. आईविना परदेशी झालेल्या आपल्या मुलाबाळांची विवंचना, दुर्दैवी बहिणीच्या उधळलेल्या संसाराची शकले, प्रेमळ पण उलाढाल्या भावाच्या जीव घेणाऱ्या करामती या सगळ्यांना सावरता सावरता तो मेटाकुटीस येतो खरा, पण कोसळणार–कोसळणार असे वाटत असता सर्कशीतला स्वार चार–चार घोडे काबूत ठेवीत, विस्मयचकित प्रेक्षकांचे मुजरे घेत दृष्टीआड जावा तसे त्याचे जीवन शेवटास जाते. असली 'पोटार्थी' माणसे आमच्या समाजात निपजतील तेवढी उणीच पडतील. ढोंगी समाजकार्यकर्त्यांच्या आणि मतलबी राजकीय पुढाऱ्यांच्या जात्यात ही माणसे अंतत: चिरडली–भरडली जात नाहीत हे त्यांचे अभिजात सामर्थ्य होय, आणि बाकीच्यांचे सुदैव होय. आई, वडील, आजी यांच्या मायाळू वात्सल्याने रोमरोम मोहरून जावे, तसल्याच वात्सल्याचा ओघ आपल्या आणि बहीण-भावाच्या पाडसांकडे आपण वाहता ठेवावा, पत्नीप्रेमाने सुखावून जावे आणि प्रेयसीच्या ध्यासाने उन्मादावे–जळावे, विपत्तिकाळातही नेकीने जगात मान ताठ ठेवावी ही रघुनाथाची जीवनरीत. एकत्र कुटुबातील जीवनाचा सगळा फुंफाटा अनुभवूनही त्याच्या अंत:करणातली आपुलकी आटत नाही.

माझ्या काळजाला जवळ असणाऱ्यांवर प्रीतीचा वर्षाव मी करू शकलो नाही, त्याचे बरे मला करता आले नाही, किंवा वाईट निवारता आले नाही तर समाजाचे आणि देशाचे बरे करण्याची माझी पात्रता ती काय ? ते चिंतण्यातला दंभ तरी कशापायी मी सांभाळावा ? अशी त्याच्या चित्ताची धारणा. वृद्ध टॉलस्टॉय आपल्या दैनदिनीत एके ठिकाणी लिहितो :

" Have not done enough good ! Even now I cannot learn the hardest thing of all, to love the people round about me, rather than humanity at large. Help me, God, help me ! "

रघुनाथाने या दुर्गम प्रीतिसाधनेत फार पुढची मजल मारली आहे.

## ' सत्य पण अभोगी ' मृगजळ

आप्तस्वकीयार्थ कष्टत आणि सोसत असताना त्याने आपल्या चित्ताच्या गाभाऱ्यात शरयूची जी पूजा बांधली आहे ती या सबंध कादंबरीला अंतर्बाह्य दरवळून सोडणारी आहे. शरयू ही रक्तमांसाची पुतळी खरी, पण तिच्या उद्‌गारानी आणि चालचलणुकीनी रघुनाथाच्या अतर्यामात जे स्वप्नतरग झुलत राहतात त्याना ना अंत, ना पार. शरयूची प्राप्ती म्हणजे मृगजळ हे त्याला ठाऊक नाही असे नाही, पण तिच्या प्राप्तीसाठी आत उकळणारे कढ हे तर त्याच्या चोख अनुभवातले म्हणून सर्वांशाने खरे. या मृगजळाला एका ठिकाणी तो ' सत्य पण अभोगी ' म्हणतो ते किती मार्मिक, म्हणजे त्याच्याच मर्मावर बोट ठेवणारे आहे. मृगजळाचा भोग घेता येत नाही तसा आपल्या वाट्याला आलेला त्याचा भोग चुकवताही येत नाही. म्हणजे, मृगजळ आपल्याला भोगत असते. आपले कर्तृत्व मावळते आणि कर्म ओढवते तेव्हा आपण आपले राहत नाही आणि परके परके राहत नाहीत. या कादंबरीतील सर्वात महत्त्वाचे (रघुनाथाच्या खालोखाल), सर्वात उजळमाथ्याने वावरणारे, नायकाला वर–खाली, इथे–तिथे, चोहीकडे खेचणारे, फरफटणारे प्रभावी पात्र कोणते म्हणाल तर शरयूचे. या शरयूला प्रत्यक्ष प्रसगात वाचकांसमोर फार थोड्या वेळा लेखकाने उभी केली आहे–आणि तीही अतिमामुली प्रसगात. सनसनाटी प्रसग या कादंबरीत रगड आहेत, इतके की तोळा–मासा चवीला त्याचा मडका वाटावा. पण तसल्या एकाही प्रसगात शरयूला स्थान नाही. तरी, असा कोठलाही महत्त्वाचा प्रसग नाही की ज्यात रघुनाथाला शरयूचे स्मरण झाले नाही किंवा तिचे मनोमन सान्निध्य साधता आले नाही. शरयू त्याचे जीवनसूत्र आहे. या आदिशक्ती म्हाळसेच्या ओटीवर रघुनाथाने आपल्या जीविताचा बेलभडार उधळून दिला आहे. म्हणूनच की काय, ती त्याच्या सबध चरित्रात आणि चारित्र्यात ठसठसून प्रतिबिंबित झालेली दिसते. ती त्याची प्रेरणा आहे आणि तीच त्याची करणी आहे. चंद्राने समुद्राला उचवळवावे आणि त्याच वेळी त्याच्या उरी–मस्तकी नाचत राहावे, तशी शरयू रघुनाथाचे शक्तिकेद्र झाली आहे आणि कर्म-कटकट होऊन बसली आहे. तिच्या " वर वर जा, मोठा हो ! " या साध्या शब्दानी त्याच्यात आग पेटवली आहे, आणि त्याच वेळी मधुसचय केला आहे. त्याच्या अतःकरणातला 'आग्यामोहोळ' असा रचला गेला आहे. पण त्याशी झोंबी घेण्याची रघुनाथाची शहामत आहे. त्याच्या चित्ताचे तसेच वाचकाच्याही अवधानाचे एकच एक लक्ष्य शरयू होऊन राहते. किती मोहमयी तरी वास्तव, किती तरल तरी सामर्थ्यसंपन्न तिचें रूप, तिची जीवनिका ! शिवनेरीच्या डोगरात कदील घेऊन तिने रघुनाथाला शोधीत आणि वाट दाखवीत येणे, ससाराचा ' येळकोट ' भरवला पण शरयूच्या ' दिवटी 'विना असे रघुनाथाला वाटायला लावणे, त्याच्या स्वप्नारण्यातली अभिसारिका तिने होणे, शेषनागाची आणि अमरनाथाची दुर्गम चढण चढण्यात तिची साथ त्याला मिळणे, या सगळ्या गोष्टीनी शरयूच्या व्यक्तिमत्त्वाला प्रतीकात्मतेची एक दाट छटा लाभते आणि तिच्याने त्याचे गहिरेपण अधिक वाढते असे मला वाटते.

## मनोवगाहनाची विशेष पातळी

शरयूच्या या 'आभासात्मक स्वप्नातील सत्या'शी राधिकेच्या 'वास्तव स्वप्ना'ला सन्मुख उभे करून लेखकाने मनोवगाहनाची एक विशेष पातळी गाठली आहे. सत्य कोणते आणि स्वप्न कोणते याची जाणीवपूर्वक गल्लत व्हावी अशीच या जीवनाची रहस्यमयता आहे. सत्य स्वप्नासारखे होऊन दडून-आडून छळते, आणि स्वप्न सत्यासारखे उरावर बसून वेसण घालते. राधिकेचे ' वरदान ' मिळाले असूनही जणू त्याच्याच बळावर शरयूची ' शिकार ' साधण्याचा चंग रघुनाथ बाधतो. पण दैवाच्या एका आकस्मिक फटक्यानिशी राधिकेचे वास्तव वरदानही स्वप्नवत् होते आणि शरयूची शिकार कांचनमृगाप्रमाणे फसवीत राहते. यातूनच रघुनाथ विकसत जातो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला असे धुमारे फुटतात की त्याच्या आतरिक परिमळाने कस्तुरीमृग व्हावा तसा तो धुद होतो आणि रानभैरी होऊन जातो. राधिकेने तो शरयूला शोधीत होता, पण राधिकेच्या मरणानंतर शरयूत राधिकेला साकार करण्याची तपश्चर्या त्याने आरंभिली. द्वैताची आणि अद्वैताची माधुरी एकाच वेळी, 'याचि देही याचि डोळा' चाखण्याचा हट्टाहास त्याने चालविला. त्यामुळे रात्रंदिवस ज्या तगमगीत तो भाजून निघतो तिच्या तप्तमुद्रा ह्या कादबरी पानोपानी देत जाते हे तिचे वैलक्षण्य होय. पाचपंचवीस (जेथल्या तेथे कामास आलेली) व्यक्तिमान् पात्रे आणि कित्येक झगमगीत प्रसग याच्या दाटीवाटीतून कथानकाला नेत असता लेखकाने शरयू आणि राधिका याना क्षणमात्र विसबू नये आणि तितक्याच उत्कटतेने आणि उत्कठेने वाचकाची दृष्टी त्याच्यावर खिळवावी, हा या कादबरीच्या यशस्वितेच्या एक प्रत्ययबिंदू आहे. तो रसिकांना केवळ स्वसवेद्य असा आहे. सगळा गुता बाजूला सारता, रघुनाथ-राधिका-शरयू या त्रयीवर ही कादबरी उभी राहिलेली दिसते. आणि हा त्रिशूळ हिमालयावर अमरगगेच्या काठी रोवल्याने स्वर्गारोहणाची भव्यगभीर कळा या कादंबरीच्या अखेरीला येते हे काही सामान्य यश नव्हे. मराठी कादंबरीला याचा अभिमान वाटावा.

अगदी प्रथम उल्लेखिलेल्या स्मरणगुंजनाने आरंभ झालेले हे कथानक एवढा लाबचा पल्ला गाठताना दिसते. दिवंगत राधिका आणि 'सीमन्तिनी' शरयू या प्रेममूर्तींची रघुनाथाने केलेली अनेकविध भक्ती अखेरीस भावार्त आत्मनिवेदनाच्या मृगाजिनावर आरूढ होते आणि आत्मलीन होण्याखेरीज तिला गत्यतर उरत नाही. हे सगळे निवेदन केव्हा थेट साधेपणाने, केव्हा रसाळ काव्यात्मतेने तर चमत्कृतीजनक नाट्यात्मतेने साधलेले असल्याने मानवी अनुभूतीचे अंतर्मनाच्या घडणीतले एकाखालील एक स्तर लेखकाला सलील उलगडता आले

आहेत. या त्रिगुणी गोफशैलीने वेगवेगळया कालावधीत भिन्न भिन्न मनोवस्थातून स्मृतिसंचार करणे त्याला सुलभ झाले आहे आणि त्यामुळे आत्मपर कादबरीवर नकळत चढणारे कटाळवाणे किटण आपोआपच झडून गेले आहे.

**अशांतीचे बिंग**

एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख केल्याविना या कादबरीविषयी बोलणे संपविता येणार नाही. ती म्हणजे हीतील नायकाची प्रबळ कामप्रवृत्ति, तिचे विविध विलास. प्रेमाची कादबरी म्हटली की आपल्याकडे तिचे काही अडाखे निर्माण झाले आहेत. त्या अडाख्याना उधळून लावणारी कृती क्वचितच निर्माण व्हावी असे वातावरण सध्या तरी जमून आलेले दिसते. **नवे लेखन आणि जुने, असा सामना गाजवू पाहणाऱ्या फडक्यांनी सोशिक वाचकांची दिशाभूल चालविली आहे.** तशातून एखादा भेदक सूर अस्मानात चढावा आणि अवधान देणाऱ्याची तद्री लागावी व हुल्लड करीत असावध असणाऱ्याची नुसतीच चडफड व्हावी असा सुप्रसंग मधूनच उद्‌भवतो. 'आग्या-मोहोळा'ने सूर जुनाच लावला आहे तरी आलापी अनोखी, काळजाला हात घालणारी आदा केली असल्याने तंत्राच्या चौकटी आणि मंत्राची पुरश्चरणें यात अडकलेल्याची असल्या मनस्वी कृतीची समीक्षा करताना तारावळ उडावी यात नवल नाही. तिच्यात प्रेम आहे, काम आहे, लैंगिक विकृती आहे आणि अध्यात्म-वेदनाही आहे, हे काय गौडबगाल ? राधिका एकाएकी मरून जावी आणि तिला आपल्या हृदयात वर्षानुवर्षे जपणारा रघुनाथ शरयूच्या चिंतनाने अधिकच ग्रस्त होऊन जावा व तसे झाल्याने नैष्ठिक ब्रह्मचर्याच्या उग्र साधनेत सापडावा ही नियती होती. दैनंदिन जीवनातल्या मारा-मर विपत्ती, त्यांची वासलात लावण्याची यातायात, त्याबरोबर अंतर्जीवनांतील सततचा जळता ध्यास आणि त्यातूनच धुमसणारा वैफल्याचा आणि उद्वेगाचा वाफारा यानी रघुनाथाच्या अतर्बाह्य जीवनाची जी फरफटे निघतात ती मुळातूनच पाहण्याजोगी आहेत. त्या सगळधात कोणत्या एका गोष्टीने त्याला सातपातळी दडपले असेल तर त्याच्यात उद्‌भवलेल्या हगामी लैंगिक विकृतीने.

तसे पाहिले तर त्याच्या जीवनाचे अधिष्ठानच स्त्री आहे; तसे पुष्कळाचे असते. नवोन्मेषशाली प्रज्ञावंताच्या बाबतीत तर ते एका वेगळयाच तीव्र-तरलतेने खरे असण्याची शक्यता असते. [ बर्नार्ड शॉचा एक उद्गार : Just as I cannot remember any time when I could not read or write, I cannot remember any time when I did not exercise my imagination in day-dreams about women. ] राधिकेच्या पावनस्मृतीला जीवन-सर्वस्वाचे अर्घ्य रघुनाथाने दिले. तिची आभासात्मक भेट होईल या उत्कठेने 'आत्म्यांच्या वसाहती'ला त्याने टक्कर दिली, आणि स्त्रीत्वाला एकनिष्ठ असणाऱ्या व आत्मवश करू पाहणाऱ्या त्याच्या वृत्तीने शरयूच्या गरुडपखांना लोंबकळण्याचा हव्यास धरून आयुष्याचे भिरभिरे करून घेतले. एका स्त्रीकडून त्याच्यात येऊन मिळालेली, त्याच्या पौरुषाला सुखविणारी एक निष्ठा स्मृतिशेष होऊन गेली, आणि त्याच्यातून उगम पावून स्त्रीत्वाची सौंदर्यशक्ती कवळू पाहणारी त्याची निष्ठा दुसऱ्या एका स्त्रीमध्ये अविश्रातपणे अधिष्ठान शोधीत राहिली. या दोहोंच्या गडसधीत त्याच्या नैसर्गिक कामवासनेची मात्र ससेहोलपट

## हे पांचाली

पाच पतींना खुष ठेवशी
कशी सांग एकटी ?
तुझ्यावरुन ग कधि न ऐकल्या
त्यांच्यातिल कटकटी !
काय घालशी अटी ?
सांग ना काय मंत्र होता ?
'एका 'ला मी खुश ठेवता
येते मेटाकुटी ! !

—*मधुसूदन गोखले*

झाली. मैथुन करून भोग नाही, भोग घेऊन सुख नाही, सुख मिळून शाती नाही, असला सर्वसामान्य कामजीवनाचा चट्टामट्टा सर्रास उडताना दिसतो. मग मैथुनाचाही दुरावा निर्माण झाल्यावर स्त्री-चिंतनाने काठोकाठ मारून गेलेल्या पुरुषात काही मनोविकृती आणि तिच्या अनुषगाने प्रभावित होणारी शरीरविकृती निर्माण न झाली तरच आश्चर्य ! असला नाजुक विषय हाताळण्याची हिंमत लेखकाने धरली आहे, आणि ती लेखनगर्भ आत्मनिष्ठेने तडीस लावली आहे. मर्ढेकराच्याच सतेज नागव्या शब्दानी सागून टाकलेले 'अशान्तीचे बिंग' रघुनाथाच्या जीवनात उद्‌भवले. सर्वांच्या जीवनाला ते व्यापून आहे. कोणाला त्याची मगरमिठी केव्हा बसेल त्याचा नेम नाही. अर्जुनासारख्या नरश्रेष्ठाच्या जीवनात असलेच गळू विराट नगरीतल्या वास्तव्यात ठणकले आणि पिकले हे आपल्याला माहीत आहे. त्या तिरीमिरीत त्याने आपली प्रियशिष्या उत्तरा, राजाने पाणिग्रहणार्थ देऊ केली असताही भार्या म्हणून नव्हे तर सून म्हणून, स्वीकारण्याचे ठरविले, यामागे त्याच्या अतर्मनातली काही ना काही विचित्र घालमेल मला जाणवते.

रघुनाथाने उत्तरकौमारवयात बारा वर्षांच्या सुदरवर पहिले-वहिले प्रेम केले. प्रेमकळी होती ती. तिची आठवण राधिका आणि शरयू याच्या प्रेमसौरभातही बुजू नये इतकी मधुर आहे—किंवा, रघुनाथ इतका कृतज्ञ आहे म्हणा ! त्यानतर साऱ्याची शरयू त्याच्या नव-यौवनापासून त्याला कायमची झपाटते, पण तिची प्रेमपाकळी त्याच्या अगाने कधीच उमलत नाही. राधिका अकस्मात् त्याच्या जीवनात येते, ती मात्र प्रीतिसर्वस्वाचे फूल त्याला वाहून तशीच अकस्मात त्यातून निघून जाते. रघुनाथाला पहिला अनपेक्षित झटका दिला तो विष्णु-प्रयागाच्या परिसरात रामकुंवरने. तिने त्याला भोगसाधन करून साफ शरमिंधा केले, आणि त्याच्या लैंगिक जीवनाला एक चमत्कारिक वळसा देऊन ठेवला. तमासगीर पाराईने त्याच्या उन्मादवयात स्त्री-मोहनाची धूसर क्षितिजे त्याला दाखवली. श्यामलेशी त्याने केलेली निरुपद्रवी

घेसट त्याच्या चांगलीच अंगलट आली आणि पोळवून गेली. पुढे श्यामलेच्या संसाराचा डाव असा काही पडत गेला की रघुनाथाच्या ती अधिक निकट आली. त्याच्यावर पूर्वीपासूनच फिदा असल्याने त्याला सर्वस्व देण्याची काक्षा तिने बाळगली, पण त्यातील. लाचारीने आणि मिंधेपणाने रघुनाथाची वासना ओशाळून गेली. त्याने उपासमार पत्करली आणि तिच्या समर्पणाच्या इच्छेला वेश्यावृत्ती मानले. पण ते वेश्येच्या दानाहून वेगळे दान होते. श्यामलेला त्याची किंमत अगदी नको होती. पण रघुनाथाचा जीव सगळाच गहाण असल्याने तो देण्याघेण्याच्या विचारावस्थेच्या पलीकडे होता. त्याच वेळी शरयूला तिचा प्रियकर भेटला. ती रघुनाथाला दुरावत होती आणि तो श्यामलेला दुरावलेला होता. तरी श्यामलेचा सहवास त्याला अढळ झाला आणि त्यातही काही एका पुरुषी समाधानाचा पाझर त्याने घेतला. पण कामतृप्ती शून्यावरच होती. श्यामलेच्या मृत्यूने ती शून्याच्याही खाली गेली. या प्रसंगी रघुनाथ म्हणतो : ' दुःखाचा हा पारा झटकू तरी किती ! ' 'पारा ' हा शब्द अनेक अंगांनी येथे अन्वर्थक आहे. खरे पाहता, हे पाऱ्याचे दु:ख सहन करू तरी किती, असेच त्याला सुचवायचे आहे. भोगशमनार्थ काय करावे आणि करू नये ते त्याला सुचेना. तेवढ्यात शरयूचे लग्न झाले. रघुनाथ पार मुरगळला, मोडून गेला. आपल्या कामजीवनाचा अंत उघड्या डोळ्यांनी पाहायचा एवढच उरले की काय या विचाराने हताश झाला आणि यातून मनोविकृतीच्या विळख्यात तो सापडला. तिची लक्षणे त्याला शरीरावर दिसू लागली आणि कामसुखप्राप्तीची अक्षमता हे त्या दुखण्याचे सर्वांत भेदक आणि दाहक टोक होऊन बसले.

### मुक्त पण अभिजात शैली

नायकाच्या या मानस-शारीरव्यथेच्या निर्भय व प्रामाणिक वर्णनाने आणि त्याला साजेशा मुक्त पण अभिजात शैलीने, ' इदं न मम ... म्हणून भल्याभल्यानी आजवर टाळलेल्या (किंवा न हेरलेल्या) जीवनरहस्याची एक कसोटीच लेखकाने निर्माण केली आहे. येथे मनातील आशयाला शहाजोगपणाच्या आणि तोंडदेखलेपणाच्या आश्रयाला उभे राहता येत नाही, व त्याच वेळी अभिव्यक्तीला असयमी आणि निर्लज्ज बनून चालत नाही. अंतर्मुख होऊन जी अनेक मनोविवरे रघुनाथाने दाखविली आहेत त्यापैकी कामविकृतीच्या अनुषंगाने त्याचे झालेले अधःपतन हे सगळ्यात खोल, गडद काळोखाने दाटलेले आहे. म्हणून तर लेखकाला आपल्या शोधदीपाला अभद्रतेचा आणि किळसवाणेपणाचा वाराही लागू देणे परवडत नाही. ' मारडोळीच्या महानदे 'जवळ आपल्या पौरुषाला पराभव सोसावा लागला त्या प्रसंगी "मी स्त्री असायला हवे होते, तरच माझ्या व्यंगावर पांघरूण घालण्यांत मला यश आले असते." अशा सालस उद्गाराने रघुनाथाच्या दारुण मनोभगाचे वर्णन करण्यात साहित्यिक सौंदर्याची एक निशाणी लेखक उंच धरून ठेवतो.

उदासीनता, कर्तव्यहीनता, साशकपणा, काळजी आणि भीती यांनी पछाडलेला रघुनाथ आपले मरण आपल्या डोळ्यांनी पाहण्याचा सोहळाच अनुभवतो. आता त्याच्या नवजन्माची तेवढीच एक वाट उरली होती. " मूळ आध्यात्मिक जीवनाकडे लक्ष वेधण्याकरिता तर हा मानसिक विकृतीचा बडगा माझ्या कपाळी बसत नसेल ?" असे एकदा त्याला वाटते ते उगाच नाही. पण स्त्रीसमागमातील अक्षमता आणि आत्मिक सामर्थ्यसंपादन या दोन अवस्थांमधल्या एका टप्प्यावर विसावणे आता त्याला आवश्यक होते. हिमालयाच्या यात्रेहून राघव परततो ते *भोगसुखात स्वतःला आकंठ बुडवून घेण्यासाठी.* त्याच्या मघाचे मोहोळ हिमालयात नव्हते. ते त्याच्या रसिक, भोगवादी, प्रेमळ, उदार मनोवृत्तीत होते. वेंगुर्ल्याच्या वास्तव्यात एका चांदण्या रात्री डोहातल्या सर्पांची रतिक्रीडा पाहून उत्तेजित झालेल्या, दीर्घकाळ कामवंचित असलेल्या कौसल्येला आपली शेजसखी करण्यात तो यशस्वी होतो आणि तेथून त्याच्या जीवनाचे नवे पर्व सुरू होते. बृहन्नडेचा अवतार सपतो. शमीवृक्षावरची शस्त्रास्त्रे सज्ज होतात आणि नरत्वाला अप्राप्य असे काही उरत नाही. लष्करी इस्पितळातील कोणी केरळ–कामिनी, कोण्या मेजरची धिप्पाड गोरीपान बायको, परिचारिका मिस् रॉबर्ट्स् याच्या आणि अशाच अनेकींच्या अंगसंगाचे उल्लेख मधल्या काही पानातून येऊन जातात, ते त्यापूर्वीच्या लैंगिक विकृतीला आणि नंतरच्या आत्मसंशोधनातून निपजलेल्या आत्मक्लेशाला सांधून घेतात म्हणूनच चवदार होतात. मनोविकृतीची प्रतिक्रिया होती ती आणि निरामय भविष्याचे सुकृत होते ते. त्या कामानलात लैंगिक विकृतीचे हीण जळून गेले आणि रघुनाथातले चोख हिरण्य तावून निघाले. *चैनविलासाच्या आतषबाजीतला प्रकाश* किती मोलाचा हे अनुभवल्यावर राघवाला आपल्या पौरुषाच्या नव्या पराभवाची तीव्र जाणीव होते आणि नियतीने आपल्या जीवनाला ' बहुरूपी केले पण त्यातला ' हुरूप ' शोषून घेतला म्हणून तो व्याकुळ होतो. त्याचे जीवित म्हणजे येथून तेथून लडाव झाला. राधिकेने फज्जा आधी गांठला आणि शरयूचा ठावच लागला नाही. राघवावर डाव जसाच्या तसा राहिला. पराभवाचे हे शल्य राघवाच्या उरात खुपसलेले आहे. ते उपसून काढणे त्याला जमायचे नाही. आणि जीवनान्त ओढवून घेणे या क्रिया आता त्याच्या बाबतीत एकाच वेळी घडायच्या आहेत.

नियतीने वाढून ठेवलेल्या पराभूतीची खंत मुखर करीत करीतच रघुनाथाचे आत्मनिवेदन शेवटास जाते. त्याच्या जीवाच्या आर्ततेला राधिकेच्या स्मृतीने आर्द्रता व पावनता येते, आणि शरयूच्या सहवासाने स्निग्धता आणि गूढत्व येते. रघुनाथाचा पराभव हा एका प्रेमधर्मी पराक्रमी पुरुषाचा पराभव असल्याने लोभी, दांभिक आणि आततायी पुरुषाच्या विजयाहून तेजस्वी आणि हृदयस्पर्शी वाटतो. पूर्वजीवनातला सगळा जंजाळ बाजूला सारून पचतरणीच्या काठावर त्याचे प्राण या दोन स्त्रियाना पंचारती ओवाळताना पाहून रसिकाने समुत्कंठ आणि पर्युत्सुक व्हावे, ही या कादबरीने साधलेली परिणामरमणीयता होय.

• • •

**आग्यामोहोळ : डॉ. रंगनाथ देशपांडे : ठोकळ प्रकाशन : मूल्य १० रुपये.**



## वाकल्या माझ्या नभाला

वाकल्या माझ्या नभाला
झाकले डोळे भिडू दे
ओंजळीच्या पापणीने
स्वप्न ओले पालवू दे.
मालवू दे आर्तताही
पंख वाऱ्याचे ढळू दे
डंख गहिरा चांदण्याचा
या तमाला गंधवू दे.
तापल्या सूर्यास साझ्या
रक्त थोडे पांघरू दे
वेदनेच्या वेदनेला
खोल वक्षी पाझरू दे.

—*श्रीकांत पुरोहित*

## माझे काचपात्रात

माझे काचपात्रात
सप्तरंगी मासा
छिद्र त्याचे सुईचे
धरणार कसा ।। १ ।।
माझे काचपात्रात
मेणबत्ती खाशी
नक्षत्राच्या दीप्तीने
लाव पाहू कशी ।। २ ।।
माझे काचपात्रात
फूल आहे मृत्यूचे
यायचे असेल तर
थेंब आण अमृताचे ।। ३ ।।

—*स. ज. कापसे*

## रातझड

तुझ्याएवढा प्रकाश
माझ्याएवढा अंधार
आसवांच्या आषाढात
कशी सजू मी शृंगार ?
गोठलेल्या शब्दासाठी
ऊब स्वप्नांची पुरेना
आठवणींच्या कोषात
एक हुंदका मावेना
वाटुलीच्या ओझ्याखाली
कशी ओढू पायओढ
मिटलेल्या पापणीला
वेदनेची रातझड !

—*राजा महाजन*

## दूरच्या त्या वाटेवर

दूरच्या त्या वाटेवर
धुके पहुडे निवांत,
लाल मातीच्या कपाळी
रंग रंगतो दंवात
दूरच्या त्या वाटेवर
उभे झाड वेडेखुळे;
त्याला नाही काटेकुटे
फक्त तुरे जांभळे.
त्याच वाटेवरी आणि
ओळ पावलांची चाले–
पंख पसरीत पुढे
मन झेपावत राहे.
दूरच्या त्या वाटेवर
ऊन्ह झाले की सावली
मनोमन हरखली,
मीच झाले
माती कशी !

—*कु. सुमन करमरकर*



ख्रिस्तिन किलर

जॉन प्रोफ्युमो

मि. हॅरॉल्ड मॅक्मिल

डॉ. स्टीफन वॉर्ड

इजिप्तवर इंग्लंडने आततायी आक्रमण केले आणि अँथनी ईडनला आपले पंतप्रधानपद गमवावे लागले.

तीच पाळी ईडनच्या पाठोपाठ पंतप्रधानकीवर चढलेल्या मॅक्मिलनसाहेबांवर १९६३ च्या अखेरीस येऊन ठेपली होती.

मॅक्मिलनच्या राजकीय कर्तृत्वावर आसा प्राणांतिक आघात करणाऱ्या प्रोफ्युमो–किलर–वॉर्ड–इव्हॅनोव्ह या सोनेरी टोळीची ही रसभरित हकीकत.

या टोळीच्या विलासी रंगढंगांकडे दुर्लक्ष केले तरी सामाजिक व राजकीय क्षेत्रांना स्पर्श करणारे कितीतरी प्रश्न या प्रोफ्युमो–प्रकरणासारख्या प्रकरणांमुळे उद्भवत असतात.

१. राज्यकारभाराची जबाबदारी वाहणाऱ्या मंत्र्यांचे चारित्र्य ही त्यांची खाजगी बाब मानण्यात येते; पण सैल चारित्र्याचा मंत्रि लंपटही असण्याची शक्यता फार. या लंपटतेमुळे प्रलोभनांना बळी पडण्याची वृत्ती वाढते व अखेर त्या राज्यकर्त्याच्या हातून कळत न कळत एखादे देशविघातक कृत्य घडण्यातही त्याचे पर्यवसान होऊ शकते.

२. अशा नाजुक व अडचणीच्या परिस्थितीत लोकशाही देशात वृत्तपत्रे, लोकसभेतील विरोधी पक्ष व स्वतंत्र सभासद यांना कुठली कामगिरी बजवावी लागते? ही कामगिरी बजावण्यात शुद्ध लोकहिताची दृष्टी किती असते व सत्तालोभ, प्रसिद्धी, पैसा यांचा वाटा किती असतो?

३. सत्ताधारी पक्षाच्या वा गटाच्या मुळावरच असे एखादे प्रकरण उठले तर लोकशाहीचे सर्वसामान्य संकेत झुगारून देऊनही सत्य दडपण्याचा पक्षाकडून वा गटाकडून कसा आटोकाट प्रयत्न केला जातो, यातील धोका कसा कमी करता येईल?

लोकशाहीचे माहेरघर असणाऱ्या इंग्लंडमधील प्रोफ्युमो-प्रकरणी या सर्व प्रश्नांचे साद-पडसाद उमटलेले आहेत. तेथील वृत्तपत्रांतून यावर जाहीर चर्चा झडल्या. काही पुस्तकेहि या विषयावर प्रकाशित झाली.

त्यातल्या त्यात महत्त्वाच्या वाटलेल्या

**"Scandal 63"**

[Clive Irving : Ron Hall Jeremy Wellington]

या पुस्तकावरून हा प्रदीर्घ परिचयलेख

**रा. म. शास्त्री**

यानी 'माणूस'साठी तयार केला आहे.–सं.

# आणि मॅक्मिलनचे तख्त कोसळले!

---

**: १ :**

**राज्यकर्त्यांच्या मनात सुंदरा भरू लागल्या की त्या हवेलीत शिरल्याच!** हा अनुभव सनातन आहे. मग हौसेला मोल उरत नाही. मग जिच्यावर भले भले आषक झाले ती 'रति धाकटी, सिंहसम कटी' म्हणून गाजावाजा पावली नाही तरच नवल! तशात अशी एकाकी सुंदरा—बाहुली कामसूत्रात! मदननेत्रात! काव्यशास्त्रात निपुण ही फार—*या जातीची असली की तिने कैकाची भाग उतरलीच म्हणून समजा!* हा खेळच असा धोक्याचा असतो—धोक्याचा असतो खरा परतु शहरी सुबत्तेत कसबिणी बायकांची फार दाटी उडाल्यावर यातून साधारण वकुबाचा राज्यकर्ता वाचला तर केवळ अपघातानेच! म्हणून ब्रिटिश पतप्रधान हॅरॉल्ड मॅकमिलन् यानी २० जुलै १९५७ ला जेव्हा इंग्लंडच्या सुबत्तेचा डंका पिटला तेव्हा या सुबत्तेच्या कवचाआड काही काळेबेरे छपलेले असेल अशी शंका देखील त्यांना कशी आली नाही याचे खरोखर आश्चर्य वाटते! त्या दिवशी बेडफोर्ड येथील आपल्या पक्षाच्या मेळाव्यापुढे भाषण करताना मॅकमिलनसाहेबांनी सांगितले.

"उघडच सांगून टाकतो. आपल्यापैकी बहुसंख्य लोकांना सध्याच्या इतक्या सुबत्तेचा काल यापूर्वी कधीच वाट्याला आलेला नव्हता—(Let us be frank about it. Most of our people had never had it so good......)

**सोन्याचा धूर**

ही सुबत्ता आणखी वाढावी, दुपटीने चौपटीने उपभोग वाट्याला यावे या इच्छेपायी १९५९ सालच्या निवडणुकीत कॉन्झर्वेटिव्ह पक्षाला ब्रिटिश प्रजाजनानी बहुसंख्येने निवडून दिले. सुबत्ता झाल्याचा जो गवगवा मॅकमिलनसाहेबानी आपल्या भाषणात केला त्यावर टीकास्त्र सोडण्याच्या इराद्याने मजूर-पक्षाच्या पुढाऱ्यानी त्याचा पुनः

पुन: भाषणातून उल्लेख करून वाढत्या किंमतीचा विचार करता ही सुबत्तेजी शेखी खोटी आहे याचे विवेचन केले. परंतु या टीकेपेक्षा प्रत्यक्षात जाणवणारी सपत्तीची ऊब ब्रिटिश प्रजाजनाना अधिक मोहक वाटली. आणि हुजुराच्या गळचात पुन: पाच वर्षे राज्यसूत्रे त्यांनी अडकवली.

मॅकमिलनसाहेबानी बेडफोर्ड येथील भाषणात अभिमानाने सागितले—" देशात कुठेही जा, कारखानदारी असलेल्या शहरात जा किंवा खेड्यापाड्यात जा—सर्वत्र तुम्हाला सुबत्तेचीच जाणीव होईल. अशी सुबत्ता या पिढीच्या आयुष्यात कधी तिच्या वाट्याला आलेली नव्हती. किंबहुना या देशाच्याच इतिहासात अशी सुबत्ता झाल्याची कधी नोंद नाही......!"

## कामचेष्टितांचा पूर

या भाषणानतर फक्त महिनाभरात एक महत्त्वाचा अहवाल प्रसिद्ध झाला. हा कसला अहवाल होता ? १९५४ साली सरकारने इंग्लडमधील *समलिंगीसंभोग आणि वेश्याव्यवसाय* (*Homosexuality* and prostitution) या दोन बाबीचा विचार करण्याकरता कमिशन नेमले होते. तीन वर्षांच्या प्रदीर्घ सशोधनानतर हा वुल्फडेन रिपोर्ट १९५७ साली अखेर लोकापुढे आला. लॉर्ड हॅल्शॅम हे त्या कमिशनचे सभासद होते. त्यांना जेव्हा विचारले की अहवाल प्रसिद्ध होण्यास एवढी तीन वर्षे हो का लागली ?" तेव्हा त्यानी उत्तर दिले :—" It was an inexhaustible subject for discussion."(अहो किती चर्चा केली तरी पुरे वाटेना, असाच मुळी हा विषय ना!) अशी ही चविष्ट चर्चा तीन वर्षे झाली आणि कमिटीने शिफारशी काय केल्या ते पहा—

(१) वयात आलेल्या व्यक्तीनी खाजगी रीत्या परस्पर संमतीने समलिंगीभोगाचे सुख अनुभवले तर तो फौजदारी गुन्हा ठरू नये.

(२) रस्त्यावरील कामचाळ्याबद्दल शिक्षा वाढवण्यात यावी.

(३) जे घरमालक आपली जागा वेश्याना धद्यासाठी वारेमाप भाड्याने वापरू देतील त्याना अनैतिक मार्गाने पैसा मिळवल्याच्या गुन्ह्याखाली शासन व्हावे.

(४) रस्त्यावरील उघड वेश्याव्यवसायापेक्षा दुकानांतून आढळणाऱ्या **'मसाज'**, **'मॉडेल्स मिळतील'** अशा जाहिरातीच्या सख्येतील वाढ ही समाजाला कमी हानिकारक समजण्यात यावी.

या कमिशनने आपल्या अहवालात रतिकन्याच्या (Call girls) संख्येत यापुढे वाढ होणार हे नमूद केले होतेच आणि याचा सरळ परिणाम म्हणून या धद्यात दलालांचा नवा वर्ग उदयास येणार याचाही इशारा दिला होता. परतु एकदर विचारप्रवाह असाच होता की वेश्यागमन हे खाजगीरित्या घडणारे पापकर्म असल्यामुळे समाजापुढे त्याची जास्त चिकित्सा आवश्यक नाही.

या सुमारास लंडनच्या गजबजणाऱ्या वस्तीतून उघडपणे रतिकन्याची सख्या अमाप वाढलेली होती. पार्कलेन, कर्झन स्ट्रीट, सोहो, स्टेपनी या सर्व भागातून त्या त्या वस्तीतील लोकाच्या दर्जानुसार मुली भरपूर प्रमाणात उपलब्ध होऊ लागल्या होत्या. वुल्फडेन रिपोर्ट प्रसिद्ध होऊन वर्ष उलटले तरी या अहवालावर सरकारने अद्याप काहीही हालचाल केली नव्हती. सर जॉन वुल्फडेन हे स्वत: कमिशनचे अध्यक्ष होते. त्यानी असा जाहीर आरोप केला की हा एक 'अनुल्लेखाचा कट 'च झाल्यासारखा दिसतो. (This is a conspiracy of silence).

शेवटी १९५८ च्या नोव्हेंबर महिन्यात रस्त्यावरील कामचाळ्याना पायबद घालणारे विधेयक पार्लमेंटमध्ये चर्चेसाठी पुढे आले.

या विधेयकात समलिंगी संभोगाच्या गुन्ह्याची दखल घेण्यात आलेली नव्हती. परंतु रस्त्यावरील गुन्ह्यांना भरपूर दंडाची व कोठडीची शिक्षा देण्याची तरतूद केलेली होती. अनैतिक मार्गाने पैसा मिळवणाऱ्या व्यक्तीला जास्तीत जास्त पाच वर्षांची शिक्षा बिलात सुचवलेली होती. ही शिक्षा वेश्यांकरता नसून जे अशा वेश्याच्या जिवावर स्वत.चे पोट जाळतात अशा दलालाना (pimps) आणि मुली पुरवणाऱ्याना (procurers) सागितलेली होती.

या धद्यातील जे दलाल असतात त्यांच्यासबधी वुल्फडेन कमिशनपुढील साक्षीत एका साक्षीदाराने एक महत्त्वाची गोष्ट नमूद केलेली आहे. या साक्षीदाराने सागितले आहे—

"*This man, the Pimp may be literally the 'bully'* which is another of his titles – but he is frequently the only person in the world towards whom she feels affection and sense of possession... he may be the one humanising element in the life of the woman on whom he lives."

(हा जो वेश्या-दलाल असतो तो बहुधा धटिंगणच असतो. परतु असे असले तरी बहुश: याच एका माणसाबद्दल धंदा करणाऱ्या वेश्येला काही आत्मीयता वाटू लागते आणि काही नाते निर्माण झाल्यासारखे तिला जाणवते. तिच्या देहविक्रयावर तो आपले पोट भरत असला तरी त्याच एका माणसाचे अस्तित्व तिच्या आयुष्यात काही माणुसकीचे बध निर्माण करते.)

या विधेयकावरील चर्चेत गृहखात्याचे चिटणीस डेव्हिड रेंटन् यानी म्हटले होते–

"तरुण आणि पुष्कळ वेळा लावण्यवती मुलीही आपल्या चागल्या घराचे आसरे सोडून या वेश्याजीवनाच्या भयानक बाजारात खेचल्या जातात, हा तरुण मुलींचा ओघ कसा थाबवावा हाच या गृहापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे."

## ख्रिस्तिनची कुळकथा

रेंटनसाहेबानें उपस्थित केलेल्या महत्त्वाच्या प्रश्नाची चर्चा पार्लमेंटमध्ये १९५८ च्या नोव्हेंबरात सुरू झाली. परंतु १९५७ सालीच या प्रवाहात अडकलेल्या एका कोमलांगीचे जीवन काही त्यामुळे आता बदलणार नव्हते. व्रीसबरी (Wraysbury) या खेड्यात रेल्वे सायडिंगला एक मोडका रेल्वेचा डबा पडलेला होता. या डब्यात अनेक गरीब कुटुंबे आपला उध्वस्त संसार कसाबसा सावरून राहत होती. बकिंगहॅमशायर परगण्यातील थेम्सच्या तीरावरील हे एक छोटेसे गाव. हमरस्त्याच्या कडेला वसलेले हे गाव एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला गावावरून रेल्वे गेली तेव्हा प्रथम गजबजू लागले. त्यानंतर वर्षांमागून वर्षे गेली. खेड्यापासून तो नदीपर्यंतच्या भागात मध्यमवर्गीयांची घरे आणि गरीब लोकाच्या गलिच्छ वस्त्या हळूहळू रुजल्या; वारेमाप वाढल्या. मुंबईच्या एखाद्या उपनगराप्रमाणे या खेड्याचा अवतार झाला. गावाची वाढ झाली. परंतु एखाद्या

पोलियो रोगाचा बेडसर मुलगा सुजल्यासारखा फुगावा तशी ही वाढ होती. त्यात कसली योजनाबद्धता नव्हती. जागा मिळेल तशी लोकवस्ती रचलेली. त्यात बगले होते, घरे होती, चाळी होत्या, तंबू होते, झोपड्या होत्या रेल्वेचे मोडकेतोडके डबे होते आणि रंगशाळा (Night clubs) होत्या.

या वस्तीत ख्रिस्तिन किलरची आई आपल्या मुलीला घेऊन एका मोठ्या रेल्वेच्या डब्यात राहात होती. ख्रिस्तिन जन्माला आली आणि तिच्या आईने नवऱ्याला सोडून या वस्तीत मुलीसह आपले घर थाटले. या घरापासून थेम्स नदी फक्त काही फुटावर होती. घर आणि नदी यात छोटीशी बाग काय ती होती. गाडीच्या डब्याची चाके जमिनीत पुरती रुतलेली नसल्यामुळे जमीन आणि घराची जमीन यांत दोन फुटाचे अतर अजून कायम होते. त्यामुळें घरात ओल वगैरे मात्र येत नसे.

## लंडनचे दिवे

या देवाने वसवलेल्या बकाल वसाहतीत ख्रिस्तिन वाढली. दुसरे महायुद्ध सपले तेव्हा ती तीन वर्षांची होती. शाळेत असताना आडदांडपणाबद्दल ती ख्याती पावली होती. ती जसजशी कौमार्यावस्थेत शिरू लागली तसतशी पोरासोराच्या नजरा तिच्यावर खिळू लागल्या. त्या नजरांची तिलाही चटक लागत गेली. पधराव्या वर्षी तिने शिक्षणाशी घटस्फोट घेतला. परतु मोकळेपणात करावे काय हा तिच्यापुढे प्रश्नच होता. व्हिसबरीपासून लडनचे दिवे फक्त चौदा मैलावर लुकलुकत होते.

रात्री निळ्याशार आणि मादक होत्या. ख्रिस्तिनला स्वस्थ बसवेना. ती १९५७ मध्ये लडनला–सोहो भागातील एका तयार कपड्यांच्या दुकानात रुजू झाली.

लंडन नगरीत ती फार काळ अज्ञात राहणे शक्य नव्हते. एका फोटोग्राफरने तिला मासिकाच्या मुखपृष्ठासाठी फोटो देण्याची विनंती केली. बिकिनी हा अर्धनग्न पोषाख घालून तिने फोटो घेऊ दिला. फोटोत तिचे लावसडक पाय आणि बेताचे स्तनद्वय प्रकर्षाने ध्यानात येत होते. परंतु फक्त १५ वर्षे वयाच्या मानाने तिचे देहदर्शन एखाद्या प्रमदेसारखे वाटत होते. 'टिट्-बिट्स' पत्राच्या २२ मार्च १९५८ च्या अंकावर हे छायाचित्र प्रसिद्ध झाले. या छायाचित्राच्या प्रसिद्धीनंतर बरोबर पाच वर्षांनी या मुलीशी आपला अनैतिक सबध नाही हे धादात खोटे वक्तव्य युद्धमंत्री प्रोफ्यूमो यांनी कॉमन्समध्ये केले.

'टिट्-बिट्स' पत्राने हे छायाचित्र प्रसिद्ध करताना त्या चित्राखाली शिफारस केलेली होती–

"–जरी ही पंधराच वर्षांची असली तरी ख्रिस्तिन आजच इतकी सुडौल आहे की मॉडेल म्हणून धंदेवाईकपणे आजच ती वावरू शकते. परंतु मॉडेल म्हणून धंदा करण्याची कल्पना तिला पटत नाही. आणि याचे कारण खरेच बोलायचे तर तिला माणसाच्या सहवासापेक्षा पशुपक्ष्याचा सहवास अधिक आवडतो." (Quite frankly she rather prefers animals to people.)

## वेश्याव्यवसायाची हातभट्टी

ज्या लंडन शहरात अशा रीतीने ख्रिस्तिनने आपल्या नशिबाचा फासा फेकला त्या शहरावर नवीन कळा आता चढू लागलेली होती. लंडनचे झपाट्याने न्यूयॉर्ककरण घडत होते. निऑनच्या जाहिरातींनी रात्री झगमगू लागल्या होत्या. न्यूयॉर्क शहरात आढळणारी रतिकन्याची रेलचेल आता या शहरातही आढळू लागली होती. अशा वेळी या बाह्य धक्क्यानी समाजातील नीतिमूल्याना जे हादरे बसत होते ते हळूहळू शहरवासियांच्या अगवळणी पडत होते.

रस्त्यावरील कामचाळ्याना पायबंद घालणारा कायदा ऑगस्ट १९५९ मध्ये अमलात आला. आणि याचा परिणाम म्हणून १९६० सालातच इंग्लड आणि वेल्स मिळून १६० व्यक्तीना अनैतिक पैशात भागीदारी केल्याच्या आरोपाखाली शिक्षा ठोठावण्यात आल्या. कारण बहुधा हे वेश्यादलाल रस्त्यावरच धदे पटवताना पकडले गेले. पुढच्या साली हा आकडा २१९ वर गेला. याचा अर्थ वेश्याव्यवसाय हादरला असा घेणे अर्थातच चुकीचे होते.

**नेहमी अशा बंदीकायद्याने जे घडते तेच इंग्लंडमध्ये घडले. वेश्याव्यवसाय भूमिगत झाला. अधिक उत्तम प्रकारे या व्यवसायाचे संघटन सुरू झाले; आणि कायद्यापासून सुरक्षित अशा रीतीने हा व्यवसाय अधिक तेजीत भूमिगत अवस्थेत भरभराट पावू लागला.**

दुकानातून आढळणाऱ्या 'मसाज' किंवा 'येथे मॉडेल्स मिळतील' या पाट्याच्या सख्येत तर वाढ झालीच, परतु केवळ अतर्क्य अशा पातळीवर हा व्यवसाय जाऊन बसला. वेश्यागमन हे आता केवळ वृद्धीला पटणारे शरीरसुख राहिले नाही तर निव्वळ शरीरसुखापेक्षा कामचेष्टिताचे नानाविध प्रकार हे आता या धद्यात महत्त्व पावले. ठराविक श्रीमंत गिऱ्हाइकाना अशा कामलीलांनी खूष करून साधारण एक मुलगी एकेका रात्री शंभर पौंड म्हणजे जवळजवळ १५०० रुपये मिळवू लागली ! या कामोद्दीपक चाळ्याचा राजमान्य मुख्य प्रकार म्हणजे—स्ट्रिप क्लब ! स्ट्रिप क्लब म्हणजे जेथे तरुण मुली नाचता नाचता विवस्त्र होतात ती रगशाळा ! अशी विवस्त्र शाळा लडनमध्ये सुरू करणाऱ्यातील एक अध्वर्यू पॉल क्विन याला १४ एप्रिल १९६१ ला कोर्टाने जवळजवळ ७५००० रुपये एवढा जबरदस्त दड ठोठावला–तो केवळ स्ट्रिप क्लबमध्ये त्याने गोधळ माजू दिला म्हणून ! स्ट्रिप क्लब चालवायला काही कायदा आड येत नव्हता ! ! पॉलने आपल्या जबानीत तर ठणकावून सांगितले–

"There are few well-known names who have not been here ! The list includes at least thirty practising solicitors !"

["अशी फारच थोडी सुप्रसिद्ध माणसे लंडनमध्ये शिल्लक आहेत की ज्यानी अजून माझ्या स्ट्रिप क्लबमध्ये पाऊल ठेवलेले नाही. आणि येथे येणाऱ्या माणसांच्या यादीत याच कोर्टात प्रॅक्टीस करणारे निदान तीस तरी सॉलिसिटर्स आहेत !"]

## इथे तर प्रतिष्ठितांची वहिवाट !

आता बोला ! ज्या न्यायालयात समाजातील नीतिअनीतीचे शवच्छेदन चालते त्याच न्यायालयाचे तीस म्होरके या स्ट्रिप क्लबचे गिऱ्हाईक असताना मला शिक्षा का ? असाच प्रश्न जणू क्विन याने कोर्टाला विचारला होता ! पुढे वॉर्ड खटल्यात पुरुषांना नग्न करून फटके मारण्याचा जो चित्तथरारक खेळ वर्णन केला गेला तो खेळ पॉल क्विनच्या या रंगशाळेत केला जात असे, असे या खटल्यात कोर्टापुढे आले होते.

क्विनने आपल्या जबानीत लंडनमधील प्रसिद्ध व्यक्ती आपल्या-

सारख्यांच्या रंगशाळेत वारंवार येतात ही गोष्ट सांगितली ती खरी होती यात शंका नाही. कारण अशा रंगशाळेत–विवस्त्रलीला करणाऱ्या एका छबेलीने असे सांगितले–"माझ्यासमोर बसणारी ही बडी बडी धेंडे घास्तावल्यासारखी माझ्याकडे पहात बसतात!"

हे घास्तावणे फक्त अशा प्रसिद्ध आणि थोर थोर व्यक्तींच्या बाबतीतच शक्य आहे; कारण अशा ठिकाणी पुढल्या महागड्या खुर्च्या अडवण्याचा मोह जितका जबर तितकाच आपण हे करीत आहोत ही गोष्ट शक्य तो गुप्त राहावी याची धडपडही जोरदार; मग त्या विवस्त्रलीलेतील आनंद तरी मोकळ्या मनाने कसा लुटता येणार? हे म्हणजे सदाशिव पेठेतील व्युत्पन्न ब्राह्मणाने आर्यभूषण थिएटरात दौलतजादा करण्यासारखेच नाही का?

परंतु लंडनमध्ये केवळ स्ट्रिप क्लब सुरू झाले होते असे नाही. जरा अधिक संभावित क्लबही चालू झालेले होते. यातच एक 'मरे क्लब' म्हणून होता. पर्सिव्हल मरे हा याचा मालक मोठा करडा समजला जात असे. तिथे एकंदर पंचेचाळीस मुली कामाला असत. त्यातल्या काही गाणाऱ्या, काही नृत्यांगना तर काही केवळ देखण्या, सोबतीची मूक मागवणाऱ्या असत. यांना Show Girls म्हणत. शो गर्ल म्हणजे क्लबमध्ये आलेल्या गिऱ्हाईकाने विनंती केली तर त्याच्या टेबलाजवळ बसून घटका दोन घटका गप्पा मारणारी देखणी मुलगी! अशा मुलींना आठवड्याला जवळ जवळ १२० रुपये पगार असे. प्रत्येक गिऱ्हाइकाच्या विनतीचा स्वीकार केलाच पाहिजे असे बंधन मात्र नसे. हा केवळ तिच्या खुषीचा मामला असे. गिऱ्हाइकाकडून जाताना अशा मुलींना वीस ते पन्नास रुपये हमखास Tip म्हणून मिळत असत. मात्र अशी Tip मागताना कुणी आढळली तर मालक तिची तात्काळ हकालपट्टी करी. म्हणजे पैशाचा सर्व व्यवहार केवळ गिऱ्हाइकाच्या खुषीचा प्रश्न झाला. मग या मुलींना पगार देऊन संभाळण्याचा उपद्व्याप मालक का करीत असावा? या प्रश्नाचे उत्तर काही कठीण नाही. अखेर श्रीमंत विख्यात पुरुषांना लागते ती घटकाभराची सुंदर सोबत! क्वचित् त्यातून अधिक निकटचा लागावाधा निर्माण झाला तर ठीक, नाही झाला म्हणून घरची मुखशय्या काही दुरावत नाही. मग अशी सोबत हटकून मिळण्याची सोय कुणी केली तर तिथे चार पैसे अधिक देऊन प्रवेशासाठी मातबर मंडळीची रीघ लागणार नाही का? लागणारच......आणि अशी रीघ पर्सिव्हल मरेसाहेबाच्या रात्रक्लबातही लागलेली असे.

**शो-गर्ल!**

याच क्लबमध्ये ख्रिस्तिन एक दिवशी अचानक दाखल झाली. तिच्या एका मैत्रिणीने तिला नोकरीच्या व्यापापेक्षा हा अधिक सोपा धंदा सांगितला. ख्रिस्तिनची 'शो-गर्ल' म्हणून या क्लबमध्ये नेमणूक झाली. २६ ऑगस्ट १९५९ रोजी किलर या नव्या धंद्यात शिरली. दिवसाची श्रमाची नोकरी संपली आणि रात्री केवळ 'छोकरी' होण्याचा हा सुखासीन व्यवसाय आता तिला उपलब्ध झाला. येथेही शिस्तबद्धता होती. नियम होते. उशीर होता कामा नये आणि न सांगता रात्री चुकवता कामा नये. या गुन्ह्याला दंड होता. यापेक्षा कमी स्वरूपाचे गुन्हे म्हणजे नखे रंगविण्यास विसरणे किंवा केसाची नीट निगा न ठेवणे. किलरला हे नियम पाळणे देखील जड जाऊ लागले. याबद्दल मालक तिला दंड करू लागला.

साधारणतः शो-गर्लचे वय १६ ते १९ असे. शो-गर्ल म्हणून नोकरी मिळवल्यानंतर जर तिच्या पालकांना प्रत्यक्ष येऊन आपली मुलगी काय करते हे पाहावेसे वाटले तर त्यांच्या पालकांना क्लबचा मालक फुकट प्रवेश देत असे आणि मुलीचे आईवडील प्रत्यक्ष येऊन पाहातही असत. त्याना काही वावगे दिसत नसे. मोठमोठी माणसे एकेका रात्रीसाठी वीसवीस रुपये फक्त प्रवेशासाठी खर्चून येथे येतात, त्यांच्याशी लहर लागली तर बोलायचे, ड्रिंक घ्यायचे किंवा चहापान करायचे! मोठ्या समाधानाने या मुलीचे आईवडील घरी परतत असत!!

ख्रिस्तिनची आई तर ख्रिस्तिन काय करते याविषयी फारशी हळवी नव्हतीच. तिचा बाप तर आईशी घटस्फोट घेऊन केव्हाच वेगळा झाला होता. ख्रिस्तिन या क्लबमध्ये शो-गर्ल म्हणून हळूहळू लोकप्रिय होऊ लागली.

एके दिवशी रात्री एका अरब पाहुण्यावरोबर गप्पा छाटीत बसलेली असताना, ख्रिस्तिनची एका डॉक्टरशी ओळख झाली. हा डॉक्टर म्हणजे साधासुधा नव्हता. त्याला मसाजचे ज्ञान होते. बडी बडी माणसे त्याची गिऱ्हाईके होती. पन्नाशीजवळ आलेला हा माणूस दिसत असे मात्र पस्तिशीचा! आणि आपल्या या चिरतारुण्याचे कारण आपले वैद्यकशास्त्र असे तो खुबीदारपणे आपल्या बोलण्यातून सांगतही असे. ख्रिस्तिनला त्याने आपली ओळख सांगितली 'स्टीफन वॉर्ड! डॉ. स्टीफन वॉर्ड–सोसायटी ऑस्टिओपाथ!'

ख्रिस्तिनचे व डॉ. वॉर्डचे लागेबांधे लगेच जुळले. १ जून १९६१ या दिवशी डॉ. स्टीफन वॉर्ड १७ विंपोल म्यूज्, मर्लिबोन या ठिकाणी नव्या जागेत राहण्यासाठी आला. आणि त्याच्याबरोबर ख्रिस्तिन किलर राहू लागली!

अठ्ठेचाळीस वर्षांच्या डॉ. वॉर्डबरोबर एकोणीस वर्षांची किलर राहू लागली! लंडनमधील समाजात कसलीही हलमचल झाली नाही; कारण समाजातील नीतिनियम आता कात टाकीत होते.

बत्तीस वर्षांपूर्वी 'लेडी चॅटर्लीज् लव्हर' या लॉरेन्सच्या कादंबरीला इंग्लंडमध्ये बंदी करण्यात आली होती. हे पुस्तक 'पेंग्विन' या सुप्रसिद्ध प्रकाशकांनी १९६० साली प्रसिद्ध केले. हेतू हाच होता की पुनः एकदा न्यायालयात सध्याच्या पिढीच्या नियमांनुसार 'चॅटर्लीज् लव्हर' अश्लील ठरते की काय हे पाहावे! पस्तीस नाणावलेले साक्षीदार 'पेंग्विन' कंपनीने कोर्टात दाखल केले. यात शिक्षणतज्ञ होते, समाजसुधारक होते, वाङ्मयसेवक होते, राजकारणी पुरुष होते, सुशिक्षित स्त्रिया होत्या, तरुण मुली होत्या, शाळकरी पोरे होती–आणि या सर्वांच्या साक्षीने कोर्टाने 'चॅटर्लीज लव्हर' या पुस्तकावरची बंदी उठवली! पेंग्विन कंपनीने खटला जिंकला. कादंबरीच्या लाखो प्रती उघडपणे विकल्या गेल्या. हे पुस्तक पचविलेल्या, स्ट्रिप क्लबचे अस्तित्व गृहीत धरलेल्या, इंग्लिश समाजाच्या नीतिकल्पना आता बत्तीस वर्षांपूर्वीच्या कल्पनाशी तोंडओळखदेखील देऊ शकत नव्हत्या.

अशा या लंडन नगरात डॉ. वॉर्ड व ख्रिस्तिन किलर तूर्त तरी सुखाने नांदू लागली......

साल होते १९६१......!

## : २ :

८ मे १९४०—

दुसऱ्या महायुद्धातील जे अनेक दिवस चिरस्मरणीय झाले त्यांतील हा एक. १९४० चा मे महिना उजाडला तो ब्रिटनवरील नाझी जर्मनीच्या स्वारीच्या संकटात ! फ्लॅन्डर्सहून ब्रिटिश सैन्याने यशस्वी माघार घेतलेली. फ्रान्सवर जर्मनीची पकड बसलेली. आणि हिटलरचे सैन्य ब्रिटनमध्ये कधी उतरते हा केवळ त्याच्या खुषीचा प्रश्न झालेला. देशाला या दुर्दैवाच्या खाईत मुद्दाम असे कुणी लोटलेले नव्हते. परंतु भ्याडांच्या राजकारणाचे जे होते, ते स्वाभाविकपणे चेंबर्लेनसाहेबांच्या राजकारणाने ब्रिटनचे झाले. 'म्युनिक' करार करून सछत्री परतलेले चेंबरलेन इंग्लंडची धुरा वाहण्यास यापुढे योग्य नाहीत हा जवळ जवळ सर्व देशाचा निर्णय. असे असले तरी खुद्द हुजूर पक्षातच बंड झाल्याखेरीज—चेंबर्लेन हे पंतप्रधानकी सोडण्यास कसे उद्युक्त होणार ? परंतु इंग्लिश माणसांचा, संकटकाळातील जो दूरदर्शीपणा इतिहासात अनेक वेळा नोंदला गेलेला आहे, त्या अनुभवानुसार हूजूर पक्षातील ३० सभासदांनी चेंबर्लेन पंतप्रधान राहू नयेत यासाठी उघड बंड उभारले ! ८ मे १९४० रोजी विन्स्टन चर्चिल यांनी ब्रिटनचे पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घ्यावी, यासाठी आवश्यक ते पाऊल कॉन्झर्व्हेटिव्ह गोटातील ३० सभासदांनी उचलले. या तीस पार्लमेंट सभासदात सर्वांत तरुण आणि धडाडीचा असा एक सभासद होता—! वयाच्या पंचविसाव्या वर्षीच याने 'केटरिंग'ची पार्लमेंटची जागा लढवून ती जिंकली होती—हाच सभासद म्हणजे जॉन प्रोफ्युमो! जॉन प्रोफ्युमोबरोबरच हॅरॉल्ड मॅकमिलन आणि पुढे लॉर्ड हॅलशॅम झालेले तेव्हाचे क्विनटीन हॉग् हे आणखी दोन हुजूर सभासद या तीस बंडखोरात होते.

### प्रोफ्युमोची वंशवेल

जॉन प्रोफ्युमोचे आजोबा जोसेफ प्रोफ्युमो हे मूळ इटालीतील ! त्यांनी ॲनी मिल्स नावाच्या इंग्लिश मुलीशी लग्न केले व सप्टेंबर १८८५ मध्ये त्यांनी ब्रिटिश राष्ट्रीयत्व कायदेशीरपणे पत्करले. या जोडप्याला दोन मुलगे झाले. त्यातील थोरला अलबर्ट याने मार्था केनेडी या स्कॉटिश मुलीबरोबर लग्न करून मूळचे इटालियन रक्त पूर्णपणे ब्रिटिश रक्तांत मिसळवून टाकले असे मानण्यास प्रत्यवाय नाही. ३० जानेवारी १९१५ रोजी या जोडप्याला मुलगा झाला—याचे नाव जॉन डेनिस् प्रोफ्युमो, हाच तो बंडखोर जॉन प्रोफ्युमो !

डेनिस् प्रोफ्युमो यांनी बॅरिस्टरीत अतोनात संपत्ति मिळवली होती. दुसरे महायुद्ध जेव्हा संपले तेव्हा डेनिस प्रोफ्युमो हा मूळचा इटालियन रक्ताचा आहे याची नावनिशाणीदेखील उरली नाही. घरदार, संपत्ती आणि K. I. हा सरकारी किताब डेनिस प्रोफ्युमोने मिळवून प्रोफ्युमो घराण्याचे रोपटे ब्रिटिश मातीत आता पक्के करून टाकले. शेक्सपिअरचे गाव अॅव्हान (Stratford on Avon) या गावापासून बारा मैलांवर एक मोठा मॅन्शन त्याने खरेदी केला होता. पैशापाठोपाठ आलेली खानदानी आणि राजकारणाची आवड यामुळे डेनिस प्रोफ्युमो हे कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षात अलगद दाखल होऊ शकले. १९०६ व १९०९ या दोन निवडणुकोत डेनिस प्रोफ्युमो यांनी पार्लमेंटची जागा लढवली; परंतु त्यात ते पराभूत झाले.

ख्रिस्तिन किलर



सुंदरा मनामधे भरली । हवेलित शिरली

### बापसे बेटा !

आपला मुलगा जॉन प्रोफ्युमो याला मात्र बापाने सुरुवातीपासून राजकारणाच्या दृष्टीनेच सारे शिक्षण आखून दिले. हॅरो व ऑक्सफर्ड येथे जॉन प्रोफ्युमोचे शिक्षण झाले...शेतकी आणि अर्थशास्त्र हे दोन विषय घेऊन जॉन प्रोफ्युमोने पदवी मिळवली; परंतु शिक्षणाबरोबर खेळांच्या नाना विभागांत त्याने प्रावीण्य मिळवले. विमानोड्डाणाचे शिक्षण ही त्या वेळी तरुण ब्रिटिश मुलांची एक फॅशनच झाली होती. फावल्या वेळात जॉन प्रोफ्युमोने वैमानिकाचे शिक्षण पुरे केले. शिकार, पोलो, घोडदौड अशा अनेक विद्या जॉनने हस्तगत केल्या व त्यांत प्रावीण्य मिळवले. या सर्व बहुढंगांमुळे त्याच्या थोरामोठ्यांशी झपाट्याने ओळखी होऊ लागल्या.

डेनिस प्रोफ्युमोच्या अपेक्षा आता शतपटीने वाढल्या. त्याने जॉनला जगप्रवासाला धाडले. रशिया, चीन, जपान आणि अमेरिकेचा दौरा करून जॉन प्रोफ्युमो जेव्हा परतला तेव्हा त्याचा आत्मविश्वास एवढा वाढलेला होता की वयाच्या केवळ एकविसाव्या वर्षी त्याने फुलहॅम कॉन्झर्वेटिव्ह असोसिएशन या संस्थेचे अध्यक्षपद आढेवेढे न घेता स्वीकारले. या अध्यक्षपदाबरोबरच त्याचे संबंध अधिक विस्तारू लागले. फुलहॅम या विभागातून पार्लमेंटमध्ये निवडून गेलेले हुजूर सभासद होते ॲस्टर ! हेच ते पुढे प्रोफ्युमो प्रकरणात गाजलेले लॉर्ड ॲस्टर ! ॲस्टर-प्रोफ्युमो मैत्रीचा प्रारंभ झाला तेव्हा जॉन प्रोफ्युमो

केवळ एकवीस वर्षांचा होता व १९३८ साल उजाडले होते.

युरोपात हिटलर या वेळेस डरकाळ्या देऊ लागला होता. व्हर्साय तहान्वये जर्मनीने दोस्ताना देण्याची वार्षिक खंडणी हिटलरने कधीच बंद करून टाकली होती व त्याच्या सैन्याचे पडसाद सर्व जर्मनीत निनादत होते. जॉन प्रोफ्युमोने हिटलरचा देश समक्ष पाहण्याचे ठरवले व १९३८ च्या मे महिन्यात तो विमान घेऊन जर्मनीला गेला. परतत असताना त्याच्या विमानाच्या पंख्यात बिघाड झाला व जेमतेम इंग्लिश खाडी ओलांडून प्रोफ्युमोचे विमान कसेबसे इंग्लंडच्या किनाऱ्यावर 'लिपने' येथे उतरले.

## कर्तृत्वाची घोडदौड

पुढच्या दोन तीन वर्षांत जॉन प्रोफ्युमोचे समाजातील वजन सारखे वाढतच गेले. तो लवकरच वेस्ट मिनिस्टर आणि ग्रेट नॉर्दर्न या दोन हॉस्पिटलाचा अध्यक्ष झाला. या सर्वांचा परिणाम होऊन १९३९ च्या मार्चमधील निवडणुकीत हुजूर पक्षाने चोवीस वर्षांच्या जॉन प्रोफ्युमोला 'केटरिंग' या मतदार-संघातून तिकिट दिले. तिकिट मिळाले, परंतु या मतदार-संघात याच काळात कारखानदारीही वाढलेली होती व मजूर पक्षाला हुकमी मताधिक्य होते. निवडणुकीत जॉन प्रोफ्युमोचा मजूर पक्षाच्या उमेदवाराने पराभव केला. परंतु १९४० साली ऐन युद्धात याच मतदार-संघात पोट-निवडणूक घेण्याचा प्रसंग आला, आणि जॉन प्रोफ्युमोला पुन: हुजूर पक्षाने तिकिट दिले. या वेळी प्रोफ्युमोने आपली निवडणूकमोहीम जोमाने आखली. तरतरीत चेहरा, चमकदार डोळे, किंचित मागे सरकू लागलेले विरळ केस व त्यामुळे भव्य वाटू लागलेले कपाळ, असा हा जॉन प्रोफ्युमो वक्तृत्व सफाईदारपणे करी. त्याच्या सभाना गर्दी उसळू लागली. त्याची बहीण त्याच्याबरोबर प्रचारासाठी जात असे. या बहीण-भावडाच्या प्रचाराला या वेळी यश येऊन वयाच्या पंचविसाव्या वर्षी जॉन प्रोफ्युमो पार्लमेंटमध्ये निवडून आला.

पार्लमेंटमध्ये निवडून येण्यापूर्वी तो प्रादेशिक सेनेत दाखल होऊन सेकंड लेफ्टनंटच्या हुद्यावर होता. जर जर्मनीची स्वारी झाली असती तर या सैन्यावर फारच मोठी जबाबदारी येणार व त्या दृष्टीने प्रादेशिक सेनेची संघटना (Territorial Army) अत्यंत कार्यक्षम ठेवण्यात आलेली होती.

पार्लमेंट–समासद होताच जॉन प्रोफ्युमो प्रादेशिक सेनेत कॅप्टनच्या हुद्यावर गेला. ब्रिटनचे विमानदल R. A. F. आणि प्रादेशिक सेना यांच्यातील संबंध राखण्याची खास जबाबदारी जॉन प्रोफ्युमोवर सोपविण्यात आलेली होती. १९४२ मध्ये जॉन प्रोफ्युमोने 'रात्र आणि दिवस' (Night and Day) या नावाचे नाटक स्वत: लिहिले, ते परिश्रमपूर्वक बसवले व स्वत: त्यात काम करून त्याचे असंख्य प्रयोग सैनिकासाठी आणि त्याच्या कुटुंबियासाठी त्याने केले.

## इटालीच्या स्वारीवर

एक वर्षाने जॉन प्रोफ्युमो मेजर झाला व त्याला प्रत्यक्ष युद्धआघाडीवर जावे लागले. उत्तर आफ्रिकेच्या लढाईत जॉन प्रोफ्युमो सामील झाला. फील्ड मार्शल अलेक्झांडर यांच्या अधिकारी–वर्गात 'सीनिअर एअर स्टाफ् लिआझाँ ऑफिसर' (Liaison Officer) म्हणून जॉन प्रोफ्युमो काम पाहू लागला. इटालीवर जेव्हा इंग्लिश सैन्याने स्वारी केली, तेव्हा त्यातील कामगिरीबद्दल जॉन प्रोफ्युमो याला O. B. E. (ऑफिसर ऑफ दि ऑर्डर ऑफ दि ब्रिटिश एम्पायर) हा किताब मिळाला.

युद्धात तो प्रत्यक्ष भाग घेत असला तरी पार्लमेंटचा सभासद म्हणून तो मध्येच इंग्लंडमध्ये येऊ शकत असे. १५ नोव्हेंबर १९४४ रोजी त्याने पार्लमेंटमध्ये एक महत्त्वपूर्ण भाषण करून मध्यपूर्वेत आणि अतिपूर्वेकडे लढणाऱ्या सैनिकांना अधिक सवलती मिळाव्या यासाठी आग्रह धरला. 'डेली मेल' आदि पत्रातून प्रोफ्युमोच्या या भाषणाची स्तुतिस्तोत्रे या वेळी प्रसिद्ध झाली.

कर्नल प्रोफ्युमो आता प्रत्यक्ष इटालीच्या भूमीवर जेता म्हणून उतरला असला तरी तीन पिढ्यांपूर्वी त्याचे घराणे इटालीतच राहत होते. कालाय तस्मै नम: !

१९४५ मध्ये इटालीतील जर्मन सैन्याने शरणागती दिली. मुसोलिनीची इटालियन लोकानीच विल्हेवाट लावली. शरण आलेल्या नाझी सेनाधिकाऱ्याना शरणागतीवर सही करण्यासाठी आणण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी कर्नल प्रोफ्युमोवरच टाकण्यात आलेली होती. या अनुभवासंबंधी वृत्तपत्रात लिहिताना जॉन प्रोफ्युमोने लिहिले आहे—

"If I retreat," shouted Mussolini from the balcony of his palace in Rome at the height of his power, "then kill me" To-day he lies stiff and cold in a Milan mortuary. He had retreated and with him the German Army, comprising of some twenty-two Nazi and six Fascist Divisions—! May 3rd 1945 will remain uppermost in my memory throughout my life. I had the privilege of being sent with an Allied escort for conducting the conquered Nazi Generals. The meeting took place at night by the light of the torches. It was formal and quiet, save for the clicks of Nazi boots. There was no handshaking."

[ "रोमच्या आपल्या प्रासादाच्या सज्जावरून मुसोलिनीने एकदा घोषणा केली होती—" जर मी पराभूत होऊन पळालो तर खुशाल माझा वध करा." आज मिलानच्या एका दफनभूमीत मुसोलिनीचे ताठरलेले थंडगार शव मातीखाली गाडले गेले आहे. तो पराभूतही झाला आणि पळालाही ! एकटा पळाला नाही तर जवळजवळ बावीस डिव्हिजन्स नाझी सैन्य आणि सहा डिव्हिजन्स फॅसिस्ट सैन्य या सर्वांसह तो पराभूत झाला ! ३ मे १९४५ हा दिवस आयुष्यभर माझ्या स्मरणात राहील याच दिवशी पराभूत नाझी जनरल्सना शरणागती स्वीकारण्याकरता आणण्यासाठी जे दोस्त सेनाधिकारी पाठवण्यात आले त्यांतला एक म्हणून मला जाण्याची संधी मिळाली. रात्रीच्या काळोखात शरणागत जर्मन सेनानी आणि जेत्याची ही भेट टॉर्चेसच्या उजेडात झाली. सर्वत्र निस्तब्धता होती. फक्त नाझी अधिकाऱ्यांच्या बुटांचे सलाम ठोकताना आवाज झाले तेवढेच ! हस्तांदोलन तर झालेच नाही !!" ]

## मायदेशी परत

युद्ध संपले. प्रोफ्युमो घरी परतला व १९४५ च्या निवडणुकीत आपण निवडून येणार याविषयी त्याला तिळमात्र शंका नसताना त्याला मोठा धक्काच बसला. केटरिंग मतदारसंघाने त्याला दगा दिला.

साऱ्या देशानेच जेथे चर्चिलला धक्का दिला तिथे प्रोफ्युमोची काय कथा ! मजुरांचे बहुमत झाले आणि अॅटली मंत्रिमंडळ अधिकारावर आले. परंतु यावेळी प्रोफ्युमोचे इतर गुण त्याला मदतगार ठरले. सरकारने जपानमध्ये ( Liaison Officer ) लिआझाँ ऑफिसर म्हणून त्याची नेमणूक केली. जनरल डग्लस मॅकआर्थर याचे राज्य जपानवर चालू झालेले होते. दोन वर्षे प्रोफ्युमो जपानमध्ये होता. आणि या काळात त्याने मॅकआर्थरकडून प्रशस्तीही मिळवली.

१९४७ साली प्रोफ्युमोने सैन्यातील नोकरी सोडली व तो इंग्लंडमध्ये परतला. १९५० च्या निवडणुकांचे वेध लवकरच सुरू झाले. मतदार–संघाची फेरआखणी झाली होती. पूर्वीचा केटरिंग मतदार–संघ विभागला गेला होता व "स्ट्रॅटफोर्ड ऑन अॅव्हॉन" हा नवीन मतदार-संघ आता तयार करण्यात आला होता. जॉन प्रोफ्युमो याला हुजूरपक्षाचे तिकिट मिळाले. या नवीन मतदार–संघातून ९३४९ मताधिक्याने जॉन प्रोफ्युमोने प्रचंड यश संपादन केले.

मजूर मंत्रिमंडळ पुनः गडगडले. विन्स्टन चर्चिल पुनः पंतप्रधान झाले, आणि १९५२ मध्ये चर्चिल यांनी मंत्रिमंडळात जे थोडे फेरफार केले त्यांत जॉन प्रोफ्युमो याला पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून अधिकारावर घेतले. "मिनिस्ट्री ऑफ ट्रॅन्स्पोर्ट अँड सिव्हिल एव्हिएशन" यासाठी त्याची नेमणूक झाली. अर्थात् ही नेमणूक करताना प्रोफ्युमोच्या विमानविद्येचे व लढाईतील अनुभवाचेच प्रामुख्याने चीज करण्यात आले होते.

## सुंदर स्त्रीचा नवरा !

प्रोफ्युमो पार्लमेंटरी सेक्रेटरी असतानाच ५ जानेवारी १९५४ रोजी व्हॅलेरी हॉब्सन् या नटीशी त्याचा विवाह झाला. व्हॅलेरी हॉबसन् त्यावेळीं "The King and I" या चित्रपटात प्रमुख भूमिका करीत होती. तिचे पहिले लग्न अॅन्थनी अॅलन नावाच्या चित्रपट-निर्मात्याशी झाले होते. परंतु तिने घटस्फोट घेतलेला होता. या लग्नानंतर मात्र व्हॅलेरीने आपले सिनेमाजीवन संपवून टाकले. मिसेस् प्रोफ्युमो म्हणून ती चूलमूल सांभाळू लागली. व्हॅलेरी दिसायला अतिशय सुंदर होती, व याचा परिणाम जॉन प्रोफ्युमोवर काय झाला हे त्यानेच मोकळेपणाने सांगून टाकलेले आहे. त्यानेच एका मुलाखतीत सांगितले,—

"मी व्हॅलेरीसारख्या देखण्या आणि बुद्धिमान मुलीशी लग्न करताच वक्ता म्हणून माझी लोकप्रियता अचानक बेसुमार वाढली. मला नाना गोष्टींच्या उद्घाटनासाठी लोक बोलावू लागले. अर्थात बोलावणे करताना ते आठवण देत– 'अर्थात तुम्ही बरोबर मिसेस प्रोफ्युमोनाही घेऊन यायचे... अगदी न विसरता !' एकदा जेव्हा एका कार्यकर्त्याने मला दुटप्पी बोलावणे केले तेव्हा मी मुद्दामच सांगितले– "माझ्या बायकोला आणणे यावेळी जमणार नाही." माझे उत्तर पुरे होण्यापूर्वीच तो कार्यकर्ता म्हणाला– "मग राहू द्या ! आम्ही तुम्हांला पुढच्या वर्षीच बोलावू ! काय ?"

१९५७ मध्ये प्रोफ्युमो अंडरसेक्रेटरी झाला, व जुलै १९६० मध्ये पंतप्रधान मॅक्मिलन यानी त्याची 'सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर वॉर' म्हणून नेमणूक केली. यावेळी युद्धखात्याला प्रोफ्युमोसारख्या धडाडीच्या माणसाचीच गरज होती. १९६३ पूर्वी जवळजवळ १,६५००० एवढे सैन्यबल उभे करावयाचे होते. यासाठी प्रोफ्यूमोने



लॉर्ड अॅस्टर

ह्यांच्याच तलावात
ती सुप्रसिद्ध जलक्रीडा झाली!

धडाकेबंद प्रचाराला सुरुवात केली. सैन्यभरतीची रटाळ भाषणे तो टाळीत असे. नव्या नव्या कल्पना काढून सैन्यातले जीवन किती सुखमय आहे याचा प्रचार युद्धखाते कौशल्यपूर्ण रीतीने आता करू लागले.

जॉन प्रोफ्युमोची स्तुती आता सर्वत्र ऐकू येऊ लागली. 'टाइम्स' पत्राने त्याच्या कर्तबगारीचा गौरव केला. आतापर्यंत भटके जीवन काढलेला प्रोफ्युमो आता व्हॅलेरीशी लग्न करून शांत, सुखी परंतु कर्तृत्ववान भविष्याचे स्वप्न पाहात होता. सैन्य उभे करण्याची अवघड कामगिरी पार पाडली तर ब्रिटिश जनता, भावी पंतप्रधान म्हणून त्याच्याशिवाय कुणाकडे आशेने पाहू शकली असती ?

प्रोफ्युमोच्या जीवनाचे तारू लोकप्रियतेच्या सागरावर हिंदकळू लागले होते. सागर शांत होता. लाटा उठत होत्या. परंतु वादळाचे कसलेही चिन्ह नव्हते...

साल होते १९६१...!

## : ३ :

युद्धाची हवा काही सर्वांनाच मानवत नाही. जॉन प्रोफ्युमोला ती मानवली; कारण त्याच्या वडिलांनी जीवनातले असंख्य आनंद उपभोगण्याची जिद्द त्याच्या ठिकाणी परिश्रमपूर्वक जोपासली होती. परंतु असेही काही अभागी असतात की बुद्धिमान असले तरी जीवनात सुरुवातीची पावले टाकतानाच त्यांना आपल्या ठिकाणच्या क्षुद्रतेचीच फक्त वारंवार जाणीव होऊ लागते. मग जीवनातील यशाचे सारे राजरोस मार्ग चोखाळण्याची उमेद त्यांच्या ठिकाणी निर्माणच होऊ शकत नाही. असे लोक मग मनात कुढत कुढत जगतात; आणि जे सरळ

मार्गाने स्पर्धा करून मिळवता येत नाही ते सारे अवैध मार्गाने का होईना, हस्तगत करण्यासाठी ते जिवाचे रान करतात. कुणाला पैसा तर कुणाला कीर्ती हुलकावण्या देऊ लागते आणि प्रत्येक हुलकावणी-गणिक त्यांचे मार्ग अधिक अधिक अनीतिमान होऊ लागतात.

दुसऱ्या महायुद्धाची हवा अशाच एका हतभाग्याला मानवली नाही. स्टीफन वॉर्ड हा मूळचा बुद्धिमान मुलगा; परंतु त्याच्या आईला तो बृहस्पतीचा अवतारच वाटे.

शाळेत स्टीफन वॉर्ड फारसा कधीच चमकला नाही. शालेय शिक्षण संपताच त्याने ऑस्टीओपाथ (Osteopath) होण्याचे ठरविले. स्नायू व हाडे रगडून रोग बरे करण्याचे हे एक शास्त्र असते. अर्थात या धंद्यातील डॉक्टर या ज्ञानाला शास्त्र समजत नाहीत. ते तिला एक कलाच मानतात. डॉ. टेलर नावाच्या माणसाने या कलेची विद्या देणारे कॉलेज काढले होते. साधारणपणे तीन वर्षे या शिक्षणासाठी लागत असत. स्टीफन वॉर्डला हा शिक्षणक्रम पुरा करायला पाच वर्षे लागली !

## वॉर्डची पूर्वपीठिका

स्टीफन वॉर्डचा बाप पाद्री होता. हर्ट्स या गावी १९ ऑक्टोबर १९१२ रोजी स्टीफन वॉर्डचा जन्म झाला. त्याची आई श्रीमत घराण्यातली होती. तिच्याकडून त्याला फारशी शिस्त लागली नाहीच. स्टीफन वॉर्ड अठरा वर्षांचा असतानाच त्याने एका फ्रेंच मुलीला तीन आठवडे पळवून नेली होती. पुढे ती मुलगी सापडली. स्टीफन हा फार हुशार असून आज ना उद्या तो चागलाच कीर्ती मिळवील असे त्याची आई ज्याला त्याला सांगत असे. कर्तृत्वाचा बेहिशोब यासारखी माण-साची फजिती उडवणारी दुसरी आपत्ती नाही. आईच्या सतत स्तुती-मुळे स्टीफनला आपण खरोखरच फार बुद्धिवान आहोत असा अहंकार कायमचा जडला. वयाच्या विशीत तो हॅंबुर्ग, लंडन, पॅरिस या ठिकाणी अनेक नोकऱ्या करीत हिंडला. त्याला चित्रकलेचे ज्ञान बऱ्यापैकी होते. व याचा मुख्य उपयोग तो तरुण मुलींची रेखाचित्रे काढण्यासाठी करीत असे. या नादाने एक गोष्ट त्याच्या अशी ध्यानात आली, की सर्वसामान्य माणसाला मोना लिसा या जगद्विख्यात चित्रापेक्षा त्याच्या आयुष्यात आलेल्या तरुण मुलीचे—मग ती फडतूस का असेना— अधिक महत्त्व वाटते.

ऑस्टीओपथीचा शिक्षणक्रम करून स्टीफन वॉर्ड आता डॉक्टर झालेला होता. या डॉक्टरकीचा मुख्य फायदा त्याला होई तो म्हणजे समाजात प्रतिष्ठित म्हणून मिरवण्यासाठी. १९३४ साली त्याने अमे-रिकेचीही सफर केली.

## सैन्यात प्रवेश

१९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. स्टीफन वॉर्डला सैन्याच्या वैद्यक विभागात डॉक्टर म्हणून प्रवेश नाकारण्यात आला. कारण ऑस्टीओपथी हे वैद्यकशास्त्र म्हणून मानण्यास सेनाधिकाऱ्यानी नकार दिला. परंतु अशा लोकांकरिता युद्धआघाडीवर पिछाडीला बरीच कामे असत. जखमी माणसांची देखभाल—उपचारानंतरची—अशी माणसे करू शकत असत. या कामासाठी वॉर्डला सैन्यात दाखल करून घेण्यात आले. लेफ्टनंटच्या हुद्यावर त्याची नेमणूक झाली. अर्थातच वॉर्डचे या दुय्यम कामात समाधान नव्हते. पूर्वसूचना न देता तो रजेवर गेला व शिक्षा म्हणून त्याचा लेफ्टनंटचा हुद्दा काढून घेण्यात आला. त्याच्या स्कंधावरचा एक स्टार यावेळी काढून घेण्यात आला खरा पण जस-जशी युद्धाची तीव्रता वाढत गेली तसतसा वॉर्ड कॅप्टनच्या हुद्यापर्यंत पुन्हा जाऊन पोचला. १९४५ साल उजाडले. वॉर्ड यावेळी ३३ वर्षांचा होता. त्याच्या वागण्यात एक प्रकारची वेडसर झाक यावेळी अधि-काऱ्यांच्या लक्षात आली. त्याच्या मनाचा तोल क्षुल्लक कारणाने सुटत असे. शेवटी सेनाधिकाऱ्यांनी त्याला प्रत्यक्ष लढाईवरील नोकरी-साठी अपात्र ठरविले व त्याची मानसिक दुर्बलता कमी होण्यासाठी 'रोगी' म्हणून त्याची रवानगी लष्करी हॉस्पिटलात विश्रांतीसाठी करावी असा हुकूम सुटला.

## शहर पुण्यात वॉर्ड !

मानसिकदृष्ट्या तोल सुटलेल्या अवस्थेत १९४५ मध्ये डॉ. स्टीफन वॉर्डला भारतामध्ये— पुणे येथील हॉस्पिटलात उपचारासाठी धाड-ण्यात आले. पुण्यातील कॅंप भागात डॉ. स्टीफन वॉर्ड वावरू लागला. यावेळी त्याला कॅप्टन वॉर्ड म्हणून कॅंपातील श्रीमंत माणसे आणि बडी धेंडे ओळखीत असत ! वॉर्डच्याजवळ जे काही गुण होते त्यातला एक हा होता की ओळख झाल्यापासून दहा मिनिटांत तो भेटलेल्या माणसाला, दोघांची मैत्री फार जुनी आहे, असे वाटावे, एवढा तो मारून टाकीत असे. गोऱ्या कातडीच्या साहेबाशी मैत्री जोडण्यासाठी आसुसलेले धनिक आणि सस्थानिक, नवाब याची भारतात कधीच वाण नव्हती. बडोद्याचे महाराज आपली गाडी पाठवून कॅप्टन वॉर्डला पुण्यातील निवासात बोलावून घेत असत. डॉ. वॉर्ड ब्रिज उत्तम खेळत असे. बायकाच्या घोळक्यात तो सहज रमून जाई. बड्या धेंडाच्या काही मूर्ख स्त्रियाना तो फारच 'सोशल' आणि 'छान माणूस' वाटे ! डॉ. वॉर्डने आपल्या ऑस्टिओपथीची प्रॅक्टिस या संस्थानिकांवर आणि नबाबावर सुरू केली. संस्थानिकाचे आणि नवाबाचे श्रीमंती रोग, शरीर-मर्दनासाठी रावबताच वॉर्डला प्रसिद्धी आणि पैसा देऊ लागले. पुण्याच्या वास्तव्यात भारतीय कामशास्त्राचा अभ्यासही वॉर्डने केला. या शास्त्रात भारतातील बहुसंख्य माजी संस्थानिक व नबाब तर पिढ्यानुपिढ्या मुरलेले ! त्यांच्या रंगेल आयुष्याच्या कहाण्या वॉर्डने दस्तुरांच्या तोडूनच ऐकल्या असाव्या. भारतीय कामशास्त्रावर त्याने आपल्या मर्दनशास्त्राचे सुरेख कलम केले. मग जेव्हा तो इंग्लंडमध्ये परतला तेव्हा श्रीमंत सुखासीन लोकांची नाडीच त्याला गवसलेली होती.

## हॅरिमन-चर्चिल गवसले

लंडनमधील एका उपचार-केंद्रात तो डॉक्टर म्हणून नोकरीला असताना त्या केंद्रात त्यावेळेचे ब्रिटनमधील अमेरिकन वकील मि. ॲव्हेरेल हॅरिमन यांचेकरिता एका ऑस्टिओपाथची फोनवर विचा-रणा करण्यात आली. वॉर्डनेच तो फोन घेतला व काही क्षणांचाच विचार करून फोनवरून त्याने आपण स्वतःच उत्तम ऑस्टिओपाथ आहोत असे अमेरिकन वकिलातीला कळवले. ॲव्हेरेल हॅरिमन यांच्या बंगल्यावर वॉर्ड दाखल झाला. उपचाराने आणि आपल्या दिलखुलास बोलण्याने वॉर्डने त्या अमेरिकन वकिलाला मारून टाकले. हॅरिमन यांनी आपल्या मित्रांजवळ वॉर्डची शिफारस केली आणि वॉर्डची वकिलातीच्या वर्तुळात ये-जा सुरू झाली. रोग असलेले आणि नसलेले, वॉर्डकडून अग रगडून घेऊ लागले. नुसते कुणीही अंग

रगडले तरी माणसाला थोडे बरे वाटतेच की ! मग त्यातून एखाद्या वॉर्डसारख्या डॉक्टर म्हणविणाऱ्याने जरा सशास्त्र हेच रगडणे केले तर भुरळ पडुन तो माणूस वॉर्डची स्तुती करू लागला यात नवल नाही.

वॉर्डच्या हे लक्षात आले की यापुढे आता नोकरी करण्यात अर्थ नाही. ऑस्टिओपाथ म्हणून आता स्वतत्र प्रॅक्टिस केली पाहिजे, मग पैशाला काय कमी ? त्याने १९४७ मध्ये हार्ले स्ट्रीटवर कॅव्हेंडिश स्केअर' या विभागात एक फ्लॅट घेतला.

सुरुवातीचे फारच थोडे दिवस आर्थिक दृष्टया वॉर्डला जड गेले. परतु भारतातून इंग्लंडध्ये गेलेले राजे-महाराजे आणि नबाब यानी त्याची भारतातील कीर्ती तिथे पसरवण्यास मदत केली. कमीत कमी सात बडया भारतीयांनी वॉर्डला त्याची प्रॅक्टिस वाढविण्यास अप्रत्यक्षपणे फार मदत केली आहे. या प्रसिद्धिचक्रात सर विन्स्टन चर्चिलही अखेर गुतले. म्हातारपण झालेले व अशा वयात वॉर्डची कीर्ती त्याच्या कानी गेली. मात्र, चर्चिलसाहेब खूष झाले ते त्याची रेखाटने पाहून ! त्यानी वॉर्डला चित्रकलाच वाढवण्याचा उपदेश केला. चर्चिलचा मासा गळाला लागल्यावर मग काय ? सौ. डकन सॅन्डीस, विनोदी सिनेनट डॅनी के, सिनेतारका एलिझाबेथ टेलर, युगोस्लाव्हियाचे पदच्युत राजे पीटर, अशा अनेकानी वेळीप्रसगी वॉर्डकडून उपचार करवून घेतले.

## प्रिन्स फिलिपची दोस्ती

इग्लडच्या राणीचे सध्याचे यजमान ड्यूक ऑफ एडिंबरा हे त्यावेळी नुसतेच प्रिन्स फिलिप होते. त्याचे लग्न झालेले नव्हते. वॉर्डची त्यांची ओळख झाली. आणि दोघांची दाट मैत्री झाली. काही काही फार मोठ्या ओळखीपाळखी हे वॉर्डच्या यशाचे मुख्य सूत्र होते. अधूनमधून तो सुरापानाचे कार्यक्रम घडवून आणीत असे. अशा पार्टीला मग त्याचे सगळे बडे बडे मित्र हजर राहत असत. वॉर्डचा दबदबा अधिकाधिक वाढू लागला. थोरामोठयांच्या घरातील देखण्या स्त्रिया या कार्यक्रमाला हजर रहात. स्त्रियाचा सहवास आणि अघळपघळ गप्पात कैक सायकाळी वॉर्ड मोठ्या मजेत घालवीत असे. थोडयाच दिवसानी प्रिन्स फिलिपने युवराज्ञी एलिझाबेथला मागणी घातली. लग्न ठरले. राजवाडयातून याची अधिकृत घोषणा होण्यापूर्वी ही गोष्ट फारतर ब्रिटनच्या पतप्रधानाना माहीत असावयाची. परतु ही गोष्ट पतप्रधानाआधी कुणाला कळली? वॉर्डला ! अर्थात प्रिन्स फिलिपनेच ही गोष्ट त्याला सागितली असावी. या माहितीचा वॉर्डने पुरा फायदा उठवला. फिलिप व एलिझाबेथ याच्या प्रेमप्रकरणासबधी सूचक वाक्ये फेकून तो अधिक अधिक बडया घेडावर छाप टाकू लागला.

त्याला आता वृत्तपत्रातून डॉ. स्टीफन वॉर्ड–सोसायटी ऑस्टिओपाथ–अशा विशेषत्वाने सबोधण्यात येऊ लागले. ' प्रकाशातल्या व्यक्तीत किंवा ' गॉसिप ' सदरात वॉर्डचा उल्लेख होऊ लागला.

## वॉर्डचे रशियाप्रेम

अशा या डॉ. वॉर्डची राजकीय मते काय होती ? अमेरिकेवर त्याचा एकदरीत राग होता. प्रत्येक आतरराष्ट्रीय व्यवहारात रशियाचे प्रत्येक पाऊल त्याला बरोबर वाटे. मार्क्स किंवा लेनिन याचा अभ्यास असा त्याने केलेला नव्हता; परतु भावनात्मक पद्धतीने तो रशियाचा पाठीराखा झालेला होता. संभाषणांतून तो आपली मते उघडपणे बोलून दाखवी, ती अशा आर्जवी भाषेत की विरोधकांनाही त्याचे बोलणे आवडत असे. मध्येच तो असेही सागे, की इग्लडच्या हिताविरुद्ध अशी एकही गोष्ट आपल्या हातून होणार नाही !

ऑस्टिओपाथ म्हणून डॉ. वॉर्डचा धदा जोरात सुरू झाला व त्याची आर्थिक विवंचना तर संपलीच, आणि शिवाय धद्याच्या निमित्ताने त्याचा ज्या थोरामोठयाशी सबध आला, त्या ओळखीपाळखीमुळे वॉर्ड हे हळू हळू मोठेच प्रस्थ झाले.

वरील माहितीवरून एक गोष्ट उघड आहे, की जर केवळ पैसा मिळविणे एवढेच माफक ध्येय वॉर्डने डोळयापुढे ठेवले असते व साधारणपणे बऱ्यापैको पैसा मिळाल्यावर जे स्त्रीसुख घरात वा बाजारात उपलब्ध होते, तेवढयावर समाधान मानले असते तर एक हुशार यशस्वी डॉक्टर म्हणून वॉर्ड सुखाने राहू शकला असता.

## वॉर्ड–एक बिटनिक्

परंतु 'Scandal 63' या पुस्तकात इग्लिश पत्रकारानी वॉर्डच्या नेमक्या उण्यावर बोट ठेवले आहे.

" There are of course many people who combine large or even peculiar sexual appetites with successful professional lives and who, though their private activities may be well-known in their professional circles, continue to promote their business. But there was another element in Ward's activities which must have ultimately destroyed his standing. He was in a sense, a beatnik–smooth, charming and intelligent, but none the less a scavenger of experiences for all that —"

[असे पुष्कळ यशस्वी धदेवाले लोक असतात की जे आपली काहीशी फाजील कामवासना किंवा विक्षिप्त कामवासना पुरेपूर भागवून शिवाय आपल्या धंद्यावर त्याचा यत्किंचितही परिणाम होऊ देत नाहीत; अशा माणसाच्या धद्याच्या वर्तुळात त्याच्या खाजगी आयुष्याविषयी असख्य वावडया असूनही त्याचा परिणाम त्याच्या धद्यावर होत नाही. कारण आपल्या धंद्यांतील कर्तबगारी त्यानी सिद्ध केलेली असते. परतु वॉर्डची अखेर फसगत झाली ती त्याच्या वागणुकीतील आणखी एका विशिष्ट गोष्टीमुळे. एका अर्थाने वॉर्ड हा बिटनिक होता. मृदू, सुस्वभावी, हुषार, परतु सर्व गलिच्छ अनुभवाची फक्त भूक असलेला ! ]

कॅव्हेडिश स्क्वेअरमधील वॉर्डचा फ्लॅट हा जवळ जवळ धर्मशाळाच झाला होता. वॉर्ड मोठ्या उदार बुद्धीने आपल्या मित्रमैत्रिणीना तिथे राहू देई; परतु त्यासाठी पैसे मात्र भरपूर घेत असे. तो स्वत.ला मानसशास्त्रज्ञही समजत असे. आपल्या मित्राना अडीअडचणीत तो मदत करी; परतु हे करताना त्याला प्रत्यय येई तो मात्र स्वतःच्या कर्तृत्वाच्या सुगधाचा !

## लग्नाची नवलाई–नव्वद दिवस

१९४९ मध्ये वॉर्डने जागा बदलली, व डेव्हनशायर स्ट्रीटवर नवी जागा घेतली. मोहल्ला मात्र तोच होता. या वर्षी म्हणजे वयाच्या ३७ व्या वर्षी वॉर्डने लग्न केले. पॅट्रिशिया बेन्स नावाच्या एकवीस वर्षांच्या एका अभिनेत्रीशी हा विवाह झाला. जेमतेम दीड महिना

वॉर्डचे हे लग्न टिकले. त्याच्या बायकोने तो आपल्याशी क्रूरपणाने वागतो असे आरोपपत्र कोर्टात दाखल केले आणि कोर्टाने वॉर्डचे लग्न रद्दबातल केले. या खटल्यानंतर वॉर्डने सांगितले, " I was never ment to be married. I belong to them all. " [एका स्त्रीशी संसार करणे मला मानवणारे नव्हतेच. मी पुष्कळ स्त्रियांसाठीच आहे.]

एका बाईचा अनुभव या विटनिकने असा पचवला. त्यानंतर काही दिवस मार्गारेट ब्राऊन ही 'मॉडेल' त्याच्याबरोबर फिरताना दिसू लागली. 'डेली मेल' पत्राने वॉर्ड मार्गारेटशी लग्न करणार आहे असेही प्रसिद्ध केले. अखेर मात्र मार्गारेटने " Three coins in a Fountain " या चित्रपटाचा पद्यलेखक जुली स्टीनें याच्याशी लग्न केले. विटनिकचे अनुभवविश्व वाढत होते. तरुण मुलीशी कसे वागावे याचे शास्त्र त्याने बरोबर बसवले. मॉडेल म्हणून धंदा करणाऱ्या अनेक मुली, सिनेमाधद्यात शिरू पाहणाऱ्या मुली, वॉर्डच्याबरोबर सर्वत्र फिरू लागल्या. यांतल्या एका मुलीने आपला त्यावेळेचा अनुभव असा नमूद केला आहे.—

" He made you feel needed. Stefen flowed over with sympathy and understanding. He was not a bit handsome, but that did not make any difference. You felt comfortable and happy with him and there was not a cloud in the sky. "

[त्याला फक्त आपली गरज आहे असे तो वाटावयास लावी. सहानुभूती आणि समजूतदारपणा ही वॉर्डजवळ अमाप होती. तसा तो दिसायला काही देखणा नव्हता, परंतु त्यामुळे काही कमी आहे असेही वाटत नसे. त्याच्या सहवासात असताना सुखात आणि आरामात असल्यासारखे वाटे; दुःखाचा एकही ढग निरभ्र आकाशात आढळत नसे.]

वॉर्डच्या त्यावेळेच्या एका मित्राने सांगितले की, " वॉर्ड एवढ्या मुली कुठून आणतो हे आपणाला नेहमीच कोडे वाटे."

## किलर म्हणजे बुजरी मांजरी

एखादी खेड्यातली मुलगी लंडन शहरात आली व वॉर्डच्या सहवासात आली की ती पाहता पाहता बदलून जात असे. ख्रिस्तिन किलरची वॉर्डशी ओळख झाली. आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास ! अशी ही जोडी जमली ! वॉर्डने सुरुवातीला किलर कशी होती हे सांगून ठेवले आहे, वॉर्ड लिहितो– " She was just an alley-cat when I took her up. " [मी तिला सहवासात आणली त्यापूर्वी ती म्हणजे गल्लीतले भित्रे मांजर होती !]

या बुजऱ्या खारीचाच पुढे कायापालट झाला, आणि चित्त्याच्या झडपेने तिने वॉर्डचा बळी घेतला.

बरे, या असख्य मुलींच्या बाबतीत वॉर्ड मत्सरी नव्हता...फार उदारच होता असे म्हणावे लागेल. त्यांनी कुणाबरोबर कसेही वागावे. याला त्याची आडकाठी नव्हती. त्याचे संबंध जवळजवळ बहीणभावासारखे होते. एक गोष्ट मात्र निश्चित खरी की वॉर्डला या सर्व मुलींपासून फक्त स्वत.करता शरीरसुख नकोच होते... !

ख्रिस्तिन किलर वॉर्डला भेटली तेव्हा वॉर्ड हा ऑस्टिओपथीपेक्षा अनेक मुलींसाठी मित्र, भाऊ, हितकर्ता, प्रियकर, अशा अनेक भूमिका वठवणारा बहुढंगी चित्रकार डॉक्टर म्हणून लंडनच्या रंगभूमीवर वावरत होता. लॉर्ड अॅस्टर याच्या इस्टेटीवर त्याने एक छोटासा वृक्षवेष्टित बंगला भाड्याने घेतलेला होता. या बंगल्यात सभावित वेश्याची जा-ये राजरोस सुरू झालेली होती.

## ते मजेदार आरसे !

यावेळी वॉर्डचे निवासस्थान होते–मलिबोन येथील Bryanston Mews. या निवासस्थानाची हकिगत मोठी विलक्षण आहे. ह्या खोल्यांत प्रथम हॅमिल्टन नावाचा गृहस्थ राहात असे. त्याने या घरातील दोन खोल्यांच्या भिंतीत आरशाची अशी एक योजना केली की दुसऱ्या खोलीतील व्यवहार एका खोलीतून राजरोस पाहता ेतील व अर्थात याचा सुगावा दुसऱ्या खोलीतील व्यक्तींना लागणार नाही ! हॅमिल्टनने ही जागा सोडली आणि त्या जागेत गरीबांची लूटमार केल्यामुळे प्रसिद्धीला आलेला रॅचमन (Rachman) 'हैवान' राहू लागला. रॅचमन् हा मूळचा पोल होता. युद्ध संपल्याबरोबर रॅचमन इंग्लंडमध्ये आला. त्याने कमी भाडेकरी असलेल्या असख्य इस्टेटी त्रासलेल्या घरमालकांकडून खरेदी केल्या नतर दडपशाही, धमकी आणि वर्णद्वेषाची आग भडकावून भाडेकऱ्यांना जागा सोडून जाण्यास त्याने भाग पाडले. या रिकाम्या झालेल्या जागांच्या किंमती अवाच्या सवा वाढताच त्या विकून त्याने मोठे आर्थिक साम्राज्यच स्थापन केले. सर्व जागा त्याने विकल्या नाहीत. काही भरपूर भाड्याने वेश्यागृहे आणि रंगशाळा याना त्याने दिल्या.

रॅचमनशी वॉर्डची ओळख होताच त्याने वॉर्डला आपले रहाते घर भाड्याने देऊ केले. यावेळी रॅचमन आपले व्यवहार आवरण्याच्या मागे लागला होता, कारण इंग्लंडमध्ये त्याच्यावर टीका सुरू झाली होती. व त्याचे 'काळे जग' हळूहळू प्रकाशात येऊ लागले होते. रॅचमनची राहती जागा अर्थातच वॉर्डने घेतली आणि आरशाची रचना त्याच्या आयतीच हातात आली.


ख्रिस्तिन किलरच्या पाठोपाठ मॅंडी राईस–डेव्हिस ही ऑक्टोबर १९६० मध्ये लंडनला आली. किलरने तिला 'शो–गर्ल' म्हणून 'मरे क्लब'मध्ये नोकरी मिळवून दिली. मॅन्डी राईस लंडनमध्ये येण्यापूर्वी १९५९ च्या अखेरीपर्यंत किलर–वॉर्डबरोबर Bryanston Mews याच जागेत राहत होती. अर्थात वॉर्डने आरशाचा उपयोग काय केला हे पुढे खटल्यात सांगण्यात आलेच.

मात्र १९५९ अखेर किलर एका इराणी तरुणाबरोबर रहाण्यास गेली, आणि राईस डेव्हिस ही रॅचमनबरोबर राहूं लागली.

## चित्रकार म्हणून यश

या सर्व भानगडी करीत असतानाच वॉर्डच्या बाबतीत एक आश्चर्यजनक घटना घडत होती. चित्रकार म्हणून त्याची चांगली ख्याती पसरत होती. त्याने ड्यूक ऑफ एडिंबराचे रेखाचित्र काढले. हे रेखाचित्र काढीत असताना अर्थातच दोघांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. वॉर्डचे त्यानंतरचे चारित्र्य माहीत नसल्यामुळे ड्यूक ऑफ एडिंबरानी राजघराण्यातील प्रमुख व्यक्तींची रेखाचित्रे वॉर्डकडून काढवली. यथा राजा तथा मंत्री ! राजघराण्यात वॉर्डचा बडेजाव वाढताच मंत्रिमंडळाच्या सभासदानी वॉर्डला रेखाचित्रे तयार करू दिली. वॉर्ड हुषार खराच ! ही सर्व रेखाटणे "Illustrated London News " या नियतकालिकात तो नियमाने प्रसिद्ध करू लागला.

जॉन प्रोफ्युमो



असंगाशी संग.........

युजेन इव्हॅनॉव्ह



हल्ली मुक्काम सैबेरिया

वॉर्डची ही चित्रकलेची बाजू याच सुमारास प्रामुख्याने बोलबाला पावली नसती, तर कदाचित् वॉर्डच्या निवासस्थानी चालू असलेल्या जोडधंद्याच्या ज्या वदंता पार्लमेंटच्या काही समासदांच्या कानी आल्या होत्या, त्यांना एकदम गंभीर स्वरूप आले असते. परंतु असंख्य रंगच्छटांमुळे वॉर्डचे मूळ सत्यचित्र निश्चितपणे कुणालाच मनश्चक्षूंपुढे उभे करता येईना.

वॉर्डच्या घरी अनेक तरुण मुलींची जा-ये आहे व त्याचा संबंध याच मुलीमार्फत काही बड्या व्यक्तींशी येतो ही गोष्ट 'डेली टेलिग्राफ'चे संपादक सर कोलीन कूटे यांना ठाऊक नसावी. कारण यांच्याजवळ स्टीफन वॉर्डने जेव्हा कांही प्रसिद्ध सोविएट व्यक्तींची रेखाचित्रे काढण्याची इच्छा प्रदर्शित केली, तेव्हा त्यांनी लगेच इंग्लंडमधील रशियन वकिलातीचा आरमारी अधिकारी कॅप्टन युजेन इव्हनॉव्ह यांच्याबरोबर स्टीफन वॉर्डची ओळख व्हावी म्हणून, गॅरिक क्लबमध्य १९६१ च्या जानेवारीत एक खास भोजनसमारंभ घडवून आणला. वॉर्डची इव्हनॉव्हशी अशी ओळख झाली.

**मला मोठा म्हणा !**

वॉर्डच्या ज्या अनेक लहरी होत्या, त्यांनुसार कधी कधी तो पैशाची यत्किंचित फिकीर न करता, मित्रांकरता पैसे खर्च करून त्यांना चकित करी. इव्हॅनोव्हला घेऊन आता तो ठिकठिकाणच्या ब्रिज् क्लबांत जाऊ लागला. या क्लबातून शक्यतो तो आपल्याबरोबर कुणी अधिकारी किंवा प्रसिद्ध–अर्धप्रसिद्ध सिनेतारका घेऊन जाई. समजा, कुणीच महत्त्वाची व्यक्ती सापडली नाही तर बोलण्यातून इंग्लंडच्या राजघराण्याशी आपला घनिष्ट संबंध आहे हे दर्शविणारे उल्लेख तो हटकून करी.

इव्हॅनोव्ह व वॉर्ड 'कॅनॉट' नावाच्या क्लबात वारंवार जात. हळूहळू इव्हॅनोव्ह चांगला ब्रिज खेळू लागला. तो फारसा बोलका नव्हता. अर्थात त्याची राजकीय मतेही कधी ऐकायला मिळत नसत. जर त्याच्यापुढे पत्त्याचे जोड टाकले तर तो नेहमी तांबड्या रंगाचा जोड उचलीत असे. यावर ठरलेला विनोद होत असे व इव्हॅनॉव्हचे त्यावरचं बोलणेही ठरलेले असे. तो म्हणे–" मी सोविएट आहे, मी दुसरा कुठला रंग निवडणार ?" विनोद तोच. हसणे तेवढेच...बाकी काही औपचारिक बोलणे घडले तर घडले, नाहीतर फक्त पाने टाकीत राहणे एवढेच काम इव्हॅनॉव्ह करीत असे.

जानेवारी ६१ ते जुलै ६१ या सहा महिन्यांत वॉर्ड आणि इव्हॅनॉव्ह चांगले परिचित म्हणून लोकांना ठाऊक झाले. त्यापूर्वी वॉर्डची त्याच्याशी ओळखही नव्हती.

वॉर्डला ज्या प्रकारचा मोठेपणा सतत हवाहवासा वाटे तो केवळ पैशाने विकत घेण्यातील नव्हता. त्याला राजघराण्यांची प्रतिष्ठित ओळख हवी होती आणि रशियन नेत्यांची रेखाचित्रेही काढावयाची होती. थोडक्यात म्हणजे वॉर्ड हा नानाविध क्षेत्रांत खानदानीपण मिरविण्याचा हव्यास बाळगून होता. या दृष्टीने त्याच्या ठिकाणी दुसऱ्यावर छाप टाकण्याची जी थोडीफार शक्ती होती ती त्याने राबवली. जी थोडीशी कला अवगत होती ती त्याने माफकपणे उपयोगात आणली. या दोनच शक्तींनिशी तो यासाठी धडपडला असता तर कदाचित् थोड्याफार प्रमाणात तो समाधानात जगू शकला असता. परंतु एवढ्यावरच त्याचे समाधान नव्हते. खानदानीपणात काहीतरी सभ्यता अंतर्भूत असते. काही नीतिनियमांची शागीर्दी त्यांना करावी लागते. वॉर्डला असले कसलेही बंधन नको होते. त्याने आपले खाजगी जीवन या दृष्टीने वाटेल तसे उधळू दिले. इतके उधळून दिले की विकृतीचा हव्यासही पुरा करण्याचा त्याने चंग बांधला. इथेच तो घसरला. त्याच्या या मानसिक अधोगतीतून तो वाचण्याची शक्यता होती ती जेव्हा त्याला चित्रकार म्हणून ख्याती लाभू लागली त्या काळात. म्हणजे १९५९–६२ या काळात. कारण पुष्कळ वेळा यश माणसाला शहाणेही करते. परंतु १९६० साल

उलटले आणि वॉर्डचे सर्व धंदे तसेच चालू राहिले.

आता साल होते १९६१... !

: ४ :

एकोणिसशे एकसष्ठ साल उजाडले. पहिले सहा महिने वॉर्ड आणि इव्हॅनॉव्ह एकत्र फिरत होते. दोघांची चागलीच मैत्री जुळली होती. जेव्हा वॉर्डबरोबर इव्हॅनॉव्ह नसे तेव्हा वॉर्ड आणि ख्रिस्तिन किलर याची सलगी पुन: वाढू लागली होती. मध्यतरीच्या काळात ती वॉर्डला सोडून एका इराणी यजमानाकडे राहू लागली होती. परतु १९६१ सालाने किलरला पुन. वॉर्डकडे आणले. १ जून १९६१ रोजी मागे सागितल्याप्रमाणे मलिबोन विभागात '१७ विंपोल म्यूज' या ठिकाणी वॉर्डने नवी जागा घेतली व ख्रिस्तिन त्याच्याजवळ राहावयास आली.

### मदनमंजिरीची दृष्टभेट

याच सुमारास जून १९६१ च्या अखेरीअखेरीस इराकचा जनरल कासीम ब्रिटिशाना आव्हान देऊ लागला. इराकच्या तेलखाणी सरकारी मालकीच्या करण्याची घोषणा त्याने केली. कुवैत ही पर्शियन आखातातील ब्रिटिश वसाहत होती. आणि तेथून इग्लडला लागणारे चाळीस टक्के क्रूड ऑइल येत असे. कुवैत हा इराकचा भाग आहे व ब्रिटिशानी तेथून बऱ्या बोलाने जावे असेही जनरल कासीम म्हणत होता. इग्लडला कुवैतमधील तेलखाणी सोडणे शक्य नव्हते.

जून ३० ला जॉन प्रोफ्युमोच्या युद्धखात्याने, सहा हजार ब्रिटिश सेनेला कुवैतच्या रोखाने त्वरित कूच करण्याची गुप्तपणे आज्ञा दिली.

जनरल कासीमला धडा शिकवावा हा एक हेतू यात होता व कुणी कुचाळकी केली तर ब्रिटिश सेना कुठेही निमिषार्धात धडकेल, असा दबदबा निर्माण व्हावा, अशीही जॉन प्रोफ्युमोची इच्छा होती.

जुलै उजाडला तो मध्यपूर्वेत युद्ध पेटणार असा रंग घेऊन. जॉन प्रोफ्युमो या काळात अत्यत त्रासून गेला होता. कुवैतच्या कटकटीचा त्रास होताच आणि शिवाय ही सैन्याची पाठवणी अगाशी तर येणार नाही ही धाकधूक होती. अशा अवस्थेत ८ जुलै १९६१ ला त्याचा मित्र विल् अॅस्टर–लॉर्ड अॅस्टर–याने त्याला आपल्या क्लिव्हडेन येथील निवासस्थानी शनिवार–रविवार घालवण्यासाठी बोलविले. लॉर्ड अॅस्टरच्या याच निवासस्थानात डॉ. वॉर्डने वृक्षवेष्टित कॉटेज् वापरण्यासाठी भाड्याने घेतली होती. आठ जुलैला सायकाळी लॉर्ड अॅस्टरसह प्रोफ्युमो निवासस्थानाला जोडून बाधलेल्या पोहण्याच्या तलावाकडे आला. तेथे जाताच प्रोफ्युमोची नजर खिळूनच पडली! तलावात एक तरुण सुस्वरूप मुलगी जवळजवळ नग्नावस्थेत विहार करीत होती. सायकाळ व रात्रीची सीमारेषा, आणि नितळ स्वच्छ पाण्यात-पाण्याच्या रेषेआड एक सुस्वरूप विवस्त्र तरुणी !! प्रोफ्युमो विरघळला. काठावरची वस्त्रे पळवून झाडावर चढण्याचा खटयाळपणा न करताच हें अतर्क्य स्नानदृश्य पाहताना तो देहभान विसरला. "चादणी वरति । चमकती परति । हिच्यापुढे कार ?" असा प्रश्न त्याला पडला. त्याने आपला मित्र लॉर्ड अॅस्टर याच्या खाद्यावर थाप मारून विचारले, 'कोण्या रे सुभगाची ही मदनमजिरी ?'

मग लॉर्ड अॅस्टरने त्याला सागितले : "She is one of the Ward girls! She is Christine Keeler." [ ही वॉर्डकडे येणारी ख्रिस्तिन किलर ] आणि वॉर्ड कोण हा प्रश्न प्रोफ्युमोने विचारताच वॉर्डसबधी सपूर्ण माहिती लॉर्ड अॅस्टरने त्याला सागितली. मग त्याला आठवले की या वॉर्डशी आपली ओळख झालेली होती.

दुसरा दिवस उजाडला. ख्रिस्तिन दुसऱ्या दिवशी पुन: क्लिव्हडेन येथे आली. यावेळी तिच्याबरोबर कॅप्टन युजेन इव्हॅनॉव्ह होता. वॉर्डने याच दिवशी जॉन प्रोफ्युमोची किलरशी ओळख करून दिली. व उपचार म्हणून कॅप्टन इव्हॅनोव्हची ओळखही झाली. सोमवारी सकाळी प्रोफ्युमोने क्लिव्हडेन सोडले व तो पुन' लडनला आला. कुवैतला सैन्य पाठवले यावर वृत्तपत्रातून टीका सुरू झाली होती. 'टाईम्स' पत्राने सैन्याने कुवैतला पोचण्यास एवढा कालावधी का घेतला याची चौकशी करावी अशी मागणी करून सैन्यात काहीशी बेदिलीच असल्याचा आरोप केला. प्रोफ्युमोला पार्लमेंटमध्ये प्रतिपक्षाचे हल्ले काय दिशेने येतील याचा अदाज लागू लागला होता व त्या दृष्टीने बचावाची तयारी करणे त्याला भाग होते.

याच गर्दीत ३२ जुलैला सोविएट वकिलातीत सोविएट अतराळवीर मेजर युरी गागारिन याच्या सन्मानार्थ जी मेजवानी होती तिला जॉन प्रोफ्युमो हजर राहिला. या खान्याच्या वेळी इव्हॅनॉव्ह व प्रोफ्युमो याची दुसरी भेट झाली आता प्रोफ्युमो इव्हॅनोव्हला चागला ओळखू लागला.

प्रोफ्युमोच्या सुदैवाने कुवैतचे प्रकरण अगाशी आले नाही. जनरल कासीम नमला. त्याने कुवैतवर हल्ला करण्याची भाषा सोडली. ब्रिटिश सैन्य १९ जुलैला कुवैतमधून मागे घेण्यासही सुरुवात झाली. अर्थात पार्लमेंटमध्ये टीका झाली ती ब्रिटिश सैन्याची हालचाल शिस्तबद्धपणे झाली नाही या मुद्यावर !

### नवे आर्थिक संकट

कुवैतचे सकट टळले परतु जे सकट कोसळेल असे भाकित अर्थशास्त्रज्ञ करीत होते ते सकट दारात आल्याची कबुली याच महिन्यात ब्रिटिश मत्रिमडळाला द्यावी लागली. चलनफुगवटा झाल्यामुळे लोकाची वस्तू विकत घेण्याची शक्ती वरवर पाहता वाढल्यासारखी दिसत असली तरी ब्रिटनची तिजोरी धोक्यात आहे, निदान परिस्थिती काळजी करण्यासारखी आहे अशी कबुली चॅन्सेलर ऑफ दि एक्सचेकर सेल्विन लॉईड यांनी पार्लमेंटमध्ये दिली.

सर्वत्र गोधळ उडाला. सुबत्ता झाली म्हणून जो डागोरा हुजुराचे म्होरके मॅकमिलन यानी पिटला होता ती सुबत्ता अशी फसवीच ठरली काय ? वॉशिंग मशिन्स, रेफ्रिजरेटर्स, मोटारी घरोघरी झाल्या ही गोष्ट तर दिसत होती. मोटारीची सख्या तर एवढी झाली की मे १९६१ मध्ये ब्रिटनमधील सर्व ५६,१०,००० मोटारी सर्वच्यासर्व रस्त्यावर उभ्या केल्या असत्या तर दोन मोटारीत फक्त पस्तीस यार्डांचे अतर ठेवणे शक्य झाले असते ! मग आर्थिक सकट एकदम आले कसे ? उत्तर सोपे होते. ही सर्व श्रीमती केवळ चलनफुगवटयावर झालेली होती; तिजोरीत पुरेसे सोने नव्हतेच !

धावाधाव सुरू झाली. मजूरपक्षात एकदम चैतन्य पसरले. हुजूर पक्षात आत्मसंशोधन सुरू झाले. मॅकमिलनसाहेबानी युरोपियन कॉमन मार्केटचे समासदत्व ब्रिटनने घ्यावे या धोरणाचा पुरस्कार केला. बुडत्याला या काडीचा आधारच तारू शकेल असे त्यानी ३१ जुलै

१९६१ ला पार्लमेंटमध्ये सांगून टाकले.

जुलै महिना संपला. तेव्हा पतप्रधान मॅकमिलन घोरात होते आणि प्रोफ्युमो मात्र घोरत होता !

सुप्रसिद्ध आंग्ल कवी बायरन् याच्या म्हणण्याप्रमाणे 'दमट हवामान ही अनीतिकारक कामवासनेला फारच पोषक असते.' (Adultery is much more common where the climate is sultry). इंग्लंडमध्ये १९६१ च्या उन्हाळ्यात अशीच कोंदट गरम हवा पसरली होती. आठ जुलै १९६१ ला तर लंडनचे उष्णतामान ७०° अंशावर गेले होते. ज्याला शक्य होते तो लंडनबाहेर पळत होता.

ख्रिस्तिनला डॉ. वॉर्डने क्लिव्हडेन इस्टेटीवर राहायला बोलावलेच होते. वर्षाला फक्त सुमारे पंधरा रुपये अशा नावापुरत्या भाड्याने डॉ. वॉर्डने लॉर्ड अॅस्टरकडून क्लिव्हडेन येथील कॉटेज भाड्यानेच घेतली होती. दहा वर्षांची जुनी ओळख तेव्हा वॉर्डबद्दल लॉर्ड अॅस्टरला कसलाच संशय आला नाही !! जेव्हा डॉ. वॉर्डने हा वृक्षवेष्टित बंगला ताब्यात घेतला तेव्हा त्यात फारशा सुखसोयी नव्हत्या. डॉ. वॉर्डने त्यात असंख्य सुधारणा केल्या होत्या.

### क्लिव्हडेन येथील 'यमुनाजळि'!

क्लिव्हडेनला जाण्यासाठी निघताना मिस् किलरने आपल्या एका तरुण मित्राची मोटारगाडी ठरवली होती. मित्राच्या गाडीतून जात असताना वाटेत बसस्टॉपवर त्यांना एक मुलगी भेटली. ख्रिस्तिनने तिला पण 'येतेस का' विचारले व तीदेखील गाडीत शिरली.

हे त्रिकूट लॉर्ड अॅस्टरच्या इस्टेटीवर म्हणजे क्लिव्हडेनवर पोचले तेव्हा डॉ. वॉर्ड त्यांची वाटच पाहात होता.

याचवेळी लॉर्ड अॅस्टर आपल्या इस्टेटीवरील स्वतःच्या बंगल्यात बऱ्याच बड्या मंडळींची वाट पहात होता. या सर्वांत बडी व्यक्ती होती ती म्हणजे पाकिस्तानचे फील्ड मार्शल आयुबखान ! वॉशिंग्टन-वारीवर असताना त्याचा वाटेत लंडनला तीन दिवसांचा मुक्काम होता. व अॅस्टरसाहेबाचा पाहुणा म्हणून आयुबखान येणार होता. शिवाय जॉन प्रोफ्युमो व व्हॅलेरी प्रोफ्युमो हे दांपत्य यायचे होते. याशिवाय वीसतीस पार्लमेंटचे सभासद मिळून मोठीच मेजवानी अॅस्टरसाहेबानी योजली होती.

या सर्वांत विश्रांतीची अत्यंत आवश्यकता कुणाला असेल तर ती जॉन प्रोफ्युमोलाच. कुवैत प्रकरणात तो गळ्यापर्यंत बुडालेला होता. या प्रकरणाचा आठवडाभर त्याला ताणच पडला होता. इराणी आखातात ब्रिटिश सैन्याचे काय होते या विवंचनेत या युद्धमंत्र्याची झोप उडालेली होती. सर्व मंडळी हळूहळू जमली. जेवण संपले. हॉलमध्ये तर उकडू लागले तेव्हा काही निवडक मंडळींना घेऊन—ज्यात अर्थातच जॉन प्रोफ्युमोही होता—अॅस्टरसाहेब शतपावली करण्याकरता बाहेर अंगणांत आले. इस्टेट मोठी पसरलेली होती. बाहेर येताच सर्वांना रात्रीची रम्यता अधिक जाणवू लागली. बाहेर मोकळे माळरान होते. वारा घोंघावत होता आणि मोठे मजेदार वाटत होते.

बोलत चालत ही मंडळी इस्टेटीवर जी नोकराचाकरांची घरे होती त्या घराच्या मागल्या बाजूकडे वळली. तिथेच डॉ. वॉर्डच्या फ्लॅटला लागून पोहण्याचा बंदिस्त तलाव होता. थेम्सच्या किनाऱ्या-किनाऱ्यानेच ही पाऊलवाट होती. तलावावर अधिक गारवा वाटेल म्हणून अॅस्टरसाहेबांनी तलावाचे दार उघडले—

अॅस्टरसाहेबाच्या अर्जुनाला त्या क्षणी विश्वदर्शनच झाले ! तिथल्या तलावात ख्रिस्तिन नग्नावस्थेत डुंबत होती. डॉ. वॉर्डने तिची वस्त्रे गंमत म्हणून जवळच्या झुडुपात फेकली होती. यामुळे तिला बाहेर पडणेही कठीण झाले होते. जॉन प्रोफ्युमोची आणि ख्रिस्तिनची नजरभेट झाली आणि त्या नेत्रकटाक्षात प्रोफ्युमोचे मंत्रिपद भिजू लागले. मोठ्या नाटकाची नांदी सुरू झाली. शनिवारची हीच ती सायंकाळ की जेव्हा प्रोफ्युमोने अॅस्टरसाहेबाना विचारले, 'कोण्या रे सुमगाची ही मदनमंजिरी ?'

डॉ. वॉर्ड अर्थात चट्कन पुढे झाला. त्याची ओळख अॅस्टर-साहेबानीच करून दिली व वॉर्डने बाहेर आलेल्या ख्रिस्तिन किलरची व प्रोफ्युमोची ओळख करून दिली. यापूर्वीच १९५९ मध्ये वॉर्डची प्रोफ्युमोची ओळख एकदा झालेली असल्यामुळे जुन्या ओळखीला फक्त उजाळा मिळाला. प्रोफ्युमोला ध्यास जडला तो ख्रिस्तिनच्या तोंडओळखीचा !

दुसऱ्या दिवशी रविवार होता. पोहण्याच्या तलावात डुबण्यासाठी दुसऱ्या दिवशीचे निमंत्रण अॅस्टरसाहेबानी सर्व बड्या मंडळींना दिले. जुजबी ओळखी झाल्या व अॅस्टरची पाहुणेमंडळी मोठ्या कष्टाने त्या दिवशी परत फिरली.

शनिवारी रात्री किलर परत लंडनला आली.

### प्रे. आयुबखानांची फोटोग्राफी

रविवारी पुन्हा क्लिव्हडेनला जाण्याकरता किलर निघाली तेव्हा आदल्या दिवशीचा तरुण मित्र तिच्याबरोबर नव्हता. तिला मोटा-रीतून अॅस्टरसाहेबाच्या इस्टेटीवर आणले ते युजेन इव्हॅनोव्हने !

रविवारी रात्री पोहण्याचा दरबार भरला. ख्रिस्तिन किलरबरोबर बड्यांचा जलविहार सुरू झाला. इव्हॅनोव्ह, प्रोफ्युमो, आयुब—सर्वजण पाण्यात उतरले. याचे वर्णन वॉर्डने कोर्टात केले ते मोठे खुमासदार आहे वॉर्डने सांगितले—" प्रथम पोहोण्याची शर्यत झाली. अट एकच होती की पोहोताना पाय मारायचे नाहीत; फक्त हातांनी पोहायचे ! या शर्यतीत जॉन प्रोफ्युमो पहिला आला. पहिला येताच त्याने इव्हॅनोव्हला हसत सांगितले की, 'आतातरी ब्रिटिश सरकारवर तुमचा विश्वास बसायला हरकत नाही ना ?' इव्हॅनोव्हने मला विचारले की 'येथे प्रेसिडेंट आयुबखान कसे आले ?' यावर मी त्याला सांगितले की, 'तसे खास काम म्हणून इथे कुणीच आलेले नाही. इथे असे बडे बडे पाहुणे नेहमीच येतात जातात—'

" प्रेसिडेंट आयुबखानने व जॉन प्रोफ्युमोने आमचे अनेक फोटो काढले. एका फोटोत मी, ख्रिस्तिन व पोहायला उतरलेल्या आणखी दोन मुली होत्या."

जलक्रीडेस बराच उशीर झाला व अखेर हा कार्यक्रम आटोपला. इव्हॅनोव्हच्या मोटारीतून किलर लंडनला परतणार होती. ती त्याच्या मोटारीत चढण्यापूर्वी जॉन प्रोफ्युमोने तिला बाजूला एकटी गाठली व तो तिला तिचा फोन नंबर विचारू लागला. यावर ख्रिस्तिनने सांगितले की— "मी वॉर्डबरोबर राहते, तेव्हा त्याचा फोन नंबर तोच माझा फोन नंबर..."

जॉन प्रोफ्युमो लंडनला परतला तो ख्रिस्तिन किलरला पुन्हा कुठे गाठावी याच विचारात. परंतु त्याचे पुढचे आठ दिवस फार

गडबडीत गेले. पार्लमेंटमधील कुवैतवरील चर्चेला त्याला उत्तर द्यावे लागले. शिवाय लष्कराच्या छावणीला भेटी देण्याचा कार्यक्रम पूर्वीच मुक्रर झालेला होता.

जॉन प्रोफ्युमोची व किलरची पहिली भेट झाली त्या दिवसापासून फक्त चवथ्याच दिवशी म्हणजे १२ जुलै १९६१ ला सुरक्षितता खात्याचे एक अधिकारी मि. वुड्स यांनी डॉ. वॉर्डची भेट घेतली. ही भेट याच उद्देशाने घेण्यात आली की डॉ. वॉर्डचे व इव्हॅनोव्हचे सबंध नेमके काय आहेत ते हुडकून काढावे. याचा अर्थ असा की प्रोफ्युमो–किलर सबधाला कोवळे कोब फुटण्यापूर्वीच वॉर्डचे उद्योग हे सुरक्षिततेला घातक आहेत की काय असा संशय इंग्लडच्या सुरक्षा दलाला आलेला होता. याच भेटीत वॉर्डला सुरक्षादलाने 'सावधपणे' राहण्याचा इशारा दिला.

डॉ. वॉर्डची जी नेहमीची पद्धत होती ती बड्याशी झालेल्या थोड्याफार ओळखीचे मांडवल करायचे. त्यानुसार डॉ. वॉर्डने मि. वुड्सशी बोलताना जॉन प्रोफ्युमोची व आपली ओळख असल्याचे सागितले. मि. वुड्स तर दचकलेच.

### सुरक्षा दल सावध झाले–पण ?

म्हणजे ज्या सामाजिक वर्तुळामुळे इंग्लडची सुरक्षितता धोक्यात आहे, असे युद्धखात्याच्या अतर्गत असलेल्या सुरक्षा दलाला वाटू लागले होते, त्याच सामाजिक वर्तुळात युद्धमत्री जॉन प्रोफ्युमो सामील होता. Man is known by the company he keeps हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे की Man is known by the company that keeps him! डॉ. वॉर्डने जॉन प्रोफ्युमोशी ओळख ठेवण्याचा हव्यास धरावा ही गोष्ट समजू शकते. कारण त्यात त्याला परावर्तित मोठेपण तरी पदरात पडते. परंतु जॉन प्रोफ्युमोसारख्या ब्रिटनच्या मत्रिमडळाच्या सर्वात जबाबदार सभासदाने डॉ. वॉर्डला सलगी करू द्यावी हे मोठे विचित्र होते. त्या डॉ. वॉर्डचे रशियन वकिलातीतील अधिकारी युजेन इव्हॅनोव्ह याच्याशी लागेबाधे! अर्थात मि. वुड्स यानी जे तावडतोब करण्यासारखे होते ते केले. जॉन प्रोफ्युमोला त्यानी सूचना केली की त्याने डॉ. वॉर्डशी संबंध टाळावेत! विचारा वुड्ससाहेब खरोखरच अरण्यरुदन करीत होता! जॉन प्रोफ्युमोला डॉ. वॉर्डच्या मैत्रीची भूक कधीच नव्हती. त्याला मैत्री हवी होती ती वॉर्डबरोबर राहणाऱ्या १९ वर्षाच्या मदनमजिरीची! वुड्सची सूचना लक्षात ठेवून ख्रिस्तिनला गाठायची म्हणजे मोठेच त्रागडे होऊन बसले व परिणाम म्हणून वॉर्डच्या नकळत प्रोफ्युमो व किलर याच्या भेटीगाठी सुरू झाल्या. लंडनच्या एखाद्या निर्मनुष्य कोपऱ्यात रात्री रगू लागल्या.

प्रोफ्युमो-किलर सबध अबाधित राहिले. फक्त सुरक्षा अधिकाऱ्याच्या समाधानाकरता प्रोफ्युमो वॉर्डला टाळू लागला व त्याच्याशी जडलेले सबध त्याने योग्य अतरावर पुनः ढकलले.

जॉन प्रोफ्युमोच्या हे लक्षात आले की कुणाच्या डोळ्यात न येता किलरशी सबध ठेवायचा तर तिला डॉ. वॉर्डच्या तडाख्यातून बाहेर काढली पाहिजे. त्याने किलरला आग्रह केला की वॉर्डला सोडून तिने स्वतत्र राहावे.

किलरचे प्रोफ्युमोशी एवढे घनिष्ट सधान आता झाले होते की किलरला प्रोफ्युमोच्या आग्रहाप्रमाणे वॉर्डला सोडून द्यावे लागले. १९६१ च्या अखेरीस म्हणजे डिसेबरात किलर 'डॉटफिन स्क्वेअर' विभागात स्वतत्र खोली घेऊन राहू लागली.

डॉ. वॉर्डला सर्व प्रकार आता हळूहळू ध्यानात आला. तो मनात हसत असला पाहिजे; कारण आज ना उद्या किलर परत 'विंपोल म्यूज'-मध्ये येणार असा त्याचा होरा होता. अखेर किलरला वॉर्डशिवाय सुटका कुठे होती! एकट्या प्रोफ्युमोच्या आश्रयावर तिची सर्व सुखाची भूक भागली नव्हती. बरे, हा संबंध उघड राजरोस असता तर प्रोफ्युमोने तिला भरपूर पैसा देऊन अगवस्त्र म्हणून उघडपणे सामाळले असते. परंतु तसेही नव्हते. काळोखातल्या भेटी फार काळ चालू शकत नाहीत हा त्याचा अंदाज बरोबर ठरला.

–एके दिवशी ख्रिस्तिन किलर 'विंपोल म्यूज' मध्ये परतली.

### प्रोफ्युमो–किलर फारकत

प्रोफ्युमोला हे अर्थात आवडले नाही. त्याचा राग अनावर झाला. किलरनेच कोर्टात सागितल्याप्रमाणे–"आमचे संबध आता तुटायला आले होते. मी वॉर्डजवळ राहू नये असा हट्ट प्रोफ्युमोने धरला होता. त्याने मला सागितले, की जर मी वॉर्डकडेच राहिले तर तो मला पुन भेटणार नाही. मी त्याला स्पष्ट सांगितले की त्यानेच आता काय ते ठरवायचे आहे. मी वॉर्डकडे यायचे ठरवूनच परत आले होते. यानतर मात्र त्याला मी पुनः कधी भेटले नाही."

संपले. १९६२ साल उजाडण्याआधीच जवळजवळ प्रोफ्युमो–किलर यांचे मेतकूट संपले. किलरला वॉर्डला सोडणे परवडणारे नव्हते आणि वॉर्डच्या सबंधातील स्त्रीशी सबध ठेवणे प्रोफ्युमोला परवडणारे नव्हते. सुरक्षादलाचा त्याला तसा इशारा मिळालेला होता.

जवळ केलेली रतिकन्या दूर गेली याचे फारसे दु खही प्रोफ्युमोला झाले नाही. तिच्यापासून जे घेण्यासारखे होते ते त्याने चारपांच महिन्यांच्या काळात मिळवले होते. ती नाही म्हणून आता फारसा खोळंबा नव्हता–असती तर अडचणच होती–

प्रोफ्युमोने नि श्वास सोडला. कुणाला हू का चू न कळता किलरची मानगड सपली होती. उद्या कुणी या लफड्याविषयी बोलू म्हणेल तर त्याला कसलाच पुरावा नव्हता. येऊन जाऊन किलरच काही सागत सुटली तर प्रश्न येणार; परतु किलर ही अखेर एक वारांगना होती. आणि तो मात्र नृप होता. नृपनीति वारांगनेसारखीच असली तरी नृप तो नृपच! वारांगनेच्या शब्दावर कोण विश्वास ठेवणार? आणि कुणी ठेवलाच तर ब्रिटनचे न्यायासन मदतीला आल्यावाचून कसे राहील ?

—हा सर्व विचार बरोबर होता. फक्त प्रेमात पडलेले मूर्ख जो घोटाळा नेहमी करतात तो झाला नसता तर! परतु हाच घोटाळा नेमका या उतावळ्या युद्धमत्र्याने केला होता. त्याने ख्रिस्तिन किलरला एकदा प्रेमपत्र लिहिले होते. प्रेमात पडलेला असताना लिहिलेले पत्र म्हणून प्रेमपत्र म्हणावयाचे एवढेच! पत्र साधेच होते! पण तो लेखी गुतला होता. 'जिवी गुतावे पण लेखी गुंतू नये,' हा साधा व्यवहाराचा नियम या उतावळ्या मत्र्याने पाळला नाही आणि—आणि किलरची मानगड मिटली म्हणून रचलेली सर्व शेखमहंमदी

पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली. शेवटी या नृपाचे साग्रसंगीत वस्त्रहरण चुकले नाही ते नाहीच !!

सोमवार बावीस ऑक्टोबर १९६२ ची सायंकाळ ही प्रे. केनेडीनी रशियाला क्यूबा प्रकरणात क्रुश्चेव्हला धडा शिकवण्याकरता निवडली होती. फक्त सातच दिवसापूर्वी म्हणजे १९ ऑक्टोबरला क्यूबामध्ये रशियाचे अण्वस्त्रतळ असल्याचा खात्रीलायक पुरावा व्हाइटहाऊसवर दाखल झाला होता. शत्रूच्या हालचालीचा सुगावा लागून जो झोप घेतो तो अखेर ' सपिली ' मरतो ही गोष्ट प्रे. केनेडी जाणून होते २२–१०–६२ ला सायकाळी वॉशिंगटन वेळेप्रमाणे सात वाजता प्रे. केनेडी यांनी आपले आकाशवाणीवरील भाषण सुरू केले. या भाषणात त्यानी क्यूबाची नाकेबदी अमेरिकन आरमार करू लागले असल्याची घोषणा केली. आणि रशियाच्या बोटीना निर्वाणीचा इषारा दिला, की अण्वस्त्रे घेऊन निघालेल्या बोटी क्यूबाजवळ दिसल्या तर अमेरिकन आरमार त्याचा समाचार घेतल्याखेरीज राहणार नाही.

यावेळी लंडनमध्ये मध्यरात्र होती. लोक झोपेतच होते. फक्त वृत्तपत्राची कार्यालये केनेडीच्या भाषणावर वृत्तपत्राचे रकाने तयार करीत होते. या भाषणावर शातपणे विचार करायला फुरसदच त्याना नव्हती. लडनमध्ये असा एक मतप्रवाह होता की, प्रे. केनेडीनी क्यूबाचा धोका वाजवीपेक्षा फाजील गृहीत धरला आहे एवढयाशा कारणावरून ते जगाला अण्वस्त्रयुद्धात होरपळून टाकण्यास उद्युक्त झाले ही गोष्ट उतावळेपणाची आहे.

## रशियन वकिलाची धावपळ

याच मतप्रवाहाची कास धरून अमेरिका-ब्रिटन याचेमध्ये मतभेदाचे कोलीत सारण्यासाठी रशियन मुत्सद्यानी धांदल सुरू केली. मगळवारी २३ ऑक्टोबरला सोविएट सरकारने एक पत्रक प्रसिद्ध केले. त्यात हाच विचार माडलेला होता. त्या पत्रकात म्हटले होते...

" सोविएट सरकार जगातील सर्व राष्ट्रांना आणि तेथील जनतेला असे आग्रहपूर्वक सांगू इच्छिते, की त्यानी क्यूबाबाबत अमेरिकेने जी युद्धखोरी चालवली आहे त्याविरुद्ध आवाज उठवावा. "

याचकरता लडनमधील सोविएट चार्ज डी अॅफेअर्स मि. लॉगिनोव्ह यांनी ब्रिटनच्या परराष्ट्र खात्याचे चिटणीस—तेव्हाचे लॉर्ड होम—यांची बुधवारी भेट घेतली व अमेरिकेला ब्रिटनने आवरावे अशी सूचना केली.

रशियन वकिलातप्रमुख लॉगिनोव्ह एवढेच करून थाबले नाहीत, तर त्यांनी युजेन इव्हॅनोव्ह याला सबधित ब्रिटिश अधिकाऱ्यावर यासाठी दडपण आणण्याची खास कामगिरी दिली असावी; अर्थात नेमकी काय कामगिरी इव्हॅनोव्हला दिलेली होती हे कुणालाच कळणे शक्य नव्हते. परतु इव्हॅनोव्हच्या पुढील हालचाली पाहिल्या की याच अदाजाला बळकटी येते.

इव्हॅनोव्हने बुधवारी वॉर्डला गाठले. वॉर्डपुढे त्याने रशियाची बाजू मांडली. ती अशी असावी—" क्यूबा प्रकरणात रशिया व अमेरिका आता विरोधी पवित्रे घेऊन उभे आहेत. या दोघांवरच जग विसबले तर समझौता होण्याची सुतराम् शक्यता नाही. कारण एक इचभरही या क्षणाला माघार घेणे म्हणजे मोठेच अपमानास्पद होणार आहे. आता यातून मार्ग काढणे फक्त ब्रिटनलाच शक्य आहे. लडनमध्ये लगेच बड्या तिघाची शिखर परिषद बोलवावी व हा प्रश्न एकदाचा मिटवावा. रशियाला युद्ध नको असल्यामुळे अशा शांतता परिषदेचे निमत्रण क्रुश्चेव्ह स्वीकारतील, व हे आश्वासन सोविएट सरकारच्या वतीने मी देतो. "

इव्हॅनोव्हचे बोलणे ऐकताच वॉर्ड एकदम खुलला. आंतरराष्ट्रीय शांततादूत होण्याची फार मोठी सधी चालून आली आहे असे त्या उतावळ्या माणसाला वाटले. जग युद्धाच्या खाईत पडत असताना—केवढी महान कामगिरी आपण करीत आहोत या विचाराने तो इव्हॅनोव्हला वाटेल ती मदत करण्यास सिद्ध झाला. वॉर्डने इव्हॅनोव्हला सागितले की, रशियाचा हा दृष्टिकोन मी योग्य अधिकाऱ्याच्या कानावर घालण्याची व्यवस्था करतो.

वॉर्डला ही राजकारणातली लुडबुड फार मोहक वाटली. त्याच्या मोठेपणाची जणू पावतीच इव्हॅनोव्हने त्याला दिली होती, असे त्याला वाटले वॉर्डने लगेच फोन उचलला. परराष्ट्रीय खात्याला त्याने फोन केला. फोनवर तिथला नेहमीचा कारकून भेटला वॉर्डने त्यालाच फोनवर आपल्या महत्त्वाच्या कामाचे स्वरूप सागितले. यावर अर्थातच त्या कारकुनाने ही सर्व हकीगत मुख्य चिटणीसाना कळवतो असे आश्वासन दिले.

## उतावळा वॉर्ड, अॅस्टरना बार्शिग

परतु वॉर्डचे एवढयाने समाधान झाले नाही. त्याच्याकडे उपचारासाठी येणाऱ्यात दोन पार्लमेंट सभासद होते. सर गॉडफ्रे निकोलसन् व विल्यम शेपर्ड. या दोन पार्लमेंट सभासदाना त्याने गाठले, व क्यूबाबाबत आपण काम करू इच्छितो हे त्याने त्यांना सागितले· आपल्यावरील महत्त्वाच्या गुप्त कामगिरीची पद्धतशीर जाहिरातच त्याने सुरू केली. प्रोफ्युमोला जाऊन भेटण्याचे धाडस वॉर्डने केले नाही. परतु लॉर्ड अॅस्टरना त्याने सागितले, " काही महत्त्वाच्या गोष्टी सरकारच्या कानांवर घालण्यासाठी इव्हॅनोव्हला परराष्ट्रीय खात्यापैकी किंवा युद्धखात्यापैकी महत्त्वाच्या व्यक्तीना मला भेटावयाचे आहे. व याकरता आपण खटपट कराल काय ? " लॉर्ड अॅस्टरनी वॉर्डला सुचवले की त्याने अर्ल डेव्हिड आर्किबाल्ड यांना भेटावे. अर्ल आर्किबाल्ड यांना अर्थात पूर्वसूचना देण्याचे काम अॅस्टरसाहेबानीच केले.

वॉर्डने दुसऱ्याच दिवशी म्हणजे गुरुवारी लॉर्ड आर्किबाल्ड याना फोन केला. आर्किबाल्ड यानी वॉर्डला इव्हॅनोव्हसह हर्टफोर्डशायर येथील आपल्या निवासात शनिवारी सकाळी सुरापानासाठी बोलाविले. मध्ये शुक्रवार गेला. या दिवशी रशियन गोटातून असा फतवा निघाला की तुर्कस्तानातील अमेरिकन अण्वस्त्र तळ अमेरिकेने हलवावे व मग रशिया क्यूबातील तळ अवश्य उठवील·

शनिवार उजाडला. प्रे. केनेडीनी रशियाच्या तुर्की तळाविषयी काढलेल्या बोलण्याचा यत्किंचितही विचार करण्याचे नाकारले, व एक रेसभरही मागे सरण्यास नकार दिला. जग युद्धाच्या दारात आता ढकलले जाऊ लागले. (याची सपूर्ण हकिगत ' माणूस 'च्या जाने. ६४ च्या अकात आलेली आहे ) शनिवारी परराष्ट्र मत्री लॉर्ड होम यांनी लॉगिनोव्ह या रशियन वकिलातप्रमुखाला भेटीला बोलावले.

वॉर्डला वाटले की आपण जी ब्रिटनने या प्रकरणात मध्यस्थी करावी अशी सूचना परराष्ट्र खात्याला किंवा लॉर्ड अॅस्टरमार्फत केली त्याला फळ येऊन बहुधा लॉर्ड होमनी ही गाठभेट घेतली असावी. तसे काहीही झालेले नव्हते. लॉर्ड होम यानी रशियनदूताला सक्त बजावले

की जर क्यूबा प्रश्नावर युद्ध पेटले तर अँग्लो-अमेरिकन दोस्तीनुसार ब्रिटन अमेरिकेच्या बाजूने युद्धात पडल्याशिवाय राहणार नाही.

लॉर्ड होमच्या गाठीभेटी चालू असतानाच अर्ल आर्किबाल्ड याच्या निवासस्थानी शनिवारी सकाळी ठीक ११-३० वाजता वॉर्ड व इव्हॅनोव्ह दाखल झाले जवळजवळ एक तास पचेचाळीस मिनिटे इव्हॅनोव्ह, वॉर्ड व अर्ल आर्किवाल्ड याचे बोलणे झाले. इव्हॅनोव्हसाठी मुद्दाम मागवलेली व्होडका पिऊन वॉर्ड-इव्हॅनोव्ह ही दुक्कल निघून गेली.

वॉर्ड निघून गेल्यानंतर काही तासाच्या आत रशियन सूचनेवर अर्ल आर्किबाल्डनी तयार केलेला वृत्तान्त लॉर्ड होम याच्या टेबलावर जाऊन पोचला. म्हणजे ज्या हेतूने इव्हॅनोव्हने वॉर्डला हाताशी घरले तो हेतू सिद्ध झाला. रशियाची सूचना लॉर्ड होमपर्यंत जाऊन तर पोचली.

या सर्व प्रकरणात वॉर्डची भूमिका फारशी आक्षेपार्ह दिसत नाही. इव्हॅनोव्ह बोलून चालून रशियन हस्तक होता. परतु वॉर्डने जी मदत केली ती केवळ अर्थात नेहमीप्रमाणे त्यात स्वतःचा मोठेपणा मिरवण्याचा हेतू होताच. परंतु तो त्याचा स्वभावदोषच समजणे भाग आहे.

इव्हॅनोव्हची सूचना अर्ल आर्किबाल्डमार्फत टेबलावर येण्यापूर्वीच लॉर्ड होम यानी क्यूबाबाबत रशियन वकिलातप्रमुखाला समज दिली होती तेव्हा अर्ल आर्किबाल्डच्या निवेदनाला त्यानी केराची टोपली दाखवली.

जगाच्या सुदैवाने क्रुश्चेव्ह यांना शहाणपणा सुचला व क्युबावावत त्यानी अमेरिकेला सपशेल शरणागती दिली. क्यूबातील आपले अण्वस्त्रतळ उठवण्याचे मान्य केले.

क्यूबाचे प्रकरण संपले. आता वस्तुतः वॉर्डला काही हालचाल करण्याची जरुरी नव्हती. परंतु मोठेपणा मिरविण्याची त्याला हौस ना! त्याने पार्लमेंटमधील मजूर नेते हॅरोल्ड विल्सन यांना क्यूबा प्रकरणात आपण मध्यस्थ म्हणून काय काय केले हे वर्णन करणारे पत्र लिहिले. हॅरोल्ड विल्सन यानी ते पत्र आपल्या फायलीत टाकले व फक्त वॉर्डला आभाराचे पत्र पाठवून ते त्यावेळी स्वस्थ बसले पुढे पार्लमेंटमध्ये याच पत्राचा उपयोग करून वॉर्ड रशियाचा मध्यस्थ होता असा लेखी पुरावा त्यानी पार्लमेंटपुढे ठेवला. अर्थात रशियाचा मध्यस्थ हा रशियाचा हस्तकच असतो असे नाही. परतु वॉर्ड हा रशियाविषयी सहानुभूती बाळगणारा होता-इव्हॅनोव्हचा दोस्त होता. त्याच्याकडे राहणाऱ्या ख्रिस्तिनचा प्रोफ्युमोशी संबध होता. आणि ख्रिस्तिनचा इव्हॅनोव्हशी सबध होता. या सर्व गोष्टी निवेदन करून साकल्याने जो परिणाम त्यानी साधला तो त्याच्या राजकीय डावपेचाचा भाग होता असे आता वाटते.

## किलरने एजकोंबला डिवचले

या धामधुमीच्या काळात ख्रितिन किलर काय करीत होती? वॉर्डचे निवासस्थान '१७ विपोल म्यूज' सोडून ती जॉन एजकोम्ब (John Edgecombe) नावाच्या वेस्ट इंडियन माणसाबरोवर राहण्यास गेली होती वॉर्डची अर्थात तिच्या अशा अधूनमधून जाण्याला फारशी हरकत नसे.

आणि किलर परत आली. जशी जॉन प्रोफ्युमोला डिवचून परत आली तशी या दुसऱ्या जॉनला पण नादी लावून परत वॉर्डकडे आली. डिसेंबर १९६३ मध्ये हा प्रकार घडला.

परतु हा जॉन जरा भावनाप्रधान होता. त्याला किलर खरोखरच हवी होती. त्याचा राग अनावर झाला. लग्नाची बायको जावी एवढे त्याला दुःख झाले.

त्या दिवशी १४ डिसेबर १९६२ ही तारीख होती. जॉन एजकोम्ब १७ विपोल म्यूजमध्ये येऊन उभा राहिला. दारावरील घंटा त्याने वाजवली. खाली गॅरेज होते. घटा वाजताच वर पहिल्या मजल्यावर किलरची मैत्रिण खिडकीपाशी आली हीच ती मॅडी राईस डेव्हीस! राईस डेव्हिसने एजकोम्बला ओरडून सागितले की ख्रिस्तिन सलूनमध्ये गेली आहे परतु हा काळा जॉन राईस डेव्हिसला ओळखून होता. ख्रिस्तिन घरात आहे हे त्याला पक्के माहीत होते. तिला त्याने घरात शिरताना पाहिलेली होती.

संतापाने एजकोम्ब दारावरची घंटा वाजवीत किलरला हाका मारू लागला.

अखेर किलर खिडकीपाशी आली आणि तिने जॉन एजकोम्बला शांत होऊन निघून जाण्यास सांगितले! एजकोम्ब संतापाने लाल झाला. खिशातील पिस्तुल काढून त्याने पाच गोळ्या समोरच्या बंद दरवाजावर झाडल्या व दोन खिडकीच्या दिशेने झाडल्या. गोळ्या संपताच एजकोम्ब पसार झाला.

एजकोम्बला सायंकाळी पोलिसांनी पकडले. या घटनेचा उल्लेख वृत्तपत्रांतून झाला, परंतु तिकडे फारसे कुणाचे लक्ष गेले नाही 'डेली टेलिग्राफ' या पत्रात बातमीची सुरुवात अशी होती-" मिस् किलर (२१) ही मॉडेल मिस् राईस डेव्हिस (१८) या सिनेनटीला भेटण्यासाठी डॉ. वॉर्ड याचे निवासस्थानी गेली असता ... वगैरे ... "

## किलरची धावपळ

आपल्यावर एका तरुण माणसाने गोळया झाडाव्या, जिवावर उदार होऊन आपला हव्यास त्याने धरावा ही गोष्ट ख्रिस्तिनला एकपरीने फार आवडली. परतु जिवाच्या भीतीने तिचीही गाळण उडालीच. तिने एकदम सॉलिसिटरकडे धाव घेतली. तिच्या मैत्रिणीनी तिला सागितले की वेळीच कायद्याचा सल्ला घेतलेला बरा! तिने मायकेल एडोज् (Michael Eddowes) याना फोन केला. मायकेल सॉलिसिटर असला तरी बऱ्यापैकी लेखकही होता. 'A man on your conscience' या नावाचे पुस्तक त्याने लिहिले होते. त्याला राजकारणातही रस होता.

किलर मायकेलला भेटायला आली. जॉन एजकोम्बने केलेला गोळीबार तिने निवेदन केलाच-परंतु शिवाय एक प्रश्न विचारला-

" या घटनेमुळे जॉन प्रोफ्युमोला तोशीस तर होणार नाही ? " मायकेलला हा प्रश्न मोठा गंमतीदार वाटला त्याने पुनः पुनः विचारून खात्री करून घेतली - " प्रोफ्युमो म्हणजे युद्धमंत्रीच ना ? " आणि जेव्हा किलरने त्याची खात्री केली की जॉन प्रोफ्युमोचे आणि आपलेदेखील सबंध होते तेव्हा मायकेलच्या डोळ्यात मिस्किलपणाबरोबरच काळजी डोकावली. कारण किलर मध्येच इव्हॅनोव्हचेदेखील आपले प्रेमपात्र म्हणून नाव घेत होती. म्हणजे त्याच्यासमोर बसलेली छबेली ही ब्रिटनचे युद्धमंत्री आणि एक रशियन हस्तक या दोघाची बराच काळ 'प्रेमपात्र' होती! याच भेटीत किलरने मायकेल याना

असेही सांगितले की इव्हॅनोव्हने तिला जॉन प्रोफ्युमोला एक चमत्कारिक प्रश्न विचारण्यास सांगितले होते. तो प्रश्न म्हणजे 'दोस्त राष्ट्रांनीं जर्मनीला अण्वस्त्र गुपिते केव्हा देण्याचे ठरवले आहे ?' हा प्रश्न वस्तुतः इतका क्षुल्लक होता की यावर पार्लमेंटमध्ये जी राळ उठली ती हास्यास्पद ठरते.

### लेविसने आग भडकवली

याच सुमारास म्हणजे २२-१२-६२ ला किलरची जॉन लेविस नावाच्या पूर्वी एकदा बोस्टनमधून पार्लमेंटवर निवडून आलेल्या सभासदाची एका चहापानाचे वेळी गाठ पडली. किलर ही पॉलमन नावाच्या आपल्या रेस-ड्रायव्हर मित्राला घेऊन तेथे आली होती. या लेविसने जेव्हा आपल्या बायकोविरुद्ध घटस्फोटाचा दावा १९५४ मध्ये लावला होता तेव्हा डॉ. स्टीफन वॉर्डने त्याच्या बायकोच्या बाजूने साक्ष देऊन लेविसची खोडी काढली होती. त्यामुळे किलरच्या बोलण्यात वॉर्डचा उल्लेख येताच लेविसने तिला अधिक बोलती केली. किलर आपल्यावरील गोळीबाराची आणि प्रोफ्युमो-इव्हॅनोव्हशी आपल्या असलेल्या जुन्या मैत्रीची हकिगत मोकळेपणाने सांगत गेली. त्यात इव्हॅनोव्हने जर्मनीला द्यावयाच्या अण्वस्त्रांसंबंधी जो प्रश्न तिला प्रोफ्युमोला विचारण्यास सांगितला होता त्याचाही उल्लेख झाला. लेविसला आपला जुना सूड उगवावयाचा होताच. शिवाय या प्रकरणात ब्रिटनची सुरक्षितता धोक्यात आहे अशीही त्याची खात्री पटली. व लेविसने जॉर्ज विग् या विद्यमान् पार्लमेंट सभासदाच्या कानावर ही गोष्ट घातली.

जॉर्ज विग् हा कुवैत प्रकरणापासूनच जॉन प्रोफ्युमोवर लक्ष ठेवून होता. त्याची व प्रोफ्युमोची या प्रकरणात चांगलीच जुंपली होती. या चर्चेच्या वेळी जॉर्ज विग् यांना पार्लमेंटमध्ये प्रथम बोलायला लावून जॉन प्रोफ्युमोने त्याच्यावर हल्ला चढवला होता. प्रोफ्युमोच्या भाषणानंतर पुनः बोलण्याची संधी विग्ला मिळाली नसल्यामुळे प्रोफ्युमोच्या उत्तरातील सारवासारव त्याला उघडीनागडी करणे अशक्य झाले. परंतु प्रोफ्युमोच्या नेतृत्वाखाली युद्धखात्यात गोंधळच अधिक आहे अशी त्याची खात्री पटलेली होती.


अर्थात् जॉर्ज विग् यांना जॉन लेविस याने जी किलरकडून कळलेली स्फोटक हकिगत सांगितली तेव्हा त्यांनी 'आता हे प्रकरण दुर्लक्ष करण्यासारखे नाही' हे मनाशी पक्के केले.

### नव्या वर्षातील अपशकुन

१९६३ साल उजाडले. या नव्या वर्षात सुरवातीलाच म्हणजे १४ जानेवारी ६३ ला मॅकमिलन सरकारला डी गॉलने चपराक दिली. युरोपिअन कॉमनमार्केटमध्ये ब्रिटनला सहभागी होता येणार नाही असे डी गॉलने जाहीर केले. सरकारचे आर्थिक सल्लागार या वार्तेमुळे हवालदिल झाले.

याच महिन्यात म्हणजे १५ जानेवारी १९६३ ला इंग्लंडमध्ये गाजलेल्या व्हॅसल्च्या हेरगिरीच्या चौकशीसाठी जे मंडळ सरकारने नेमले होते त्याने आपली चौकशी सुरू केली. जॉन व्हॅसल् नावाचा एक कारकून आरमारी खात्यात नोकरीला होता व रशियासाठी हेरगिरी केल्याचा आरोप त्याच्यावर होता. या खात्यात महत्त्वाचा मुद्दा अर्थात हेरगिरीपेक्षा दुसराच होता. या हेरगिरीचा पुरावा 'डेली स्केच' या पत्राचे वार्ताहर रेजिनॉल्ड फॉस्टर व 'डेली मेल'चे वार्ताहर ब्रेन्डन

क्लिव्हडेन येथील पोहण्याचा तलाव—



कन्हैया का लाजता ?

मल्होलंड यांनी आपल्या वृत्तपत्रांतून वेशीवर टांगला होता. या हकिगती लिहिण्यासाठी त्यांनी जी माहिती मिळवली ती अर्थात सरकारी फायलीतून! ज्या अर्थी ही माहिती सरकारी फायलींतून पळवली, त्याअर्थी ती काहीतरी वाममार्गाने मिळवण्यात आली असे सरकारचे म्हणणे व याकरता या दोन वार्ताहरांवर ही माहिती कशी व कुठून मिळवली हे सांगण्यासाठी सरकारने खटले भरले. या दोन्ही वार्ताहरांनी आपल्या बातमीपत्राचा उगम कुठून झाला हे सांगण्याचे साफ नाकारले व हायकोर्टाने दिलेली तुरुंगवासाची शिक्षा भोगण्याचे ठरवले.

हा प्रश्न अर्थात वृत्तपत्रकारांच्या स्वातंत्र्याचा होता. आणि केवळ नाणावलेली मजूर पक्षाची वृत्तपत्रेच नव्हे तर हुजूरपक्षाच्या वृत्तपत्रांनी याबद्दल सरकारवर कडक टीका केली, व या खटल्यांचा निषेध करून दोन्ही वार्ताहरांची पाठ थोपटली. अशा रीतीने डी गॉलने एका गालावर वाजवल्यानंतर मॅकमिलनसाहेबांच्या दुसऱ्या गालावर सर्व 'फ्लीट स्ट्रीट'ने हा आवाज उठवला.

अर्थातच किलरने सांगितलेली प्रोफ्युमो-इव्हॅनोव्ह संबंधीची हकिगत जरी मायकेल एडोज्, जॉर्ज विग्, जॉन लेविस आणि किलरच्या मैत्रिणी यांना माहीत होऊन त्याची सर्वत्र वाच्यता सुरू झालेली असली, तरी वृत्तपत्रांत यासंबंधी मजकुर प्रसिद्ध करण्यास वार्ताहर बिचकत होते.

### इव्हॅनोव्ह पळाला

१६ जानेवारीला एज्कोम्बवरील खटल्याची प्राथमिक चौकशी सुरू झाली. २६ जानेवारीला एका पोलिस अधिकाऱ्याने किलरची पोलिस कोठडीत जबानी घेतली व या जबानीत पुनः एकदा क्यूबा प्रकरणाचे वेळी जॉन प्रोफ्युमोकडून, प. जर्मनीला अमेरिका अण्वस्त्रे कधी देणार, ही माहिती काढण्याकरता इव्हॅनोव्हने आपल्यामार्फत प्रयत्न केला असे किलरने सांगितले. अर्थात ही माहिती काढण्याचा आपण कधीच प्रयत्न केला नाही असा खुलासाही ख्रिस्तिनने केला.

किलर-प्रोफ्युमो प्रकरणात ही सर्वात महत्त्वाची घटना घडली.

आतापर्यंत ज्याची चर्चा आणि वाच्यता फक्त खाजगीरीत्या जोरात सुरू होती व सरकारच्या वृत्तपत्रकारांकडे पाहण्याच्या कडक दृष्टिकोनामुळे, ज्याला प्रसिद्धी देण्यास 'फ्लीट स्ट्रीट' वरील वृत्तपत्रे राजी नव्हती, ती हकिगत किलरनेच पोलिस अधिकाऱ्यांना जबानीत सांगून टाकली.

किलरच्या या गौप्यस्फोटाची हकिगत इव्हॅनोव्हला कळली असावी; कारण २८ जानेवारी १९६३ ला इव्हॅनोव्हने इंग्लंडचा किनारा सोडला व तो इंग्लडमधून निसटला.

## चोरावर मोर

पोलिसांच्या जबानीतील महत्त्वाचा भाग सरकारीरित्या ॲटर्नी जनरल सर जॉन हॉबसन् याना कळताच, त्यानी जॉन प्रोफ्युमो याला झाल्या प्रकाराबद्दल सर्व वस्तुस्थिती मोकळेपणाने निवेदन करण्याची विनंती केली.

जॉन प्रोफ्युमो यावेळी मुळीच गडबडला नाही. त्याने किलरच्या जबानीतील सर्व गोष्टीबाबत कानावर हात ठेवले. "He said, he had been friendly with the girl but their relationship was completely innocent. Not only had there been no adultery but sexual impropriety of any sort had taken place...." (प्रोफ्युमोने सांगितले की त्याचे किलरशी मैत्रीचे संबंध होते. परंतु ते संबध अगदी साधेसुधे होते. त्याचा कसलाही अनैतिक संबध तर नव्हताच; पण त्यांच्या सबंधांत काही वैषयिक अशिष्टतादेखील नव्हती.) प्रोफ्युमोने फक्त एक गोष्ट मान्य केली की किलरला त्याने एकदा, त्यांची ठरलेली एक भेट ऐनवेळी रद्द झाली हे कळविणारी चिठी लिहिली होती. प्रोफ्युमो धडधडीत खोटे बोलत होता. फक्त चिठीचा भाग त्याने खरा सांगितला होता, कारण ती चिठी किलरजवळ आहे आणि तिचा उपयोग किलरने आपल्याविरुद्ध केला तर सावधपणा म्हणून हा उल्लेख प्रोफ्युमोने करून ठेवला होता.

मंत्र्याच्या शब्दावर कसा गैरविश्वास ठेवणार? ॲटर्नी जनरल यांची खात्री झाली की प्रोफ्युमोविरुद्ध जे काहूर उठले आहे त्यात अर्थ नाही.

## हे तर हेरांचे जाळे

मॅकमिलनसाहेब आधीच हैराण झाले होते. कॉमन मार्केटबाबत त्यांची निराशा झाली होती त्यातच व्हॅसल प्रकरणात एकजात सर्व वृत्तपत्रांनी त्यांच्या सरकारला दोष दिला होता, आणि आता त्याचे खाजगी कारभारी चॅपमन वॉकर याना 'News of the world' या मासिकाच्या सपादकांनी फोन करून मुद्दाम असे कळवले होते, की त्याच्या वार्ताहराने एक सनसनाटी हकिगत त्यांच्याकडे धाडली असून त्या हकीगतीचा प्रोफ्युमो यांच्याशी घनिष्ट सबध येतो! या संपादकानी ही गोष्ट स्पष्ट केली की किलर व प्रोफ्युमो याचे अनैतिक सबंध तर होतेच, शिवाय किलर-इव्हॅनोव्ह यांचेही अनैतिक सबध होते आणि या तिघांशी स्टीफन वॉर्डचा सबध असल्यामुळे या सर्व प्रकरणाला एखाद्या हेरांच्या जाळयाचे स्वरूप प्राप्त झाले होते.

चॅपमन वॉकर यांनी ही गोष्ट मॅकमिलनसाहेब इटालीहून परत येताच त्याच्या कानावर घालण्याचे ठरवले. परतु त्यापूर्वी त्यानी स्वत: जॉन प्रोफ्यूमोची गाठ घेतली. पुन्हा एकदा जॉन प्रोफ्युमोने कानावर हात टेवले. चॅपमन वॉकरसाहेब बुचकळयात पडले.

## पैशाचे झाड

सरकारदरबारी ही धांदल सुरू असताना मॅकमिलनसाहेब इटालीत होते. इकडे वृत्तपत्रकाराना किलरजवळ बरीच गमतीदार माहिती आहे याचा सुगावा लागल्यामुळे त्यांनी किलरला घेरले होते. प्रत्येक वृत्तपत्र किलरला पैशाचे आमिष दाखवून तिने फक्त आपल्या वृत्तपत्राला आपली सर्व 'कहाणी' द्यावी याची खटपट करू लागले. किलरला हे समजले की पैशाचे झाड आता दारात हलू लागले आहे. 'संडे पिक्टोरिअल' या पत्राने किलरला २५० पौंड म्हणजे सुमारे ३७५० रुपये देऊन फार महत्त्वाचा पुरावा हस्तगत केला. तिने आपली रोमहर्षक कहाणी त्याना सागण्याचे मान्य केलेच आणि शिवाय प्रोफ्युमोने तिला लिहिलेले चिठीवजा प्रेमपत्रही त्या वृत्तपत्राला देऊन टाकले!

'सडे पिक्टोरिअल' चे चालक इतके खूश झाले की त्यांनी आणखी साडेसातशे रुपये देऊन तिला पार्कवेस्ट विभागात स्वतंत्रपणे राहण्याची व्यवस्था करून दिली. त्या वृत्तपत्राने किलरची हकिगत आपल्या वृत्तपत्रातून सुरू होणार अशी जाहिरात फडकवली. १० मार्च १९६३ च्या अकात पहिला हप्ता प्रसिद्ध होणार होता.

## पैशाच्या झाडावर माकड बसले.

इतक्यात या बनावात स्टीफन वॉर्डने खो घातला. सर्व पैसे आपण अन्नाला लावलेली किलरच मिळवणार ही गोष्ट वॉर्डला कळताच तो 'सडे पिक्टोरिअल' च्या सपादकाना भेटला. त्याने सागितले— 'किलर जी हकिगत तुम्हाला सागत आहे तीत मुख्य घटनाबाबत बऱ्याच चुका आहेत. त्यापेक्षा या प्रकरणातील खरीखुरी साद्यत हकिगत मीच सागू शकेन!" झाले! किलरची कथा 'सडे पिक्टोरिअल' मध्ये १० मार्चला प्रसिद्ध झालीच नाही. त्या ऐवजी १७ मार्चच्या अकापासून वॉर्डची कथा सुरू झाली.

किलरला आता वृत्तपत्राशी काय करायचे होते? तिला भरपूर पैसे मिळाले होते; १४ मार्चला एजकोम्बचा खटला उभा राहणार होता. या खटल्यात किलर ही महत्त्वाची साक्षीदार होती. किलर-प्रोफ्युमो या दुकलीसबंधी ज्या वदंता आता सर्वत्र पसरल्या होत्या त्यामुळे किलर ही आता फारच प्रसिद्धी पावली होती. किलरने आणखी एक धक्का दिला.

दि. ७–३–६३ ला आपली मैत्रिण किम् व मित्र पॉलमन याचेसह ती लडनमधून पळाली व स्पेनला निघून गेली.

प्रथम इव्हॅनोव्ह पळाला. आता किलरही निसटली.

१४ मार्चला एजकोम्ब खटला सुरू झाला. परंतु किलर हजर नव्हती

किलर पळून गेली ही गोष्ट कुणातरी उच्चपदस्थ माणसाच्या सहकार्याशिवाय होणे शक्य नव्हते. पुन: प्रोफ्युमोच्या नावाने सर्वत्र चर्चा सुरू झाली

मजूर नेते हॅरॉल्ड विल्सन यानी यावेळी एक महत्त्वाची गोष्ट केली. पार्लमेंटमध्ये जेव्हा मजूरपक्षाच्या एक सभासद मिस् बेकन यांनी 'किलरला कसे पळून जाता आले' असा प्रश्न उपस्थित केला, तेव्हा विल्सन यानी तो प्रश्न त्याना मागे घेण्यास सांगितले. कारण या क्षुल्लक प्रश्नांतून प्रोफ्युमोवर जो मुख्य आरोप होता की त्याने 'इंग्लडची सुरक्षितताच धोक्यात आणली' या आरोपाच्या

फैरी झडल्या असत्या आणि हे काम असे अवेळी होणे त्यांना फायद्याचे वाटत नव्हते.

उंदीर–माजराची पाठशिवणी आता सुरू झाली होती. फडताळाच्या फटीतून माजर आत डोकावू लागले होते. उंदीर धडपडू लागला होता. माजराच्या तोडात त्याचे भक्ष्य होण्यास फक्त काही कालाचा आता प्रश्न होता !

**: ५ :**

*यापुढची इंग्लंडच्या पार्लमेंटमधील सर्व घटना मोठी महत्त्वाची* आणि मजेदार आहे. २१ मार्च १९६३ ला पार्लमेंटमध्ये ज्या दोन पत्रकाराना 'व्हॅसल' खटल्यात कारावास झाला त्याच्या शिक्षेवरील चर्चेला सुरुवात झाली. या प्रकरणात मॅकमिलन सरकारातील एक मत्री मि. गालब्रेथ यानी राजिनामा दिला व मॅकमिलन यानी इटलीमधून परत येताच तो स्वीकारला. पत्रकार रेजिनॉल्ड फॉस्टर यांना तीन महिने व मुल्होलंड यांना सहा महिने कारावासाची शिक्षा मिळाली होती व हे दोने यावेळी तुरुंगात होते.

चर्चेला सुरुवात झाली. चर्चेत भाग घेण्यासाठी जॉर्ज विग् हे उठले तेव्हा रात्रीचे ११ वाजलेले होते. त्यानी आपल्या भाषणात गालब्रेथ याना राजीनामा द्यावा लागला व दोन पत्रकाराना शिक्षा झाल्या याबद्दल ज्या हुजूरपक्षीय सभासदानी नक्राश्रू ढाळले त्यांचा समाचार घेतला. ते म्हणाले,

"सरकारवर टीका करण्याचे वृत्तपत्रांना संपूर्ण स्वातत्र्य असले पाहिजे, परंतु असे करताना समाजाला घातक अशा प्रकारचे मार्ग त्यानी अवलबिता कामा नयेत. जेव्हा 'व्हॅसेल' प्रकरणासाठी सरकारने ट्रायब्यूनल नेमले तेव्हाच आम्ही अशा ट्रायब्यूनलविरुद्ध १४ नोव्हेंबरला टीका केली. त्यावेळी हे हुजूरपक्षीय सभासद काय झोपा काढीत होते ? आता ट्रायब्यूनलमुळे याचे एक मत्रि गडगडले तेव्हा हे सरकारवर टीका करू लागले.

'झाले ते गेले. सध्यातरी काय चालू आहे ? सर्वत्र अशा दाट वदंता आहेत की सरकारातील महत्त्वाच्या व्यक्तीनीच देशाची सुरक्षितता धोक्यात आणलेली आहे. असा एकही सभासद या सभासदांत वा असा एकही पत्रकार पत्रकाराच्या गॅलरीत आज हजर आहे का, की *ज्याच्या कानावर सरकारच्या मंत्र्यापैकीच एकाचे नाव* यात्रकरणी आलेले नाही....?"

सगळ्या सभागृहात शातता पसरली. जॉर्ज विग् यानी क्षणभर उसत घेतली. टाचणी पडली तरी ऐकू येईल अशा पसरलेल्या शाततेत जॉर्ज विग् यानी आवाज चढवला.

"That being the case, I rightly use the privilege of the House of Commons– that is what it is given to me for– to ask the Home Secretary to catagorically deny the truth of those rumours. The rumours to which I refer relates to Miss Chirstine Keeler and Miss Davis and a shooting by a West Indian. It is no good for a Democratic State that rumours of this kind should spread and be inflated."

(गोष्टी या थराला गेलेल्या आहेत की कॉमन्स सभागृहात वापरण्यासाठी म्हणून जो खास अधिकार सभासद या नात्याने मला आहे– आणि जो अशाच कामासाठी दिलेला आहे— त्याचा उपयोग करणे मला भाग आहे. मी गृहसचिवांना स्पष्टच विचारतो की ज्या अफवा म्हणा, वदंता म्हणा, बाहेर पसरल्या आहेत— त्यांत सत्य नाहीच असे खात्रीपूर्वक ते जाहीर करतील काय ? मी ख्रिस्तिन किलर, राईस डेव्हिस व त्याच्यावर गोळ्या झाडणारा वेस्ट इडियन माणूस याच्या सबंधांत बोलत आहे. जे लोकशाही सरकार आहे त्यानी अशा तऱ्हेच्या वावड्या उठू देणे व वाढू देणे ही गोष्ट *योग्य* नाही. )

**चौकशी कसली, अभिनंदन करा !**

रेजिनॉल्ड पॅगेट् नावाचे मजूर सभासद यानंतर बोलले. त्यानी खटयाळपणे भाषण केले–ते म्हणाले–"या वावड्या आहेत तरी काय ? तर एक मंत्रीमहाशय एका अत्यंत सुस्वरूप तरुण मुलीशी सलगी ठेवून आहेत. मला विचाराल तर ही गोष्ट चौकशी करण्याची नसून त्या मत्र्याचे कौतुक करण्याची आहे ! "

यावर क्रॉसमन नावाचे सभासद म्हणाले—"हे भाषण म्हणजे पद्धतशीरपणे आणखी वावड्या उठवण्याचा मजेदार प्रकार आहे–!"

सौ. कॅसल नावाच्या स्त्री-सभासद यानतर बोलल्या. त्यांनी आपल्या भाषणात हे आरोप आणखी पुढे रेटले–

"रेजिनॉल्ड पॅगेट यांच्या म्हणण्याप्रमाणे एखाद्या मत्र्याने एखाद्या सुस्वरूप मुलीशी सलगी ठेवली तर खरोखरच सरकारचे त्यात काही बिघडत नाही. परंतु जर ही सलगी कायद्याच्या आड येऊ लागली, न्यायदानाला अडथळा करू लागली तर तिकडे कानाडोळाच करायचा काय ? जर एखाद्या व्यक्तीला किलर कुठे आहे ही गोष्ट माहीत असेल व त्याने ती उघड करण्याचे नाकारले तर तो फौजदारी गुन्हा होतो. अशी व्यक्ती जर सरकारातच असेल तर मग–?"

जॉर्ज विग्ना मात्र यावेळी अशी धास्ती वाटली की ही गाडी भलत्याच रुळावर चालली. कदाचित् किलरच्या पलायनाशी प्रोफ्युमोचा सबंध नसेलही. **सत्य आणि खोटेपणा याची गल्लत झाली तर खोटेपणाचा भाग प्रतिष्ठा पावू लागतो.**

–महत्त्वाची गोष्ट म्हणजे या सर्व चर्चेत जॉन प्रोफ्युमोचे प्रत्यक्ष नाव एकाही सभासदाने घेतले नाही !

*त्या* दिवशी पार्लमेंटची बैठक अपरात्रीही चालूच होती. आता सरकारपुढे एकच पर्याय होता आणि तो म्हणजे या वावड्याबद्दल खबीर भूमिका घेणे. हुजूर–पक्षाचे प्रतोद व कायदेखात्यातील अधिकारी याचे असे मत पडले की जॉन प्रोफ्युमो यांनी एक वैयक्तिक निवेदन सभागृहाला सादर करावे. दुसऱ्या दिवशी २२ मार्चला सभागृह सकाळी ११ वाजता भरणार होते, तेव्हा रातोरात हे निवेदन प्रोफ्युमोने तयार करावे असे ठरले.

–तस्याम् जागर्ति असयमी। प्रोफ्युमोला फोन करून रात्री उठवण्यात आले व तो लगेच वेस्ट मिन्स्टरमध्ये आला. इकडे पार्लमेंटमध्ये चर्चा सुरू होती व आता हॅरॉल्ड विल्सन बोलत होते. त्याना हे ठाऊक होते की प्रोफ्युमोला कॅबिनेट मिनिस्टर डिडेस यांनी बोलावून घादल केली आहे. त्यांच्याकडे पाहत विल्सन म्हणाले—

"आता सभागृहात मत्री डिडेस हजर आहेत. त्याच्याबद्दल मला सहानुभूती वाटते. विचारे सारखे कामात आहेत ! त्यांना खाते असे

काही नाहीच. मला वाटते ते खाते नसलेले मंत्री आहेत. तरीही सध्याच्या परिस्थितीत ते व गृहसचिव यानी जी धादल चालवली आहे त्याचे मी कौतुक करतो."

हॅरॉल्ड विल्सन यांच्या भाषणातील उपहास सभागृहाला समजत होता आणि हास्याचे फवारे मजूर सभासदात उठत होते.

जॉन प्रोफ्युमो रात्री एक वाजून पधरा मिनिटानी वेस्ट मिन्स्टर येथे येऊन पोचला व लगेच प्रतोदाच्या खोलीत महत्त्वाची बैठक सुरू झाली. या बैठकीला मंत्र्यापैकी डिडेस, प्रोफ्युमो, सभागृहाचे नेते मॅकलिऑड, प्रतोद रेडमायने ही मडळी हजर होती. याशिवाय कायदाखात्यातील अधिकारी होते. या सर्वांनी जॉन प्रोफ्युमोला एकच प्रश्न विचारला की जे पत्र त्याने किलरला लिहिले ते काय होते व कशासाठी लिहिले होते. या पत्रासंबंधी फक्त दोनच गोष्टी बाहेर आल्या होत्या. एक म्हणजे त्याची सुरुवात 'डार्लिंग' या संबोधनाने आहे व सध्या ते 'सडे पिक्टोरिअल' या वृत्तपत्राच्या ताब्यात गेलेले आहे.

### डार्लिंग गाजू लागली

जॉन प्रोफ्युमोने सागितले, "सध्याच्या जगात डार्लिंग या शब्दाला तसा फारसा खोल अर्थ नाही. शिवाय मी त्या पत्रात किलरशी माझे असलेले सबंध तोडण्याला सुरुवात केलेली असल्यामुळे मी मुद्दामच थोडी जवळची सलगी दाखविणारा शब्दप्रयोग केला." प्रोफ्युमोचा हा खुलासा सर्वांना पसंत पडला. जॉन प्रोफ्युमोने जे वैयक्तिक निवेदन दुसऱ्या दिवशी सभागृहाला करायचे होते त्याचा मसुदा तयार करण्याकरता मग सर्व मडळी मदत करू लागली. इंग्लडचे सॉलिसिटर-जनरल बैठकीत होते. त्यानी प्रोफ्युमोला सक्त बजावले, "You must realise that you are making a statement that there is no truth whatever in any of these allegations. Supposing that there is, for the rest of your life you will be submitting yourself to blackmail!" (लक्षात ठेवा की तुमच्यावर केल्या गेलेल्या आरोपात अजिबात सत्य नाही असे विधान आपण करणार आहात जर समजा, त्या आरोपात सत्य असेल तर आयुष्यभर तुमच्यावर ही टांगती तलवार राहील व याच्या जोरावर तुमचा छळही होऊ शकेल.")

यावर प्रोफ्युमोने सागितले.-" I quite realise that; but as it is all true, I have nothing to fear." (मला याची पूर्ण जाणीव आहे. परतु मी सत्यच सागितल्यामुळे कर नाही, त्याला डर कशाची?") याला म्हणावे मुरलेला मंत्री! खोटे बोलत होता परतु अशा थाटात की जगात यालाच फक्त सत्याची चाड आहे. इतर देशातल्या मंत्र्याना असे कुणीच कधी धारेवर धरीत नसल्यामुळे त्याच्या मुठी झाकलेल्या राहतात. नाहीतर मंत्र्याच्या जातीत अशी किती रत्ने अमतील कुणास ठाऊक?

मसुदा तयार होण्यास पहाटेचे ३-३० झाले. बरोबर सकाळी ९-३० वाजता मॅकमिलनसाहेबांच्या टेबलावर निवेदनाची एक प्रत सुपूर्द करण्यात आली. मॅकमिलनसाहेबाना ते निवेदन वाचून समाधान झाले, व मोठ्या खुषीत ते स्वतः सकाळच्या बैठकीला हजर राहिले.

### प्रोफ्युमोचे ते निवेदन

सकाळचे ११ वाजले. त्या दिवशी शुक्रवार होता. वातावरणात एकदम चैतन्य पसरले होते. जॉन प्रोफ्युमो आधीच सभागृहात येऊन बसला होता. त्याच्या एका बाजूला अॅटर्नी-जनरल सर जॉन हॉब्सन व दुसऱ्या बाजूला मॅक्लिऑडसाहेब बसले होते.

तेवढ्यात पतप्रधान मॅकमिलन आले व त्यानी जॉन हॉब्सन याना उठवून प्रोफ्युमोशेजारची खुर्ची अडवली.

बरोबर ११ वाजून ८ मिनिटानी प्रोफ्युमो उठला. रात्रभर झोप नसल्यामुळे त्याचा चेहरा फटफटीत वाटत होता. त्याने हळूहळू वाचण्यास सुरुवात केली. आवाजात त्याने असा आत्मविश्वास गोळा केला होता की जणू त्याच्यावर झालेला अन्याय मोठ्या शातपणे तो परतवीत होता. जॉन प्रोफ्युमोने सागितले-

"मला असे कळते की काल रात्रीच्या पार्लमेंटच्या बैठकीत असा आरोप करण्यात आला की मिस् किलर ही साक्षीदार जी नाहीशी झाली ती एका मंत्र्याच्या सहकार्याने! अर्थात यामुळे न्यायदानाच्या कार्यात मोठाच विक्षेप आला आहे. यासबधी सभागृहाबाहेर अनेक वावड्या पसरल्या आहेत असेही सांगण्यात आले!-

"मला असे समजते की मिस् किलरच्या या पलायनाच्या संबंधात माझे नाव या वदंतांतून गोवण्यात आलेले आहे. म्हणून मी हे वैयक्तिक निवेदन करण्याची सधी साधून घेत आहे-

"माझी व मिस् किलरची अखेरची भेट डिसेंबर १९६१ मध्ये झाली व त्यानतर आमची भेट झाली नाही. ती सध्या कुठे आहे याविषयी मला काहीच कल्पना नाही. जर असे कुणी सुचवीत असेल की ओल्ड बेली येथे चाललेल्या खटल्यात ती साक्षीदार असून हजर राहिली नाही या घटनेशी माझा सबध आहे, तर ती गोष्ट सर्वस्वी खोटी आहे-

"मी व माझी पत्नी याना मिस् किलर ही जुलै १९६१ मध्ये क्लिव्हडेन येथे प्रथम भेटली, ती एका जेवणसमारंभाच्या वेळी! त्यावेळी जमलेल्या अनेक पाहुण्यांत डॉ. स्टीफन वॉर्ड हे होते व त्यांच्याशी माझी पूर्वीची पुसटशी ओळख होतीच. त्याच खान्यासाठी इव्हॅनोव्ह नावाचे रशियन वकिलातीचे आरमारी अधिकारीही आले होते.

"या प्रसंगानंतर पुन्हा मी व माझी पत्नी इव्हॅनोव्हला भेटलो ते युरी गागारिनच्या सत्काराच्या वेळी रशियन वकिलातीत!

"डॉ. वॉर्ड यानी मला व पत्नीला त्याच्या निवासस्थानी नेहमीच बोलावलेले असे. जुलै ६१ ते डिसेंबर ६१ या कालात मी मिस् किलरला फार तर अर्धा डझनवेळा डॉ. वॉर्डच्या येथे भेटलो असेन. माझे व किलरचे सबध मैत्रीचे होते, परंतु या मैत्रीत आक्षेपार्ह असे काहीच नव्हते.

"माननीय सभापती! मी हे व्यक्तिगत निवेदन एवढ्याचसाठी या सभागृहात केले की माझ्यावर ज्यांनी कडक आरोप केले त्याना पार्लमेंटचे खास सरक्षण आहे. **या सभागृहाबाहेर जर कुणी असले घाणेरडे व बेअब्रू करणारे आरोप माझ्यावर केले तर त्यांच्यावर मी अब्रूनुकसानीचे खटले केल्याशिवाय राहणार नाही.**"

प्रोफ्युमोचे भाषण संपताच हुजूर सभासदानी टाळ्या वाजवून त्याचे स्वागत केले.

प्रोफ्युमोने सर्वांनाच बनवले होते. "माझ्या व किलरच्या संबंधात आक्षेपार्ह काहीही नव्हते" हे प्रोफ्युमोचे विधान तर धादान्त खोटे

होते ! अशा प्रकारच्या भलत्या इरेला प्रोफ्युमो का उद्युक्त झाला ? एक कारण संभवते की प्रोफ्युमोच्या दृष्टीने प्रोफ्युमोचा किलरशी आलेला संबंध हा एक व्यक्तिगत अनैतिक साहसाचा भाग होता. त्याने किलरला पळून जाण्याकरिता मदत केली नसावी. या एका सत्य विधानात त्याला वाटले, एक क्षुल्लक खोटे सहज खपून जाईल. कदाचित् त्याचे म्हणणे असेही असेल की यापूर्वी उच्चपदस्थ मंत्र्यांनी यापेक्षा अधिक रंगेल जीवन गुपचुपपणे काढलेले आहे, ते सापडले नाहीत. मी थोडासा पकडला गेलो एवढेच ! तेव्हा हे खोटे बोलणे बचावासाठी असल्यामुळे तसे मुळीच आक्षेपार्ह नाही. अरेरे! प्रोफ्युमोचा होरा सपशेल चुकला ! किलरशी त्याच्या असलेल्या संबंधाची त्याने खरी खरी कबुली देऊन टाकली असती तर निदान तो वचनाचा घड आहे म्हणून लोकांनी त्याला क्षमा केली असती **परंतु जो माणूस शब्दाचा घड नाही त्याची अब्रूही फार काळ घड राहू शकत नाही ही गोष्ट तो विसरला.**

### विगसाहेबांचा जळफळाट

फक्त दहा मिनिटात निवेदन संपवून प्रोफ्युमो २२ मार्चला खाली बसला.

या निवेदनामुळे पुनः जॉर्ज विग्चा तिळपापड झाला. चोर तो चोर आणि वर शिरजोर ! परंतु मंत्री अखेर थोर समजणेच भाग होते. ज्या तीन सभासदांनी आदल्या दिवशी आरोप केले होते त्यांनाही आता चोरट्यासारखे झाले. काय करावे हे विग्ला समजेना !

पार्लमेंट आटोपताच पूर्वी ठरल्याप्रमाणे त्या दिवशी प्रोफ्युमो व व्हॅलेरी प्रोफ्युमो 'सॅनडाऊनपार्क रेस'ला हजर होती. तेथे राज्ञीमाताही आलेली होती व राज्ञीमातेबरोबर प्रोफ्युमोदांपत्याचे फोटो दुसरे दिवशी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले.

विग् आठवडाभर अस्वस्थ होता २५ मार्चला बी बी. सी ने त्याला टेलिव्हिजनवर मुलाखतीला बोलावले टेलिव्हिजनवर विग्ने सांगितले, " पार्लमेंटमध्ये केले गेलेले आरोप परिस्थितिजन्य पुराव्यावर आधारलेले होते. इव्हॅनोव्हच्या मैत्रीमुळे प्रोफ्युमो हा इंग्लडची सुरक्षितता धोक्यात आणीत होता. याच कारणाकरता पार्लमेंटमध्ये आरोप करावे लागले. इंग्लडमध्ये इव्हॅनोव्ह ज्या छानछोकीत राहात होता तशी छानछोकी रशियन माणसाकडून सहसा अपेक्षित नाही..."

### किलर सापडली !

२५ मार्चला दुपारी वृत्तपत्र वार्ताहरांनी किलरचा शोध लावला ! 'डेली एक्स्प्रेस' पत्राच्या वार्ताहराला ती 'माद्रीद' या स्पेनच्या राजधानीत सापडली. किलरने त्या वार्ताहराशी १४०० पौंड म्हणजे जवळ जवळ १२०००/– रुपये एवढ्या रकमेवर आपली पलायनाची खरी हकिगत सांगण्याचा करार केला.

२६ मार्चला किलरची हकिगत प्रसिद्ध झाली ती किम् या आपल्या मैत्रिणीबरोबर व पॉलमन या मित्राबरोबर कशी पळाली हे सांगून किलरने प्रोफ्युमोसंबंधी म्हटले होते—

" मी प्रोफ्युमोला असंख्य वेळा भेटलेली आहे. तो मोठा सभ्य आणि आर्जवी आहे—"

ही हकीगत २१००० रुपये देऊन खरेदी करण्यातली खासच नव्हती व वाचकांची त्याने फारशी तृप्ती झाली नाही. परंतु स्टीफन वॉर्डने ही मुलाखत वाचली. आदल्या दिवशी त्याने जॉर्ज विग् याची टेलिव्हिजनवरील मुलाखत ऐकली होती. त्यात त्यांनी उपस्थित केलेला सुरक्षिततेचा मुद्दा त्याला खुणावू लागला ! त्याने लगेच सायकाळी ५ वाजता वेस्ट मिन्स्टरमध्ये फोन केला व जॉर्ज विग् यांना असा निरोप ठेवला की त्यांनी तावडतोब ८६२५ या नंबरवर फोन करावा. कारण स्टीफन वॉर्डला त्यांच्याशी महत्त्वाचे बोलायचे आहे

### विग्-वॉर्ड भेट

जॉर्ज विग् यांनी फोनवर वॉर्डशी बोलणे केले व प्रत्यक्ष भेटीसाठी वॉर्डला निमंत्रण दिले सायंकाळी सहा वाजता वॉर्ड वेस्ट मिन्स्टरच्या व्हराड्यात हजर झाला. डॉ. वॉर्डला घेऊन जॉर्ज विग् खाजगी भेटीगाठीच्या खोलीत गेले

डॉ वॉर्डने नेहमीप्रमाणे क्यूबा प्रकरणात आपण केवढी धावपळ केली याचे अतिशयोक्तिपूर्ण वर्णन केले. नंतर त्याने सांगितले की इव्हॅनोव्हवर सुरक्षादलाचे प्रथमपासून लक्ष असल्यामुळे त्याच्यापासून धोका असा मुळीच नव्हता. तो पुढे म्हणाला की प्रोफ्युमो माझेकडे येत असे ही गोष्ट देखील सुरक्षादलाला माहीत होती

मात्र एका घटनेमुळे वॉर्डला चीड आलेली होती. वृत्तपत्रांनी या प्रकरणात किलरला अवाच्या सवा पैसा व प्रसिद्धी द्यावी याबद्दल तो नाराज होता. आपल्या उनाड मुलीविषयी बापाने राग व्यक्त करावा तसा हा वॉर्डचा राग होता तो म्हणाला की या अफवामुळे त्याची गिऱ्हाईके कमी झाली आहेत. रोजच्या येणाऱ्याची संख्या साठावरून पाच-सहावर घसरली आहे.

आपण इव्हॅनोव्हला शेवटचे डिसेंबरात भेटलो असे वॉर्डने सांगितले. परंतु इंग्लडमधून निसटण्यापूर्वी जानेवारीमध्ये वॉर्ड–इव्हॅनोव्ह यांची गाठभेट झाली होती ही गोष्ट विग् यांना माहीत होती.

जवळजवळ तीन तास गप्पा छाटल्यानंतर डॉ. वॉर्ड रात्री ९ वाजता पार्लमेंट हाऊसमधून बाहेर पडला. लगेच जॉर्ज विग् यांनी हॅरॉल्ड विल्सनची गाठ घेतली. विग् यांच्याशी झालेल्या बोलण्यात वॉर्डने विल्सन यांना क्यूबा-प्रकरणाच्या वेळी एक पत्र लिहिले होते याचा उल्लेख आला होता. विल्सनसाहेबांना आठवले की असे एक पत्र आले होते व फक्त आभाराचे पत्र धाडून त्यांनी ते फायलीत टाकले होते. याच पत्रात वॉर्डने स्वतःचा उल्लेख 'रशियाच्या वतीचा मध्यस्थ' असा केलेला होता. विल्सन यांनी ते पत्र हुडकले व या प्रकरणात बराच दारूगोळा आहे अशी त्यांची खात्री झाली.

यावेळी हॅरॉल्ड विल्सन हे प्रे केनेडींना भेटण्यासाठी अमेरिकेला जायला निघाले असल्यामुळे गडबडीत होते. त्यांनी जॉर्ज विग् यांना वॉर्डभेटीचा संपूर्ण वृत्तान्त बारीकसारीक तपशीलासह तयार करण्यास सांगितले व ते अमेरिकेला निघून गेले.

इकडे २८ मार्चला ख्रिस्तिन किलर अचानकपणे स्पेनहून पॅरिसमार्गे लंडन विमानतळावर उतरली ! १ एप्रिलला ती 'ओल्ड बेली' कोर्टात गेली व आपण एजकोम्ब खटल्याचे वेळी गैरहजर राहिलो याबद्दल तिने कोर्टाला दिलगिरी प्रदर्शित केली. न्यायाधीशांनी हा एप्रिलफूलचा प्रकार–तिचा चाळीस पौंड जामीन जप्त करून–एक एप्रिललाच निकालात काढला.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात हॅरॉल्ड विल्सन अमेरिकन यात्रेवरून परतले, व आल्याबरोबर त्यांनी जॉर्ज विग्चा अहवाल आपल्या पत्रासोबत पंतप्रधान मॅकमिलन यांना ९ एप्रिलला धाडून दिला.

: ७ :

एप्रिल उजाडण्यापूर्वी प्रोफ्युमो-प्रकरणातील थोडी थोडी माहिती मुख्यत: तीन मार्गांनी जनतेच्या स्मरणजळात पडत होती. काही राजकीय पुढारी प्रोफ्युमोच्या मागावर होते; सुरक्षादलाने प्रोफ्युमोवर नजर ठेवलेली होतीच आणि शिवाय वृत्तपत्रे आपआपल्या परीने किलर व वॉर्ड याचेकडून मिळणारी माहिती प्रसिद्ध करीतच होती.

आता आणखी एका मार्गाने या प्रकरणावर प्रकाश पडू लागला. आता पोलिसदल डॉ. वॉर्डच्या उद्योगाची चौकशी करू लागले. मॅलिबोन लेन पोलिस स्टेशनचे चीफ इन्स्पेक्टर सॅम्युएल हर्बर्ट यानी डॉ. वॉर्डची चौकशी २ एप्रिलला जातीने हाती घेतली.

यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे तीन एप्रिलला 'संडे पिक्टोरिअल' या वृत्तपत्राकडून प्रोफ्युमोने किलरला ९ ऑगस्ट १९६१ ला जे चिठीवजा पत्र लिहिले होते ते वॉर्डला त्याच्या सॉलिसिटर-मार्फत परत पाठवण्यात आले. हे जे पत्र प्रोफ्युमोने किलरला लिहिले होते त्यात प्रोफ्युमो लिहितो—

"डार्लिंग,

मी घाईत आहे. तुला फोन करण्याचा प्रयत्न केला; परंतु उत्तरच मिळेना म्हणून हे पत्र... आपले उद्या रात्री भेटण्याचे ठरले होते पण काही घोटाळा झाल्यामुळे मी उद्या तुला भेटू शकत नाही. मी दौऱ्यावर जात असल्यामुळे, आपली भेट होऊ शकत नाही, याचे मनस्वी दु:ख होते. दौऱ्यावरून मी परस्पर रजेवर जात आहे, तेव्हा सप्टेंबरपर्यंत आता मी तुला भेटू शकणार नाही. काय करावे—आलिया भोयासी...! स्वत.ची भरपूर काळजी घे. आणि कुठे पसार होऊ नको...

प्रेमळ J"

(या पत्रातील सही करणारा J म्हणजे जॉन प्रोफ्युमो.)

"संडे पिक्टोरिअल' पत्राने आता प्रोफ्युमोची पाठ सोडली. 'न्यूज ऑफ दि वर्ल्ड' हे पत्र मात्र स्वस्थ बसेना. उलट ७ एप्रिलच्या अंकात त्यानी किलरचे समग्र चरित्रच प्रसिद्ध केले. त्यात तिच्या बालपणापासून समग्र हकिगत दिली होती.

## वॉर्डमागे त्रिशूळ

फ्लीट स्ट्रीट, वेस्ट मिन्स्टर व स्कॉटलंड यार्ड या तीन ठिकाणाहून प्रोफ्युमोप्रकरणाची जी उकल हळूहळू सुरू झाली त्यामुळे २२ मार्चला प्रोफ्युमोने पार्लमेंटमध्ये केलेले निवेदन म्हणजे असत्याची एक पोतडी आहे असे ठरू लागले.

आपला उपयोग प्रोफ्युमोकडून जर्मनीला द्यावयाच्या अण्वस्त्रां-संबंधीची माहिती काढण्याकरता वॉर्डने व इव्हॅनोव्हने केला हे विधान किलरने पुन: पुन: केले होते. अर्थात् ती एकदा वॉर्डचे नाव घेई तर एकदा इव्हॅनोव्हचे !

२६ जानेवारीला पोलिसांना तिने सांगितले की ही माहिती काढून आण असे वॉर्डने तिला सांगितले.

२९ मार्चला एजकोम्बने गोळ्या झाडल्यावर सॉलिसिटर एड्वर्ड्स् यांना भेटायला गेली तेव्हा तिने इव्हॅनोव्हने हे काम सांगितले असे सांगितलें होतें.

२५ मार्चला सुरक्षादलाने अशीच माहिती गोळा केली की हे काम वॉर्डनेच तिला सांगितले होते.

आता पुन: ४ एप्रिलला इन्स्पेक्टर हर्बर्ट यांना किलरने असेच सांगितले की अण्वस्त्रासंबंधीची माहिती काढण्याचे काम वॉर्डनेच आपल्यावर सोपविले होते.

खरे म्हणजे ख्रिस्तिन ही काही विश्वासार्ह मुलगी नाही. पण ज्याअर्थी दोन दोन तीन तीन महिऱ्यानतर ती पुन: पुन: हीच गोष्ट सांगते, त्या अर्थी वॉर्डनेच गमतीत तिला म्हटले असले पाहिजे की— "विचार तुझ्या त्या प्रोफ्युमोला की जर्मनीला अमेरिका आता अण्वस्त्रे कधी देणार ?"

ख्रिस्तिनच सांगते, हा प्रश्न त्याला तिने कधीच विचारला नाही. समजा विचारला असता, तरी प्रोफ्युमो काय सांगणार होता ? प्रोफ्युमो हा काही कॅबिनेट मंत्री नव्हता. त्याचा दर्जा तसा दुय्यमच होता. अण्वस्त्र देण्याचा निर्णय पंतप्रधान हॅरॉल्ड मॅकमिलन व परराष्ट्रमंत्री लॉर्ड होम यानाच फारतर ठाऊक असता. प्रोफ्युमोशी त्याचा सबंध येणारच नव्हता.

क्यूबा-प्रकरणाच्या वेळीच ही सर्व किलरगडबड उडाल्यामुळे वॉर्डच्या या गंमत म्हणून केलेल्या प्रश्नाला अवास्तव महत्त्व आले. काही मजूरपक्षीय सभासदानी तर असे मत दिले की, — 'जर्मनीला अजून अण्वस्त्रे दिलेली नाहीत अशी जेव्हा क्रुश्चेव्हची खात्री झाली तेव्हाच त्याने क्यूबातील तळ उठवण्याचे मान्य केले. कारण क्यूबात रशियाचे तळ असण्याला जर अमेरिकेचा विरोध होतो तर उद्या जर्मनीला अण्वस्त्रे देऊ नयेत म्हणून रशियालाही मागणी करता येईल."

ते काहीही असो, या प्रश्नाला किलरमार्फत उत्तर मिळवण्याचा प्रयत्न वॉर्डने वा इव्हॅनोव्हने केला असे समजणे शुद्ध बावळटपणा होय.

## प्रोफ्युमो धिटावला

स्कॉटलंड यार्ड जेव्हा वॉर्डच्या मागे लागले तेव्हा प्रोफ्युमो अधिकच धीट झाला. 'पॅरिस मॅच' या फ्रेंच वृत्तपत्रावर त्याने अब्रूनुकसानीचा दावा लावला. त्या पत्राने प्रोफ्युमोचा एक फोटो छापून त्यावर एक वाह्यात् परंतु सत्य सांगणारा मथळा दिला होता. त्याने दुसरा दावा लावला तो 'टॅंपो इलस्ट्रेटो' या इटालियन मासिकावर. या मासिकाने असे वृत्त दिले होते की एजकोम्ब खटल्यातील साक्षीदार किलर असताना पळून जाण्यास तिला प्रोफ्युमोने मदत केली. या दोन्ही वृत्तपत्रांनी माफी मागितली. अब्रूनुकसानी म्हणून मिळालेली जवळजवळ ७००–८०० रुपयांची रक्कम त्याने लष्करी धर्मदाय फंडाला देऊन टाकली व तेवढ्यात थोडा चांगुलपणाही पदरी बांधला !

आता काही काल प्यादी प्रोफ्युमोच्या बाजूने हलण्यास सुरवात झाली.

१७ एप्रिलला मॅकमिलन यांनी हॅरॉल्ड विल्सन याना त्यांच्याकडून आलेल्या पत्रासोबतच्या जॉर्ज विग् याच्या अहवालावाबत पत्र धाडले. या अहवालाला त्यानी जवळजवळ पानेच पुसली. या उत्तरात पंतप्रधान मॅकमिलननी लिहिले आहे—

"माझ्या मुख्य प्रतोदाकडून तुमचे ९ एप्रिलचे पत्र व त्यासोबतचा जॉर्ज विग् व कुणी स्टीफन वॉर्ड याच्या संभाषणाचा अहवाल मला पोचला. तुम्ही पाठविलेली माहिती योग्य त्या अधि-

कार्‍यांकडे मी अवलोकनार्थ धाडीत आहे व जर आवश्यक वाटले तर यासंबंधी मी पुनः आपल्याला लिहीन."

हॅराल्ड विल्सन यांना जेव्हा हे पत्र मिळाले तेव्हा ते क्षुब्ध झाले. 'कुणी स्टीफन वार्ड' असा उल्लेख मॅकमिलनसाहेब करतात, याचा अर्थ वॉर्डचे नावही अजून या कुंभकर्णाच्या कानांवर गेले नाही काय? परंतु योग्य त्या अधिकार्‍याकडे हा अहवाल जाताच परिणाम दिसू लागतील अशी मनाची समजूत घालून विल्सन तर वाट पहात राहिले.

### मॅकमिलन झोपी गेले

एप्रिल संपला. मेची बारा तारीख आली तरी मॅकमिलनसाहेबांकडून काहीच कळले नाही. विल्सनना संशय आला की मॅकमिलनसाहेबांनी आपले पत्र व जॉर्ज विग्‌चा अहवाल रद्दीत काढला असला पाहिजे. त्यांनी १३ मेला पुन्हा मॅक्‌मिलनसाहेबांना पत्र लिहिले की योग्य त्या अधिकार्‍यांनी पुढे काय केले? याला पंतप्रधानांनी त्वरित उत्तर दिले, "There seems to be nothing in the papers you sent, which requires me to take further action." (तुम्ही पाठवलेल्या कागदांत, मी काही पुढे करावे असे आढळले नाही.)

वस्तुतः मॅकमिलनसाहेबांनी नीट चौकशी केली असती तर मध्यंतरी घडलेला महत्त्वाचा प्रकार त्यांना कळू शकला असता. हा प्रकार म्हणजे डा. वॉर्डने केलेला प्रमुख गाढवपणा! गाढवपणा हा त्याच्या दृष्टिकोनातून गाढवपणा म्हणायचा. नाहीतर प्रोफ्युमोप्रकरण जवळजवळ विझत चालले होते.

७ मेला वॉर्डने पंतप्रधान मॅकमिलन यांचे प्रमुख खाजगी चिटणीस टिमथी ब्लिग यांना फोन केला व त्यांची मुलाखत मागितली. टिमथी यांनी भेट घेण्याचे मान्य केले. मात्र याची हकीगत त्यांनी सुरक्षादलालाही कळवली. सुरक्षादलाचा एक माणूस या भेटीच्या वेळी हजर राहिला.

स्वतःच्या मोटारीतून वॉर्ड अॅडमिरल्टी हाऊसवर आला. त्याच्याबरोबर जी देखणी मुलगी होती ती शेजारच्या हॉटेलात जाऊन बसली. टिमथी यांचेजवळ वॉर्डने प्रथम अशी तक्रार केली की स्कॉटलंड यार्ड त्याला फार त्रास देत आहे. टिमथी यांनी सांगितले की पोलिसदलाच्या चौकशीचा सरकारशी संबंध नाही, आणि या तक्रारीची दखल घेता येत नाही. यावर अर्थात् डॉ. वॉर्डचा तोल सुटला. तो उद्धटपणे म्हणाला,– "मनात आणले तर मीदेखील या सरकारला छळू शकतो. प्रोफ्युमोने पार्लमेंटमध्ये जे सांगितले ते सर्व खोटे आहे. त्याने सभागृहाला चक्क बनवले आहे."

ही हकीगत मॅकमिलनसाहेबांनी जरा त्रास घेतला असता तर कळू शकली असती. निदान याच वेळी पुन्हा एकदा प्रोफ्युमोला खडसावणे आवश्यक होते.

### वॉर्ड पेटला, विल्सन बिथरले!

आता काय झाले पाहा! वॉर्ड इरेला पेटलेला, आणि विल्सन पंतप्रधानांच्या वांझोटया उत्तरामुळे बिथरलेले! वॉर्डच्या जेव्हा लक्षात आले की त्याने केलेल्या तक्रारीचा काहीच उपयोग झालेला नाही किंवा त्याच्या धमकीलाही टिमथीने भीक घातलेली नाही, तेव्हा त्याने सरकारच्या मानेभोवतीच्या फासाच्या दोरीला शेवटचा हिसका देण्यासाठी १९ मेला गृहखात्याच्या सचिवांना पत्र लिहिले. त्यात त्याने 'प्रोफ्युमाने सभागृहाला बनवले आहे' हा आरोप पुनः लेखी केला. इतके करून वॉर्ड थांबला नाही. त्याने वृत्तपत्रकारांना एक







नववधूसाठीं...

कांहीं विरक्त महात्मे सोडले तर रूचकर जेवण सर्वांनाच आवडतें, आणि तुमचे पतिराजही त्याला अपवाद नसणार. फक्त रूचकर जेवण बनवायचें कसें हाच काय तो प्रश्न। पण बेडेकर मसाला वापरून स्वयंपाकाला अवीट चव आणण्याची गुरुकिल्ली तुम्हांला माहित असली कीं पतिराज खूष!

प्रत्येकाच्या आवडीचे आणि विविध पद्धतीचे मसाले बेडेकरांकडे उपलब्ध असतात. त्यांतून आपली निवड करा.

व्ही. पी. बेडेकर अॅण्ड सन्स प्रा. लि., मुगभाट, मुंबई ४.
शाखा : ठाकुरद्वार, दादर, फोर्ट, परेल, पेरूगेट पुणें.

पत्रकच काढून दिले. या पत्रकात तो सांगतो–

" मी गृहसचिवांना पत्र लिहून ख्रिस्तिन किलर व प्रोफ्युमो याच्या संबधातील वस्तुस्थिती त्याचेपुढे मांडली आहे. मी आतापर्यंत यासबंधी गप्प राहिलो कारण हे संबंध उघड करणे प्रोफ्युमो यानाच हिताचे नव्हते. माझ्या या मौनाचा विपरीत फायदा घेऊन सरकार आता असे भासवू लागले आहे की मलाच काही गोष्टी लपवायच्या आहेत. मला काहीही लपवण्याची इच्छा नाही. यासाठी मला अनेक प्रकाराने छळण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी केवळ माझीच नव्हे तर माझे मित्र व पेशंट्स या सर्वांचीच नाचक्की होत आहे. ही स्थिती मी आता सहन करू शकत नाही..."

डॉ. वॉर्डचे हे पत्रक कुणी छापले का ? कुणीही नाही ! सर्व वृत्तपत्रांनी हाय खाल्ली होती. प्रोफ्युमोने अब्रूनुकसानीचा दावा लावला तर ! शिवाय आता सर्वच बाजूनी वॉर्डचे दिवस फिरू लागले होते. मित्र टाळू लागले होते. पेशंट्सनी पाठ फिरवली होती. त्याने जमवलेल्या छबेल्याही पागू लागल्या होत्या. पैसा–प्रतिष्ठा आणि पोरी हे तिन्ही 'प'कार आता त्याच्या आयुष्यातून झपाट्याने अस्तंगत होऊ लागले होते. रंग उडून गेले होते आता फक्त राग शिल्लक होते. किलरचा राग, प्रोफ्युमोचा राग, मॅकमिलनचा राग, स्कॉटलंड यार्डचा राग आणि त्यात होरपळणारा वॉर्ड !!

डॉ. वॉर्डने प्रोफ्युमोवर आता चारी दिशानी तो पार्लमेंटमध्ये खोटे बोलला या आरोपाचा रेटा सुरू केला. हॅरॉल्ड विल्सन याच्या हे लक्षात आले की अनेक मजूर सभासद आता अस्वस्थ झाले आहेत आणि पार्लमेंटमध्ये कोण केव्हा अवेळी प्रश्न विचारून ही 'हडी' फोडील याचा नेम नाही. २३ मेला डॉ. वॉर्डने खुद्द विल्सन यानाच पत्र लिहून आपल्या वृत्तपत्रांना पाठवलेल्या पत्रकातीलच माहिती कळवली.

विल्सन यांनी तावडतोब पंतप्रधानाची भेट मागितली. २७ मेला दोघांची भेट मुक्रर झाली. परतु त्याच्या अपेक्षेप्रमाणे पार्किन नावाच्या मजूर सभासदाने दि. २४ लाच खालील प्रश्नाची नोटीस दिली. प्रश्न असा होता–

"डॉ. स्टीफन वॉर्डने सरकारला जी माहिती दिली तीवर सरकारने काय निर्णय घेतला आहे– आणि स्कॉटलंड यार्डच्या चौकशीत जी माहिती बाहेर आली त्या अन्वये रतिकन्याच्या (Call girls) वाढत्या सख्येबाबत सरकार काही उपाय करणार आहे काय ?"

### विल्सन-मॅकमिलन् भेट

या प्रश्नाला उत्तर मिळण्यापूर्वीच विल्सन–मॅकमिलन भेट झाली. मॅकमिलन याचे अजूनही हेच म्हणणे होते की प्रोफ्युमोविरुद्ध काही तावडतोब करावे अशी परिस्थिती निर्माण झालेली नाही. विल्सन यानी सागितले,

'अॅटली प्रधानमंत्री असताना असाच एक प्रसग घडला होता. 'बोर्ड ऑफ ट्रेड'चे सेक्रेटरी मि. ब्लेचर म्हणून होते. त्याच्यावर लाच म्हणून काही भेटी स्वीकारल्याचा आरोप होता. यासबंधी जनतेत टीका सुरू होताच अॅटली यानी लॉर्ड चॅन्सेलर याना बोलावून चौकशी करवली. चौकशीत असे आढळले की केळी, एखादी दारूची बाटली अशा किरकोळ गोष्टी त्यानी स्वीकारल्या होत्या. अॅटलींनी त्याचा राजिनामा घेऊन त्याचे राजकीय चारित्र्य निकालात काढले...'

विल्सन यांनी ही हकिगत मॅकमिलन याना सांगताच मॅकमिलनसाहेबांचा चेहरा पडला. आपल्यावर केवढी जबाबदारी येऊन पडली आहे, याची त्यांना कल्पना आली. आगामी निवडणुकीत विल्सन हीच गोष्ट जाहीर सभांतून सागून आपल्या पक्षाचा उपहास केल्याशिवाय राहणार नाहीत, असा अंदाज त्याना आला. मॅकमिलन याना आगामी निवडणुकावर लक्ष ठेवूनच साऱ्या गोष्टी करणे भाग होते. विल्सन याच्या भेटीने या प्रकरणाकडे मॅकमिलन जरा गभीरपणे पाहू लागले–मजूर पक्षाच्या हातात हे कोलीत देऊन चालणार नाही अशी त्याची खात्री झाली.

मॅकमिलनसाहेबानी या प्रकरणाचे सर्व अहवाल वाचण्यास सुरुवात केली आणि त्याच्या डोळ्यापुढे काजवेच चमकले. दि. ३० मे ला म्हणजे विल्सन यांच्या भेटीनतर फक्त दोन तीन दिवसानीच त्यानी घाईघाईने आपण होऊन विल्सन याना पत्र लिहिले. त्यात त्यानी लिहिले—

" मी सोमवारी आपल्या झालेल्या बोलण्यावर विचार करीत होतो. माझी मनोमन अशी खात्री पटली आहे की वॉर्ड प्रकरणात सुरक्षितता मुळीच धोक्यात आलेली नाही. या बाजूवर योग्य ती नजर ठेवण्यात आली होती. परंतु मला वाटते, यासबधी तुम्हीही खात्री करून घेतलेली बरी व याकरता लॉर्ड चॅन्सेलर यानी केलेल्या चौकशीचा वृत्तान्त आपल्याला सोबत कळवीत आहे–"

लॉर्ड चॅन्सेलरच्या चौकशीचा वृत्तान्त विल्सन याचे हाती आला. व त्यात इंग्लडची सुरक्षितता वॉर्डमुळे धोक्यात आलेली नाही असा निष्कर्ष काढलेला होता. अर्थात वॉर्डने जो प्रश्न विचारावयास किलरला सांगितला अशा वावड्या होत्या, त्याच आरोपाचे यात निराकरण होते.

विल्सन याना या माहितीचा उपयोग पार्लमेंटच्या सकेताप्रमाणे करता येणार नव्हता. तेव्हा त्यानी निराळी युक्ती केली. मि. पार्किन यानी ज्या प्रश्नाची सूचना २४ मेला दिली होती तो मागे घेण्याची विनती त्यांनी पार्किन याना केली, व त्याऐवजी प्रश्नाची दिशा बदलून तो प्रश्न विचारावा असे त्यानी सुचविले. पार्किन यानी विल्सनची विनंती मान्य केली.

दि. ३० मेला पार्लमेंट सुटीकरता बरखास्त होण्यापूर्वीचा शेवटचा कामकाजाचा दिवस होता. त्या दिवशी पूर्वीचा प्रश्न मागे घेऊन मि. एडी या जुन्या आणि जाणत्या मजूर सभासदाने नवीन प्रश्नाची सूचना दाखल केली. हा प्रश्न असा होता–

" २२ मार्च १९६३ ला एका मत्र्याने वैयक्तिक निवेदन सभागृहात केले. त्या निवेदनासबधी डॉ. स्टीफन वॉर्ड यानी जी माहिती गृहसचिवांना पाठविली आहे, त्यावर गृहखाते काय करणार आहे ?"

हा प्रश्न सभागृहाच्या पटावर आला. या प्रश्नाचे जनकत्व हॅरॉल्ड विल्सन याचेच होते.

आता चक्रे जोरात फिरू लागली. प्रोफ्युमो याची गाठ घेऊन खुलासा मागविण्याची कामगिरी लॉर्ड डिलहॉर्न यानी पत्करली. त्यानी प्रोफ्युमोला निरोप दिला की ६ जूनला त्याने येऊन भेटावे.

### प्रोफ्यूमोची व्हेनिस–यात्रा

परतु प्रोफ्युमो व व्हॅलेरी प्रोफ्युमो ही दोघे यापूर्वीच व्हेनिसला निघून गेली होती.

ही सपत्नीक व्हेनिसयात्रा प्रोफ्युमोने केली ती एकाच गोष्टीकरता; झालेला खराखुरा प्रकार काहीही न लपवता प्रथम व्हॅलेरीच्या कानावर घालावा. त्याच मत्री म्हणून मरण, त्याला आता जळी, स्थळी काष्ठी दिसू लागले होते. याच प्रकरणाच्या खडकावर विवाहजीवनाचे तारू फुटणार की काय अशी त्याला धास्ती होती. व्हेनिसच्या या सहलीत प्रोफ्युमो हा आपल्या पापाचे पाढे वाचीत होता आणि बहुधा त्याची बायको त्याला सारखी क्षमा करीत होती.

व्हेनिसहून प्रोफ्युमो दापत्य घाईघाईने दि. ३ जूनलाच परतले. लंडनमध्ये येताक्षणीच प्रोफ्युमोने मॅकमिलनसाहेबाची भेट मागितली. परंतु मॅकमिलनसाहेब स्कॉटलडमध्ये सुटी घालवण्यासाठी गेले होते.

प्रोफ्युमोने ४ जूनला मॅकमिलनसाहेबाना खालील पत्र पाठवले—

**प्रिय पंतप्रधान**

तुम्हाला आठवत असेल की २२ मार्चला माझ्यावर सभागृहात केल्या गेलेल्या आरोपासंबंधी मी वैयक्तिक निवेदन केले होते.

मी एका साक्षीदाराला पळून जाण्यात मदत केली आहे व माझ्यामुळे सुरक्षिततेला धोका निर्माण झालेला आहे, अशा तऱ्हेचा तो आरोप होता.

हे आरोप इतके गंभीर होते की त्याचा विचार करता त्या विवक्षित साक्षीदाराशी असलेले माझे खाजगी संबंध—ज्याच्यासबंधीही तर्कवितर्क केले जात होते—हे फारसे महत्त्वाचे नाहीत असे मी समजून चालतो.

मी माझ्या निवेदनात असे म्हटले की माझ्या व सदर साक्षीदाराच्या संबधात आक्षेपार्ह असे काही नाही. मला हे अत्यंत विषादपूर्वक कबूल करणे भाग आहे की माझे हे म्हणणे खरे नव्हते. मी तुमची, माझ्या सहकाऱ्यांची व सभागृहाची दिशाभूल केली.

मी हे जे केले ते केवळ माझी बायको व कुटुब याना तोशीस लागू नये या हेतूने केले ही गोष्ट आपण समजून घ्यावी. अर्थात त्यांनाही मी पर्यायाने बनवलेच !

मला आता याची जाणीव होत आहे की अशा तऱ्हेची फसवणूक करून मी फौजदारी स्वरूपाचा नसला तरी गंभीर अपराध केला आहे. म्हणून माझ्यावर केल्या गेलेल्या आरोपात यत्किंचितही सत्य नाही, ही गोष्ट स्पष्ट असली तरी मी केलेल्या अपराधामुळे मला आपल्या सरकारात यापुढे राहणे जसे उचित नाही तसे कॉमन्ससभागृहाचा साधा सभासद रहाणेही योग्य नाही. मी व्यक्तिशः तुमची, माझ्या सहकाऱ्याची, माझ्या मतदाराची आणि ज्या पक्षाची मी २५ वर्षे सेवा केली त्या माझ्या पक्षाची अत्यत कुचबणा केली आहे याचा मला किती पश्चात्ताप होत आहे हे मी तुम्हाला कसे सागू...!"

तुमचा विश्वासू
**प्रोफ्युमो**

जूनच्या या पत्राला पतप्रधान मॅकमिलन यानी जे छोटेसे उत्तर पाठवले त्यात त्यानी म्हटले आहे—

" This is a great tragedy for you, your family and your friends. "

(व्यक्तिशः तुमची, तुमच्या कुटुबाची आणि तुमच्या मित्राची ही एक शोकातिका आहे. )

मॅकमिलनसाहेबानी प्रोफ्युमोला जे कळवले ते अगदी बरोबर होते. परतु त्यांना याची कल्पना नव्हती. पतप्रधान म्हणून त्यानी या प्रकरणात जी हयगय केली त्याचा जाब त्याना देश विचारणार आहे. प्रोफ्युमोवर विश्वासल्यामुळे त्याचाही कार्यभाग बुडणार होता. मॅकमिलनसाहेबाची शोकातिकाही आता सुरु झाली होती.

: ८ :

दडपलेले सत्य जेव्हा बाहेर पडते तेव्हा उन्मळून पडणाऱ्या प्रचड वृक्षाप्रमाणे ते त्याच्या आडोशाला असणाऱ्याचीच केवळ नव्हे, तर त्याच्या उत्पातात सापडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची नासाडी करते. प्रोफ्युमोने अखेर सत्य सागून टाकले—हे सर्व यापूर्वीच लोकाना माहीत झालेले असल्यामुळे—प्रोफ्युमोने कबुली देताच इग्लडमध्ये संतापाची लाट उसळली. आरोपाची राळ मॅकमिलनसरकारवर उठली.

हुजूर पक्षातीलच काही पुढारी म्हणू लागले की प्रोफ्युमो-किलरसंबधाची संपूर्ण माहिती पतप्रधानाना होती. परतु काहीतरी वेडगळपणाने त्यानी प्रोफ्युमोला वाचवण्याचा खटाटोप करून पाहिला. अर्थात बहुतेकाची खात्री होती की मॅकमिलन याना सपूर्ण माहिती नव्हती व संपूर्ण माहिती करून घेण्याचा त्यांनी प्रयत्नदेखील केला नाही. हाच त्याचा मोठा गुन्हा होय. एका मत्र्याविरुद्ध गभीर आरोप होत असताना पतप्रधान झोपी कसे गेले ?

फ्लीट स्ट्रीटवर प्रोफ्युमोच्या सत्यकथनाने एकदम चैतन्य पसरले. 'व्हॅसल' खटल्यात वृत्तपत्रकारांना तुरुगात जावे लागल्यामुळे वृत्तपत्राचे बातमीदार हबकले होते. व ते प्रोफ्युमोबाबत मूग गिळून होते. आता प्रोफ्युमोनेच आपले चरित्र सागून टाकल्यामुळे सर्वांना एकदम कठ फुटले.

**वॉर्डला अटक**

वृत्तपत्राचा किलरसबधीचा ओढा मात्र दिवसेदिवस वाढत चालला होता. गॉर्डन या दुसऱ्या वेस्ट इडियन माणसावर किलरवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला या आरोपावरून खटला सुरू झाला होता. जेव्हा किलर स्पेनमधून येऊन अचानक लडन विमानतळावर उतरली तेव्हा गॉर्डन तिच्या अगावर धावून गेला होता.

या खटल्यात ख्रिस्तिन किलर साक्ष द्यावयास आली ती रोल्स-रॉईस मधून ! असख्य कॅमेरे सज्ज होते तिची छायाचित्रे काढली गेली. तिने गॉर्डनबरोबर आपण राहात होतो व त्याच्यापासून आपल्याला एकदा दिवस गेले होते या दोन्ही गोष्टी सपशेल नाकारल्या.

गॉर्डन चिडला. त्याने आपल्या वकिलाचे वकीलपत्र रद्द करून स्वतःच बचाव हाती घेतला व किलरची उलटतपासणी घेण्यास सुरुवात केली.

पहिला प्रश्न...

" मी किलर हिला विचारतो की तिने आपल्या तथाकथित स्टीफन नावाच्या भावाकरता एक गौरकायेतर मुलगी आणण्यास सागितले होते ही गोष्ट खरी की नाही ? '

यावर किलरने बॉबच टाकला. ती म्हणाली—

" ही गोष्ट अगदी खरी आहे. "

यावर गॉर्डनने कोर्टाला सागितले—

" ही डॉ. वॉर्डची साथीदार आहे आणि हिने माझ्याविरुद्ध जे जे

[ पृष्ठ ५९ वर पहा ]



हळूहळू आपल्या रस्त्यांवर वाहने वाढत आहेत. अपघातांची संख्याही सहाजिकच त्यामुळे वाढते आहे. मोटारअपघाताबद्दलचे वृत्त बहुतेक रोजच आपल्याला वाचायला मिळते. अर्थात् प्रत्येक अपघाताला ड्रायव्हरच जबाबदार असतो असे नाही. कित्येकदा पादचारीही जबाबदार असतो, तर काही वेळा भोवतालची परिस्थिती अपघाताला जबाबदार असू शकते. काही वेळा कुणाकडेच काही चूक नसते आणि केवळ योगायोगानेच अपघात घडतो.

परंतु जेव्हा एखाद्या मोटारीचा अपघात होतो, तेव्हा मोटार चालविणाऱ्यावर पुष्कळ जबाबदाऱ्या येऊन पडतात. त्याची चूक असो अगर नसो, अपघात झाल्यावर त्याने कसे वागावे यासंबंधी काही दंडक आहेत. मोटर व्हेइकल्स अॅक्टमध्ये याबाबत संपूर्ण विवेचन असून, त्या नियमांप्रमाणे न वागल्यास खटलाही होतो.

एखादा अपघात झाला म्हणजे अपघातास कारणीभूत असलेल्या, किंवा कारणीभूत नसलेल्या पण ज्याच्याशी टक्कर झाली आहे अशा मोटारीच्या ड्रायव्हरने बरीच दक्षता घ्यावयाची असते. अपघातात कुणी जखमी झाले असेल, तर त्यास जरूरीप्रमाणे तावडतोब वैद्यकीय इलाज करण्याची तजवीज केली पाहिजे. तशीच आवश्यकता असेल, तर त्यास इस्पितळातही पोहोचविले पाहिजे. वैद्यकीय मदत तावडतोब उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न न करणे हा गुन्हा असून, त्यास शंभर रुपये दंडाची शिक्षा आहे.

अपघातात सापडलेल्या माणसाला वैद्यकीय मदत देणे हे जसे बंधनकारक आहे, त्याचप्रमाणे अपघाताची माहिती तावडतोब शेजारच्या पोलीसस्टेशनवर देणे हेही ड्रायव्हरने केले पाहिजे. किमान २४ तासांच्या आत जर ड्रायव्हरने अपघाताची खबर पोलीसांना दिली नाही, तर तोही गुन्हा होतो.

ड्रायव्हरने अपघाताची खबर दिल्याशिवाय त्या जागेवरून पळ काढणे—मग त्याची चूक असो की नसो—जागेवरून पळ काढणे हाही गुन्हा आहे.

अपघात होण्यास वर सांगितल्याप्रमाणे अनेक कारणे असू शकतात. पण बव्हंशाने बेदरकारपणे आणि निष्काळजीपणाने बेफामरीत्या गाडी चालवून दुसऱ्याचे जीवितास धोका उत्पन्न करणे हाच प्रकार अनेकदा घडत असतो. अशा वेळी पोलीस एक तर मोटर व्हेइकल्स अॅक्टच्या कलम ११६ प्रमाणे खटला भरतात किंवा इंडियन पीनल कोडच्या कलम ३३७, २७९ अगर ३०४–अ प्रमाणे खटला भरतात. मात्र मोटर व्हेइकल्स अॅक्टच्या ११६ कलमाखाली खटला भरण्याचा असेल तर पोलीसांनी तशी ड्रायव्हरला आगाऊ सूचना द्यावी लागते. अपघातात सापडून जर एखादा मनुष्य मयत झाला असेल, तर ड्रायव्हरवर इंडियन पीनल कोड क. ३०४–अ प्रमाणे खटला भरण्यात येतो.

ड्रायव्हरने गाडी चालविताना स्वत:जवळ मोटार चालविण्याचे लायसेन्स ठेवले पाहिजे. पोलीसांनी त्याच्याकडे लायसेन्स पाहायला मागितल्यावर त्याने ते पोलीसापुढे हजर केले पाहिजे. निदान तेथपासून दहा दिवसांचे आत कुठल्यातरी पोलीस स्टेशनवर हजर केले पाहिजे. नाहीतर हादेखील गुन्हा आहे. लायसेन्स नसताना गाडी चालविणे हा जसा गुन्हा आहे, त्याचप्रमाणे लायसेन्स नसलेल्या माणसाला वाहन चालवायला देणे हाही गुन्हा आहे. मित्राला मोटार चालविण्यास देण्यापूर्वी ही चौकशी मात्र अवश्य करा.

मोटार चालविणाऱ्यांना नेहमी एक प्रश्न असा पडतो की आपण मोटार थांबवायची तरी केव्हा केव्हा? कायद्यात याबाबत मजेदार तरतुदी आहेत. चौकातल्या पोलीसांनी हात दाखविला की मोटार थांबविलीच पाहिजे. एवढेच नव्हे तर वाटेवरून जाणाऱ्या पोलीसांनी जरी मोटार थांबवायला सांगितले, तरी मोटार थांबवलीच पाहिजे; मात्र अट अशी की आपल्याला मोटार थांबवायला सांगणारा पोलीस हा पोलीसाच्या वेषात असला पाहिजे.

त्याचप्रमाणे अपघाताशी दूरान्वयाने का होईना, पण थोडा जरी संबंध असला व अपघातात कोणी जखमी वा मयत झाले असले किंवा कुणाची नुकसानी झाली असेल, तर मोटार ड्रायव्हरने मोटार थांबविलीच पाहिजे, नाहीतर हा गुन्हा आहे.

कायद्यात आणखी एक गमतीदार तरतूद आहे. समजा, एखादा मनुष्य बैल वगैरे गुरे हाकारीत चालला असला व त्याला वाटले की मोटारीमुळे आपला पशु उधळण्याचा संभव आहे तर त्याने हात करून मोटार थांबवायची खूण केली, तरी ड्रायव्हरने मोटार थांबवलीच पाहिजे. नाहीतर हा गुन्हा आहे. ' पशू 'मध्ये घोडा, शेळया, हत्ती, उंट, गाढव, बकरी, मेंढी, खेचर व गुरेढोरे यांचा समावेश आहे. असंख्य मोटार ड्रायव्हर्संना हे माहीत नसेल. पण आता तरी त्यांनी हे नीट ध्यानात ठेवावे.

• • •

# घटस्फोटांचे लोण

एलिझाबेथ टेलरने एडी फिशरशी घटस्फोट घेण्याचे ठरवून रिचर्ड बर्टनशी विवाह करण्याचे ठरवले आहे ही कुणकुण बरेच दिवस होती. परंतु आता प्रत्यक्षात ही बातमी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली तेव्हा अमेरिकेतील बहुसंख्य चित्रपटविषयक नियतकालिकांत आणि दैनंदिन होणाऱ्या खान्यांच्या वेळी, एक चर्चा फार होत असलेला विषय म्हणजे—अलीकडे घटस्फोटांचे प्रकार वाढले आहेत काय? अनेक वर्षे सुखाने वैवाहिक आयुष्य घालवूनदेखील हे पुरुष आपल्या बायकोला सोडतात तरी कसे?

वेगवेगळ्या नियतकालिकांतून ही चर्चा सुरू झाली व अद्यापही चालूच आहे. या निमित्ताने पुन्हा एकदा कोणी किती विवाह केले याचा पुनरुच्चार होत आहे. पुन्हा एकदा जोरात चर्चा चालली आहे की हे असे घडतेय तरी का? चर्चा पुष्कळ झाली आहे, पण उपाय मात्र कुणाला काही सापडत नाही. मात्र काही नवे निष्कर्ष काढण्यात येत आहेत. घटस्फोट घेण्यात, कुठली मंडळी अधिक आहेत याची वर्गवारी पाडली जात आहे आणि कारणे शोधली जात आहेत.

हॉलिवुडमध्ये होणारी प्रत्येक घटना गाजते. परंतु सुखाने अनेक वर्षे वैवाहिक आयुष्य कंठीत असणाऱ्या सुखी निष्ठावंत जोडप्यांची उदाहरणे मात्र गाजत नाहीत. कोणा पुरुषाने एकदा एकादीशी लग्न केले आणि अनेक वर्षे सुखाने तिच्याशीच संसार केला तर बातमीदारांना त्याच्याविषयी काहीहि कुतूहल वाटत नाही. पण जर का एखाद्या नटाने आपल्या पत्नीस दूर केले की त्याचा गाजावाजा मोठ्या प्रमाणात होतो. आपल्या पत्नीस टाकून देणाऱ्यांत श्रीमंत, प्रसिद्ध आणि मध्यम वयाच्या लोकांचा भरणा अधिक आहे असे दिसते. या कलावंतांच्या आयुष्याकडे पाहिले की असे दिसते की जे श्रीमंत आहेत त्यांना वेगवेगळ्या स्त्रियांना घेऊन खर्चिकपणे हिंडणे फिरणे परवडते, प्रसिद्ध आहेत त्यांना पुष्कळ स्त्रियांना भेटण्याची संधी प्राप्त होते आणि मध्यम



रिचर्ड बर्टन, एलिझाबेथची मुलगी लिझा आणि एलिझाबेथ टेलर

★

वयाच्या नटांना वाटते की आयुष्यात 'खरे' प्रेम काय आहे ते एकदा अनुभवलेच पाहिजे. आणि या साऱ्या विचारातून घटस्फोटप्रकरणे वाढतात.

विल्यम होल्डनने २२ वर्षांपूर्वी ब्रेन्डा मार्शल हिच्याशी विवाह केला. गेली २२ वर्षे सारे ठाकठीक चालले. अर्थात् अधूनमधून त्यांच्या इतरत्र प्रणयाच्या वावड्या ऐकू येत. ऑड्रे हेपवर्नशी तो लग्न करणार आहे असेही म्हटले जात होते. या अतिशय श्रीमंत गृहस्थाला चित्रपटधंद्याशी संबंध नाही ठेवला तरी चालेल. वर्षाला सुमारे लाख मैल तो प्रवास करतो आणि चित्रपट काढतो. 'ब्रिज-ऑन दि रिव्हर क्वाय' या एकाच चित्रपटाचे त्याला दरसाल २५ लक्ष रुपये मिळत असतात. त्याचे जपानमध्ये कारखाने आहेत, आफ्रिकेतहि क्लब्स् आहेत. या माणसाला वयाच्या ४५ व्या वर्षी आपल्या बायकोला सोडावीशी वाटते ते कसे? त्याने आता कॅपुसीन (खरे नाव जर्मेन लेफेब्र) हिच्याशी विवाह करायचे ठरविले आहे. त्याच्या 'दि लायन' या चित्रपटात ती काम करते.

दुसरे उदाहरण ॲन्थनी क्वीन या नटाचे. अत्यंत गरीबीतून वर आलेला हा नट सुमारे वीस वर्षांपूर्वी मला स्वतःचे घर, मोटार आणि बोट हवी असे म्हणत होता. आता सुमारे सात देशांत त्याची मिळकत आहे! 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' चित्रपटापासून त्याला फार मागणी आहे व १९६५ पर्यंत नवी कामे स्वीकारायला वेळही नाही. सव्वीस वर्षांपूर्वी त्याने कॅथरीन डेमीलशी लग्न केले. या लग्नापासून त्याला १० वर्षांपासून २१ वर्षांपावेतोची चार मुले आहेत. आणि गेल्या वर्षी ॲन्थनी क्वीनने जाहीरपणे सांगितले की 'मी न्यूयॉर्कमध्ये सहा महिने आजारी असताना माझी मनोभावे सेवा करणाऱ्या ओलांडा आडोलोरायशी माझा अनैतिक संबंध आहे. तिला माझ्यापासून मूल झाले आहे. ती आणि मी एकत्र राहात आहोत.' हे वृत्त वाचूनदेखील कॅथरीनने नवऱ्याची चूक पोटात घातली व त्याला जाहीररीत्या माफही केले. पण त्याचे समाधान झाले नाही. त्याने घटस्फोट घेतलाच. याही गृहस्थाचे वय मध्यम, आणि आहे श्रीमंत.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीसाठी वाटचाल करीत असलेले गव्हर्नर नेल्सन रॉकफेलर (मध्यमवयीन आणि श्रीमंत) यांनीही ३१ वर्षांची विवाहबंधने तोडली.

फोर्ड कंपनीचा मालक हेन्री फोर्ड (दुसरा) यानेही (वय ४५, श्रीमंत) २३ वर्षे चालत आलेला संसार आटोपता घेतला आणि त्याने मॅरीआ ख्रिस्तीनाबरोबर विवाह केला.

यापेक्षाही मोठे चमत्कारिक उदाहरण आहे ते अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाचे एक न्यायाधीश विल्यम ऑरव्हील डग्लस (वय ६४) यांचे. यांनी २३ वर्षाच्या मुलीशी नुकतेच लग्न केले. त्यांच्यावर घटस्फोटाची जी फिर्याद झाली तीत त्यांच्या बायकोने म्हटले होते की 'मी त्यांना नकोशीच झाली आहे!'

'फाइव्ह फिंगर्स' या सिसेरोबद्दलच्या चित्रपटात अतिशय उत्कृष्ट अभिनय केलेला नट जेम्स मेसन याचे २२ वर्षांपूर्वी लग्न झाले होते. २२ वर्षे याचे सारे काही ठीक चालले आणि आता या मध्यम वयाच्या प्रसिद्ध आणि श्रीमंत माणसाने स्वतःच्या सेक्रेटरीशी लग्न केले आहे. त्याच्या बायकोने सांगितले की माझा नवरा बाहेरख्याली होता.

टोनी कर्टिस आणि जेनेट ली यांचा बारा वर्षांपूर्वी विवाह झाला. तेव्हापासून गेल्या वर्षापर्यंत 'दृष्ट लागण्यासारखे प्रेमळ जोडपे' असे त्यांचे वर्णन होई. पण जेनेट ली हिला

टोनी कर्टिसपेक्षा अधिक प्रसिद्धी मिळू लागताच, टोनीने वेगळी वाट धरली आणि सरळ १८ वर्षे वयाच्या ख्रिस्तीनशी विवाह केला. टोनी कर्टिस–वय सुमारे ३८, आणि प्रसिद्ध.

यश मिळत गेले म्हणजे कलावंतांना प्रसिद्धी आणि पैसा मिळतो. त्यातून हे प्रसंग अधिक उद्भवतात आणि नेमका गाजावाजा होतो तोही अशाच गोष्टींचा !

* * *

# धाडसी स्वार – स्टीव्ह मॅक्लीन

मार्लेन ब्रँडो आणि स्टीव्ह मॅक्लीन हे नट कोणास ठाऊक नाहीत? दोन्हीहि चांगल्या प्रकारचे नट असून, न्यूयॉर्कच्या एका शाळेत त्यांनी अभिनयाचे शिक्षण घेतलेले आहे. दोघांचेही 'एक तगडा आकर्षक तरुण' अशीच वर्णने केली जातात.

स्टीव्ह मॅक्लीन याला तर धाडसी स्वार म्हणूनच ओळखले जाते. मोटार सायकल असो की स्कूटर असो, साधी मोटार असो, की रेसची गाडी असो, स्टीव्ह मॅक्लीनच्या हातात वाहन आले की ते कधीच सावकाश चालणार नाही. त्याचे वागणे बोलणे देखील रेस खेळणाऱ्या मोटारच्या इंजिनसारखेच आहे.


नटाला काहीतरी वेड असले म्हणजे त्याचा म्हणे मोठेपणा वाढतो. स्टीव्ह मॅक्लीनला जलद गतीने वाहने चालवण्याचा विलक्षण षोक आहे. दोन वर्षांपूर्वी तर काही महिने असे गेले की त्यावेळी मोटारी वेगाने चालविणाऱ्यांना अडवून खटले भरणाऱ्या पोलीसांची व स्टीव्ह मॅक्लीनची इतक्या वेळा भेट झाली की त्याच्या कुटुंबीयांनाही तो इतक्यांदा भेटला नसेल.

परंतु त्याची पत्नी समजूतदार आहे. साधारणपणे बायकांना असल्या वेडाची फार भीती वाटते. त्या एक वेळ दारुड्या, जुगारी माणसाशी विवाह करायला तयार होतील, पण असले वेड? छे...त्यांना कधी खपायचे नाही. परंतु नर्तिका-गायिका-अभिनेत्री असलेली त्याची पत्नी नील आदाम्स आपल्या पतीच्या या वेडापायी बिलकुल चिंता करीत नाही.

रेसमध्ये भाग घेणाऱ्या अशा वीरांना एक प्रकारची जिद्द नेहमी छेडत असते. आपल्या या वेडापायी ते कशाचाही त्याग करायला तयार असतात. जेम्स डीन हा तरुण नट केवळ या आपल्या रेसिंगच्या वेडापायी सर्वस्व गमावून बसला.

स्टीव्ह मॅक्लीन व नील आदाम्स या दोघांची १९५६ साली प्रथम भेट झाली. त्यावेळी दोघेही नाटकात काम करीत होते. त्यांचा परिचय वाढला व हळूहळू प्रेमात रूपांतर झाले.

दोघांचे लग्न कसे झाले याची हकीगत मोठी मनोरंजक आहे. नाटके संपल्यावर



उघडा–स्टीव्ह मॅक्लीन

चित्रपटात काम मिळावे म्हणून नील आदाम्स हॉलिवुडमध्ये गेली होती. स्टीव्ह मॅक्लीन लगेच तिच्या पाठोपाठ तेथे गेला. त्याने ती भेटताच लग्नाबद्दल विचारले. ती तयार होतीच. त्याने तिला आपल्या मोटारीत घातली व भरवेगाने पाद्रयाच्या शोधात ते निघाले.

पाद्रयाला गाठण्याची स्टीव्हला विलक्षण घाई झाली होती. त्याला हवी होती तेवढी मोटार वेगात नव्हती, तरी पण पोलिसांच्या मते मोटारीने ताशी शंभर मैलापेक्षा अधिक वेग घेतला होता. दोन पोलिसांनी त्यांना आडवले आणि खटला भरण्यासाठी नावपत्ता घेण्यास सुरुवात केली. तोच स्टीव्ह म्हणाला–

"एरव्ही तुम्ही माझ्यावर जरूर खटला भरा...पण आता मला याच वेगानं जायचं आहे. आम्हां दोघांना लग्न करायचं आहे. आम्ही पाद्रयाच्या शोधात आहोत."

पोलीसांनी त्याच्यावर खटला तर भरला नाहीच, उलट त्याला घेऊन ते नजिकच्या पाद्रयाकडे गेले. पाद्रयाकडे लग्न तर लागले, पण साक्षीदार लागतात ते कुठे होते? झाले, साक्षीदारही ते पोलीसच झाले !

लग्नानंतर त्या दोघांनाही पुष्कळ चित्रपटांत कामे मिळाली. स्टीव्हने फेरारी ही प्रसिद्ध रेसकार घेतली व तो रेसमध्ये भाग घेण्यास तयार झाला. आपल्या नटास अपघात वगैरे झाला, तर स्टुडिओचे बरेच नुकसान होईल, या भीतीने स्टुडिओच्या अधिकाऱ्यांनी स्टीव्हला बोलावून सांगितले की त्याला रेसमध्ये भाग घेता येणार नाही. ही अट मोठी विलक्षण होती. त्याने सरळ नकार दिला, तेव्हा स्टुडिओच्या अधिकाऱ्यांनाही मोठा पेच पडला. पण हळूहळू त्यांनी त्याची समजूत घातली.

तरी त्याला वाहने जलद चालविण्याचे वेड अद्याप आहे. स्टुडिओतदेखील पार्क करण्यासाठी असलेल्या जागेत तो कधीच मोटार ठेवत नाही. तो सरळ सेटवरच आपली मोटार नेतो. त्याच्या मोटार सायकलच्या आवाजाने सर्वांना त्रास होतो व सारे जण कानांत बोटे घालून उभे राहतात. स्टीव्ह मॅक्लीनला मात्र त्याचा काहीहि त्रास होत नाही. कारण तो एका कानाने संपूर्ण बहिरा आहे व दुसऱ्या कानाने त्याला थोडेसेच ऐकू येते !

चित्रपटांत त्याने काम करायला नुकतीच सुरुवात केली होती, त्यावेळी त्याच्या मोटारीचा व त्या भरमसाट वेगाचा सभोवतालच्या सर्व रहिवाशांना त्रास होत असे. एकदा तर त्याची एक मैत्रीण त्याच्या मोटारीत बसली. घाटातून भर वेगाने मोटार जात असताना त्याने पाहिले तो त्याच्या वेगाने भयभीत झालेली त्याची मैत्रीण ही मूर्च्छित होऊन पडली होती !

स्टीव्ह मॅक्लीन आज यशस्वी कलावंत असल्याने फार श्रीमंत आहे. त्याच्याजवळ तरीही त्याच्या जुन्या मोटारसायकली, रेसगाड्या वगैरे अद्याप आहेत.

आपल्या या वेगाबद्दल बोलताना स्टीव्ह मॅक्लीन म्हणतो––

"मला वेगाने मोटार हाकायला आवडते. ती एक कला आहे आणि मला पसंत आहे. खरे सांगायचे म्हणजे काही काही वेळ जोरात जाताना मलाही भीती वाटते. पण या भीतीवर मात करण्यातही मला मोठी मौज वाटते. मी अतिशय वेगाने गाडी चालवतो, याबद्दल

मला स्वतःला कधीच वाईट वाटत नाही. मला ठाऊक आहे की माझ्यापेक्षा काही चागले कलावंतही आहेत. पण इतक्या वेगाने मोटार चालविणारा मात्र एकही माझ्यासारखा कलावत नाही!"

* * *

# काही आगामी चित्रपट

## ऑल दि वे होम

ज्या कादबरीला पुलित्झर पारितोषिक मिळाले व ज्या कादंवरीच्या आधारे लिहिलेल्या नाटकालाही न्यूयॉर्कमध्ये बक्षीस मिळाले, त्या कादंवरीवर हा चित्रपट आधारलेला आहे. घरचा कर्ता पुरुष अपघातात मरण पावतो, त्यानतर त्याच्या बायकोवर आणि मुलावर काय प्रसंग येतात त्याचे दर्शन. रॉबर्ट प्रेस्टन नायकाचे काम करीत असून, जीन सीमन्स पत्नीचे व नवा बालनट मायकेल किरने मुलाचे काम करीत आहे.

## ट्वायलाइट ऑफ ऑनर

आपल्या पत्नीचा विशेष जबरदस्त कारण नसताना खून करणाऱ्या खुनीतर्फे केस चालविणाऱ्या तरतरीत वकिलाची कथा. मेट्रोचा हा चित्रपट. रिचर्ड चेम्बरलेनने वकिलाची भूमिका केली असून, निक ॲडम्सने खुनी माणसाची उत्कृष्ट भूमिका केली आहे.

## अन्डर दि यूमयूम ट्री

एक वेगळेच पण मनोरंजक कथानक असलेला चित्रपट. तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या मुलीपुढे नेहमी एक यक्षप्रश्न असतो तो असा की आपल्याला परक्या पुरुषाबद्दल जे आकर्षण वाटते आहे, ते खरोखर प्रेम आहे की लैंगिक आकर्षण? हा प्रश्न सोडविण्याची इच्छा असलेली तरुणी केरॉल लिनले दोन तरुणाच्या सहवासात येते त्याची कथा. जॅक लेमन व डीन जोन्सच्या भूमिका.

## मॅरी मॅरी

वॉर्नर ब्रदर्सचा चित्रपट. कोर्टातून घटस्फोट मिळविलेले एक जोडपे. घटस्फोटानतर त्याच्या असे लक्षात येते की अजूनही आपले एकमेकावर अतिशय प्रेम आहे. एकमेकांना एकमेकाचाच आधार आहे. डेबी रेनॉल्ड्स व मायकेल रेनीच्या भूमिका.

## बीच पार्टी

एकवीस वर्षाखालील तरुणतरुणीच्या मनांत लैंगिक विषय कसा डोकावतो आणि त्याचे मनोव्यापार काय असतात याचा अभ्यास करून त्यावर पुस्तक लिहिण्याचे एका प्रोफेसरचे काम चालू असते. समुद्रकाठावर अशा तरुणतरुणीची एक पार्टी असते. प्रोफेसरमहाशय टेलिस्कोप लावून त्या तरुणाचे वर्तन पहातात. हेतू, आपल्या पुस्तकासाठी मालमसाला पाहिजे. पण त्या तरुणाच्या हे लक्षात येते आणि ते त्याला आगळाच धडा शिकवतात. याच वयाच्या तरुणाना हा चित्रपट आवडेल. रॉबर्ट क्युमिग्स आणि डॉरोथी मेलोनच्या भूमिका.

## धिस स्पोर्टिंग लाईफ

फुटबॉल खेळणाऱ्या एका खेळाडूच्या जीवनावरील चित्रपट. फुटबॉलच्या खेळात नैपुण्य मिळवून तो एक एक यशाची पायरी ओलाडत असतो. त्याचवेळी आपल्या विधवा घरमालकिणीवर त्याचे प्रेम बसते. परतु ती साद देत नाही, देऊ शकत नाही, त्यातून दोघाचेही जीवन उध्वस्त होते. रिचर्ड हॅरीस खेळाडूची भूमिका करीत आहे.

## दि कार्पेट बॅगर्स

येत्या मार्च अगर एप्रिलमध्ये हा चित्रपट अनेक देशांत दाखविला जाईल. आणि हा चित्रपट इतका स्फोटक आहे की हिंदमध्ये तर अर्धाअधिक कापूनच हा चित्रपट कदाचित् दाखविला जाईल. हॉलिवुडमध्ये चित्रीकरण झालेल्या आतापावेतोच्या सर्व चित्रपटाना मागे सारणारा, वासना भडकवणारा हा चित्रपट आहे. कोणत्याही चित्रपटात कधी पहायला मिळाले नाहीत, असले नाजुक प्रसंग चित्रित करण्यात आले आहेत. सेन्सॉरने कितीही अडथळे निर्माण केले, तरी हा चित्रपट जशाच्या तसाच अमेरिकेत दाखविला जाईल.

या चित्रपटात एक प्रसग असा आहे की नायक नायिकेला पलंगावर पाडतो व अतिप्रसग करू पाहतो. ती त्याला ढकलते, ओरडते. हा प्रसंग अशा विलक्षण प्रकारे दाखविण्यात आला आहे की तो विसरता येणार नाही.

यातील नायिका केरॉल एका प्रसगी सपूर्ण नग्नावस्थेत दाखविण्यात आली आहे. ती ज्या वेळी सपूर्ण नग्न होते त्या वेळी समोर एक्स्ट्रॉंपैकी शभर नट बसलेले असतात. आपल्या कृतीचे ती समर्थनही करते. केरॉल म्हणते—' अलीकडे लेखक वास्तवप्रकारेच प्रेमाच वर्णन करतात. मग आम्ही आहे तो खराखुरा प्रकार दाखवायला काय हरकत आहे?'

हेरॉल्ड रॉबिन्सनने लिहिलेल्या कादबरीच्या आधारे पॅरामाऊंट पिक्चर्सनी हा चित्रपट तयार केला आहे. चित्रपटात नग्न लोकाच्या एका क्लबचे चित्रीकरण आहे. हंक मून या चित्रपटाचा दिग्दर्शक आहे. नग्नाच्या वसाहतीचे चित्रीकरण चालू असताना फोटोग्राफर गमतीने स्वतःसाठी उगाचच काही फोटो घेत असताना हंक मूनने धावत जाऊन त्याला फोटो घेताना थाबवले होते.

हा चित्रपट बराच गाजेल आणि चित्रपटसृष्टी कुणीकडे वाहत जाणार याचे दर्शनही घडवील.

—महेश

* * *


# पांढरे डाग

पाढऱ्या कोडाचे अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसे व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू. नकली वैद्यापासून सावध राहावे.

**वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद-भवन**

**मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)**

हिंदी चित्रपटांतील तीन नाणी

# दोन खोटी एक चालेच ना !

* बहुरानी
* प्यार किया तो डरना क्या ?
* फूल बने अंगारे

गेल्या महिन्यात तीन हिंदी चित्रपट लागले. यांतला एक बरा, एक आचरट आणि तिसरा खुळचट आहे—

**रिंगमास्टर बहुरानी**

एक तपापूर्वी शांता आपटे याची प्रमुख भूमिका असलेला 'स्वयं-सिद्धा' नावाचा चित्रपट येऊन गेला होता. स्वतःच्या हिमतीवर एका घराण्याचा डोलारा सावरणाऱ्या एका तडफदार सुनेची ती कहाणी होती. 'बहुरानी' हा चित्रपट 'स्वयसिद्धा'चा मद्रासी अवतार ! ही बहुरानी इतकी तडफदार नि तेजस्वी दाखवली आहे की तिच्यामागे राधा–कृष्णाच्या मागे जे तेजोवलय दाखवतात तेवढेच दाखवायचे उरते. ही नुसती बहुरानी नाही बहुरुपीदेखील आहे. सुरवातीलाच एका उधळलेल्या मस्त बैलाला केवळ नजरेच्या इशाऱ्याने ती काबूत आणते. इतकेच नव्हे तर त्याला 'बैठ जाव' म्हणून सर्कशीतल्या वाघ–सिंहाप्रमाणे बसायला लावते.

या रिंगमास्टरिणीचे (पद्मा) लग्न होते एका जमीनदाराच्या अर्धवट मुलाशी. सावत्र आईने लहानपणी अफू पाजून अर्धवट बनलेला रघू त्याचा सावत्र भाऊ विक्रम हा 'पर्फेक्ट' खलनायक ! त्याची आई ही खल–सासू. जमीनदारसाहेबांना काय करावे हे समजत नसते. पद्मा आपल्या पतीला 'ग म भ न' पासून थेट भगवद्गीतेपर्यंत शिकवणी देते. या मधल्या संक्रमण–काळात विक्रमचे खलनायकी प्रकार–दारू, बाई इत्यादि चालूच असतात. जमीनदारसाहेब वारतात– एक कमी ! बहुरानीच्या तडफदारपणाचे रूपान्तर मग त्यागात होते नि ती आपल्या पतिसमवेत पुनश्च आपल्या खेड्यावर जाऊन राहते. इकडे विक्रमने घरादाराचा व्यवस्थित निकाल करण्याची वेळ आणल्यावर सासूबाईंना उपरती होते. त्याही घर सोडून जातात. सारा-वसुलीसाठी बाहेर पडलेला विक्रम आपल्या भावावर बदूक उगारतो नि नंतरचा अतिनाट्यपूर्ण प्रसंग क्षणात विनोदी होतो तो असा– प्रथम पद्मा पतीवर झाडली जाणारी गोळी आपल्या उरावर मार म्हणून पुढे येते. मग पद्मावर झाडली जाणारी गोळी माझ्या छातीवर झाड म्हणून सासूबाई नसलेली छाती पुढे काढतात. मग रघू काय एकतो ! मला ती गोळी मार म्हणून रघू पुढे येतो. ही शर्यत पाहून विक्रमचे डोके फिरते फिरलेलेच असल्यामुळे आता ते सरळ होते. तो सुधारतो नि शेवटी 'तिळगूळ घ्या गोड बोला !'

**भट्टी मद्रासी**

हे सगळे खास मद्रासी भट्टीतून भडक स्वरूपात सादर केले गेलेय्. पद्मा जादुगारीण असावी अशी शका येण्यासारखे प्रसंग अधून मधून येतात. तिच्या कर्तृत्वामध्ये वास्तव तडफदारपणापेक्षा झपाटाच जास्त असतो. विक्रमरूपी खलनायक अरबी पार्श्वभूमीवरच्या कथातील कपटी प्रधानाला किंवा बालवाङ्मयातील परीला कोंडून ठेवणाऱ्या दुष्ट राक्षसालाही मागे सारील इतका ढोबळ वाटतो. स्वभावचित्रणातला नाजुकपणा हा मद्रदेशीयाचा प्रांतच नसावा ! प्रत्येक गोष्ट बटबटीत झाली पाहिजे एवढाच त्यांचा कटाक्ष असतो. मालक, मालकीण, मुनीमजी, घरगडी, घरदाई, बहू ही सगळी अगदी 'स्टॅन्डर्ड' फॉर्मची पात्रे. त्यातली काही अक्षरशः 'पात्रे' च वाटावीत अशी. गरीब सगळे अतिसज्जन व श्रीमंतापैकी एक दुष्ट नि दुसरा सुष्ट असा कायमचा फॉर्म्युला !

पण असे सगळे असले तरी हा चित्रपट इतर मद्रासी चित्रपटांपेक्षा थोडासा का होईना वेगळा आहे हे मात्र जाणवते. म्हणजे कुठेतरी काहीतरी फरक असावा, तेवढा आहे. अगदी ठळक सागायचा झाला तर या चित्रपटात इतर मद्रासी चित्रपटाप्रमाणे एक गभीर नि एक विनोदी अशी दोन कथानके नसून एकच सरळ कथानक आहे. दुसरा मोठा फरक म्हणजे इतर काही अनावश्यक गोष्टी त्यात असल्या तरी ओढूनताणून कोंबलेला निरर्थक विनोद त्यात नाही. विशेष खोलात जायचे झाले तर नायिकेला म्हणजे पद्मालाच केंद्र-बिंदू समजून तिच्याभोवती कथानकाचे धागे गुफण्यात बरचसे यश मिळवले आहे. 'बहुरानी' कितीही भडक असली वा क्वचित् अति-रिक्त वाटली तरी चित्रपटगृहाबाहेर आल्यावर इतर सगळी पात्रे विसरली जातात, पण 'बहुरानी' मात्र लक्षात राहते. याचाच अर्थ 'बहुरानी' चे मार्वाविश्वही लेखक-दिग्दर्शकाना थोडे फार गवसले आहे, असे म्हणायला हरकत नाही.

या वैशिष्टयात लेखक–दिग्दर्शकाच्या समजूतदारपणाबरोबरच माला सिन्हाच्या समजूतदार अभिनयाचाही वाटा आहे. जास्तीत जास्त सहज अभिनय करून दाखवून माला सिन्हाने एक चागला नमुना सादर केला आहे. गुरुदत्त याची साथ चागली आहे.

विक्रमाच्या भूमिकेत फिरोजखान यांनी खलनायक करतो त्या गोष्टी केल्या आहेत. चुकीच्या स्वभावचित्रणाने नि तशाच दिग्दर्शनाने त्यात भर पडली आहे. त्याला बनविणाऱ्या भूमिकेत शामा, साहाय्यक भूमिकात प्रकर्षाने चमकणारी नि सध्या थोडी मागे पडलेली ही नटी! पण आपले वैशिष्ट्य दाखवून जाते. ललिता पवार आणि नझिरहुसेन कधी चागला तर कधी हास्यास्पद असे अभिनयाचे दोन्ही नमुने दाखवतात. त्याचा दोषही बराचसा लेखक–दिग्दर्शकाकडेच जातो. बाकीपैकी रणधीर, आगा, मनोरमा, शिवराज इत्यादीना भूमिकाच इतक्या फालतू आहेत की त्याचा विचार करण्याचे विशेष प्रयोजन वाटत नाही.

## यश ? बलमा अनाडी मन भाये

टी. प्रकाश राव यांचे दिग्दर्शनाचे तंत्र अगदी ठरलेले आहे. जितकं साधं तितकंच सरळ. खोलात न जाणारे पण लांबीरुंदीला मात्र भरपूर. पटकथाही त्यांचीच आहे. तीही तशीच. नुसती लांबी नि रुंदी. असे आहे हे ' फॅमिली मिक्श्चर. ' बरे आहे झाले !

सी. रामचंद्र यांच्या संगीताने सजलेले नवे चित्रपट आजकाल दुर्मिळ झाले आहेत. एकेकाळची त्यांची वेड लावणारी गाणी आठवली म्हणजे ते सी. रामचंद्र ते हेच का असा संभ्रम अलिकडे पडतो. आपले जुने शास्त्रच चालू ठेवावे की नव्याचा अवलंब करावा या द्विधा अवस्थेत ते सांप्रत सापडले असावेत. त्यांची या चित्रपटातली गीते बाहेर ' हिट्ट ' नाही ठरली तरी चित्रपटगृहात समाधानकारक वाटतात. ' बलमा अनाडी मन भाये ' हे गाणे लोकप्रिय झालेच आहे. पार्श्वसंगीताचे महत्त्व त्यांना जाणवते एवढे तरी प्रेक्षकांना जाणवते.

वर्टले यांचे छायाचित्रण नितळ आहे. कलाकुसर फारशी आढळली नाही तरी ते त्रासदायक निश्चित नाही. प्रामाणिक पुनर्दर्शन (Faithful Reproduction) घडविण्यात ते संपूर्ण यशस्वी झाले आहेत. कला, संकलन, ध्वनी इत्यादि बाजू मध्यम आहेत.


## इडली संपली, आता डोसा

' प्यार किया तो डरना क्या ?' हा विनोदी नाव धारण करणारा दुसरा मद्रप्रांतीय चित्रपट. हा चित्रपट काहीसा मयसभेसारखा आहे. पाणी दिसावे तिथे जमीन असावी नि जमिनीच्या ठिकाणी पाणी, असा प्रत्यय प्रेक्षकांना वारंवार येतो.

नायक एक बहकलेला कॉलेज तरुण. गाणी म्हणणे, जुगार खेळणे, सिगरेट ओढणे नि पोरीमागून हिंडणे हे त्याचे उद्योग. या उद्योगातच त्याची गाठ नायिकेशी पडते. पहिल्याच झटक्यात नायिका त्याला ' विद्यार्थ्यांची कर्तव्ये ' या विषयावर एक बौद्धिक देते. नायक सुधारतो म्हणजे गाणीबिणी म्हणतोच पण शिवाय अभ्यास करतो. नायिकेची शिकवणीही ठरते. साखरेत दूध ! आता तो परिक्षेत पडत नाही, प्रेमात पडतो. नायिका बिचारी सेकंड क्लासात येते पण नायक एकदम फर्स्ट क्लास फर्स्ट (जात्याच हुषार असला पाहिजे). नायिकेची गरीबी नेहमीप्रमाणे आड येते. पण तिच्याकरता नायक श्रीमंती सोडून तिच्याशी लग्न करतो. मग नोकरीची मोहिम उघडतो. त्याचवेळी नायिकेवर ' डोळा ' असणारा खलनायक नायिकेने त्याला नाकारल्याचा सूड उगविण्यासाठी त्याला आपल्या हॉटेलमध्ये नोकरी देतो. हॉटेलमध्ये एका नर्तिकेच्या साहाय्याने तो नायक-नायिकेत संशयाचे जाळे पसरवतो. त्याचा परिणाम म्हणून त्यांचे भांडण होते व नायिका आपल्या वडिलांकडे निघून जाते. बाई गेली की दारू—मग नायक पुन्हा दारू पिऊ लागतो नि एक भयानक स्वप्नदृश्य—गाणे म्हणतो. पुढे खलनायकाचे कारस्थान उघड झाल्यावर एक सेन्सेशनल मारामारी होते. इकडे नायकाच्या पिताजींनाही उपरती होऊन तेही ' मुगले आझम 'च्या पावित्र्यात त्या मारामारीत भाग घेण्यासाठी येतात. ही मारामारी होतच नाही. म्हणजे चित्रपट संपतो.

यात भरीला खलनायकाच्या शब्दकोडयांचा षौकीन बाप, नायकाचा नोकर, त्याची प्रेयसी (शब्दकोडेवाल्याची मुलगी) विनोदपूर्तीसाठी आहेत. त्यांचा विनोद विचार न करण्यासारखाच !

' बहुरानी 'मध्ये गुरुदत्त – माला सिन्हा



## फक्त " बी " आहे, कोंब नाहीत

निर्माते—दिग्दर्शक—छायाचित्रकार बी. एस्. रंगा ! एकाच माणसाने सगळा आचरटपणा का करावा कळत नाही. मद्रासी निर्मात्यांप्रमाणे यांना प्रेक्षकांची नाडी निदान माहिती असावी. पण ती त्यांना सापडली नाही ही त्या चित्रपटाची शोकान्तिका. टेकिंग वगैरे बाबतीत तर रूढ प्रथेशिवाय इतर पैलू दिसत नाहीत. ' हाय की ' तंत्राचे छायाचित्रण फक्त एका स्वप्न—दृश्याचा अपवाद वगळून सुव्यवस्थितरित्या त्यांनी केले आहे.

शम्मी कपूर हा आजचा लोकप्रिय हीरो. त्याच्या चाहत्यांची या चित्रपटाने अगदीच निराशा झाली नाही तरी ' वाह ' करावी असे फारसे काही त्यांना आढळेलसे वाटत नाही. चित्रविचित्र वेषांतर करणेसुद्धा परवडेल पण हे ' भावनान्तरा'चे चमत्कार करणे नको असे त्याला स्वतःलासुद्धा वाटले असेल. नायिका आहेत बी. सरोजादेवी ! या अजून ' बी 'च आहेत. अभिनयाचे कोंब काही फुटलेले नाहीत. भावदर्शन कशाशी खातात हे त्यांना समजायला अजून अवकाश असावा. त्या हिंदी बोलतात तेहि तामिळ—तेलगू बोलल्यासारखे. (राजकमल हिंदीचा हा मद्रासी प्रकार म्हणावा हवा तर !) पृथ्वीराज यांनी नायकाच्या पित्याची भूमिका एखाद्या शहेनशहासारखी केली आहे. ते चालू जमान्यातले नसून मुगलकालीन वाटतात. आयुष्यभर केलेल्या रंगभूमीच्या सेवेचा हा कटु परिणाम असावा.

ओम् प्रकाश, आगा, शुभा खोटे हसविण्यासाठी आहेत. हसवतात बिचारे आपल्यापरीने. हसतील ते हसतील !

रवींनी आपल्या चालू भट्टीतून चार गाणी काढून दिली आहेत. इकडून तिकडून गोळा केलेल्या चाली ! पण तरीही ' वल्ला कमाल है ' हे गाणे चांगले आहे म्हणायला हरकत नाही. ' जिंदगी क्या है ' हे गीत ऐकायला कठिणच जाते नि पडद्यावर पाहताना तर भयावह चित्रणामुळे पळून जावेसे वाटते. पार्श्वसंगीत ?—छे छे ! तो रवींचा प्रांतच नव्हे !

मद्रासी चित्रपटांच्या तांत्रिक बाजू बहुधा समाधानकारक म्हणण्याइतपत असतात नि तशा इथेही आहेत.

**डॅम–फूल–चित्रपट**

तिसरा खुळचट चित्रपट "फूल बने अंगारे !" चिनी आक्रमणानंतर समरगीतांचे जे पेव फुटले ते सर्वांच्या परिचयातलेच आहे. पण गादीवर बसून समरगीत लिहिण्यासारखे समर–चित्रपट काढणे हे तितके सरळ नि सोपे नसल्याने तत्सम चित्रपटांचे पीक येणे अशक्यच होते. तरीही या चालू विषयाचा फायदा घेऊन स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही साधायची संधी निर्मात्यांना मोह पाडणारीच होती. त्या मोहाचे पहिले फळ म्हणजे प्रस्तुतचा चित्रपट.

या चित्रपटाचा उपरिनिर्दिष्ट विषयच मुळी धोकेबाज. यशस्वी होण्यापेक्षा गोता खाण्याचाच संभव जास्त.

आणि झालेय् तेच. एका बिनबुडाच्या कथेला भारत–चीन युद्धाचे शेपूट नि फिल्म्स डिव्हिजनकडून घेतलेले 'नेफा'चे स्टॉक शॉट्स् जोडून भलताच ध्येयवादी समरपट तयार केलाय्. नुसता पाहावयाचा तरी अतिप्रसंग वाटतो.

एका मुलीचे (नर्स) एका कॅप्टनवर (सैन्यातल्या) प्रेम बसते. मध्येच त्याला कोरियात जावे लागते. म्हणून लग्न लांबते. पुढे तिचा भाऊ उघळचा निघतो. त्याचे लग्न एका श्रीमंताघरच्या मुलीशी होते, नी काही वेळ मराठी चित्रपटासारखा कौटुंबिक सिनेमा सुरु होतो. नायिकेला घर सोडावे लागते. पुढे तो कॅप्टन परत येतो. लग्नाचा दिवस उजाडतो. त्याच दिवशी त्याला नेफा आघाडीवर जायचा हुकूम येतो. देशासाठी लग्न सोडून तो जातो. तिथे एक पूल उडवतो आणि...? तो मरतो की जिवंत राहतो हे शेवटपर्यंत प्रेक्षकांना कळतच नाही ! नायिकाही सैन्यात सैनिकांच्या शुश्रुषेला नर्स म्हणून दाखल झालेली असते. तिथे तिला आता मुबारून सैन्यात गेलेला आपला भाऊ मृत्युशय्येवर असलेला भेटतो. हा मात्र मरतो, नक्की मरतो ! चित्रपट संपतो.

दिग्दर्शक सूरज प्रकाश हे भलत्याच फंदात का पडले राम जाणे ! या चित्रपटाला समरपट म्हणावे तर तो आचरट वाटतो, आणि साधा 'घरेलु' म्हणावे तर डल्ल वाटतो. बिनडोककथानक–! जाऊ द्या झालं.

फार खोलात जाण्यात अर्थ नाही. माला सिन्हा, राजकुमार यांची कामे ठीक आहेत. बाकी सर्व यथातथाच.

तेव्हा लक्षात ठेवा, एखाद्या दोस्ताबरोबर हिंदी सिनेमा पाहावाच लागला तर 'बहुरानी' बघा. नाहीतर खुशाल घरी झोपा !

–ब्रह्मा

* * *

**अनंत चित्र**

# काय हो चमत्कार !

## अहो, चित्रपट बरा निघाला आहे !

**पूर्वी एक धनाजी म्हणुनि कुळंबी वसे अशा गावी**
**गावी कीर्ति तयाची गावकऱ्यांनी दुज्यांस सांगावी**
**नमुनेदार धनाजी धनीण त्याची बघोनि राजाऊ**
**ज्याला त्याला वाटे क्षणभरि त्यांच्याकडे चला जाऊ!**

–चंद्रशेखर



जयश्री गडकर यांनी अभिनयाचा उच्चांक गाठला आहे.

**सुप्रसिद्ध** कवी कै. चंद्रशेखर यांनी ज्या नमुनेदार धनाजीच्या कुटुंबाची गोष्ट आपल्या खंडकाव्याचा विषय केली आहे आणि ज्याचे वर्णन करताना––'ज्याला त्याला वाटे क्षणभरि त्यांच्याकडे चला जाऊ'–असे खुद्द कवीनेच वर्णन केले आहे, त्यांच्या वाटेला आज ना उद्या सिनेमावाले जाणार असा आमचा तर्क होताच. तसा हा चित्रपट मूळ खंडकाव्याशी इमान राखून काढलेला आहे एवढीच जमेची बाजू ! परंतु तो काढला आहे या पद्धतीनेच काढायला कुणीही दिग्दर्शक चालला असता. मृत माणसाची इच्छा–त्याचा आत्मा पुरी करून घेतो ही कल्पना मराठी प्रेक्षकांना आता नवीन नाही. कारण दत्ता धर्माधिकाऱ्यांनी "बाळा जो जो रे" या चित्रपटात ती उत्कटपणे हाताळून आधीच शिळी केलेली होती. केवळ याच कल्पनेच्या विस्ताराला मार्क द्यावयाचे तर दत्ता धर्मा-

धिकाऱ्यांनी ही कल्पना मान्यांपेक्षा अधिक उत्तम रीतीने चित्रित केली होती असे म्हणावे लागेल.

**कथानक**

एका खेड्यातील पाटलाची मुलगी जिवू (जयश्री गडकर) व त्यांच्याच घरात वाढलेला व लहानाचा मोठा झालेला शेतावरचा गडी शिवा (अरुण सरनाईक) यांच्या प्रेमावर ही कथा आधारलेली आहे. शिवाचे आई-वडील लहानपणीच मरतात. शिवाला पाटलाची बायको (हंसा वाडकर) आपल्या घरी ठेवून घेते. पाटलाची मुलगी जिवू व शिवा लहानपणापासून एकत्र वाढतात. शिवा पाटलांचे शेत राखतो. पाटलाची बायको त्याला मुलाप्रमाणे वागवते. पाटलांची विधवा बहिण (इंदिरा चिटणीस) त्याच गावात असते. तिचा मुलगा बापूसाहेब (रमेश देव) शिवाच्याच वयाचा असतो. लहानपणीच पाटलाने (साळवी) आपली मुलगी जिवू बहिणीच्या मुलाला-बापुसाहेबांना-द्यायचे वचन बहिणीला दिलेले असते. वयात आल्यावर जिवू व शिवा एकमेकांच्या प्रेमात पडतात आणि लग्नाच्या आणाभाका घेतात. बापूसाहेब जमत नाही म्हणून शिक्षण सोडून शेतीची व्यवस्था बघण्यासाठी कायमचा गावाला परत येतो. जिवू व शिवा यांच्या प्रेमात तो सांकेतिक पद्धतीने बिब्बा घालतो. पाटील संतापतो. तो शिवाच्या अंगावर भाला फेकतो. त्याला चाबकाने फोडून काढतो आणि मुलीला घेऊन घरी येतो. चुलीत पेटत असलेल्या लाकडाने तिने हातावर गोंदून घेतलेल्या "शिवा" या नावावर डाग देतो. जिवूची आई शिवाला भेटून त्याच्याकडून ती मुलीला या जन्मात न भेटण्याचे वचन मागते. पाटलाच्या घरच्या अन्नावर वाढलेला शिवा जिवूच्या आईला वचन देतो. जिवूला मामाच्या घरी पाठवतात. शिवा–जिवूची कायमची ताटातूट होते.

पाटलाचे नियोजित जावई बापुसाहेब गावातल्या सैली नावाच्या कोल्हाटणीबरोबर (जीवनकला) सूत जमवतात–लग्नाशिवाय बाकी सगळे! आपल्यावर आलेले संकट टाळण्यासाठी बापुसाहेब शिवाच्या अंगावर किटाळ आणतात––सैलीकरवी. जिवूच्या विरहाने हैराण झालेला शिवा भडकतो. तो कुऱ्हाड परजून बापूसाहेबांच्या वाड्यावर येतो. बापूसाहेब गोळी घालून त्याचा खून करतात. आपण केलेले पाप दडवण्यासाठी बापुसाहेब पाटलाची भीक मागतात. दोघे मिळून रात्री रानात जाऊन शिवाचे प्रेत खड्डयात पुरून टाकतात.

मेलेला शिवा जिवूला भेटण्याची इच्छा अतृप्त राहिल्यामुळे रात्री पाटलाची बैलगाडी घेऊन जिवूच्या मामाच्या घरी घेऊन येतो व तिला बैलगाडीत बसवून पाटलाच्या घरी घेऊन येतो. येताना त्याचे डोके फार दुखते. त्याच्या डोक्याला बांधायला जिवू आपली चोळी देते. शिवा जिवूला पाटलाच्या घरी आणून सोडतो व गाडी सोडायला म्हणून जातो तो अदृश्य होतो!

रात्री अपरात्री मुलगी परत आलेली पाहून पाटलाला आश्चर्य वाटते. जिवूने सांगितलेली हकीकत ऐकून तो थक्कच होतो. खरेखोटेपणा पडताळण्यासाठी तो रानात जाऊन शिवाला ज्या खड्डयात पुरले होते तो उकरून पाहतो, तों खरोखरच त्याच्या डोक्याला जिवूची चोळी बांधलेली असते! हाच तो चमत्कार! शिवाचा खून झाल्याचे ऐकून जिवू हंबरडा फोडत पाटलाच्या मागोमाग येते. शिवाचे प्रेत पाहून ती प्राण सोडते. अखेर जिवा–शिवाची भेट होते.

**दिग्दर्शन**

चित्रपटातील प्रणयप्रसंग दिग्दर्शक अनंत माने यांनी अत्यंत धीटपणाने हाताळले आहेत याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे. नायक–नायिका प्रेमात पडली की बागेत किंवा बागेतल्या एखाद्या वाकड्या पुलावरून एकमेकामागून धावत धावत जाण्याचे प्रसंग त्यांनी कटाक्षाने टाळले आहेत. लहानग्या जिवूचे काम करणाऱ्या कु. शैलजा हिजकडून त्यांनी समजूतदारपणे काम करून घेतले आहे. मूळ कथानक सरळसोटपणे त्यांनी मांडले आहे.

हे सर्व ठीक झाले. परंतु त्यांनी मराठी रांगड्या प्रेमाला जी लैला–मजनूं धाप-उसाशांची आणि रडारडीची डूब दिली आहे हा मराठी चित्रपटसृष्टीचा धडधडीत अपमान आहे. पुरुष माणूस––पोरीकरता ढसढसा रडावा ही काही प्रेम व्यक्त करणारी रांगडी तऱ्हा नव्हे. न रडताही––उसासे न सोडताही––प्रेमाची उत्कटता काय व्यक्त करता येत नाही? तसेच ते बासरी प्रकरण! या



बिचाऱ्याला काहीच बातमी न मिळाल्यामुळे
खोटी बातमी देण्याऐवजी खरी बातमी तो तयार करीत आहे.

शिवाचा पावा म्हणजे कृष्णाच्या मुरलीवर ताण आहे !

सिनेमारूप देताना कधीच या असल्या अवास्तव कल्पना चित्रित केल्याच पाहिजेत असे नाही. तारतम्याने काय ते करायला नको का ?

जयश्री गडकर, साळवी, इंदिरा चिटणीस, यांना दिग्दर्शक लागत नाहीच ! रमेश देव आता दिग्दर्शकापासून काही शिकण्यापलीकडे गेले आहेत. उरलेल्या सर्वांना दिग्दर्शन चांगले केलेले आहे.

**अभिनय**

जयश्री गडकर यांनी अभिनयाचा उच्चांक गाठला आहे. त्यांचा अभिनय साऱ्याच प्रणयप्रसंगांत बहार आणतो. अरुण सरनाईक यांचा अभिनय बरा आहे. ' मजनू–छाप ' प्रेमविव्हलता मात्र त्यांना जमत नाही. आणि ते फक्त रुसल्यासारखे वाटतात. अभिनय शून्य ! रमेश देव यांना खलनायकाची भूमिका ! काय लिहायचे ? सारखी कांडी चावण्याचा त्यांचा चाळा खुळचट वाटतो. ' प्राण ' ह्या हिंदी चित्रपटातील कसलेल्या खलनायकाची नक्कल करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यांना तो जमलेला नाही.

कोल्हाटणीचे काम करताना जीवनकलेने बराच धुमाकूळ घातला आहे. अशा भूमिकेची जी समज उषा किरण यांनी ' वासुदेव बळवंत ' मध्ये दाखवली आहे ती यात औषधाला नाही. **संगीत**–वसंत पवार यांनी चालू चाली दिल्या आहेत, पण संगीत योग्य ठिकाणी घातले आहे. शिवाचे पावावादन मात्र अपवाद.

ध्वनिचित्रण अत्यंत सदोष आहे. पार्श्वगीते पुढे आणि हलणारे ओठ मागे असा सगळा प्रकार आहे. आरशात नऊवारी पातळ नेसलेली स्त्री एकदम दक्षिणप्रांतीय दिसते असे असूनही जयश्री गडकर यांचे गाणे चालू असताना आरशातील प्रतिबिंबेच सारखी का टिपण्यात आली आहेत हे, तो फोटोग्राफरच जाणे !

बाह्य चित्रण मात्र चांगले झाले आहे. परंतु तीन तासांचा रतीब घालण्यासाठी जी फिल्मांची नासाडी चालू आहे त्या विरुद्ध प्रेक्षकांनी आवाज उठवला पाहिजे. सकाळ झाली हे दाखवायचे, –दाखवा हजार सकाळचे उद्योग ! एखादा माणूस फक्त प्रातर्विधीसाठी गेलेला आहे, एवढे दाखवीत नाहीत नशीब! जाऊद्या झाले. आम्ही पुन्हा गुणाकडे वळावे हे उत्तम–

हा चित्रपट तरीही बरा वाटतो याला कारण जिवूची व्यक्तिरेखा उत्तम रीतीने जयश्री गडकर यानी साकार केली आहे. तिची अभिनयाची समज अत्यंत मोठी आहे. शिवाय अनंत माने यांनी चित्रपटकथेसाठी चांगल्या कादंबऱ्या, खंडकाव्ये निवडण्यात कटाक्ष ठेवल्यामुळे चांगल्या कथेवरचा अयशस्वी चित्रपटही सपशेल पडत नाहीच ! म्हणूनच तर आम्ही म्हणतो—' काय हो चमत्कार! ' हा चित्रपट बरा निघाला !

–विष्णु

• • •


## ६ चांगली पुस्तके

जी सहा वर्षे मिळत नव्हती

लालमहाल प्रतापगड

पन्हाळगड राजगड

पुरंदर आग्रा

लेखक

**ब. मो. तथा बाबासाहेब पुरंदरे**

मूल्य : प्रत्येकी दोन रुपये केवळ

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

# आणि मॅक्मिलनचे तख्त कोसळले!

[पृष्ठ ४९ वरून पुढे चालू]

कोर्टात सांगितले ते निखालस खोटे आहे. याच मुलीमुळे मला नको तो रोग जडला—! "

गॉर्डन खटल्यात सुटू शकला नाही. कारण यापूर्वी चार पाच वेळा त्याला अशाच गुन्ह्यावरून शिक्षा झालेल्या होत्या. पण एक महत्त्वाची गोष्ट—ज्याचा संशय स्कॉटलंड यार्डला होता—ती या खटल्यात पुढे आली.

ख्रिस्तिन किलर व राईस डेव्हिस याच्यामार्फत नव्या नव्या मुली वॉर्ड वेश्याव्यवसायात आणीत असे. या मुलींच्या अनैतिक व्यवसायातून मिळालेल्या उत्पन्नात त्याचा वाटा असावा !

स्कॉटलंड यार्डने वॉर्डला अटक करण्याचे ठरवले.

इन्स्पेक्टर हर्बर्ट यानी डॉ. वॉर्डला हर्टफोर्डशायरजवळ एका बंगल्यात अटक केली. तो आठवड्याअखेरची सुटी घालवण्याकरता तिथे गेला होता. सायंकाळी त्याला मॅरिलबोन लेन पोलीस स्टेशनवर आणण्यात आले. व त्याच्यावरील आरोप त्याला वाचून दाखवण्यात आले.

" एक जानेवारी १९६१ ते ८ जून १९६३ या काळात ' १७ विंपोल म्यूज ' लंडन या ठिकाणी या माणसाने वेश्याव्यवसायातील तेथील उत्पन्नात जाणूनबुजून भागीदारी ठेवली. ही गोष्ट सेक्शुअल ऑफेन्सेस ॲक्ट, १९५६ च्या तिसाव्या कलमाखाली फौजदारी गुन्हा ठरते. "

वॉर्डला स्कॉटलंड यार्डने पोलिस कस्टडीत अडकवला तेव्हा मॅकमिलन व डोरोथी मॅकमिलन ही लंडनमध्ये नव्हती. ग्लेनिगल्स येथील एका हॉटेलात त्यांची विश्रांती चालू होती.

आता वृत्तपत्रातून त्यांच्यावर जबर टीकास्त्रे सुटली. ' संडे टेलिग्राफ ' हे पत्र उजव्यातले उजवे. परंतु त्यानेही अग्रलेख लिहून मॅकमिलनवर टीका केली. ' न्यूज् ऑफ दि वर्ल्ड ' या पत्राने तर ' किलरचे सत्यकथन ' या मथळ्याखाली तिच्या आणि प्रोफ्युमोच्या संबंधाचे साग्रसंगीत वर्णन सुरू केले होते. ' संडे मिरर ' पत्राने (म्हणजे पूर्वीचे ' संडे पिक्टोरिअल ') प्रोफ्युमोने किलरला लिहिलेले पत्र आता प्रसिद्ध केले. ' न्यूज ऑफ दि वर्ल्ड ' या पत्राने तिच्या कहाणीबद्दल २३००० पौंड म्हणजे जवळ जवळ ३,४५००० रुपये दिले. किलरचे संपूर्ण नग्न छायाचित्र त्या पत्रात आता प्रसिद्ध झाले !

किलरने आपल्या कहाणीत क्लिव्हडेनमेट, बिल ॲस्टरची दोस्ती, इव्हॅनोव्हचे सौंदर्य अशा प्रमुख प्रमुख चटकदार गोष्टी सांगितल्या असल्यामुळे २,५०,००० एवढ्या जादा प्रती ' न्यूज ऑफ दि वर्ल्ड 'ने विकल्या !

### मंत्र्यांच्या धावपळी

९ जूनला मॅकमिलन लंडनला एकटेच परतले. डोरोथी मॅकमिलन मागेच राहिल्या. लंडनमध्ये आल्याबरोबर त्यांनी घोषणा केली की ' लॉर्ड हॅलशॅम याना अण्वस्त्रबंदी कराराबाबत बोलणी करण्याकरता मॉस्कोला पाठविण्यात येत आहे. ' ही घोषणा करण्यात त्यांचा हेतू लोकांचे लक्ष दुसऱ्या महत्त्वाच्या बाबीकडे वेधणे हाच होता.

परंतु लोकांचे लक्ष असे आपल्या तंत्राने राज्यकर्त्याला वळवता येत नाही. मॅकमिलननी अधिकारावर राहावे की नाही याचीच मूलभूत चर्चा सर्वत्र सुरू झाली होती.

पार्लमेंट चालू नव्हते. अजून सर्व मंत्री लंडनमध्ये परतलेले नव्हते. हॅरॉल्ड विल्सन रशियात दौऱ्यावर गेले होते.

बुधवारी १२ जूनला मंत्रिमंडळाची बैठक मॅकमिलन यानी बोलावली. परंतु तत्पूर्वी मंत्रिमंडळातील बड्यांची एक खाजगी बैठक मॅकमिलन यांच्या निवासस्थानी झाली. या बैठकीला बटलर, लॉर्ड होम, लॉर्ड हॅलशॅम, लॉर्ड डिलहोर्न, ॲटर्नी जनरल सर जॉन हॉब्सन अशी निवडक मंडळी होती. या सर्वांचा स्वतःला पाठिंबा मॅकमिलन यानी निश्चित करून घेतला.

मग राणीची आठवड्याची भेट घेण्याकरता पंतप्रधान गेले. ही भेट जरा जास्त वेळ चालली. कारण डॉ. वॉर्डने राजघराण्यातील व्यक्तींची रेखाटणे केलेली होती. व ही गोष्ट वॉर्डवरील खटल्यात गाजणारी होती.

१२ जूनला ठरलेली मंत्रिमंडळाची सभा ठरल्याप्रमाणे १०-३० ऐवजी १० लाच सुरू करण्यात आली. कारण दुपारी भारताचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् याना घेऊन येणारी गाडी व्हिक्टोरिया स्टेशनवर येणार होती. स्वागत करण्यासाठी मॅकमिलनसाहेबांना जायचे होते.

या बैठकीसंबंधी वृत्तपत्रातून आलेले नुसते मथळे पाहिले तर या बैठकीचे महत्त्व ध्यानात येईल. ' पंतप्रधानांना भरघोस पाठिंबा, ' ' वादळापूर्वीची शांतता—मॅकमिलन सरकार गडगडणार—' ' चार मंत्र्यांचा राजीनामा ' असे असंख्य तर्कवितर्क सुरू झाले होते. या सर्वांमधील एक जो सूर सर्व वृत्तपत्रांच्या रकान्यातून होता तो म्हणजे निवडणुकीपूर्वी मॅकमिलन याना पंतप्रधानकीवरून खाली ओढले पाहिजे, नाहीतर हुजूर पक्षाला पुढच्या निवडणुकीत यशाची आशा नाही. मॅकमिलन लवकर जातील तेवढे हुजुर पक्षाच्या हिताचे आहे— नेता बदला हाच साऱ्यांचा आग्रह होता. हॅरॉल्ड विल्सन हे आपला मोर्चा बांधताना हाच विचार करीत होते, की बदनाम झालेले मॅकमिलन अधिकारावर राहू देणे मजूर पक्षास फायद्याचे, की ताबडतोब त्यांचा राजीनामा मागणे अधिक धोरणीपणाचे ? "It was decided to cut Mr Macmillan about the face a bit but to avoid execution. "

(असे ठरले की नाक कापलेल्या अवस्थेत मॅकमिलन याना अधिकारावरच लोंबकळत ठेवावे. त्याना लगेच राजीनाम्याच्या फासात अडकवणे इष्ट नाही.)

: ९ :

१७ जूनला पार्लमेंटची बैठक भरण्यापूर्वी काही तास मॅकमिलन यानी आपल्या स्नेह्याजवळ उद्‌गार काढले—" माझ्या स्वत्वाला तडा गेलेला नाही. परंतु माझ्या मनाची उभारी ढासळली आहे. " (My spirit is not broken but my zest has gone ) पंतप्रधानांनी केलेल्या स्वतःच्या मनःस्थितीचे वर्णन अगदी यथार्थ होते. कारण खरोखरच प्रोफ्युमोने जे प्रताप गाजवले त्याला काही पंतप्रधानाचा आशीर्वाद नव्हता.

परंतु लोकशाही जितकी सहृदय आहे, तितकीच ती निष्ठुर आहे. पंतप्रधान म्हणून प्रोफ्युमोचे उत्तरदायित्व त्याच्यावरच होते.

जेव्हा मॅकमिलन पार्लमेंट सभागृहाकडे निघाले, तोपर्यंत सभागृहाच्या गच्च्या प्रेक्षकांनी तुडुंब भरल्या होत्या. त्यांत रंगीबेरंगी वस्त्रे परिधान केलेल्या स्त्रियांची संख्या अधिक होती. 'सहज कशी खेळविते ललना!' हा ललनाजातीचा पराक्रम त्याना ज्ञात होता. त्याचा जाहीर प्रयोग पाहण्यासाठी त्या मोठ्या हौसेने जमल्या होत्या.

दुपारी तीन वाजून २६ मिनिटांनी मॅकमिलन आपल्या स्थानावर येऊन बसले. त्यांचा चेहरा फटक दिसत होता. काळजीमुळे तोंडावर निरुत्साह होता. दोन मिनिटांनी हॅरॉल्ड विल्सन आले. त्यांच्या हातात हुजुर पक्षावर ठासण्यासाठी आणलेल्या दारूगोळ्याची फाईल होती.

## विल्सनचा हल्ला

तीन वाजून तेहतीस मिनिटांनी विल्सन बोलण्यासाठी उठले. सर्व सभागृहावर त्यांनी नजर फिरवली. आणि आत्मविश्वासाने बोलण्यास सुरुवात केली–

" This is a debate without precedent in the annals of this House "– या सभागृहात आज सुरू होणारी चर्चा ही अभूतपूर्व आहे. देशाच्या नैतिक अधिष्ठानाला ज्यामुळे धक्के मिळाले अशा काही घटना प्रकाशात आल्या हे आजच्या चर्चेचे मूळ आहे. " This is clear evidence of a sordid underworld network, the extent of which we cannot debate today because of proceedings elsewhere "—(एका भयानक अशा भूमिगत विश्वातील जाळ्याचा शोध लागला आहे. परंतु या जाळ्याचे स्वरूप कसे व केवढे आहे याची चर्चा या सबंधी अन्यत्र कोर्ट दरबार चालू असल्यामुळे आज आपल्याला करता येणार नाही–")

अशी सुरुवात करून विल्सन यानी आपल्या कानावर वॉर्ड-प्रोफ्युसबंधी कसकशी माहिती आली, आपल्या पतप्रधानाना सावध करण्याचा आपण कसा प्रयत्न केला, परंतु पंतप्रधानांनी त्या प्रयत्नाची कशी दखल घेतली हा साद्यंत वृत्तात सभागृहापुढे ठेवला. भाषणाच्या अखेरीस त्यांनी पाच प्रश्न पंतप्रधानाना विचारले. विल्सन म्हणाले–

" मी आता मला या प्रकरणाबाबत जी माहिती आहे त्याच्या अनुषगाने काही प्रश्न पंतप्रधानांना विचारतो. वस्तुतः या प्रश्नांची उत्तरे मला काहीशी ठाऊक आहेत; कारण लॉर्ड चॅन्सेलर याचा अहवाल मी विरोधी पक्षाचा नेता या नात्याने वाचलेला आहे. परंतु या अहवालापैकी कोणता भाग सभागृहात सागावयाचा आहे व कोणता नाही यासबधी पंतप्रधानाचा निर्णय मला ठाऊक नाही... तेव्हा या प्रश्नांची उत्तरे मी त्याच्याकडूनच अपेक्षितो. माझे प्रश्न मुख्यतः पाच आहेत–

(१) जेव्हा इव्हॅनोव्हच्या हालचाली आक्षेपार्ह आहेत असे सरकारला कळले तेव्हा लगेच त्याला देशातून निघून जाण्यास का सांगण्यात आले नाही ?

(२) नेमक्या कुठल्या तारखेपासून डॉ. वॉर्ड याच्यावर सुरक्षा–दलाने नजर ठेवण्यास सुरुवात केली ?

(३) पतप्रधानाच्या कानावर याबाबत उठलेल्या अफवा कधी येऊन पोचल्या ?

(४) या अफवांची माहिती त्याना कोणी दिली ?

आणि शेवटचा प्रश्न–

(५) प्रोफ्युमोचे किलरशी नेमके काय सबध होते या संबंधी सुरक्षादलामार्फत पंतप्रधानानी कधी चौकशी केली होती काय ?

शेवटच्या प्रश्नाची फोड करताना विल्सन यांनी जोरदार हल्ला केला. ते म्हणाले,

" एकतर सुरक्षादलाने प्रोफ्युमो–किलरसंबधाची खरी माहिती पतप्रधानाना दिली असली पाहिजे. असे असेल तर सभागृहाला जे खोटे निवेदन प्रोफ्युमो यानी केले त्यात पतप्रधान भागीदार ठरतात. जर सुरक्षादलाला या संबंधाचा पत्ता लागला नसेल तर तो का लागू शकला नाही ? मग वर्षाला साठ लाख पौंड खर्च करून हा सुरक्षा-यंत्रणेचा पाढरा हत्ती कशाला पोसला आहे ? 'न्यूज ऑफ दि वर्ल्ड' या पत्राचे हेरखाते सरकारी यंत्रणेपेक्षा अधिक कार्यक्षम आहे असे दिसते; नाहीतर जी वित्तंबातमी या पत्राच्या वार्ताहरांनी मिळवली ती सुरक्षादलाला का मिळवता आली नाही–? "

ज्या वृत्तपत्रानी किलरची उपद्रवी वृत्ती बारेमाप पैसा देऊन वाढीस लावली त्यावर विल्सन यानी कोरडे ओढले. ते पुढे म्हणाले–

" There is something utterly nauseating about a system of society which pays a harlot twentyfive times as much as it pays to its Prime Minister, 250 times as much as it pays to its Member of Parliament and 500 times as much as it pays to some of its ministers of religion–"

**( या समाजरचनेतच दुर्गंधी सुटावी अशी घाण साठली आहे. ही काय लायकीची धारणा म्हणावी, की ज्यात आपल्या पंतप्रधानांना जो पगार मिळतो त्याच्या पंचवीसपट, पार्लमेंटच्या सभासदांना तनखा मिळतो त्याच्या अडीचशेपट, आणि धर्माची आन्हिके सभाळणाऱ्या धर्मगुरुंना मिळतो त्याच्या पाचशेपट पैसा, एका देहविक्रय करणाऱ्या वेश्येला दिला जातो ! ")**

भाषणाच्या अखेरीस पार्लमेंटची जबाबदारी विषद करताना ते म्हणाले–

" आपल्या समाजाचा जो थोडासा भाग नासलेला आहे त्याचा परिणाम, भविष्याचे आव्हान स्वीकारणाऱ्या आपल्या समाजपुरुषाच्या दाडग्या शक्तीवर होऊ देता कामा नये. परतु यासाठी लागणारी चालना व नेतृत्व या सभागृहातून पुढे आले पाहिजे. "

विल्सन याचे भाषण हे संयमी वक्तृत्वाचा एक पाठच होते. त्याचे भाषण चालू असताना मॅकमिलन मधूनमधून रुमालाने तोंड पुसून काढीत होते. त्याच्या हे ध्यानात आले होते की विल्सन याच्या सयमी परंतु सडेतोड वक्तृत्वाचा परिणाम सभागृहावर झालेला आहे.

## मॅकमिलनची सपशेल माघार

ठीक ४–२५ ला मॅकमिलन बोलायला उठले. त्याच्या पापण्या नेहमीपेक्षा जडावलेल्या होत्या. आणि कोटाच्या खिशात नेहमी ताठरपणे उभा असणारा रुमाल आज त्यानी मुठीत चुरगळत ठेवलेला होता. सुरुवातीलाच पंतप्रधानानी कबुली दिली—

" On me, as head of Administration, what has happened has inflicted a deep, bitter and lasting

wound ..... "

"I find it difficult to tell the House what a blow it had been for me, for it seems to have undermined one of the very foundations upon which political life must be conducted...... "

राज्ययंत्रणेचा नेता म्हणून, जे घडले त्याने माझ्यावर फार मोठा कटू प्रहार होऊन, खोल व कधीही न भरून येणारी जखम झाली आहे.

"या प्रहाराची तीव्रता सभागृहाला निवेदन करून सांगणे माझ्या शक्तीबाहेरचे आहे. कारण या घटनेने, ज्या भक्कम पायावर विसबून देशातील राजकीय जीवनाचा सारा व्यवहार व्हावयाचा तो पायाच उखडला गेला आहे—"

अशी सुरुवात करून मॅकमिलन यानी लगेच सभागृहाला सांगितले—

"मला वाटते मी मला लाज वाटावी असे काहीही केलेले नाही; मी न्यायानेच वागलो आहे. जेव्हा माझी बाजू मी सभागृहापुढे पूर्णपणे निवेदन करीन तेव्हा या सभागृहाची खात्री पटेल की मी योग्य ती काळजी घेतली होती व माझे वर्तनही शहाणपणाचे होते..."

मॅकमिलनचे सर्व म्हणणे ऐकून घेतले गेले. त्यात पंतप्रधानांनी हाच मुद्दा सांगितला की सुरक्षा अधिकाऱ्यानी सपूर्ण माहिती त्यांना दिलेली नव्हती. जसजशी माहिती मिळाली तसतसे उपाय त्यानी योजिले. स्वतः प्रोफ्युमोला त्यानी का खडसावले नाही या प्रश्नाचे उत्तर देताना मॅकमिलन म्हणाले—

"एकतर प्रोफ्युमो यानी माझ्याशी मोकळेपणाने सर्व गोष्टी सांगितल्या नसत्या असे मला वाटले. कारण मी त्याचा राजकीय वरिष्ठ होतो. दुसरी गोष्ट, अशा तऱ्हेच्या चौकशीला जे मर्मभेदक प्रश्न विचारावे लागतात ते विचारल्यानंतर मला त्याच्याशी वागणे बोलणेच कठीण झाले असते."

डार्लिंग या सबोधनाबद्दल प्रोफ्युमोने जे कारण सहकाऱ्याना सांगितले त्याचा उल्लेख मॅकमिलन यानी करताच सभागृहात हशा पिकला व वातावरण थोडे सैल झाले. मॅकमिलन म्हणाले—

"कदाचित् यासवधी प्रोफ्युमोने सांगितले ते खरे असावे, मला मात्र यात मत नाही, कारण मला अलीकडच्या तरुणात सतत मिसळण्याची संधी आता मिळत नाही—"

प्रोफ्युमो प्रकरणी विल्सन यानी जी पत्रे लिहिली त्याची आपण वेळोवेळी कशी दखल घेतली याबद्दल त्याची बाजू सांगितल्यावर पतप्रधानानी शेवटी पुनः क्षमायाचनेचा सूर लावला. ते म्हणाले—

"माझ्या सहकाऱ्याची फसवणूक करण्यात आलेली आहे, माझी फसवणूक—ठार फसवणूक झाली आहे, या सभागृहाची फसवणूक झालेली आहे. परंतु या फसवणुकीच्या व्यवहारात आम्ही भागीदार नव्हतो. असे असल्यामुळे देशाची व या सभागृहाची सहानुभूती आणि विश्वास मिळण्यास मी पात्र आहे असे मला वाटते."

मॅकमिलन खाली बसले. उपचार म्हणून हुजुरानी टाळ्या वाजवल्या.

मग झालेल्या चर्चेत अनेक हुजुर व मजूर सभासदानी भाग घेतला.

यानंतर मॅकमिलन सरकारवरील अविश्वासाचा ठराव मतास टाकला गेला. हुजुर पक्षाला ९७ जागाचे बहुमत असताना या ठरावाला विरुद्ध बहुमत फक्त ६७ मताचे मिळाले, म्हणजे हुजुर पक्षातीलच २७ जणानी मते दिली नाहीत. ही मते विरोधी पक्षातच धरावयास हवीत. ती धरली तर फक्त १२-१३ मतानी हा ठराव फेटाळला गेला असे म्हणता येईल. मांडे फुटले नव्हते तरी चिरा गेल्या होत्या. मुकुट पडला नसला तरी ढळला होता.

: १० :

इव्हॅनोव्ह इंग्लंडमधून निसटला व रशियात गेला. रशियात तो गेल्यावर त्याला 'वेडा' म्हणून सैबेरियात रवाना करण्यात आल्याचे रशियन सरकारने जाहीर केले.

ओल्ड बेली कोर्टात २२ जुलैला स्टीफन वॉर्डवरील खटला सुरू झाला. या खटल्याच्या सनसनाटी हकीगती वृत्तपत्रांतून आलेल्या आहेत. राईस-डेव्हिस व ख्रिस्तिन किलर याना या खटल्याने तर जागतिक प्रसिद्धी दिली आहे. मिस् बॅरेट या वेश्येने वर्णन केलेला वॉर्डच्या निवासस्थानी घडलेला पुरुषांना फटके मारण्याचा प्रकार, आणि त्याचा पधरा रुपये फटका हा दर, मिस् रिकार्डो या वेश्येने आपण वॉर्डला पैसे दिल्याची सांगितलेली हकीगत, राईस-डेव्हिस या मुलीने आपण वॉर्डच्या निवासस्थानी ज्या पुरुषांशी संबंध ठेवला त्याची पुरवलेली यादी, ख्रिस्तिन किलर हिने आपण वेश्या नसल्याचा धरलेला आग्रह या गोष्टी या खटल्यात लोकापुढे आलेल्या आहेत.

जस्टिस मार्शल हे खटला ऐकत असताना आरोपी वॉर्ड हा शांतपणे तिथे येणाऱ्या साक्षीदारांची रेखाचित्रे काढीत होता! फक्त मिस् बॅरेट या वेश्येने जेव्हा या फटक्यांची हकीगत सांगितली तेव्हा वॉर्डचा तोल सुटला व त्याने कोर्टाला ओरडून सांगितले—

"—ही खोटे बोलत आहे. ही का खोटे बोलते याचे कारण शोधून काढले पाहिजे—!"

मिस् रिकार्डो या वेश्येने आपण पोलिसजबानीत जे वॉर्डला पैसे दिल्याचे सांगितले ते पोलिसांच्या छळाला भिऊन, असे कोर्टात सांगितले.

मिस् रिकार्डोनेच परस्परविरोधी विधाने केल्यामुळे तिची साक्ष वॉर्डला दोषी ठरविण्यास फारशी उपयोगाची नव्हती. बाकी कुणी वॉर्डला पैसे दिल्याचे सांगितले नव्हते. वॉर्डच्या म्हणण्याप्रमाणे मिस् बॅरेट ही खोटेच बोलत होती.

नेहमीच्या ब्रिटिश कायदेशास्त्राप्रमाणे जोपर्यंत आरोपीवर गुन्हा सिद्ध होत नाही तोपर्यंत तो निर्दोषी ठरतो व गुन्हा सिद्ध करण्याची जबाबदारी ही फिर्यादी पक्षावर असते.

### न्यायमूर्तींची निराळी भूमिका

परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की जस्टिस मार्शल यानी या खटल्यात निराळी भूमिका घेतली. 'सेक्शुअल ऑफेन्सेस अ‍ॅक्ट १९५६, याचे ३० वे कलम विशद करताना म्हणाले—

"जर एखादा माणूस हा सतत वेश्यांशी संबंध राखून आहे असे सिद्ध झाले तर तो ती गोष्ट त्यांच्यापासून आर्थिक लाभ होतो म्हणून करीत असला पाहिजे. अशा परिस्थितीत आरोपीला आर्थिक लाभ नव्हता हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीचीच ठरते!"

आपण ही अशी खास भूमिका का घेत आहोत हे सांगताना जस्टिस मार्शल म्हणाले—

"वेश्या ही आपला धंदा अनेकांच्या मदतीने चालवते, ही गोष्ट

तर उघडच आहे. तिला या धंद्यात आणणारा माणूस, तिला गिऱ्हाईके मिळवून देणारा माणूस, तिला धद्यासाठी जागा देणारा मालक ही सर्वच तिची मदतगार असतात व तिच्या धद्यात भागीदार असतात. यापैकी कुणी आपण होऊन वेश्यांकडून पैसे घेतल्याचे कबूल करणे शक्य नाही. मग हा गुन्हा सिद्ध व्हायचा कसा ?"

जस्टिस मार्शल यांनी ज्यूरीला वॉर्डवरील आरोपाचा विचार करताना खालील तीन गोष्टी विचारांत घेण्यास सांगितले !

१ ख्रिस्तिन किलर व मॅंडी राईस या दोघीना कायदेशीरपणे वेश्या समजता येईल काय ?

२. वॉर्डला ही गोष्ट माहीत होती काय ? आणि

३. जाणूनबुजून या दोघीकडून म्हणा किंवा दुसऱ्या कोणाकडून म्हणा, वॉर्डला देहविक्रयासाठी आवश्यक त्या सुखसोयी व जागा पुरविण्याबद्दल पैसे मिळत होते काय ?

यातील तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी जस्टिस मार्शल यांनी मिस् विकी बॅरेट् या वेश्येची जबानी समजावून सांगितली. ते म्हणाले–

"मिस् बॅरेट् ही काही किलर किंवा राईस्-डेव्हिससारखी प्रसिद्धीच्या मागे लागलेली नव्हती. ती फक्त वेश्या होती. तिला मुद्दाम बनवून काही सांगण्याचे कारण नाही. तिच्या घरात पोलिसांना डायरीत डॉ. वॉर्डचा फोन नंबर मिळाला. चार जुलैला ही गोष्ट घडली. ही बाई सांगते की वॉर्ड याच्या फ्लॅटवर दोन अडीच महिने ती आठवड्यातून दोनतीन वेळा जात असे. प्रथम वॉर्डनेच तिला रस्त्यातून मोटारीत घेतली व फ्लॅटवर नेली. तिथे एक माणूस बसलेला होता. त्या माणसाबरोबर तिने रात्र घालवली. वॉर्डने तिला सांगितले की त्या माणसाकडून पैसे आधीच घेतलेले आहेत. असेच यानंतर अनेक वेळा झाले. पुष्कळ वेळा न्याय हा एखाद्या अचानकपणे पुढे येणाऱ्या पुराव्यावर द्यावा लागतो. बॅरेटची साक्ष खरी मानली तर तो एक असाच कर्मधर्मसयोगाने हाती आलेला पुरावा आहे."

जस्टिस मार्शलने खटला समजावून देणे येथे संपवले. ३० जुलै १९६३ ला जस्टिस मार्शलने हे काम सुरू केले होते.

जस्टिस मार्शल यानी या खटल्यात आरोपीवरच आरोप असिद्ध करण्याची जबाबदारी आहे अशी भूमिका जेव्हा घेतली तेव्हाच या खटल्यात वॉर्ड सुटत नाही ही गोष्ट स्पष्ट झाली.

डॉ. वॉर्ड पकडला गेल्यापासून एकाकीच पडला होता. वाल्मिकीचा तो पुनः वाल्या झाला. परतु त्याच्या जीवावर ज्या खाशा स्वाऱ्या 'सुरता'ची मजा लुटून गेल्या त्यानी वॉर्डच्या वतीने साक्ष देण्याचे नाकारले. जणू सर्वांनी त्याला वाळीतच टाकला. या विकलावस्थेत जस्टिस मार्शल यांनी जेव्हा त्याच्या खटल्याचा नेहमीच्या न्यायनियमांना अपवाद करण्याचे ठरवले तेव्हा त्याची सुटण्याची उरलीसुरली आशाही मावळली.

फक्त कायदेपडित तावातावाने सांगत होते, "वॉर्डवर गुन्हा सिद्ध करणारा एकही सबळ पुरावा पुढे आलेला नाही. 'वॉर्ड सुटणार ! वॉर्ड सुटणार !" हा कायदेपडिताचा आवाज वॉर्डला आशा दाखवीत होता. कारण आज बेअब्रूच्या धास्तीने लपून बसलेले दिवाभीत वॉर्ड सहीसलामत सुटला असता तर पुनः गोळा व्हायला कितीसा उशीर लागला असता ?

**वॉर्डची अखेर**

वॉर्डला तेवढीच आशा होती. परंतु जस्टिस मार्शल यानी तो सुटू नये असाच जेव्हा उघड डाव टाकला तेव्हा त्याच दिवशी रात्री वॉर्डने आत्महत्येचा निर्णय घेतला. तो जामिनावर अजून मोकळा होता. व आपल्या एका मित्राकडे राहात होता. Nembutal या औषधाचा बाजवीपेक्षा मोठा डोस त्या रात्री त्याने घेतला. सकाळ झाली तेव्हा वॉर्डला बेशुद्धावस्थेत हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले.

बुधवारी ३१ जुलै १९६३ ला जस्टिस मार्शल यांनी जेव्हा दुपारी आपले निवेदन संपवले तेव्हा वॉर्ड अखेरच्या घटका मोजीत होता. सेंट स्टीफन्स हॉस्पिटलमध्येच एका स्टीफनचे आयुष्य संपत आले होते.

चार तास छत्तीस मिनिटे विचार केल्यानतर ज्यूरीने आपला निर्णय दिला.

विकी बॅरेट् या वेश्येची साक्ष त्यांनी विचारात घेण्याच्या लायकीची नाही असे सांगितले. व पहिल्या दोन आरोपावरून मात्र वॉर्डला दोषी ठरवले. हे दोन आरोप म्हणजे–

(१) वॉर्ड जाणूनबुजून देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांना मदत करीत होता. या स्त्रिया म्हणजे किलर व राइस-डेव्हिस.

(२) ही मदत प्रत्यक्ष स्वरूपाची म्हणजे जागा वापरू देणे व गिऱ्हाईक पुरविणे अशा स्वरूपाची होती.

ज्या दोन आरोपातून वॉर्डची ज्यूरीने मुक्तता केली ते आरोप म्हणजे–

(३) जर मदत दिलेल्या स्त्रिया देहविक्रय करतात ही गोष्ट वॉर्डला ठाऊक नसती तर अशी मदत त्याने केली नसती.

(४) अशा मदतीबद्दल वॉर्डला त्या स्त्रियांकडून पैसे मिळत होते. म्हणजे जो शक्याशक्यतेचा नवा निकष (Balance of probability) फक्त याच खटल्याला जस्टिम मार्शल यानी लावला त्याच निकषावर फक्त वॉर्ड दोषी ठरला.

याचा अर्थ स्पष्ट आहे. वॉर्डवर नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत !

याचा परिणाम असा झाला की काहीसे हौतात्म्य मृत्युनतर वॉर्डला लाभले. एखाद्या माणसाला तुरुंगात डाबायचेच अशी सूडाची भावना ठेवून इंग्लिश न्यायात सोईस्कर बदल करून वॉर्डचा काटा काढण्यात आला असा समज सर्वत्र पसरला.

परंतु कागदोपत्री अखेर वॉर्ड निर्दोषीच राहिला आहे. ३ ऑगस्ट १९६३ वॉर्ड सेट स्टीफन इस्पितळात तो पुनः शुद्धीवर न येताच मरण पावला. ज्यूरीने त्याला दोषी ठरवल्याचेही त्याला कळले नाही आणि न्यायमूर्तींना त्याला दोषी ठरवता आले नाही. ज्यूरीने निकाल दिल्यावर कोर्टाने निकाल राखून ठेवला होता. कोर्टाने निकाल दिला नाही.

"आरोपी मयत; ३ ऑगस्ट १९६३; सबब खटला संपला." असा शेरा मारून कोर्टाने वॉर्डच्या नाटकावर अखेरचा पडदा टाकला.

**बाजारी संस्कृतीची लक्तरे**

–अखेर वॉर्ड हा कोण होता ? जी बाजारी आणि भोगप्रधान संस्कृती हळू हळू सर्व शहरी जीवनाचा कबजा करीत आहे त्याचेच वॉर्ड हा अपत्य होता. शहरात एका बाजूने पैशाचे पाट वाहात

असतात आणि दुसऱ्या बाजूला जीवनासाठी धडपडणारे सामान्य जीव लव्हाळ्यांसारखे नांदत असतात. जीवनाच्या संघर्षांत यातलीच वाट चुकलेली माणसे वरच्या सुखासीन थरात शिरण्यासाठी आपल्या जवळची सर्वांत महत्त्वाची जीवनमूल्ये विकायला काढतात. विलासी जीवनाकडे सुबत्तेचा ओढा साहजिकच असतो. मग यातूनच अशा 'वाट चुकलेल्यांचे' पोषण सुरू होते. 'गरज तसा पुरवठा' आणि जसा पुरवठा तशी गरजही वाढू लागते.

फक्त लंडनमध्येच किलर, राईस–डेव्हिस आहेत का? पॅरिस, न्यूयॉर्क, टोकियो, रोम, दिल्ली, कलकत्ता, मुंबई––जगातील सर्व प्रमुख शहरांत अशा मुली शेकड्यांनी आहेत. आणि त्या चालू काळात असणारच! म्हणूनच 'वॉर्ड' हाही अशा समाजात राहणारच. एकवेळ हातभट्टी बंद करता येईल. परंतु वॉर्डचे अस्तित्व नाहीसे करता येणार नाही.

परंतु अशी काही सामाजिक पापे असतात की जी उघडपणे मान्य करणे हे रूढ संकेतात बसत नाही. म्हणूनच वॉर्डच्या अस्तित्वापेक्षा, तो आहे हे जाहीर झाले याचेच दुःख इंग्लिश लोकांना अधिक झाले. आणि सर्वांनी त्याला धिक्कारले.

वॉर्डला काहीही करून तुरुंगांत डांबायचेच असे न्यायासनाने ठरवले होते असे सिद्ध करणारी आणखी एक घटना घडलेली आहे. वॉर्डचा खटला चालू असताना गॉर्डनचे वरिष्ठ न्यायालयातील अर्ज न्यायासनाने स्वीकारले व नऊ–दहा मिनिटांत गॉर्डनला निर्दोषी सोडले. कारणे काहीही देण्यात आली नाहीत. किलरच्या साक्षीवर गॉर्डन तुरुंगात गेला होता व ही साक्ष विचारात घेऊ नये असा गॉर्डनचा दावा होता. हे चटावरचे श्राद्ध का उरकण्यात आले? वॉर्डखटल्याचा निकाल लागेपर्यंत हा निर्णय मागे का ठेवण्यात आला नाही? याला उघड कारण दिसते ते असे की गॉर्डनला ज्यांच्या साक्षींवरून शिक्षा झाली त्यांच्याच साक्षी वॉर्डखटल्यात झाल्यामुळे या साक्षीदारांवर कदाचित् वॉर्डची ज्यूरी अधिक विश्वास दाखवण्याचा संभव होता. या साक्षीदारांनी वॉर्डविरुद्ध कसलाच प्रत्यक्ष पुरावा दाखल केलेला नव्हता. या खटल्याचा हायकोर्टातील अर्ज याच उद्देशाने घाईघाईने निकालात काढण्यात आला.

कारण आता न्यायासनाला, स्कॉटलंड यार्डला वॉर्ड व किलर यांची चित्रे अधिकाधिक बदनाम करून शासनाच्या प्रतिष्ठेचे तडे बुजविण्याचे नाटक करावयाचे होते. पोलिस–खाते व न्यायखाते हे शासनाधिकाऱ्यांना खूष करण्याकरता असे प्रयत्न वारंवार करते, हे सर्वांच्या परिचयाचे आहेच.

वॉर्ड मातीआड झाला. मॅकमिलन पंतप्रधानकीला मुकले. प्रोफ्युमो बदनाम झाला, परंतु या प्रकरणातील कुठला भाग समजूतदार सामान्य माणसाला चिंतनीय वाटतो?

## एक चाचणी

याकरता इंग्लंडमध्ये एक प्रयत्न झाला. निवडणुकीपूर्वी 'गॅलप् पोल' घेऊन जसे वारे कोणत्या दिशेने वाहते आहे हे अजमावतात, तशाच तऱ्हेचा हा प्रयत्न होता. २५ ते ३५ वयाच्या काही मध्यमवर्गीय पुरुष इंग्लिश नागरिकांना खालील प्रश्न विचारण्यात आले!

(१) प्रोफ्युमो प्रकरण काय होते?

या प्रश्नाचे उत्तर देताना उत्तर देणाऱ्याला या प्रकरणात गुंतलेल्यांची नावे लिहिण्यास सांगितले होते. या उत्तरात अनेक लोकांनी प्रोफ्युमोचे नावच दिले नव्हते. परंतु किलरचे नाव मात्र एकहीजण विसरला नव्हता. याचा अनुक्रम असाच होता–किलर–वॉर्ड–प्रोफ्युमो. यानंतरमग विग्, विल्सन, मॅकमिलन, ॲस्टर या मंडळींची नावे होती.

हॉस्पिटलकडे नेताना –वॉर्ड



Violent pleasures– violent ends!

(२) प्रोफ्युमोचा महत्त्वाचा गुन्हा नेमका काय होता?

प्रोफ्युमोने तीन गुन्हे केले होते. एक त्याने युद्धमंत्री असून संरक्षण प्रश्नाकडे जागरूकपणे पाहिले नाही. दुसरे, त्याने किलरशी विवाहबाह्य संबंध ठेवले आणि तिसरा गुन्हा, तो पार्लमेंटपुढे खोटे बोलला. यात महत्त्वाचा गुन्हा कोणता असा प्रश्न होता. ऐंशी टक्के लोकांनी त्याने पार्लमेंटला बनवले व खोटे निवेदन केले हाच महत्त्वाचा गुन्हा होता असे उत्तर दिले. फक्त आठ टक्के लोकांनी त्याच्या विवाहबाह्य संबंधाला अधिक महत्त्व दिले.

हा अभ्यास अतिशय बोलका आहे. प्रोफ्युमो प्रकरणांत महत्त्व आले ते ख्रिस्तिन किलरला. ते सुद्धा तिच्याशी प्रोफ्युमोचे विवाहबाह्य संबंध होते एवढ्याच कारणाने नाही तर तिचे एकंदरीत आयुष्य रंगीत होते म्हणून. यामुळे किलर–वॉर्ड हीच या प्रकरणाची नायकनायिका झाली.

दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर फारच स्पष्ट आहे. फक्त आठ टक्के लोकांना आज व्यक्तिगत चारित्र्याबद्दल कटाक्ष ठेवावासा वाटतो. ऐंशी टक्के लोकांचे म्हणणे असेच आहे की हा प्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न आहे. यापेक्षा सार्वजनिक जीवनात अधिक महत्त्व आहे ते सचोटी आणि प्रामाणिकपणाला!

परंतु व्यक्ती जेव्हा सार्वजनिक हितासाठी जगण्याचा दावा सांगते तेव्हा तिच्या व्यक्तिविश्वाच्या कक्षा अपरिहार्यपणे बहुजनहिताच्या कक्षेत गुरफटलेल्या आहेत ही गोष्ट त्यांनी नजरेआड करता कामा नये. याचा विसर एखाद्या जबाबदार माणसाला पडला तर त्याला शासन करण्याइतका कणखरपणा देशात असला पाहिजे.

प्रोफ्युमोची शोकांतिका अटळ होती. वॉर्ड कसलेही जीवन जगला असता तरी त्याचा बहुजनहिताशी दूरान्वयानेच काय संबंध असेल तेवढाच! परंतु प्रोफ्युमो लोकप्रतिनिधी असून जनतेच्या हिताहिताशी

घोक्याचा खेळ खेळू लागला होता. विल्सन यांनी सुरक्षाप्रश्नावर प्रोफ्युमो प्रकरण हाताळले याचा अर्थ हाच होता की मंत्रिपदाचे पथ्य हा पाळीत नाही म्हणून याला हाकलला पाहिजे.

प्रोफ्युमो आणि मॅकमिलन हे लोकशाहीप्रणीत राज्यशासनाच्या इतिहासाचे विषय होते म्हणून ही हकीगत विस्ताराने मांडली. किलर-वॉर्ड यांचेवर एखादी सनसनाटी कादंबरी किंवा चित्रपट मात्र सहज निघू शकेल. त्यांची चरित्रे रंगीत आहेत, परंतु ती काही इतिहासाचा विषय नाहीत.

या प्रकरणी इतिहासजमा झाले ते प्रोफ्युमो आणि मॅकमिलन ! जगातील सगळ्या देशांत आता मंत्री हा प्राणी आहे. यातही अनेक प्रोफ्युमोच्याच रोगाने पछाडलेले असतील. इस्पितळ निराळे पण 'वॉर्ड' तोच असेल. किलर तर हजारो शहरांतून शेकड्यांनी वावरत असतील. मंत्रिवरांना म्हणत असतील, आमचेही अगत्य असो द्यावे ! !

• • •



## घरट्यात एक वर्ष राहणारी मुले—

ब्युनॉस आयर्स— एका हरवलेल्या मुलाचे पक्ष्यात रूपांतर झाल्याच्या भारतीय दंतकथेची आठवण करून देणारी एक घटना नुकतीच येथे घडली. ब्युनॉस आयर्स प्रांताची राजधानी असलेल्या ला–प्लाटा शहराच्या मध्यवस्तीत तीन मुलांनी झाडावर एक 'घरटे' बांधून त्यात एक वर्ष काढले असे अधिकृतरीत्या समजते.

या तीन मुलांना त्यांचे आई–बाप बूट पॉलिश करणे, भीक मागणे वगैरे कामे करावयास लावून मुलांच्या कमाईवर जगत असत. तेव्हा त्या ११, १२, १३ वर्षे वयाच्या मुलांनी लोखंडी पट्ट्या, वर्तमानपत्रे वगैरेच्या साहाय्याने एका झाडावर 'घरटे' बांधले. आणि ती तिघेही त्यात कालक्रमणा करू लागली. स्थानिक नगरपालिकेच्या अधिकाऱ्याला हे घरटे दिसले होते. पण हलगर्जीपणामुळे त्याने ती घटना एक वर्षानंतर वरिष्ठ अधिकाऱ्याला कळविली आणि या गोष्टीवर त्यामुळे प्रकाश पडला. सध्या ही तिघेही मुले शिशुकल्याण अधिकाऱ्याच्या ताब्यात असून त्या मुलांच्या पालकावर मुलांची हेळसांड केल्याचा आरोप ठेवण्यात आलेला आहे. या प्रकरणाची रीतसर चौकशी चालू आहे.

एम्. एम्. सुरतकर

# गंगाजळी

## सॉक्रेटीस, गर्जना आणि बरसात

सॉक्रेटीस या महान तत्त्ववेत्त्याचा स्वभाव अतिशय शांत असला तरी त्याची पत्नी मात्र विलक्षण कर्कशा होती. दिवसभर सारखे तिचे तोंड कडाडत असे. आणि सॉक्रेटीस तितक्याच शांतपणे तिचे ऐकून घेत असे.

एकदा अशीच ती चिडली होती. खूपवेळ ती सॉक्रेटीसला तोंड सोडून बोलली. सॉक्रेटीस मात्र विलक्षण शांतपणे बसला होता; त्यामुळे ती अधिकच चिडली. आणि अखेर तिचा तोल सुटून तिने पाण्यानें भरलेला घडा सॉक्रेटीसच्या डोक्यावर आदळला.

"हां ! बरोबर आहे," तोंडावरचे पाणी निपटीत सॉक्रेटीस तितक्याच थंडपणे म्हणाला, "खूप गरजल्यानंतर थोडंसं बरसायलाही हवंच !"

*

## मोलाची रायबहादुरी

'गोदान' आणि 'गबन' यांसारख्या अमर कलाकृती निर्माण करणारे विख्यात लेखक मुन्शी प्रेमचंद यांना ब्रिटिश सरकारने 'रायबहादूर' हा सन्मानाचा किताब द्यायचे ठरवले. प्रेमचंदांना खास सरकारी सहीशिक्क्यानिशी तशा अर्थाचे पत्र गेले. आता काय करावे, असा प्रश्न प्रेमचंदांसमोर उभा राहिला. कारण त्या काळात स्वातंत्र्याची चळवळ भारतीयांच्या घराघरात पोचलेली होती.

प्रेमचंदांची विचारमग्न मुद्रा पाहून त्यांच्या पत्नीने विचारले, "काय झालं ?"

"सरकारनं मला रायबहादुरी द्यायचं ठरवलंय्" प्रेमचंद म्हणाले.

"नुसतीच रायबहादुरी की आणखीहि काही ?" त्या माऊलीने सरळसरळ व्यवहारी प्रश्न केला.

"आणखीहि काही !" प्रेमचंद म्हणाले.

"मग त्यांत एवढं विचार करण्यासारखं काय आहे !" प्रेमचंदांची पत्नी आनंदाने म्हणाली, "होकार कळवून टाका सरकारला."

"कसा कळवू ?" प्रेमचंद म्हणाले, "सरकारची रायबहादुरी घेतली की जनतेची रायबहादुरी मिळणार नाही, आणि जनतेने दिलेली रायबहादुरी सरकारी पदव्यांपेक्षा लाखपटीने मोलाची आहे."

आणि त्याच दिवशी प्रेमचंदांनी सरकारी सन्मान नाकारणारे उत्तर सरकारकडे रवाना केले.

●

MANOOS MAGAZINE February 1964 : ONE RUPEE R. N. B 9304


# चिरंजीव किती ?

अश्वत्थामा, बलि, व्यास, हनुमान,
बिभीषण, कृप, परशुराम एवढे सातच नाहीत !
मराठी साहित्यात असे आणखी एक नाव आहे
की जे चिरंजीव आहे.

## कादंबरीकार

# हरिभाऊ आपटे

या ज्येष्ठ व श्रेष्ठ मराठी कादंबरीकाराच्या
जन्मशताब्दिनिमित्ताने
'माणूस'चा एप्रिल १९६४ चा अंक

## 'हरि नारायण आपटे – विशेषांक'

म्हणून २० मार्च १९६४ ला प्रसिद्ध होईल.

**या अंकात—**

हरिभाऊंच्या करुणोदात्त जीवनावरील
मराठीतील एका चतुरस्र लेखकाची

# हरि नारायण

ही संपूर्ण कादंबरी येत आहे.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रायव्हेट लि., ३८३ नारायण पेठ, पुणे, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **संपादक : श्री. ग. माजगावकर**